कविकुलगुरु - कालिदास - संस्कृत - विश्वविद्यालयः

This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

M-2882

शिर्षक	ग्रंथकार	विषय	विस्तार (पुर्ण/ अपूर्ण)	टिकाकार	आकार	पृष्ठे	लिपी	सामग्री	Lines per page	Letters per line	Condition & age (शके/विक्रम सवंत)	Additional Particulars / Remark
भक्तिमालामृत	बापुशास्त्री नंदुरबारकर	काव्य भक्ती	पूर्ण	–	३/12	७९५	मराठी	कागद	15	47		

प्रस्तावना.

आलिकडे लोकांत संस्कृत, प्राकृत, हिंदुस्थानी आदिकरून बहुतेक ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. तशाच प्रकारचा हा एक ग्रंथ महानुभवी ईश्वरपरायण प्रेमस्निग्धांतःकरण श्रीनाभाजी यांनीं भक्तगुणानुवाद आपण गावे आणि लोकांकडूनही गाववावे, ह्मणून व सार्वकाल भवसमुद्रामध्यें बुडणाऱ्या लोकांच्या उद्धारार्थ केला, आणि याचें नांव भक्तमाला असें ठेविलें. हा हिंदुस्थानी भाषेनें मूलछप्पाछंदांत तात्पर्यरूपानें केला आहे. तो संक्षिप्त असल्यामुळें दुर्बोध, याकरितां त्यावर मूलकवितरूप टीका श्रीमत्प्रियादास यांनीं लोकांना शीघ्र बोध व्हावा ह्मणून त्याच (हिंदुस्थानी) भाषेंत केली आहे. तथापि ही भाषा न जाणणाऱ्या आबालवृद्धांनासुद्धा या ग्रंथाची मातब्बरी समजून यांतील भक्तांच्या प्रेमळ व मधुर कथा समजाव्या, याकरितां श्रीमार्तंड बुवा यांनीं भक्तिप्रेमामृत नामक हा ओवीबद्ध टीकाग्रंथ केला. तो आह्मी मोठ्या प्रयत्नानें खानदेशस्थ तळोदेग्रामवासी श्रीखंडूबुवा महाराज यांच्या द्वारा संपादन करून छापून प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथांतील हिंदुस्थानी अंश प्रासादिक आहे हें तावडतोब समजावें ह्मणून त्याचे निरनिराळे शब्द तोडून यथामति शुद्ध करून त्याच्या आरंभीं व शेवटीं भ्रांति न व्हावी ह्मणून थोडथोडी जागा सोडिली आहे; त्यावरून लोकांच्या लक्षांत सहज येईल. ग्रंथ फार मोठा आहे, याचा प्रत्येक छप्पा निरनिराळा छापिला असतां घेणारांस जड जाईल; याकरितां एक संपतांच दुसरा अशा क्रमानें छापिले आहेत. या कामांत रा० रा० माधवराव वाडेकर, रा० रा० शंकर हरि डाक्टर वगैरे मंडळी यांनीं फारच मदत केली. त्यांचे उपकार माझ्यानें प्रसिद्ध केल्यावांचून राहवत नाहीं. ग्रंथ छापतेवेळीं नजरचुकीमुळें स्थलविशेषीं जे दोष घडले असतील ते हंसक्षीरविवेचनन्यायानें टाकून सारग्राही विद्वज्जन यांतील गुण घेवोत अशी त्यांस प्रार्थना आहे.

बापुशास्त्री नंदुरबारकर.

अथ भक्तमालाअनुक्रमणिका ॥

छप्पा.	भगवद्भक्तांचीं नांवें.	पत्र.
१	मंगलाचरण, प्रियादासांस टिकेची आज्ञा, कवितरचनेचें वर्णन, शृंगाररसहित भक्तिवर्णन, पंचरसवर्णन, भक्तितरूचें वर्णन, छप्पारचनेचें वर्णन, भक्तमालमहात्म्य, नाभाजीकृतमंगलाचरण, भक्तिमाळ करण्याची आज्ञा, नाभाजीची जन्मकथा, व, दशावतारांचें मंगलाचरण.	१
२	रामचरणचिन्हवर्णन.	६
३	शिव व अजामेळाचें चरित्र.	७
४	जयविजयांचें च०	९
५	हनुमंत, बिभीषण, शबरी, जटायू, अंबरीष, विदुर, सुदामा, चंद्रहास, मैत्रेय, चित्रकेतु, कुंती व द्रौपदीचें च०	११
६	श्रुतदेवाचें चरित्र.	२७
७	वाल्मिक, श्वपचवाल्मिक, रुक्मांगद, मुचकुंद, चंद्रभागा, हरिश्चंद्र, सुरथसुधन्वा, शिबि, भरतदधीचि, विंध्यावली, मयूरध्वज, व अलर्कांचें च०	२८
८	रंतिदेव व गुहकाचें च०	३६
९	नवयोगेश्वरांचें चरित्र.	३८
१०	परिक्षिती, शुकाचार्य, प्रऱ्हाद, अक्रूर, व बळीचें च०	,,
११	हरिप्रसादरसज्ञनामावळी.	४१
१२	ध्याननिष्ठभक्तनामावळी.	,,
१३	अष्टादशपुराणांची नामावळी.	,,
१४	अष्टादशस्मृतींची नामावळी.	,,
१५	रामसचिवनामावळी.	४२
१६	रामसहचरनामावळी.	४२
१७	नवनंदनामावळी.	,,
१८	हरिप्रियगोपगोपीनामावळी.	४३
१९	कृष्णअनुगनामावळी.	,,
२०	सप्तद्वीपस्थ भक्तांस नमन.....	,,
२१	नवखंडांतील देवभक्तनामावळी.	४४
२२	श्वेतद्विपस्थभक्तांचें च०	,,
२३	अष्टमहानागनामावळी.	४५
२४	चतुर्व्यूहमहाभक्तमहिमा व निंबादित्यचरित्र.	४६
२५	चारीसांप्रदाय व श्रीसंप्रदायवर्णन.	,,
२६	बाहत्तरअनुजसंप्रदायउत्पत्ति व [illegible]मानुज च०	४७
२७	रामानुजाच्या चार गुरुबंधूंच [illegible] मावळी	४

छप्पा.	भगवद्भक्तांचीं नांवें.	पत्र.
२८	लालाचार्य च०	४९
२९	पादपद्माचार्य च०	५१
३०	रामानुजशिष्यपरंपरा.	५२
३१	रामानंदाच्या शिष्यांची नामावळी.	५३
३२	अनंतानंदाचे शिष्यांची नामावळी व श्रीरंगसरावगी च०	,,
३३	पयहारी कृष्णदास व नेपाळचा राजाचें चरित्र.	५४
३४	पयहारीचे शिष्यांची नामावळी.	५७
३५	सुमेरदास व कील्हदासाचें च०	,,
३६	अग्रदासाचें च०	५९
३७	शंकराचार्यांचें च०	६०
३८	नामदेवचरित्र.	६१
३९	जयदेवचरित्र.	६८
४०	श्रीधरचरित्र.	७७
४१	बिल्वमंगलचरित्र.	७८
४२	विष्णुपुरी.	८२
४३	ज्ञानदेव, त्रिलोचनवाणी व वल्लभाचार्यचरित्र.	८३
४४	उग्रसेनराय, नाटकवाला व रतीवंतीबाईचें चरित्र.	८९
४५	पुरुषोत्तमराय, कर्माबाई, सिलपिल्ल, उभयबाई, जमीदारकन्या, नृपकन्या, पतिप्रीत्यर्थ पुत्रास विषदिलें व सत्संगार्थ पुत्रास विष दिलें.	९१
४६	महाजन, हंसभक्त व महाजनसदावर्तीचें चरित्र.	९९
४७	भुवनचव्हान, चतुर्भुजपंड्या, कर्मध्वज, जयमल्लराय, ग्वालभक्त व श्रीधराचें च०	१०५
४८	हरिपाल, साक्षीगोपाळ, उभयविप्र, व डाकूरचे रामदासबुडानाचें च०	११२
४९	जसुस्वामी, नंददास, आल्हुभक्त व वारांगनांचें चरित्र.	११७
५०	राममध्यस्थिकेलेला विप्र.....	१२१
५१	भागवतराजाचें च०	१२२
५२	अंतर्निष्ठराजाचें च०	१२३
५३	गुरुनिष्ठावर्णन.	१२४
५४	रोहिदासचरित्र.	१२५
५५	कबीरचरित्र.	१३०
५६	पिपाजीरायाचें च०	१३७
५७	धनाजाटाचें च०	१६२
५८	सेनानापिक च०	१६५
५९	सुखानंदजीचें च०	१६६
६०	सुरसुरानंदाचें च०	,,
६१	सुरसुरीबाईचें च०	१६७
६२	नरहरियानंदाचें च०	,,
६३	पद्मनाभाचें च०	१६८
६४	तत्वाजीवाचें च०	१६९
६५	माधवदासचरित्र.	१७१
६६	रघुनाथगुंसाईचें च०	१७९
६७	नित्यानंद व महाप्रभुकृष्णचैतन्य च०	१८०
६८	सुरदासजीचें च०	१८१
६९	परमानंदाचें च०	१८२
७०	केशवभट्टजीचें च०	,,
७१	श्रीभट्टकवीचें च०	१८६
७२	हरिव्यासाचें च०	,,
७३	दिवाकरभट्टाचें च०	१८८

छप्पा.	भगवद्भक्तांचीं नांवें.	पत्र.
७४	विठ्ठलनाथजी व त्रिपुरदास च०	१८८
७५	विठ्ठलनाथांच्यापुत्रांचें च०	१९०
७६	कृष्णदासाचें च०	,,
७७	श्रीवर्धमानमंगलच०	१९४
७८	खेमगुंसाईच०	,,
७९	विठ्ठलदासांचें च०	,,
८०	हरिरामहटिले च०	१९८
८१	कमलाकरभट्टजींचें च०	१९९
८२	नारायणभट्टजींचें च०	,,
८३	वल्लभकथ्थकाचें च०	२००
८४	रूपसनातनचरित्र.	२०१
८५	हरिवंशजीचें च०	२०७
८६	हरिदासांचें च०	२०९
८७	व्यासजीचें च०	२१२
८८	जीवगुंसाइजीचें च०	२१९
८९	गोपालभट्ट, अलिभगवानजी, विपुलविठ्ठल, लोकनाथ, मधुगुंसाइजी, थानेश्वरी, कृष्णदासब्रह्मचारी, कृष्णदासपंडित व भूगर्भगुंसाईचें च०	२२०
९०	रसिकमुरारीचरित्र.	२२४
९१	सदनाकसाई व काशीश्वरगुंसाई च०	२२९
९२	खोजीजू व राकाबंकाच०	२३२
९३	लड्डुभक्त, संतभक्त व त्रिलोकसोनारच०	२३५
९४	घाटमाचें च०	२३८
९५	भक्तिपालकभक्तनामावळी.	२३९
९६	प्रतापरुद्राचें च०	२४०
९७	गोविंदजीचें च०	,,
९८	चतुर्भुजसंत, गुंजामाळी व साची सून यांचें च०	२४४
९९	गणेशदेराणीचें च०	२४६
१००	नरवाहनच०	२४८
१०१	गोपाळदासच०	२४९
१०२	लाखाभक्तच०	२५०
१०३	नरसीमेहसाचें चरित्र.	२५४
१०४	जसोधरच०	२७०
१०५	नंददासच०	२७१
१०६	जनगोपाळचरित्र.	,,
१०७	माधवदासच०	,,
१०८	अंगदभक्तचरित्र.	२७२
१०९	चतुर्भुजच०	२७७
११०	मीराचरित्र.	२८०
१११	प्रथीराय व अंधविप्रच०	२८५
११२	जैमल्ल व मधुकर्षराजाचें च०	२८८
११३	खेमालरतनराजाचें च०	२९०
११४	रामरैनीराजाचें च०	२९१
११५	रामरैनीच्या स्त्रीचें चरित्र.	२९२
११६	किशोरदासाचें च०	२९२
११७	हरिदासराजाचें च०	२९४
११८	चतुर्भुजच०	,,
११९	कृष्णदासकवि च०	२९७
१२०	संतदासच०	,,
१२१	सुरदासमदनमोहनच०	२९८
१२२	कासायनीचें च०	३०१
१२३	मुरारिदासाचें च०	३०२
१२४	तुळसीदासाचें च०	३०४
१२५	मानदासच०	३१०
१२६	गिरिधरनाथच०	३११

छप्पा.	भगवद्भक्तांचीं नांवें.	पत्र.
१२७	गोकुलनाथच०	३११
१२८	बनवारीचें च०	३१३
१२९	मिश्रश्रीनारायणदासाचें च०	,,
१३०	राघवदासाचें च०	३१४
१३१	हरिदासजीचें च०	,,
१३२	परशरामजीचें च०	३१५
१३३	गदाधरभटजीचें च०	३१६
१३४	कर्मानंदाची, आल्हुकोल्हुची व नारायणदासाची कथा.	३२०
१३५	पृथ्वीरायाचें च०	३२५
१३६	सिवाकाबाचें च०	३२६
१३७	रत्नावतीचें च०	३२७
१३८	जगन्नाथविप्राचें च०	३३६
१३९	मथुरादासाचें च०	,,
१४०	नृतकनारायणदासाचें च०	३३७
१४१	हरिगुणविशदकरणार भक्तनामावळी.	३३९
१४२	जैतारनविदुराचें च०	,,
१४३	स्वामी चतुरोनगनाची कथा.	३४०
१४४	केवळाचें चरित्र.	३४२

छप्पा.	भगवद्भक्तांचीं नांवें.	पत्र.
१४५	अग्रदासाचे शिष्यांची नामावळी	३४६
१४६	लाहांचे शिष्यांची नामावळी.	,,
१४७	कान्हरभक्तच०	,,
१४८	निंबाखेताची कथा.	३४७
१४९	तुंबरभगवानच०	,,
१५०	जैमालभक्ताचें च०	३४८
१५१	हरिदासवाणीचें च०	३४९
१५२	गोपाळदासविष्णुदासाचें च०	३५०
१५३	किल्हदासाचे शिष्यनामावळी.	३५२
१५४	नाथभट्टाचें च०	,,
१५५	कर्मेतीबाईचें च०	,,
१५६	खड्गसेनाचें च०	३५६
१५७	गंगाग्वालाचें च०	३५७
१५८	सोतीभक्ताचें च०	३५८
१५९	लालदासाचें च०	,,
१६०	माधवग्वालाचें च०	३५९
१६१	प्रयागदासाचें च०	,,
१६२	प्रेमनिधीचें च०	,,
१६३	राघवदासाचें च०	३६२

छप्पा.	भगवद्भक्तांचीं नांवें.	पत्र.
१६४	संतसेवकनामावळी.	३६३
१६५	हरिभक्तिणी स्त्रियांची नामावळी.	,,
१६६	कन्हरदासच०	,,
१६७	केशवलटेरेच०	३६४
१६८	केवलरामाचें च०	,,
१६९	आसकरनराजाचें च०	३६५
१७०	हरिवंशजीचें च०	३६७
१७१	कल्याणदासाचें च०	३६८
१७२	विठ्ठलदासाचें च०	,,
१७३	संतसन्मानीभक्तनामावळी.	,,
१७४	हरिदास, जगदेव व हरिदासबंधु गोविंदजी च०	३६९
१७५	कृष्णदाससोनाराचें च०	३७२
१७६	प्रबोधानंदाचें च०	३७३
१७७	द्वारकादासाचें च०	,,
१७८	पूर्णदासाचें च०	३७४
१७९	लक्ष्मणभटजीचें च०	,,
१८०	कृष्णदासाचें च०	,,
१८१	गदाधरीदासाचें च०	३७५

छप्पा. भगवद्भक्तांचीं नांवें. पत्र.
१८२ नारायणदासाचें च० .... ३७७
१८३ भगवानदास, मीरमाधव व रसाखानच० ३७८
१८४ कल्याणसिंहाचें च० .... ३८०
१८५ सोभूरामाचे बंधू माधवदास यांचें च० ३८१
१८६ आत्मारामजीचें च० .... „
१८७ गोविंददासाचें च० .... „

छप्पा. भगवद्भक्तांचीं नांवें. पत्र.
१८८ ज़गतसिंहाचें च० .... ३८२
१८९ गिरिधरग्वालाचें च० .... ३८३
१९० गोपालीबाईचें च० .... ३८४
१९१ रामदासाचें च० .... „
१९२ रामरायजीचें च० .... ३८५
१९३ भगवंतदास व माधवदासाचें च० .... „

छप्पा. भगवद्भक्तांचीं नांवें. पत्र.
१९४ लालमतीचें च० .... ३८८
१९५ संतथोरपणाचा निर्णय. .... „
१९६ संतांचेहरीप्रीतीचें वर्णन. .... „
१९७ फळश्रुतिकथन. ३८९
१९८ दामोदरस्वामी व खंडोबाचरित्र. ३९२

एकंदर कथा भक्तांच्या ३०३.

॥ इति भक्तमाला अनुक्रमणिका समाप्त ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ माझासद्गुरूपरमदयाळ ॥ ज्यातेंदीनाचीबहूकळवळ ॥ माझेनिमुखेंभक्तमाळ ॥ वदविलीअधिकारनसतांकांहीं ॥ १ ॥ आतांतयाचेचिकृपेकरून ॥ भक्तमालेचेंमाहात्म्यपूर्ण ॥ निजमुखानेंकरितोंकथन ॥ मूलतयाचेंपरिसिजे ॥ २ ॥ प्रियादासजीचेपौत्र ॥ वैष्णवदासनामेंपवित्र ॥ तेहींमाहात्म्यवर्णिलेंस्वतंत्र ॥ चोपाईछंदेंकरूनी ॥ ३ ॥ त्यावरीहीकरितोंटीका ॥ महाराष्ट्रभाषेकरूनिदेखा ॥ जीऐकतांचिप्रीतीसम्यका ॥ भक्तिमालेवरीउपजतसे ॥ ४ ॥ ॥ मू०दो० ॥ श्रीनारायणदासज्जु किनी भक्तकि माल ॥ पुनि ताकी टीका करी प्रियादास सुरसाल ॥ १ ॥ ॥ टी०ओ ॥ नाभाजीहेचिनारायणदास ॥ भक्तमालयेहींकेलीसुरस ॥ पुन्हात्यावरीप्रियादास ॥ परमरसाळटीकाकरी ॥ ५ ॥ ॥ मू०दो० ॥ ताको साधुनको कहे कहत महातमबानि ॥ लै ग्रंथनि मत अधुनिक न रचे रसकी खानि ॥ २ ॥ ॥ टी०ओ० ॥ मोठेमोठेमहात्मेजाण ॥ आपुल्यावाणीकरूनपूर्ण ॥ ज्यासाधूंचेंकरितीवर्णन ॥ त्यांसीचयेहींगाइलें ॥ ६ ॥ थोरथोरांच्यामतेंकरून ॥ निर्मिलीहेरसाचीखाण ॥ आधुनिकग्रंथांचेंमतघेऊन ॥ नाहींरचिलीहेभक्तिमाला ॥ ७ ॥ ॥ मू०दो० ॥ भक्तनकी महिमा कही कपिल ऋषभ भगवान् ॥ नारायण अरु सौनिकजन मे कहा करू बखान ॥ ३ ॥ ॥ टी०ओ० ॥ भक्तजनांचेंमाहात्म्यसत्य ॥ वर्णिलेंश्रीमद्भागवतांत ॥ कपिलमुनीतृतीयस्कंधांत ॥ निजमुखेंगायनकरितेझाले ॥ ८ ॥ पंचमस्कंधींऋषभदेव ॥ संतांचेंमाहात्म्यवर्णितीअपूर्व ॥ एकादशस्कंधींबहुतआव ॥ संतांचेंवर्णनकरिताकृष्ण ॥ ९ ॥ नवमस्कंधींनारायण ॥ अहंभक्तपराधीन ॥ दुर्वासासीकरीनिवेदन ॥ निजभक्तांतेंवर्णोनियां ॥ १० ॥ प्रथमस्कंधींशौनकादिक ॥ सूतवक्त्याचेंकरोनिकौतुक ॥ संतांचेंमाहात्म्यगाइलेंसम्यक ॥ यापरीवर्णिलेथोरथोरीं ॥११॥ कपिलआणिऋषभजाण ॥ श्रीकृष्णआणिनारायण ॥ शौनकादिकहीसंतांचेंकरितीगायन ॥ तेथेंमीकायकरूंवर्णना ॥ १२ ॥ ॥ मू०दो० ॥ सबसंसार सुआरसी जनमहिमा प्रतिबिंब ॥ रतिदृगबिन सूझे नही ज्यो अंधेको बिंब ॥ ४ ॥ ॥ टी०ओ० ॥ हातोंसकळहीसंसार ॥ केवळदर्पणअसेसुंदर ॥ यांतसज्जनमहिमाअपार ॥ प्रतिबिंबितवसतसे ॥ १३ ॥ हरीचेठाईंरतीजाण ॥ हेचिपाहिजेदृष्टीपू

र्ण ॥ संतमहिमायादृष्टीविण ॥ नदिसेजेवींसूर्यअंधा ॥ १४ ॥ ॥ मू०दो० ॥ ओरशास्त्रके श्रवणको अतिफल हरि निर्धार ॥
सो याके श्रोता अहो महिमा अगम अपार ॥ ५ ॥ ॥ टी०ओ० ॥ इतरशास्त्रश्रवणाचेंफल ॥ अतिशयेंनिर्धारेंहरीचकेवळ ॥ तो
चिश्रीहरितमालनीळ ॥ भक्तिमालेचामुख्यश्रोता ॥१५॥ यावरोनिऐसेंवाटतेंसार ॥ याचामहिमाअगम्यअपार ॥ त्रिभुवनींज्याचेंभाग्य
थोर ॥ होयतोअधिकारीश्रवणाचा ॥ १६ ॥ ॥ मू०दो० ॥ भयो चहे हरिपातिको सोई सुनि हरिखाई ॥ तहां दोइ इतिहास
हैं सुनियो चित्त लगाई ॥ ६ ॥ ॥ टी०ओ० ॥ श्रीहरीच्यानिजपंक्तींत ॥ जोकोणीजनहोऊंइच्छित ॥ तोचिहोवोनिआनंदयुक्त ॥
होईलसादरश्रवणासी ॥ १७ ॥ यामाहात्मींदोनइतिहास ॥ चित्तकरोनियांसावकाश ॥ श्रवणकरावेपरमसुरस ॥ असतीतेकथनकरितों
कीं ॥१८॥ ॥ मू०चो० ॥ श्रीप्रियादासजूके सुमित्रवर ॥ श्रीगोवर्धननाथ नामकर ॥ ते श्रीभक्तमालरंग छाये ॥ पढिसांभरिकी राम
ति गये ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ मूलभक्तमालिकेवर ॥ भक्तिरसबोधिनीटीकासुंदर ॥ जेहींकेलीतेप्रियादासथोर ॥ महाहरिभक्त
जाहले ॥ १९ ॥ तयांचेपरममित्रवर ॥ श्रीगोवर्धननामेंसुंदर ॥ भक्तमालेच्यारंगांतफार ॥ तयांचेंअंतरव्यापिलेंसे ॥ २० ॥
प्रेमामाजीनिमग्नहोऊन ॥ भक्तिमालेचेंकरितीगायन ॥ पढिसांभरिगावींजाण ॥ एकदागेलेयात्रेसी ॥ २१ ॥ ॥ मू०चो० ॥ मगमे श्री
गोविंददेव जो ॥ तिनके दरसनको गमने जो ॥ तहां श्रीराधारमनपुजारी ॥ हरिप्रिय रसिक अनन्य सुभारी ॥ २ ॥ ॥ टी०
ओ० ॥ मार्गामाजीएकसंस्थान ॥ श्रीगोविंददेवाचेंजाण ॥ तयाचेंप्रेमेंघ्यावयादर्शन ॥ गोवर्धननाथगेलेतेथ ॥ २२ ॥ तेथीलपुजा
रीराधारमण ॥ श्रीहरीचेप्रियकरपूर्ण ॥ अनन्यत्वेंभारीकरितीसेवन ॥ परमरसिकअसती ॥ २३ ॥ ॥ मू०चो० ॥ तिनसु तिन्हे रा
खे अटकाय ॥ भक्तमालसुनवेको चाय ॥ होन लगी तहां भक्तसुमाल ॥ जहां बिराजत गोविंदलाल ॥ ३ ॥ ॥ टी०ओ० ॥ भ
क्तिमालेच्याश्रवणाविषयीं ॥ परमोत्साहतयाचेहृदयीं ॥ गोवर्धननाथजीसीपाहीं ॥ घेतलेठेवूनआग्रहें ॥ २४ ॥ तेहींत्याचेंप्रेमपाहून ॥
गोविंदजीचेमंदिरींआपण ॥ भक्तिमालेचेंकरितीगायन ॥ ऐकावयाजनबहुयेती ॥ २५ ॥ ॥ मू०चो० ॥ कछुकदिना तो बाचत

भये ॥ पुनि सांभरिकी रामति गये ॥ यही कोल कीनो निर्धार ॥ पूरन करिहे बंगदति वार ॥ ४ ॥ ॥ टी०ओ० ॥ ऐसिया
परीकांहींदिन ॥ भक्तिमालेचेंकेलेंगायन ॥ संपूर्णतीनहोतांजाण॥ गोवर्धननाथगेलेसांभरीसी ॥ २६ ॥ राधारमणपुजाऱ्यास ॥ ऐसें
कबूलकेलेंसुरस ॥ सांभरीहूनयेतेवेळेस ॥ भक्तमालपूर्णकरूंयेथें ॥ २७ ॥ ॥ मू०चो० ॥ रामति कर बगदे जब सही ॥ कालिह क
था तब कहिहे कही ॥ कहांते रही संभार सु नाही ॥ तब श्रीजू निसि स्वप्नजु माही ॥ ५ ॥ ॥ टी०ओ० ॥ सांभरीसीयात्राकरू
न ॥ परतोनितेथेंआलेआपण ॥ पुन्हामिळवुनीश्रोतेसज्जन ॥ भक्तमालगावयाबैसले ॥ २८ ॥ कोठवरीकथाआलीजाण ॥ गोवर्धन
नाथानराहिलेंस्मरण ॥ नित्यतेकरितीपारायण ॥ यायोगेंध्याननराहिलें ॥ २९ ॥ सर्वश्रोत्यांसीकरितीप्रश्न ॥ परीनकथेचीकोणाआठव
ण ॥ ह्मणतीविसावाआजिघेऊन ॥ विचारेंकरूनआठवूं ॥ ३० ॥ मगतेदिवशींराहिलेंपुराण ॥ तोंकायकरीजगज्जीवन ॥ स्वप्नामाजीप्र
गटहोऊन ॥ कथाभागातेंसुचवी ॥ ३१ ॥ ॥ मू०चो० ॥ कही पूजारीजीसो यही ॥ हमने सुनि मन देके सही ॥ श्रीरैदासभक्तकी
अहो ॥ कथा भई अब आंगे कहो ॥ ६ ॥ ॥ टी०ओ० ॥ राधारमणपुजारीजाण ॥ गोविंदजीचाभक्तपूर्ण ॥ तयाचेस्वप्नींप्रगट
होऊन ॥ कायआपणबोलती ॥ ३२ ॥ मींआपुलेंमनदेऊन ॥ भक्तिमालेचेंकेलेंश्रवण ॥ रैदासभक्ताचेंचरित्रजाण ॥ तेथवरकथाआली
से ॥ ३३ ॥ त्यापुढेंआतांकरावेंगायन ॥ माझेंवेधलेंअंतःकरण ॥ निजभक्तांचेचरित्रींजाण ॥ प्रीतीअत्यंतजडलीसे ॥ ३४ ॥ ॥
मू०दो० ॥ सुनि पूजारीके दृगन पानी बह्यो अपार ॥ याके श्रोता आपहे यह कीनो निर्धार ॥ ७ ॥ ॥ टी०ओ० ॥ पुजाऱ्या
नेंतेंकरितांश्रवण ॥ कंठआलासेगहिंवरोन ॥ नयनांतूनऐसेंवाहेजीवन ॥ जयाचापारनसेची ॥ ३५ ॥ अंतरींनिर्धारकेलापूर्ण ॥ याचा
श्रोताजगज्जीवन ॥ भक्तिमालहीधन्यधन्य ॥ अगाधमाहात्म्यअसेईचें ॥ ३६ ॥ सर्वांसीसांगेप्रीतीकरून॥ करितीजयजयकारसज्जन॥
एकचिआनंदझालापूर्ण ॥ वेधलेंमनभक्तिमालेसी ॥ ३७ ॥ ॥ मू०चो० ॥ पुनि दूजो इतिहास सुनो अब ॥ प्रियादास टीका की
नो जब ॥ तब श्रीव्रजपरकंमा गये ॥ फिरतफिरत होंडल जा छये ॥७॥ ॥टी०ओ०॥ ऐसाइतिहासझालाएक ॥ पुनरपिसादरहोऊ

नदेख ॥ दुसराइतिहासअसेसम्यक ॥ परमकौतुकत्यामाजी ॥ ३८ ॥ जेव्हांप्रियादासानेंदेख ॥ भक्तिमालेवरभक्तिपूर्वक ॥ टीकाकेली
असेसम्यक ॥ परमसंतोषझालातेणें ॥ ३९ ॥ तेवेळींभक्तीकरोनिजाण ॥ व्रजप्रदक्षणाकरावयालागुन ॥ प्रियादासजीगेलेआपण ॥
शतावधीसंतबरोबरी ॥४०॥ यात्राकरीतफिरतफिरत ॥ होडलगांवींझालेप्राप्त ॥ तेथेंतयांचेंरमलेंचित्त ॥ ह्मणोनिआपणराहिले ॥ ४१ ॥
॥ ॥ मू०चो० ॥ तहां श्रीलालदास सुमहंत ॥ जनसेवीअनन्य रसवंत ॥ सब समाज तिन राख्योसही ॥ भक्तमाल कहिये
यह कही ॥ ८ ॥ ॥ टी०ओ० ॥ लालदासजीनामेंमहंत ॥ तेथेंरहातहोतेसंत ॥ सज्जनसेवीमहारसवंत ॥ अनन्यभक्तश्रीहरीचा
॥ ४२ ॥ त्यानेंपरमप्रीतीकरून ॥ सर्वसज्जनांसहवर्तमान ॥ प्रियादासासीआग्रहेंकरून ॥ ठेऊनघेतलेंसंस्थानीं ॥ ४३ ॥ करजोडोनिक
रीविनंती ॥ भक्तमालेचीबहूप्रीती ॥ कृपाकरोनीतरीमजवरती ॥ गायनकरोनिऐकविजे ॥ ४४ ॥ ॥ मू०चो० ॥ भक्तमाल तहां
होन सु लागी ॥ सुननि लगे सब लोग सभागी ॥ एकदिन निसि तहां आये चोर ॥ सबैबस्तु लीनी ठकठोर ॥ ९ ॥ ॥ टी०ओ० ॥ प्रियादा
सेंपरिसतांविनवण ॥ तयाचीप्रीतीपाहोनिपूर्ण ॥ भक्तमालेसीकरितीगायन ॥ नित्यपुराणहोऊंलागलें ॥४५॥ कोणीजेतेथेंभाग्यवंत ॥ श्र
वणकरावयायेतीनित्य ॥ तोंकायझालेंअकस्मात ॥ चमत्कारपरिसावा ॥४६॥ लालदासजीच्यामठांत ॥ एकेदिवसींरात्रीआंत ॥ दाहापांच
जणचोरयेत ॥ सावडोनिघेतसकळवस्तु ॥४७॥ ॥मू०चो०॥ ठाकुरहूंको लेते गये ॥ हरिही किये कौतुकनये ॥ प्रात भये सबही दुख छाये ॥
प्रियादासहूं अति अकुलाये ॥१०॥ ॥ टी०ओ० ॥ त्यामाजीदेवहीगोळाकेले ॥ सत्वरनिघोनिचोरगेले ॥ देवेंचिनवीनकौतुककेलें ॥ ना
तरीछळीलकोणभक्तां ॥४८॥ तोंजाहलाप्रातःकाळ ॥ मंगलारतीसीयेतीसकळ ॥ पाहतीतोंमंदिरामाजीदयाळ ॥ राधिकारमणनसेचि ॥४९॥
सर्वहीवस्तूंसहवर्तमान ॥ चोरासवेंगेलेदयाघन ॥ सर्वांसीझालेंदुःखगहन ॥ लालदासरुदनकरीतसे ॥५० प्रियादासहीकरीतळमळ ॥ अतिश
येंसीहोयव्याकुळ ॥ ह्मणेहोतअसतांभक्तमाळ ॥ हाकायअनर्थजाहला ॥५१॥ ॥मू०चो०॥ कथा कही न रसोई कीनी ॥ बहुरो या दुखमे म
ति दीनी ॥ ठाकुरको राजत न प्यारे ॥ जाते चोरन संग पधारे ॥११॥ ॥ टी०ओ ॥ परमअंतरींखेदहोऊन ॥ भक्तमालवाचणेंदिलेंसोडून ॥

बहूतदुःखामाजीपूर्ण ॥ मतीलोटूनदीधलीसे ॥ ५२ ॥ मनींह्मणतसेहीभक्तमाळ ॥ श्रीहरीसीनआवडेनिर्मळ ॥ ह्मणोनिचोरासवेंकेवळ ॥ निघोनिगेलेवाटतें ॥ ५३ ॥ जरीहेहरीसीनआवडेटीका ॥ धिग्धिग्आपणालागोनिदेखा ॥ कायमुखआतांदाविजेलोकां ॥ प्राणसत्वरसोडावे ॥ ५४ ॥ ऐसाअंतरींविचारकरून ॥ खानपानादिदिलेंसोडून ॥ स्वयंपाकहीनकेलाजाण ॥ खिन्नहोऊनबैसले ॥५५॥ ॥ ॥मू०चो०॥तबतोश्रीमहंत यो कही ॥ हरितो त्यागि गये मो सही॥तुमहू त्याग करोंगे जोपे ॥ मेरीगत कहां व्हैहे तोपे॥१२॥ ॥ ॥ टी०ओ० ॥ तेव्हांलालदासमहंतयेऊन ॥ प्रियादासाचेधरीचरण ॥ मुखानेंबोलेविनंतीकरून ॥ हेंकायआपणकरीतसा ॥५६॥ श्रीहरीमजलाटाकोनिगेले ॥ यावरीतुह्मीहीत्यागोनिवहिले ॥ जातसांतरीआजियेवेळे ॥ गतीकायमाझीहोईलकीं ॥ ५७ ॥ ॥ मू०चो० ॥ तातें हरिइछा मन दीजे ॥ कथा कहो रु रसोई कीजे ॥ तब श्रीप्रियादास यों कही ॥ अबतो कथा न कहि हे सही ॥१३॥ ॥ ॥ टी०ओ० ॥ इकडेकांहींनलक्षदेऊन ॥ हरिइच्छेवरीठेविजेमन ॥ चोरचिलागलेगोडमजहून ॥ ह्मणोनिसोडूनगेलेमजला ॥५८॥ तरीतुह्मीचकृपाकरून ॥ मजदीनासीकरिजेपावन ॥ श्रीभक्तमालाकरावीगायन ॥ पाकसारूनिभोजनकीजे ॥ ५९ ॥ तेव्हांप्रियादास ऐसेंबोलती ॥ नवाचणेंभक्तमालानिश्चिती ॥ श्रीहरीच्यानआवडेचित्तीं ॥ मगकांवृथाचिवाचावें ॥ ६० ॥ ॥ मू०चो० ॥ श्रीनाभाजू यों वरनी पुन ॥ जो जनको प्यारे हरिके गुन ॥ त्यों जनके गुन प्यारे महा ॥ है हरिहूंको कहिये कहा ॥ १४ ॥ ॥ टी०ओ० ॥ परीएकआश्चर्यवाटेपूर्ण ॥ ऐसेंनाभाजीनेंकेलेंवर्णन ॥ भगवद्भक्तासीजैसेजाण ॥ श्रीहरीचेगुणआवडती ॥ ६१ ॥ तैसियाचपरीश्रीहरीप्रती ॥ भक्तांचेगुणमहाआवडती ॥ आजिकायहेझालीरीती ॥ कांहींनबोलवेमजआतां ॥ ६२ ॥ ॥ मू०चो० ॥ ये अब सभी झूट झलकात ॥ ताते कहां सु मिथ्या बात ॥ यो सबदिन सब भूखे रहे ॥ हरि तब चोरनसो यो कहे ॥ १५ ॥ ॥ टी०ओ० ॥ निजभक्ताचेगुणबहुत ॥ श्रीहरीसीगोडलागत ॥ आतांहेंसर्वहीअसत्यवाटत ॥ ऐसियाप्रकारावरोनियां ॥ ६३ ॥ नाभाजीजे बोलिलेगोष्ट ॥ यावरूनमिथ्यावाटेस्पष्ट ॥ यापरीदिनभरकरीतकष्ट ॥ प्रियादासराहिलेउपवासीं ॥ ६४ ॥ तैशाचपरीहोवोनिखिन्न ॥ उ

पवासींराहिलेसकळसज्जन ॥ तोंकायतिकडेझालेंजाण ॥ सादरश्रवणकरावें ॥ ६५ ॥ रात्रौचोरानींचोरीकरून ॥ जेहरीसीगेलेघेऊन ॥
अपुलाल्याघरींजाऊन ॥ नित्यकृत्यसारूननिजले ॥ ६६ ॥ तोंकायकरीजगज्जीवन ॥ स्वप्नींसर्वांच्याप्रगटहोऊन ॥ ऐसियापरीकरीभा
षण ॥ जेणेंतेदुर्जनभयपावती ॥६७॥ ॥मू०चो०॥ मोंहि जहांको तहां करि आवो ॥ नातरु तुम बहुते दुख पावो ॥ दुहरे दुःख पेरहे हमप
र ॥ चोहर दुःख डारुंगो तुमपर ॥१६॥ ॥टी०ओ०॥ जेथोनिमजलाचोरूनआणिलें ॥ तेथेंचिनेऊनघालावहिलें ॥ नातरीसकळहीतुह्मीये
वेळे ॥ दुःखबहुतपावाल ॥ ६८ ॥ तुह्मीचोरोनियेथेंआणिलें ॥ दुप्पटमजवरीदुःखपडलें ॥ जरीनपोहोंचवोनद्यालवहिलें ॥ चौपटतुह्मां
वरीघालीनदुःखा ॥ ६९ ॥ ॥ मू०चो० ॥ एक मोभक्त रहे दुख माही ॥ पुनि मे भक्तमाल सुनि नाही ॥ सुनि यह चोर उठे अ
धिरात ॥ ठाकुरको लै हरषत गात ॥ १७ ॥ ॥ टी०ओ० ॥ एकतेंऐसियापरीदुःख ॥ भक्तउपाशींराहिलेसकळिक ॥ दुसरेंभक्तमा
लसम्यक ॥ नाहींसंपूर्णऐकिली ॥ ७० ॥ ऐसेंस्वप्नपडतांसत्वर ॥ घाबरोनियांउठलेचोर ॥ कोणासीहीनधरवेधीर ॥ प्रेमानेंअंतरव्यापि
लें ॥ ७१॥ ह्मणतीसंतांचामहिमाउद्भट ॥ आपणतयांशींकरितांकपट ॥ स्वप्नींभेटलावैकुंठपीठ ॥ जोकांदुर्घटयोगियांसी ॥७२॥ जरीकां
भावेंकरितांसेवन ॥ कायफलप्राप्तहोईलजाण ॥ याचापारनपावेपूर्ण ॥ धन्यमहिमानसंतांचें ॥७३॥ मगमिळोनियांसकळचोर ॥ ठेवोनिपा
लखीमाजीश्रीधर ॥ चालिलेहोडलगांवींसत्वर ॥ हर्षितगात्रतेधवां ॥७४ ॥ ॥मू०चो०॥ गावत बजवत नाचत आये ॥ संग सबै साम
ग्रीलाये ॥ प्रात होन पायो नहि सहि ॥ इक द्विज आइ सबनिसो कही ॥१८॥ ॥टी०ओ०॥ अनेकवाद्येंवाजवीत ॥ प्रेमेंकरोनिगातनाच
त ॥ होडलगांवीझालेप्राप्त ॥ परमानंदेंकरोनियां ॥ ७५ ॥ जितुकीसामुग्रीहोतीनेली ॥ तितुकीसर्वहीसवेंआणिली ॥ प्रातःकाळनहो
तासमूळीं ॥ गांवाजवळींपातले ॥७६ ॥ तोंसकळांसीयेतांदुरोन ॥ एकाविप्रानेंपाहिलेंजाण ॥ लगबगेंतोधांवतयेऊन ॥ सांगेसकळहीसंतां
सी ॥७७॥ ॥मू०चो०॥ चोर सिहारे ठाकुर लावत ॥ गावत बजवत नाचत आवत ॥ सुनि साधु निपट हरषाये ॥ गावत नाचन सन्मुख
धाये ॥ १९ ॥ ॥ टी०ओ० ॥ तुमच्यादेवासीघेऊनसत्वर ॥ प्रेमेंवाद्येंवाजवीतसुंदर ॥ गातनाचतयेतीचोर ॥ गांवाच्याजवळीपातले

॥ ७७ ॥ ऐसेंविप्रांचेंऐकतांवचन ॥ परमहर्षेंकरोनिसज्जन ॥ अंगवस्त्रातेंउडवीतजाण ॥ गातनाचतपुढेंधांवले ॥ ७८॥ ॥ मू०चो०॥
सुधिबुधि गये प्रेममे छये ॥ जाइ पाइपर लपटत भये ॥ चोर कछू कही सकत न बतिया ॥ दृग भरि आवत फाटत छतिया ॥२०॥ ॥
॥टी०ओ०॥ शुद्धिबुद्धीविसरोनिजाण ॥ प्रेमामाजीझालेनिमग्न ॥ देवाच्याआणिचोराच्याजाण ॥ पायांवरलोळतीजावोनियां ॥७९॥
ऐसेंसंतांचेंप्रेमपाहून ॥ आणिजेंहरीनेंदिधलेंस्वप्न ॥ मनींतयाचाआठवहोऊन ॥ गहिवरूनआलेंचोरांसी ॥ ८० ॥ कांहींतयासीनबोल
वेबोल ॥ नेत्रींभरोनियेतसेजळ ॥ हृदयफाटोनिजातसेकेवळ ॥ प्रेमाचागोंधळमातला ॥ ८१ ॥ ॥ मू०चो० ॥ आसु पोछि कछुक
जब कहे ॥ सुधि आये पुनिपुनि जकि रहे ॥ कहन लगे हरि यह है कही ॥ दुहरे दुःख परे मो सही ॥ २१ ॥ ॥ टी०ओ० ॥ म
गकांहींअश्रुपुसोन ॥ चोरजोंसांगतीवर्तमान ॥ तोंदेवभक्ताचेंप्रेमआठवोन ॥ पुनरपिस्तब्धराहती ॥ ८२ ॥ ऐसियाचपरीकथितांवृत्त ॥
वारंवारतेराहतीस्तब्ध ॥ मगआवरोनियांप्रेमअद्भुत ॥ सांगूंलागलेवृत्तांतासी ॥ ८३ ॥ स्वप्नींहोवोनिश्रीहरीप्रगट ॥ ऐसीआह्मांसीकथि
लीगोष्ट ॥ मजवरीदुःखपडलेंदुप्पट ॥ तेणेंमजचैननपडेची ॥ ८४ ॥ ॥ मू०चो० ॥ तुमे चौहरे दुःख अव भलो ॥ व्हैं नातरु मोही
लै चलो ॥ एकतो भयो दुःख अति यही ॥ मेरे जन रहे भूषे सही ॥ २२ ॥ ॥ टी०ओ० ॥ तरीतुह्मांवरीदुःखचौपट ॥ आतांउत्तम
होईलस्पष्ट ॥ नातरीमजलाघेऊनझटपट ॥ होडलगांवासीचलावें ॥ ८५ ॥ एकहेंअतिशयेंदुःखझालें ॥ माझेसज्जनउपाशींराहिले ॥ ते
णेंमीअंतरींबहुतळमळें ॥ कायतेंसांगूंतुह्मांसी ॥८६॥ ॥मू०चो०॥ दूजो बडो दुःख इह लहो ॥ भक्तमाल हम सुनी न अहो ॥ सुनि यह
बात सबै मुरझाये ॥ भई मूरछा हिये सिराये ॥ २३ ॥ ॥ टी०ओ० ॥ दुसरेंथोरहेंपावलेंदुःख ॥ अहोमींनऐकिलीभक्तमालसम्यक ॥
मध्येंचिखंडितराहिलीदेख ॥ नाहींसंपूर्णजाहली ॥ ८७ ॥ सकळांनींतेंऐकतांगोष्ट ॥ प्रेमेंव्याकुळहोवोनिउद्भट ॥ भूवरीमूर्च्छितपडलेनी
ट ॥ परमसुखहृदईजाहलें ॥ ८८ ॥ ॥ मू०चो० ॥ गृह लाये बड उत्सव कीनो ॥ सबको मन हरिचरितन भीनो ॥ याके श्रोता
है हरि आप ॥ सबनि जानि यह तजिदयी ताप ॥ २४ ॥ ॥ टी०ओ० ॥ उत्साहकरोनियांपरम ॥ घरींआणिलेमेघश्याम ॥ हरी

च्याचरित्रामाजीउत्तम ॥ सकळाचेंमनभीजलें ॥ ८९ ॥ याचाश्रोताश्रीहरीआपण ॥ सर्वांनींजाणोनिघेतलेंपूर्ण ॥ भक्तिमालेवरीजडलें मन ॥ सोडोनिदीधलेंविकल्पतापा ॥ ९० ॥ ॥मू०दो० ॥ हाथकंकनही आरसी कहा दिखाऊं माहि ॥ हरि श्रोता बिनु सबनिकेयों मन अटके नाही ॥ ८ ॥ ॥ टी०ओ० ॥ हातामाजीअसतांकंकण ॥ कासयादाविलेंपाहिजेदर्पण ॥ श्रीहरीश्रोताअसल्यावांचुन ॥ मनसकळांचेंनवेधेइतुकें ॥ ९१ ॥ कैसाहीकांअसोदुर्जन ॥ भक्तिमालेचेंहोतांदर्शन ॥ तत्काळद्रवेअंतःकरण ॥ श्रीहरीश्रोताह्मणूनी ॥ ९२ ॥ असोहेवर्णिलेइतिहासदोन ॥ यावरूनिश्रोताश्रीहरीपूर्ण ॥ भक्तिमालेचेंमाहात्म्यजाण ॥ कितीह्मणूनवर्णावें ॥ ९३ ॥ ॥ मू०चो० ॥ श्रोतावक्ताके फल सोई ॥ कापे कही आवतहै जोई ॥ जो लिखाइ उर राखे याही ॥ अंतमे कृष्णप्राप्त होइ ताही ॥ २५ ॥ ॥ टी०ओ० ॥ भक्तमालजोकरीलपठण ॥ आणिकरीलजोकोणीश्रवण ॥ त्याचेंइतुकेंफलसंपूर्ण ॥ होईलवर्णनकोणाचेनी ॥ ९४ ॥ परंतुनुसतीचपोथीलिहून ॥ जोकोणीहृदयींधरीलठेवून ॥ श्रीकृष्णाचीप्राप्तीपूर्ण ॥ अंतींहोईलतयासी ॥ ९५ ॥ ॥ मू०चो० ॥ तहां एक सुनियो इतिहास ॥आयो कोउ प्रियादासजी पास ॥ तिन कहि भक्तमाल जो आय ॥ हे प्रभु दीजे मोहि लिखाय ॥ २६ ॥ ॥ टी०ओ० ॥ भक्तिमालेचेंपुस्तकलिहून ॥ कोणपावलावैकुंठसदन ॥ याविषयींएकइतिहासजाण॥ असेतोश्रवण करावा ॥ ९६ ॥ कोणीएकनरअज्ञानकेवळ ॥ प्रियादासजीच्यायेऊनजवळ ॥ जोडोनियांनिजहस्तकमळ ॥ यापरीबोलिलातयांसी ॥ ९७ ॥ आपणालागींभक्तमाल ॥ मुखपाठजरीयेतअसेल ॥ तरीतेमजलालिहूननिर्मळ ॥ कृपाकरोनिदीजेप्रभू ॥ ९८ ॥ ॥ मू०चो० ॥ तिननि ताहि कहि हां सुखरास ॥ कहन सुनन करिहो अभ्यास ॥ तिन कहि मै न कछू कहिजानो ॥ सुनिवेहूकी गति न पहिचानो ॥ २७ ॥ ॥ टी०ओ० ॥ ऐकोनितयाच्यावचनासी ॥ प्रियादासाच्याहर्षमानसीं ॥ तयासीह्मणतीहेसुखराशी ॥ बरें मीतुजलासांगतों ॥ ९९ ॥ घोकणेंजरीतूंघेघोकून ॥ अथवाकरूनघेईश्रवण॥ जोकांअभ्यासआहेकरण ॥ तोमीतुजलासांगतों॥१००॥ तोह्मणेकैसेंकरावेंपठण ॥ हेंनकांहींमीजाणेंपूर्ण ॥ आणिकवण्यापरीकीजेश्रवण ॥ गतीनओळखेंयाचीमी ॥ १ ॥ ॥ मू०चो० ॥ आ

प कही तो करिहो कहा ॥ तिन इक बात कही तब महा ॥ हे महाराज मे सो व्यवहारी ॥ ग्रहकामनमें अटको भारी ॥ २८॥ ॥
टी०ओ० ॥ तुह्मीतोनिश्चयकरालकथन ॥ त्यासीमीकायकरूंजाण ॥ महाआश्चर्याचीगोष्टतेणें ॥ केलीनिवेदनप्रियादासा ॥ २ ॥ अ
होमहाराजऐकासत्वरी ॥ सदासक्तमीअसेंव्यवहारीं ॥ घरकार्यांतगुंतलोंभारी ॥ नसेक्षणभरीअवधीमज ॥ ३ ॥ ॥ मू०चो० ॥ साधु
संगको नहि कोउ घरी ॥ ताते मे यह मनमे धरी ॥ मरतीबार हियेपे धरिहो ॥ इतने साधुन संग उबरिहों ॥२९॥ ॥ टी०ओ० ॥
कांहींसत्संगधरिजेनिका ॥ ऐसीकोणतीनसेचिघटिका ॥ त्यावरोनिमीमनींनेटका ॥ ऐसाविचारधरिलासे ॥ ४ ॥ भक्तिमालेचेंपु
स्तकजाण ॥ आपणापासूनघ्यावेंलिहून ॥ अंतकाळींच्यासमयींपूर्ण ॥ धारणकरीनहृदयावरी ॥ ५ ॥ इतुक्याचकींयोगेंकरून ॥ संत
संगतीघडेलपूर्ण ॥ निजधामासीहोईलगमन ॥ यमपाशबंधनेंतुटतील ॥ ६ ॥ ॥ मू०चो० ॥ सुनि यह बात नेत्र भरि आये ॥ ब
हुत बढाई करी सुख छाये ॥ ताको पोथी दई लिखाय ॥ सो ले घर गमन्यो सुख पाय ॥३०॥ ॥ टी०ओ० ॥ प्रियादासेंतेंऐकतां
वचन ॥ तत्काळआलेनेत्रभरून ॥ अंतःकरणींसुखव्यापून ॥ स्तवनबहूतकेलेंत्याचें ॥७ ॥ ह्मणतीजैसानिश्चयपूर्ण ॥ तैसाचिपावेलज
गज्जीन ॥ मगतयासीपोथीलिहून ॥ भक्तिमालेचीदीधली ॥ ८ ॥ मगतोमोठेंसुखपावोन ॥ गेलापुस्तकघरींघेऊन ॥ जैसातयाचानिश्च
यपूर्ण ॥ तैसेंचिघडूनआलेंतया ॥ ९ ॥ ॥ मू०चो० ॥ ग्रहकारजमे अटक्यो भारी ॥ आई ताहि मीच भयकारी ॥ जमके दूत
न आय दबायो ॥ दयो त्रास पुनि कंठ रुकायो ॥ ३१ ॥ ॥ टी०ओ० ॥ यावतआपुल्याजन्मपर्यंत ॥ गुंतलाभारीग्रहकार्यार्थ ॥
तोंतयासीआलाअंत ॥ जोकांभयंकरजगासी ॥११०॥ यमरायाचेदूतआले ॥ बळेंकरोनियांतयादाबिलें ॥ ऐसियाप्रकारानेंत्रासिलें ॥
त्वरेंरोधिलेंकंठासी ॥ ११ ॥ ॥ मू०चो० ॥ बेटा पोते ढिंग बिललात ॥ नैननसे दे कही सुबात ॥ भक्तिमालकी पोथी लाये ॥
मो छातीसो देहु लगाये ॥ ३२ ॥ ॥ टी०ओ० ॥ ऐसेंपाहूनित्याचेंनिदान ॥ पुत्रादीनातूजवळयेऊन ॥ दीर्घस्वरानेंकरितीरुदन ॥
ह्मणतीसांडूनचालिलां ॥ १२ ॥ कंठावरोधझालाह्मणोन ॥ यासीकांहींनबोलवेवचन ॥ मगनेत्रांच्याखुणेकरून ॥ उत्तमगोष्टसांगीत

ली ॥ १३ ॥ भक्तिमालेचीपोथीआणून ॥ माझेहृदयासीठेवालावून ॥ एवढाउपकारकरापूर्ण ॥ तेणेंमीपावनहोईनकीं ॥ १४ ॥ ॥
मू०चो० ॥ तेउ लाय पोथीरसभरी ॥ मरतपिताके हियमे धरी ॥ धरत हि यमके दूत भजे यों ॥ सुरनके आये कायर ज्यों ॥३३॥
॥ ॥ टी०ओ० ॥ ऐसेंतयाचेंवचनऐकोन ॥ पुत्राप्तादिसकळधांवोन ॥ रसभरिततीपोथीजाण ॥ भक्तिमालेचीआणिली ॥ १५ ॥
मरणोन्मुखजोंझालापिता ॥ तयाचेहृदयावरीतत्त्वता ॥ ठेविलेंभक्तिमालग्रंथा ॥ तोंकायझालाचमत्कार ॥ १६ ॥ पुस्तकठेवितांहृदया
वरी ॥ यमदूतऐसेपळालेदूरी ॥ जैसेशूरासीरणाभीतरी ॥ येतांचिपळतीभेकड ॥१७॥ ॥ मू०चो० ॥ कंठ खुलो नैननी जल ढाऱ्यो ॥
हरेकृष्णगोविंद उचारो ॥ पुनि सब भक्त न दरसन दीनो ॥ हिये मांझ आनंद सु भौनो ॥ ३४ ॥ ॥ टी०ओ० ॥ तत्काळकंठ
झालामोकळा ॥ नेत्रांतूनअश्रुवाहतीढळढळां ॥ हरेकृष्णगोविंदतयेवेळा ॥ मुखानेंकेलाउच्चार ॥ १८ ॥ तोंकायचमत्कारझालाजाण ॥
सकळसंतांनींदिलेंदर्शन ॥ हृदयामाजीआनंदपूर्ण ॥ व्यापोनिगेलातेधवां ॥ १९ ॥ ॥ मू०चो० ॥ सुत हरखे पुनि पूछी अहो ॥
कहा भयो सो हमसो कहो ॥ तिन कहि जमदूतनि दुख दीनो ॥ भक्तनि आय उवार मै लीनो ॥ ३५ ॥ ॥ टी०ओ० ॥ ऐसापाहो
नितोप्रकार ॥ पुत्रादिकांसीआनंदफार ॥सर्वहीमिळोनिपुसतीसत्वर ॥ कायझालेंतेंसांगाआह्मां ॥१२०॥ तेव्हांतोसांगेसर्वकौतुक ॥ यम
दूतांनींदिधलेंदुःख ॥ भगवद्भक्तांनींयेऊनसम्यक ॥ घेतलेंमजलासोडवोनी ॥ २१ ॥ ॥ मू०चो० ॥ नामदेव रैदास कबीर ॥ धना
सेन पीपा अतिधीर ॥ ठाडे मोसो कहतहे बात ॥ हमरे संग अवो हे तात ॥ ३६ ॥ ॥ टी०ओ० ॥ नामदेवरैदासकबीर ॥ धना
सेनपीपाअतिधीर ॥ उभेराहोनिमजसमोर ॥ कायतेगोष्टबोलती ॥ २२ ॥ आम्हुचियासंगेंप्रेमळा ॥ तुवांचलावेंयेचिवेळा ॥ ऐसेंह्मणती
वेळवेळां ॥ परमप्रीतीकरूनी ॥ २३ ॥ ॥ मू०चो० ॥ सो मे अब उनके संग जैंहो ॥ जमदूतनको मुख न चितैंहो ॥ यह कही रा
मकृष्ण उच्चारत ॥ नैंन मूंदि हरि उरमे धारत ॥ ३७ ॥ टी०ओ० ॥ तरीमीत्यांच्यासवेंआपण ॥ प्रेमेंआतांकरीनगमन ॥ यमदूतां
चेंवदनजाण ॥ नपाहेंचिकदापी ॥ २४ ॥ ऐसेंसर्वांसीभाषणकरून ॥ रामकृष्णनामउच्चारून ॥ नयनझांकोनिहरीचेंध्यान ॥ हृदयामा

जीजोकरी ॥ २५ ॥ ॥ मू०चो० ॥ प्राण त्यागि हरिसो मिलि गयो ॥ बेटनिको अतिही सुख भयो ॥ तबते तिननि नेम यह भज्यो ॥ तिन कोऊ कुलमे तन तज्यो ॥३८॥ ॥ टी०ओ० ॥ तितुक्यामाजीप्राणसोडून ॥ हरीचेरूपांतझालालीन ॥ पुत्रादिकांसीतेंपाहून ॥ अत्यंतसुखजाहलें ॥२६॥ तयादिवसापासोनिजाण ॥ तेहींनियमहाकेलाधारण ॥ कुलामाजीजोपावेनिधन ॥ जेव्हांत्यजीतनिजदेहा ॥ २७ ॥ ॥ मू०चो० ॥ तिन हिय धन्यो ग्रंथ यह लह्यो ॥ तुलसी चरणामृत सुख दयो ॥ तिनको कुटुंब बननको आयो ॥ जिननि सबै यह चरित सुनायो ॥ ३९ ॥ ॥ टी०ओ० ॥ भक्तमालहासुंदरग्रंथ ॥ हृदयावरीतेधारणकरीत ॥ वदनींतुलसीचरणामृत ॥ प्रेमेंकरोनिदेतगेले ॥ २८ ॥ तैशाचपरीकितीएकांचा ॥ उद्धारझालाकुलपुरुषांचा ॥ एकदापरिवारत्याकुलींचा ॥ यात्रेसी आलावृंदावनीं ॥२९॥ वैष्णवदासह्मणतीआपण ॥परिवारभेटलातोआह्मांयेऊन ॥ तेहींहेंसकळचरित्रजाण ॥ संतसमाजींऐकविलें ॥१३०॥ ॥ ॥मू०चो०॥ सो हम लिखन कियोहे सही ॥ ओर कहो महिमा कहां रही ॥ शेषसहस्रमुख जिन गावे गुणि ॥ सोउ पुनि चरणरेणु जाचे सुनि ॥ ४० ॥ ॥टी०ओ०॥ ऐसेंतेंआह्मींप्रत्यक्षऐकिलें ॥ ह्मणोनिमाहात्म्यांतलिहोनठेविलें ॥ याहूनविशेषमहिमावहिलें ॥ सांगाकायतोराहिला ॥ ३१ ॥ सहस्रमुखेंकरोनिशेष ॥ जयाचेसद्गुणगाईविशेष ॥ तोचिपरिसाश्रीजगन्निवास ॥ याचितपदरजभक्तांचें ॥ ॥३२॥ ॥ मू०चो० ॥ आपते अधिक दासको गावे ॥ जनकी महिमा का कहि आवे ॥ अब याके श्रोता वक्ता सुनि ॥ उत्तम दोइ न्यून इकमे पुनि ॥ ४१ ॥ ॥ टी०ओ० ॥ आपणाहूनिश्रीहरिअधिक ॥ दासांचीकीर्तीगाईसम्यक ॥ तेव्हांसंतांचामहिमा देख ॥ कितीह्मणोनवर्णवेहो ॥ ३३ ॥ भक्तिमालेचाश्रोतावक्ता ॥ दोन्हीउत्तमअसतीतत्त्वता ॥ जरीत्यामाजीएकासन्यूनता ॥ तेणेंप्रेमाचाभंगहोय ॥ ३४ ॥ ॥ मू०छ० ॥ पछपात धनचाहनी पुनि श्रोताहिन जाने ॥ प्रश्न ताहि उत्तर न देहि फेरि नहि सन्माने ॥ मूर्तिबांधिकेबात मूर्ख हिय धरि न सके पुनि ॥ सबैशास्त्र पढि लिये सार नाहिन लीनो गुन ॥ पूछत बात रिसाय अति छिमा नाहि जाके दिले ॥ बहुत पाप श्रोता करे तो ऐसो वक्ता मिले ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ श्रोत्यावक्त्याउभयतांत ॥ एकविपरीत

असल्यासत्य ॥ त्यामाजीनठसेभावार्थ ॥ ऐकातेंलक्षणसांगतों ॥ ३५ ॥ नसांगतांचितात्पर्यार्थ ॥ निजबोलाचाधरीपक्षपात ॥ धनाशा
स्थापोनियांचित्तांत ॥ पुराणकथीतोहीनवक्ता ॥ ३६ ॥ श्रोत्याचेंनजाणतांअंतःकरण ॥ भलतेंचकांहींकरीभाषण ॥ प्रश्नकरितांतया
लागून ॥ नदेउत्तरसन्मानेंसी ॥ ३७ ॥ एखादामूर्खश्रोताजाण ॥ ज्यासीनसत्वरउमजेभाषण ॥ स्पष्टार्थाचीमूर्तिबांधून ॥ ठसवूंनशकेउ
रींत्याच्या ॥ ३८ ॥ सकलहीशास्त्रेंकेलींपठण ॥ त्यांतीलसारनघेतलेगुण ॥ एखादीगोष्टपुसतांजाण ॥ क्रोधअत्यंतभरेज्यासी ॥ ३९ ॥
जयाचियाअंतःकरणांत ॥ क्षमानसेचियत्किंचित ॥ श्रोताकरीजेदोषबहुत ॥ यापरीवक्तामिळेत्यासी ॥ १४० ॥ ॥ मू०चो० ॥ हम
रा दोष कहे वक्ताके ॥ पुनि ओर सु बरनो श्रोताके ॥ ४२ ॥ ॥ टी०ओ० ॥ वैष्णवदासबोलेवाचे ॥ आम्हुच्यासारिख्याहीनव
क्त्याचे ॥ दोषइतुकेकथिलेसाचे ॥ आतांश्रोत्याचेवर्णनकरितों ॥ ४१ ॥ ॥ मू०छं० ॥ अन्यमना दृग लोल पदनछेदक असमंज
स ॥ स्थित अधीर श्रुतमंद पलक झपके निद्राबस ॥ प्रश्नप्रसंग न मिले मधुर अनुमोदन अक्रिय ॥ वाद रसिकछहर अनभिज्ञ अ
लापित अप्रिय ॥ रसिकअनन्यबिसासमति बादअनुभव सकृत ॥ दशदोषरहित श्रोता मिले तो उज्वल रस बरषे अमृत ॥ २ ॥ ॥
टी०ओ० ॥ करितबैसलाअसतांश्रवण ॥ दुसरीकडेधांवेमन ॥ तेणेंतरलितहोतीनयन ॥ हीनतोश्रोताजाणावा ॥ ४२ ॥ वक्ताउच्चारी
कांहींपद ॥ येरूतयाचाकरीछेद ॥ एकतोकेवळमूर्खशुद्ध ॥ कांहींचउमजनसेत्यासी ॥ ४३ ॥ अतिशयेंसीचंचळएक ॥ धीरनधरोनि
बैसेसम्यक ॥ बधिरश्रवणासीनसेठीक ॥ आणीकलक्षणपरिसावें ॥ ४४ ॥ निद्रेच्यावश्यहोऊनिपाहीं ॥ पापण्यालावूनडुकल्याघेई ॥ क
थाऐकतांप्रसंगकांहीं ॥ नमिळेप्रश्नकरावया ॥ ४५ ॥ कांहींउत्तमअर्थऐकून ॥ नकरीचमधुरअनुमोदन ॥ एकतोऐसाश्रोतादुर्जन ॥ क
थारसभंगकरीतसे ॥ ४६ ॥ श्रोतावक्तारसिकविशेष ॥ व्यापोनिराहिलाअसतांसुरस ॥ नजाणतांमुख्यतात्पर्यास ॥ अप्रियभाषणेंवा
दघाली ॥ ४७ ॥ कोणीभावार्थीश्रोतारसिक ॥ अनन्यविश्वासेंऐकतांसम्यक ॥ विपरीतअनुभवदावोनिदेख ॥ तयाच्यामतींतवादघा
ली ॥ ४८ ॥ यापरीचेहेमहादशदोष ॥ येणेंसींरहीतजोश्रोतासुरस ॥ कीर्तनामाजीमिळतांविशेष ॥ निर्मलअमृतरसवर्षे ॥ ४९ ॥ श्रो

तावक्तादोन्हीसुरस ॥ असतांओढवेरंगविशेष ॥ श्रुतीनेंवर्णिलेंज्याफळास ॥ तेंसंपूर्णमिळेतेथें ॥ १५० ॥ ॥ मू०चो० ॥ श्रीप्रिया
दास अतिही सुखकारी ॥ भक्तमालटीका बिस्तारी ॥ तिनकौ पौत्र परम रंगभीनो ॥ नाम वैष्णवीदास सु कीनो ॥ तिन गुरुसाधुकृपाते
कीनी ॥ भक्तिमालमाहात्म्य कहि दीनी ॥ ४३ ॥ ॥ टी०ओ० ॥ असोहेंभक्तिमालेचेंमाहात्म्य ॥ जेहींवर्णनकेलेंउत्तम ॥ त्याचीपरं
पराआणीकनाम ॥ परिसाकथनकरीतसें ॥ ५१ ॥ श्रीप्रियादाससज्जनथोर ॥ तेहींजनांसीअतिसुखकर ॥ भक्तिमालेचीटीकासुंदर ॥
उत्तमप्रकारेंविस्तारिली ॥५२॥ तयाचेनातूभक्तउत्तम ॥ याचिरंगांतरंगलेपरम ॥ वैष्णवदासतयाचेंनाम ॥ सज्जनींमिळूनठेविलें ॥५३॥
तिहींसद्गुरूसाधुकृपेनें ॥ तीन्हीकथात्याकेल्यावर्णन ॥ भक्तिमालेचेंमाहात्म्यपूर्ण ॥ दिधलेंकथोनसर्वही ॥५४॥ ॥ मू०दो० ॥ भक्ति
मालके गंधको लेत भक्त अलि आय ॥ भेक बिमुख ढिंगही रहे रहे कीच लपटाय ॥ ९ ॥ ॥ टी०ओ० ॥ भक्तिमालेचासुगंधसुं
दर ॥ धांवोनिघेतीभक्तभ्रमर ॥ अभक्तमंडूकराहोनिजवळ ॥ विकल्पकर्दमींलोळती ॥ ५५ ॥ ॥ मू०चो० ॥ जो या महात्म्यमे
चित लावे ॥ सोतो परमधाम पद पावे ॥ जब श्रीभक्तमाल मन देय ॥ ताते येही निरंतर सेय ॥ ४४ ॥ ॥ टी०ओ० ॥ जो
यामाहात्मींलावीलचित्त ॥ परमधामपदपावेलसत्य ॥ आणीकएकऐकारीत ॥ आश्चर्यकारकअसेकीं ॥ ५६ ॥ जेवेळींआपुल्याप्रीती
करून ॥ श्रीभक्तमालेसीदेईलमन ॥ मगतोनिरंतरकरीलसेवन ॥ नसोडीतिजलाकदापी ॥ ५७ ॥ असोयापरीमाहात्म्यवहिलें ॥ वैष्ण
वदासेंवर्णनकेलें ॥ त्यावरीटीकासद्गुरुबळें ॥ मार्तंडदीनेंवर्णिली ॥ १५८ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ इति श्रीभक्तमालमाहात्म्यं समाप्तम् ॥

॥ अथभक्तमालाष्टक ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ समस्तभक्तवर्यजींतमूर्तिमंतराहती ॥ ईश्वरासबहुतमान्यह्मणोनिईसबोलती ॥ पाठमात्रकेलियाजिभक्तिरूपदा
यिका ॥ नमोनमोप्रसन्नहोइमातभक्तमालिका ॥ १ ॥ अग्रदासकीलदासदासनाभाजीकृती ॥ मूळछप्पछंदबंधप्रथमहीअसेकृती ॥ ईश
भक्तिहेंचिहेमशोधनैकपट्टिका ॥ नमोनमोप्रसन्नहोइंमातभक्तमालिका ॥ २ ॥ गंभिरार्थविशदव्हावयाकबीतछंदिका ॥ प्रियादा
सभक्तराजत्यांचिहीकृतीटिका ॥ यमकअलंकारअनुप्रासरसदीर्घिका ॥ नमोनमोप्रसन्नहोइमातभक्तमालिका ॥ ३ ॥ विनाभक्तमा
लभक्तिरूपअतिदूरअसे ॥ ऐसेंहेंवचनसंतबोलुनीविनवीतसे ॥ भवसमुद्रपारव्हावयासदीर्घनाविका ॥ नमोनमोप्रसन्नहोइमातभक्तमालि
का ॥ ४ ॥ नियमनित्यजोधरूनिभक्तमालवाचकू ॥ आपणचिदेवत्याजवळिहोययाचकू ॥ अशीअभीष्टअर्थजीस्ववाचकासदायिका ॥ न
मोनमोप्रसन्नहोइमातभक्तमालिका ॥ ५ ॥ भक्तमालपुस्तकासवंदुनीकरीपुजा ॥ नाहिंत्यासमानआनपुण्यवानहोइजा ॥ त्यासवंदुनीह्म
णाबापाहिंयातुंबालका ॥ नमोनमोप्रसन्नहोइमातभक्तमालिका ॥ ६ ॥ अंतकाळआलियाज्यावक्षसिश्रीभक्तमाळ ॥ ठेवितांचिपुण्यवा
नपाहतोतिभक्तमाल ॥ भक्तमाळमहात्म्यकामधेनुयांतसाक्षिका ॥ नमोनमोप्रसन्नहोइमातभक्तमालिका ॥ ७ ॥ श्रीभक्तमालभक्तमालना
मजोजपेसदा ॥ त्यासनर्कवासनानस्वप्निंहीदिसेकदा ॥ भक्तमालहीअसेहोभुक्तिमुक्तिदायिका ॥ नमोनमोप्रसन्नहोइमातभक्तमालिका
॥ ८ ॥ भक्तमालअष्टकापठंतिजेसदानर ॥ अभीष्टत्यांसद्यावयाप्रसन्नतोचिश्रीवर ॥ श्रीखंडुबावापादपद्मरसिकहाअसेभ्रमर ॥ बापुशा
स्त्रिनामज्याचेंजोडितोतुह्मांकर ॥ ९ ॥ इतिश्रीभक्तमालाष्टकसंपूर्ण ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ आरतीश्रीवृंदावनविहारीची ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ जयदेवजयदेवजयवृंदावनवासी ॥ भक्तजनप्रियदेवानमितोंचरणासी ॥ धृ० ॥ १ ॥ यमुनापुलिनेरम्ये कदंबतरुचरणीं ॥ वेणूवाजवितोजोजवळीतीरमणी ॥ जयदेव० ॥ २ ॥ मधुरस्वरमनमोहितधेनूहुंबरती ॥ हमारशब्देंवत्सेंधांवोनीयेती ॥ जयदेव० ॥ ३ ॥ मोरमुगुटपीतांबरकासेकसियेला ॥ संतमंडळीजवळीऐकतिमुरलीला ॥ जयदेव० ॥ ४ ॥ कर्णींकुंडलजोडाविचित्रपुष्पांचा ॥ हस्तींकंकणजोडातैसाबाजूचा ॥ जयदेव० ॥ ५ ॥ वृक्षींपक्षीमुनिवरस्वरमोहितठेले ॥ कितीकमत्स्यहोऊनियमुनेवरी आले ॥ जयदेव० ॥ ६ ॥ जयदेवपीपानामाकबीररोहिदास ॥ आलेइतुक्यामाजीअनंतहरिदास ॥ जयदेव० ॥ ७ ॥ सेवाघडोह्मणोनीअवघेतेझाले ॥ सुगंधयुक्तेंपुष्पेंनाभ्यातेंकळलें ॥ जयदेव० ॥ ८ ॥ तेणेंभक्तिगुणामधिंरचियेलीमाळा ॥ खंडूदासतियेतेंअर्पींगोपाळा ॥ जयदेव० ॥ ९ ॥ विद्यारामतनूद्भवमधुकरमीझालों ॥ सद्गुरुपदारविंदींशरणागतआलों ॥ जयदेव० ॥ १० ॥ भक्तमालिके अंतींआरतिकृष्णाची ॥ जोगाइलत्याभेटीहोइलकृष्णाची ॥ जयदेव० ॥ ११ ॥ समाप्त ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ श्रीसद्गुरुभ्योनमः ॥ अनंतकोटिसाधुभ्योनमः ॥ श्रीशंकरायनमः ॥ श्रीरामचंद्रायनमः ॥
श्रीएकाजनार्दनायनमः ॥ ओवी ॥ ॐनमोगणपतिआदिकर्ता ॥ सकलजीवांसीबुद्धिदाता ॥ प्रसन्नहोवोनिकृपावंता ॥ हरिभक्त
कथाप्रकाशवीं ॥ १ ॥ श्रुतिस्मृतिअवयवांग ॥ षड्दर्शनहेभुजाभाग ॥ पदबंधहेंचिवस्त्रसांग ॥ तर्कसवेगफरशतुझा ॥ २ ॥ नीतिहा
चिअंकुशदेख ॥ वेदांतहातींशोभेमोदक ॥ बोधरूपीदंतएक ॥ बुद्धीसीविवेकदेईमज ॥ ३ ॥ नमोसरस्वतीआदिमाता ॥ ब्रह्मींउद्भव
असेतत्त्वता ॥ कृपाकरोनिमजअनाथा ॥ मुखींसंतकथावदवावी ॥ ४ ॥ नमोसद्गुरुगंगाधरा ॥ अविद्याकल्पनापापहरा ॥ सद्विद्ये
च्यादातारा ॥ मजपामराउद्धरीं ॥ ५ ॥ गर्जेगर्जोनितुझेंनाम ॥ गायनकरीजोसप्रेम ॥ धन्यतयाचानरजन्म ॥ तोचिउत्तमरत्नवंशहेमीं ॥ ६ ॥
तूंहस्तठेविसीज्याचेशिरीं ॥ तोचिपावेअविनाशपुरी ॥ आतांकृपाकरोनिमजवरी ॥ वदवींवैखरींसंतचरित्रें ॥ ७ ॥ नमोवैष्णवाग्र्यत्र्यं
बकेश्वरा ॥ मंत्रपंचाक्षरीजपद्वारा ॥ प्राप्तकेलेमजरघुवीरा ॥ संतचरित्रातेवींवदवीं ॥ ८ ॥ नमोजानकीरामचंद्रा ॥ तुझेंनामदातावायु
कुमरा ॥ उभयांसीनमोनमागतोंवरा ॥ निजभक्तवरासुखेंगावें ॥ ९ ॥ नमोसप्तशृंगनिवासिनी ॥ तुझेंलक्षबहुपुराणीं ॥ अद्यापिवक्रता
दिसेवदनीं ॥ तेंप्रेममजलाअर्पावें ॥ १० ॥ नमोजीएकाजनार्दना ॥ तुझेउद्बोधमाझेमना ॥ मजवरीद्रवोनिकरुणाघना ॥ सज्जनचरि
त्रागावर्वी ॥ ११ ॥ नमोअनंतकोटिसंत ॥ तुमचेचरित्राचानलागेअंत ॥ भक्तिमालानुसारयत्किंचित ॥ गाईनत्वरितकृपाकरा ॥ १२ ॥
दयावंततुह्मीसमदृष्टी ॥ माझियाअपराधांच्याकोटी ॥ त्याघालोनिसर्वपोटीं ॥ निजकथाहोटींवदवाव्या ॥ १३ ॥ यापरीनमिलेमीअने
क ॥ नानानामेंपरीवस्तुएक ॥ तोपितामातागंगाअवश्यक ॥ नमितांविवेकसंतभजनीं ॥ १४ ॥ पूर्वीअग्रदासकृपेकरोन ॥ नाभाजी
करीसंतवर्णन ॥ तेंचिप्रियादासमुखेंजाण ॥ आज्ञादेवोनविस्तारिलें ॥ १५ ॥ ॥ मूलकवित ॥ ॥ महाप्रभूकृष्णचैतन्यमनहर
नजूके चरनको ध्यान मेरे नाम मुख गाइये ॥ ताहींसमे नाभाजूने आज्ञा दई लई धारी टीका विस्तारी भक्तमालको सुनाइये ॥ कीजिये
कबितबंध छंद अति प्यारो लगे जगे जगमाहीं कही बानी बिरमाइये ॥ जानो निज मती ऐपे सुन्यो भागवत शुक द्रुमनी प्रवेश कियो

ऐसेई कहाइये ॥ १ ॥ ॥ टीकाओवी ॥ ॥ प्रियादासजीएकदाजाण ॥ महाप्रभूश्रीकृष्णचैतन्य ॥ जोसर्वांचेंकरीमनहरण ॥
तयाचेंध्यानकरीतबैसे ॥ १६ ॥ मुखींसद्गुरूचेंनामघेत ॥ तोंनाभाजीप्रगटलेमनांत ॥ प्रियादासासीआज्ञाकरीत ॥ येरूधरीतहृदयींप्रेमें
॥ १७ ॥ भक्तिमालेच्याविस्तारासी ॥ करवावेंश्रवणसर्वजगासी ॥ कवितबंधछंदेंसी ॥ प्रियकरजगेंसीप्रकाशे ॥ १८ ॥ प्रियादासतें
करीविनंती ॥ माझीतोंप्राज्ञाआहेकिती ॥ वर्णावयासीसंतकीर्ति ॥ कायसामर्थ्यदीनाचें ॥ १९ ॥ नाभाजीह्मणेपरिसलीसम्यक ॥
भागवतींकथाअलोलिक ॥ व्यासासीपुत्रजाहलाशुक ॥ जन्मतांचिवनसेविलें ॥ २० ॥ व्यासमागोनिमारीहांका ॥ मुखदावींरेम
जबालका ॥ तैंस्थावरजंगमींप्रवेशोनिदेखा ॥ शुकप्रत्युत्तरदेतसे ॥ २१ ॥ तैसेंचितुझेहृदयींजाण ॥ प्रवेशोनियांसंतजन ॥ करितील
आपुलेगुणवर्णन ॥ निश्चयेंकरूनजाणपां ॥ २२ ॥ यापरीआज्ञापरिसोन ॥ प्रियादासजीआनंदोन ॥ नाभाजीसीवंदनकरोन ॥ कवि
त्ववर्णनकरितसे ॥ २३ ॥ ॥ मूलकवित ॥ ॥ रची कविताई सुखदाई लगे निपट सुहाई ओ सचाई पुनरुक्ति ले मिटाईहें ॥ अ
क्षरमधुरताई अनुप्रास जमकाई अतिछबिछाई मोदझरीसी लगाईहें ॥ काव्यकी बढाई निजमुख न भलाई होति नाभाजू कहाई
याते प्रौढके सुनाईहें ॥ हृदयसरसाई जोपे सुनिये सदाई यह भक्तिरसबोधिनी सो नाम टीका गाइहें ॥ २ ॥ ॥ टीकाओवी ॥ ॥
प्रियादासह्मणेतेसमयीं ॥ मीजेंकवित्वकरींपाहीं ॥ तेंसर्वांसीबहुसुखदाई ॥ अतिशयेंसीआवडे ॥ २४ ॥ जेंसत्यत्वेंशोभेपाहीं ॥ पुन्हापु
न्हाभाषणज्यांतनाहीं ॥ अक्षरांतबहूमधुरताई ॥ अनुप्रासयमकेंउत्तम ॥ २५ ॥ यापरीकविताविस्तारली ॥ आनंदामृतातेंवर्षली ॥
जैसेमेघवर्षाकाळीं ॥ संततवर्षतीजलधारा ॥ २६ ॥ आपुल्याकाव्याचेंआपण ॥ नवर्णीमीश्रेष्ठपण ॥ हृदयींनाभाजीप्रगटोन ॥ तेंचिक
वनकरितसे ॥ २७ ॥ ज्यांचेंकांहृदयअतिसरस ॥ तेचियोग्ययेथेंश्रवणास ॥ इतरजेकांअभक्तवायस ॥ ग्राम्यगीतपरिसोतकीं ॥ २८ ॥
असोभक्तिरसबोधिनी ॥ याटीकेसीनामठेवोनी ॥ गातसेंमीऐकाश्रवणीं ॥ शृंगारसहितभक्तिरूपा ॥ २९ ॥ ॥ मूलकवित ॥ ॥
श्रद्धाई फुलेल ओ उवटनो श्रवनकथा मैलअभिमान अंगअंगनी छुटाइये ॥ मनन सुनीर अन्हवाई अंगुछाई दया नवीन बसन पन

सोंधों ले लगाइये ॥ आभरन नाम हरिसाधुसेवा करनफूल मानसी सुनथ संग अंजन बानाइये ॥ भक्तिमहारानीको सिंगार चारु बीरी चाह रहे जो निहारि लहे लालप्यारी गाइये ॥ ३ ॥ ॥ टीकाओवी ॥ ॥ ज्याभक्तीसीश्रद्धाफुलेल ॥ तेंचिअंगासीलाविलेंतेल ॥ कथाश्रवणउटणेंविमळ ॥ होण्यालागींमर्दिलें॥ ३० ॥ तेणेंकरूनअभिमानमळ ॥ अंगोअंगींचासुटेतत्काळ ॥ वरीमननाचेंजलनिर्मळ ॥ घालोनिन्हाणिलेंभक्तीसी ॥ ३१ ॥ दयाहेंचिनवीनवसन ॥ तेंचिशरीरींकेलेंवेष्टन ॥ निश्चयाचेंजेंसदृढपण ॥ तेंचिसौभाग्यभाळींलेइलें ॥ ३२ ॥ रामनामाचेंआभरणसकळ ॥ प्रभूसंतसेवाकर्णफूल ॥ मानसिकजेंध्यानसोज्ज्वळ ॥ नथसुरेखरेखिली ॥ ३३ ॥ संतसंगाचेंअंजन ॥ घालितांचिशोभलेनयन ॥ ज्यांच्याकटाक्षबाणेंकरून ॥ श्रीहरीतेंवश्यकेलें ॥ ३४ ॥ यापरीसर्वअलंकारयुक्त ॥ भक्तीमहाराणीशोभत ॥ प्रीतीहेंचितांबूलमुखांत ॥ प्रेमाचारंगउमटला ॥ ३५ ॥ ऐसियापरीजेहरिभक्ती ॥ तीवरीजोठेवीआसक्ती ॥ तोचिधन्यहोयजगतीं ॥ सफलतयाचानरजन्म ॥ ३६ ॥ त्यासीचराधाकृष्णप्राप्त ॥ होतीलनिश्चयेंकरूनित्वरित ॥ हेंचिकवितींआनंदभरित ॥ प्रियादासजीगातसे ॥ ३७ ॥ ॥ मूलकवित ॥ ॥ शांत दास्य सख्य वात्सल्य ओ सिंगार चारु पांचो रससार विस्तार नीके गायेहैं ॥ टीकाको चमत्कार जानोगे विचार मन इनके सरूपमे अनूप ले दिखायेहैं ॥ जिनके न अश्रुपात पुलकितगात कहूं तिनहू को भाव सिद्ध वोरे सो छकायेहैं ॥ जोलो रहे दूरि रहे विमुखता पूरि हियो होय चूरिचूरि नेकु श्रवन लगायेहैं ॥ ४ ॥ ॥ टीकाओवी ॥ ॥ ज्याभक्तीच्याअंगींबहुवस ॥ नवधादशधाप्रकारेंरस ॥ त्यांमाजीजेपांचविशेष ॥ रससारउत्तमअसती ॥ ३८ ॥ त्यांसीचउत्तमप्रकारेंकरून ॥ यामाजीगाइलेविस्तारून ॥ ऐकातयांचेंनामाभिधान ॥ हरीसीबहुतजेआवडती ॥ ३९ ॥ शांतदास्यसख्यवात्सल्य ॥ तैसाचिशृंगाररसअमौल्य ॥ हेचिटीकेंतगाइलेनिर्मळ ॥ विस्तारेंकरूनजाणावे ॥ ४० ॥ आणिटीकेचाबहुचमत्कार ॥ जाणालमानसींकरितांविचार ॥ यापंचरसांचेंस्वरूपसुंदर ॥ अनुपमकरूनीदाविलें ॥ ४१ ॥ जगींजेह्मणवितीपूर्णअभक्त ॥ जयांसीऐकतांहरिकथामृत ॥ नेत्रींनवाहतीअश्रुपात ॥ कधींहीरोमन्नुठतीदेहीं ॥ ४२ ॥ तेहीयाटीकेचेंकरितांश्रवण ॥ भावसागरांतहोतीनिमग्न ॥

आश्चर्ययुक्तकरितीस्नान ॥ प्रेमळपूर्णह्मणविती ॥ ४३ ॥ परीयाभक्तिमालेहून ॥ दूरिजोंवरीराहेजाण ॥ तोंवरीविन्मुखतावाहेपूर्ण ॥ भक्तीचेंलक्षणनकळेचि ॥ ४४ ॥ जरीकिंचितहीलक्षदेवोन ॥ याटीकेसीकरीलश्रवण ॥ तरीअंतरींचुरचुरून ॥ लागेलगोडहरिभक्ति ॥४५॥

॥ मूलकवित ॥ ॥ पंचरस सोई पंचरंगफूल याकि नीके पियके पहिराइवेको रचिके बनाईहें ॥ वैजयंती दाम भाववती अलि नाभानाम लाई अभिराम शाममती ललचाइहें ॥ धारी उर प्यारी किंहु करत न न्यारी अहो देखो गति न्यारी ढरी पाइनिको आईहें ॥ भक्तीछबिभार ताते नमित श्रृंगार होत होत वस लखे जोई याते जानि पाईहें ॥ ५ ॥

॥ टीकाओवी ॥ ॥ पंचरसहेंपंचरंगीफूल ॥ याचीरचलीसेउत्तममाळ ॥ हरीचेकंठींसर्वकाळ ॥ घालावीह्मणोनकेलीसे ॥ ४६ ॥ तेचिकींमाळवैजयंती ॥ जीकांविराजेभाववती ॥ नाभामाळीघेऊनहातीं ॥ हरीचेसन्मुखपातला ॥ ४७ ॥ हरीनेंतीमाळपाहून ॥ प्रीतीनेंतिजवरीधांवलेंमन ॥ हृदयावरीकेलीधारण ॥ कधींहीवेगळीठेवीना ॥ ४८ ॥ पहामाळेचेंमहिमान ॥ येवढेंपावोनियांस्थान ॥ अधोमुखनम्रहोऊन ॥ हरीचेचरणींलोळतसे ॥४९॥ किंवाभक्तिभारझालाबहुत ॥ ह्मणोनियांतेवणवीहोत ॥ माळेसीपाहोनिजोवश्यहोत ॥ त्यासीचप्राप्तहोतसे ॥५०॥

॥ मूलकवित ॥ ॥ भक्तितरुपोधाही बिघन डर छेरिहूंको वारदे विचार बारि सीचो सतसंगसो ॥ लग्योइ बढन गोदा चंहूंदिस कटन सो चटन अकासजस फेल्यो बहुरंगसो ॥ संतउर आलवाल सोभित बिसाल छाया जिये जीवजाल ताप गये यो प्रसंगसो ॥ देखो बढवारि जांही अजाहूकि संका हूति ताहि पेड बांधे झूले हाथी जीते जंगसो ॥ ६ ॥

॥ टीकाओवी ॥ ॥ बहुशानरदेहभूमींतजाण ॥ होतसेभक्तितरुउत्पन्न ॥ परीतोजोंवरीअसेलहान ॥ तोंवरीरक्षणकेलापाहिजे ॥ ५१ ॥ शेळीह्मणजेअजामाया ॥ तेचिभक्षोनिकरीवायां ॥ विचारहाबारदबांधोनियां ॥ करावेंरक्षणभक्तीचें ॥ ५२ ॥ नातरीऐसेंकरीविघ्न ॥ जोकोणीकरूंबैसेभजन ॥ तयासीरुचीनउपजवीजाण ॥ भजनकरितांरोंकीतसे ॥ ५३ ॥ तेथेंहाविचारकरावाजाण ॥ केवळदेहहाभजनाकारण ॥ यावीणहेंव्यर्थजिण ॥ ह्मणोनिभजनींलागावें ॥ ५४ ॥ त्यावरीहीकरितांभजन ॥ मायाप्रेरीअस्वस्थपण ॥ अहोयेसमयींस्थिरनसेमन ॥ उदईकभजनकरूंआतां ॥ ५५ ॥ तेथेंहाचि

विचारजाण ॥ नाहींआयुष्याचेंप्रमाण ॥ पुढेंकार्याचीघालीअडचण ॥ भजनींत्वराकरीतसे ॥ ५६ ॥ तैंविचारहाचिविशेष ॥ कोणता
हीभक्षितांत्वरेंरस ॥ त्यांतीलपावेनास्वादरस ॥ ह्मणोनिसावकाशभजावें ॥ ५७ ॥ तंवतेदंभातेंउपजवी ॥ आपुलेंभजनजनांदावी ॥ ते
थेंयोजावीहीयुक्तिबरवी ॥ हरिविणदुजेनीकार्यनसरे ॥ ५८ ॥ मगतेलोटीअभिमानीं ॥ मजसमभजनींनसेकोणी ॥ तेथेंहाविचारआ
णिजेमनीं ॥ अंतरींप्रेरकहरिकर्ता ॥ ५९ ॥ त्यावरीवांछीतसेफळ ॥ सिद्धिदावोनिकरीविकळ ॥ प्रभूवांचूनिनश्वरसकळ ॥ विचारहाते
थेंयोजावा ॥ ६० ॥ यापरीविचाराचीबारद ॥ पाणीघालणेंतोसत्संगविमद ॥ वाढीलागेतैंवृक्षविशद ॥ फूटल्याशाखाचहूंदिशे ॥ ६१ ॥
त्यावाढल्याआकाशपरियंत ॥ यशरूपेंपसरल्याबहुत ॥ अनेकरंगतेपानेंशोभत ॥ संतउरआलवालविलसतसे ॥ ६२ ॥ पहावृक्षाचाथोर
पणा ॥ जेथेंशेळीचीशंकाजाणा ॥ तेथेंबांधितांहीमत्तवारणा ॥ यत्किंचितहीहालेना ॥ ६३ ॥ जात्याभिमानकुलाभिमान ॥ कर्माभि
मानज्ञानाभिमान ॥ अहंकोहंसोहंभान ॥ अजिंक्यवारणहेचिजाणा ॥ ६४ ॥ यांचेनितोनहालवेवृक्ष ॥ साक्षातयेवोनिजगन्निवास ॥
बैसेत्याचियाछायेस ॥ परमविश्रांतीपावतसे ॥ ६५ ॥ ॥ मूलकवित ॥ ॥ जाको जो सरूप सो अनूप ले दिखाइ दियो कियो
यो कबित पटमिहि मध्य लालहे ॥ गुनपे अपार साधु कहे अंक चारिहिमे अर्थ विस्तारि कविराज टकसारहे ॥ सुनि संतसभा झूमि रही
अलिश्रेनि मानो घूमि रही कहे यह कहांधो रसालहे ॥ सुनेहे अगर अब जानेमे अगर सही चोबा भये नाभा सो सुगंध भक्तिमालहे ॥ ७ ॥
॥ टीकाओवी ॥ ॥ आतांनाभाजीचेंऐकावर्णन ॥ ज्याचेंजेंस्वरूपकेलेंकथन ॥ प्रत्यक्षअनुपमदिलेंदाऊन ॥ जेवींसूक्ष्मपटांतररत्नशो
भे ॥ ६६ ॥ ऐसाकवित्वाचाप्रकार ॥ गुणेंकरोनिजोअपार ॥ साधूबोलतीअक्षरेंचार ॥ परीविस्तारबहूअर्थाचा ॥ ६७ ॥ कवींमाजीहा
विशाळ ॥ कवित्वज्याचेंटांकशाळ ॥ एकाक्षरेंरोकडविपुल ॥ तैसाचिविस्तारअर्थाचा ॥ ६८ ॥ ज्याचियाश्रवणींसंतचतुर ॥ मोहित
झालेजैसेभ्रमर ॥ ह्मणतीकितीहेंआहेरसाळ ॥ जयाचापारनलागेचि ॥ ६९ ॥ म्याहीऐकिलेबहुतरस ॥ परीत्यातजाणिलेहेचिसुरस ॥
नाभाजीचोबाझालेविशेष ॥ भक्तिमालहासुगंधज्याचा ॥ ७० ॥ ॥ मूलकवित ॥ ॥ बडे भक्तिमान निसिदिनि गुन गान

करे हरे जगपाप जाप हियो परिपूरहे ॥ जानी सुख मानी हरि संत सनमान सचे बचेऊं जगतरीति प्रीति जानि मूरहे ॥ तऊ दुराराध्य कोऊ कैसेके आराध्य सके समजो न जात मन कंप भयो चूरहे ॥ सोभित तिलक भाल माल उर राजे ऐपे बिना भक्तमाल भक्तिरूप अतिदूरहे ॥ ८ ॥ ॥ टीकाओवी ॥ ॥ मोठेमोठेभक्तिमान ॥ गुणगातातीहरीचेनिशिदिन ॥ जगाचेंकरितीपापहरण ॥ हृदयपरिपूर्णस्वानंदें ॥ ७१ ॥ सर्वगतहरीजाणून ॥ जेसर्वदासंतुष्टमान ॥ हरिसंतांचाकरितीमान ॥ जगरीतीहूनजेवेगळे ॥७२॥ प्रीतीच्छिसुळींजयासाध्य ॥ तयासीहीहेदुराराध्य ॥ इतरांसीकैसेनिआराध्य ॥ ऐसीहेश्रेष्ठभक्तिमाला ॥ ७३ ॥ जाणूंबैसतीजेलक्षलाऊन ॥ परीमनहोतसेकंपायमान ॥ हृदयामाजीचुरचुरहोऊन ॥ तटस्थतातेपावती ॥ ७४ ॥ तिलकेंकरूनिशोभेभाळ ॥ हृदयींविराजेतुळसीमाळ ॥ परीपाहिल्याविणभक्तिमाळ ॥ भक्तिरूपअतिदूरअसे ॥ ७५ ॥ ॥ नाभाजीकृतमंगलाचरण ॥ ॥ मूलपद ॥ ॥ नमो नमो श्रीभक्तिसुमाल ॥ जाके सुनत महातम नासत उरझलकत राधानंदलाल ॥ गदगदसुर पुलकत अंगअंगनी लोचनबरसत असुवनि जाल ॥ उतरिजात अभिमानव्यालबिख लेत जिवाइ सुरस तिहिकाल ॥ १ ॥ होति प्रीति हरिभक्तजननिसो लेत सीत हरिचरनप्रक्षाल ॥ तजत कुसंग लेत सतसंगति भाल जगत कोउ अद्भुतभाल ॥ २ ॥ निसिवासर अरु सोवत जागत रोमरोमव्है करत निहाल ॥ श्रीअग्रनरायनदासप्रियाप्रियप्रगटी जीवनि रसिक रसाल ॥ ३ ॥ ॥ टीकाओवी ॥ ॥ उत्तमहेश्रीभक्तिमालपूर्ण ॥ वारंवार ईसीमाझेंनमन ॥ जीचेंजनांसीहोतांश्रवण ॥ तमाचानाशहोतसे ॥ ७६ ॥ हृदयामाजीप्रत्यक्षनिर्मळ ॥ शोभतसेराधानंदलाल ॥ गदगदकंठभरोनिकेवळ ॥ शब्दनिघतसेतेवेळां ॥ ७७ ॥ रोमांचितहोतसेसर्वगात्र ॥ दोनींभरोनियेतीनेत्र ॥ केवळअश्रुजालवर्षत ॥ प्रेमअद्भुतलोटतसे ॥ ७८ ॥ अभिमानरूपीजोसर्पविख्यात ॥ त्याचेंविषउतरोनिसर्वजात ॥ तत्काळजीवांसीजिवंतकरीत ॥ आत्मस्वरूपओळखवी ॥ ७९ ॥ हरिभक्तजनांचेठायींसत्य ॥ अतिशयेंसीप्रीतिहोत ॥ हठानेंचरणप्रक्षाळित ॥ तीर्थप्रसादघेतसे ॥ ८० ॥ दुःसंगाचाकरीत्याग ॥ रात्रंदिवसधरीसत्संग ॥ ऐसेंकांहींअद्भुतभाग्य ॥ उठेजागोनिमस्तकींचें ॥ ८१ ॥ निद्रेंतआणिजाग्रतींत ॥ रात्रंदिवसप्रेमदा

टत ॥ तन्नहोवोनिरोमांचित ॥ आनंदवीतश्रीहरीतें ॥ ८२ ॥ अग्रदासाच्याकृपेजाण ॥ नारायणदासाच्यामुखेंकरून ॥ राधाकृष्णा
चीकेवळजीवन ॥ भक्तिमालाहेप्रगटली ॥ ८३ ॥ रसिकजनांसीरसाळपरम ॥ जीवापासोनिआवडेउत्तम ॥ ह्मणोनिअंतरींयेऊनिप्रेम ॥
करितसेनमनभक्तिमालेसी ॥ ८४ ॥ ॥ मूलदोहा ॥ भक्त भक्ति भगवंत गुरू चतुर नाम वपु एक ॥ इनके पद वंदन करे नासे
विघन अनेक ॥ १ ॥ ॥ टीकाओवी ॥ आणीकऐकामंगलाचरण ॥ श्रवणींगोडअमृताहून ॥ भक्तभक्तिदेवगुरुजाण ॥ नांवेंचारप
रीएकतन्न ॥ ८५ ॥ याचेंकरितांपदवंदन ॥ नाशपावतीअनेकविघ्न ॥ ह्मणोनियांकरितसेंनमन ॥ ग्रंथपरिपूर्णव्हावया ॥ ८६ ॥ ॥
मूलकवित ॥ ॥ हरिगुरुदासनिसों साच्यो सोई भक्त सही गही एक टेक फेरि उरते न टरिहे ॥ भक्तिरसरूपको सरूप यहै छबिसार
चारु हरिनाम लेत असुवनि झरिहे ॥ वही भगवंत संत प्रीतिकों बिचार करे धरे दूरि ईसताहू पांडवनिसो करीहे ॥ गुरू गुरुताईकी
सचाइ लेदिखाइ जहां गाई श्रीपैहारीजुकी रीति रंगभरीहे ॥ ९ ॥ ॥ टीकाओवी ॥ हरिगुरुहरिदासांचेठायीं ॥ खरेपणावसेज्याचे
हृदयीं ॥ ज्याचानिश्चयनढळेकहीं ॥ तोचिकींभक्तजाणावा ॥ ८७ ॥ सर्वदावसेहृदयींध्यान ॥ हरिनामाचेंमुखींगर्जन ॥ प्रेमाश्रुअखं
डनयनींहून ॥ भक्तिस्वरूपतेंचिखरें ॥ ८८ ॥ भक्तप्रीतीचाकरीविचार ॥ अपुलेंईशत्वठेवीदूर ॥ नीचपणेंसेवीजोपंडुकुमर ॥ तोचिईश्वर
जाणावा ॥ ८९ ॥ अपुल्यागुरुपणाचीसत्यता ॥ शिष्यासीजेणेंदाविलीतत्त्वता ॥ पैंहरीचीरीतिआणाचित्ता ॥ पूर्णरंगभरलाजीमाजी ॥ ९० ॥
॥ ॥ मूलदोहा ॥ मंगल आदि विचारि रह्यो वस्तु न ओर अनूप ॥ हरि जिनको जश गावत हरिजन मंगलरूप ॥ २ ॥ सबसंतन नि
रनय कियो मथि श्रुति पुरान इतिहास ॥ भजिवेको दोऊ सुघर कै हरि कै हरिदास ॥ ३ ॥ श्रीगुरुअग्रदेव आज्ञा दई भक्तिनिको ज
स गाई ॥ भवसागरके तरनको नाहिन ओर उपाई ॥ ४ ॥ ॥ टीकाओवी ॥ प्रथमकरितांमंगलविचार ॥ अन्यवस्तुनदिसेचिथो
र ॥ ज्यांचेंयशगाईहरीनिरंतर ॥ मंगलरूपतेसज्जनची ॥ ९१ ॥ सर्वसंतांनींनिर्णयकेले ॥ श्रुतिपुराणइतिहासादिमथिले ॥ दोघेचिभ
जनायोग्यनिवडिले ॥ श्रीहरीकिंवाहरिदास ॥ ९२ ॥ हरिभक्तयशगावयाची ॥ आज्ञाश्रीगुरूअग्रदेवाची ॥ भवसागरींतरण्याची ॥

अणीकयुक्तिअसेना ॥ ९३ ॥ ॥ मूलकवित ॥ मानसीसरूपमें लगेहें अग्रदास जबे करत बयार नाभा मधुर संभारसो ॥ चढ्यो
हो जहाजपैंजु शिष्यएक आपदामें कऱ्यो ध्यान खिच्यो मन छूट्यो रूपसारसों ॥ कहत समरथ गयो वोहित बहुत दूरि आवो छ
बि पूरि फिरि ढरै ताही ढारसो ॥ लोचन उघारिकें निहारि कह्यो बोल्यो कोन वही जोन पाल्यो सीत दैंदै सुकुवार सों ॥ १० ॥
टीकाओवी ॥ ॥ कोणेएकेसमयास ॥ जयपुरनिकटींगलथ्यास ॥ एकांतींमानसपूजेस ॥ श्रीअग्रदासबैसले ॥ ९४ ॥ तयेसमयींनाभाभ
क्त ॥ निकटउभाभक्तियुक्त ॥ हळूहळूवाराघालित ॥ प्रेमभरितहोऊनी ॥ ९५ ॥ तंवकोणीएकसावकार ॥ अग्रदासाचाअसेकिंकर ॥
मालभरोनीजहाजावर ॥ समुद्रांतजातसे ॥ ९६ ॥ एकाएकींजहाजडगमगलें ॥ सावकाराचेंमनघाबरलें ॥ सद्गुरूचेंस्मरणकेलें ॥ तेणें
ध्यानविसरलेअग्रदास ॥ ९७ ॥ मनींह्मणतीकायझालें ॥ नाभाजीनेंतैंविनविलें ॥ आपुलेंमानसबहुदूरगेलें ॥ संकटींभक्ततारावया ॥ ९८ ॥
तंवतोशिष्यसावकार ॥ अंतरींस्मरतांचिगुरुवर ॥ जहाजचालिलेंतैंसत्वर ॥ इकडेनाभाजीविनवीतसे ॥ ९९ ॥ ह्मणेजीआपुलेंआलेंम
न ॥ ऐसेंत्याचेंपरिसतांवचन ॥ सद्गुरूतेव्हांसावधहोऊन ॥ मानसपूजनसारिती ॥ १०० ॥ उघडोनियांमगलोचन ॥ ह्मणतीकोणरेबो
लिलावचन ॥ येरूह्मणेसीतदेऊन ॥ पाळिलाजोकुमारकीं ॥ १ ॥ ॥ मूलकवित ॥ अचिरज दयो नयो ईहांलों प्रवेस भयो मनसु
खछायो जान्यो संतनि प्रभावकों ॥ आज्ञा तब दई यह भई तोपें साधुकृपा उनहीको रूप गुन कहो हिय भावकों ॥ बोल्यो करजो
रि याको पावतन ओर छोर गाउ रामकृष्ण नही पाउ भक्तिदावको ॥ कही समुझाइ वेइ हृदैं आइ कहे सब जिन ले दिखाइ दई
सागरमें नावको ॥ ११ ॥ ॥ टीकाओवी ॥ तेव्हांह्मणतीअग्रदास ॥ नवीनदीधलेंआश्चर्यास ॥ येथवरयाचाझालाप्रवेश ॥ मनींसंतो
षेंव्यापिलें ॥ २ ॥ मगह्मणतीहासंतप्रभाव ॥ ह्मणोनियाचाऐसाआव ॥ तयातेंबोलतीसद्गुरूदेव ॥ आज्ञापरिसिजेबालका ॥ ३ ॥ तु
जवरीझालीसंतकृपा ॥ त्याचेचिवर्णिजेगुणरूपा ॥ अंतरींधरिजेभावसोपा ॥ तेणेंभवकूपालंघिसी ॥ ४ ॥ नाभाजीविनवीजोडोनिक
र ॥ कवण्यापरीमीवर्णूंकिंकर ॥ नसांपडेचियाआधार ॥ भक्तप्रभावनआकळे ॥ ५ ॥ रामकृष्णाचेंगाईनचरित्र ॥ व्यासवाल्मीकांचा

त्यासआधार ॥ तेव्हांबोलतीसद्गुरुवर ॥ चिंताअंतरींकरूंनको ॥ ६ ॥ जेंहीकांहृदयींवसोन ॥ जहाजदिधलेंदाखवोन ॥ कथितीलअंतरींतेचियेऊन ॥ आपुलेंचरित्रआपणचि ॥ ७ ॥ ऐसीआज्ञाहोतांचिजाण ॥ नाभाजीहृदयींआनंदोन ॥ करूंलागलेसंतगुणवर्णन ॥ जेणेंपावनजगहोय ॥ ८ ॥ तेनाभाजीकोठीलकोण ॥ अग्रदासाचीकृपाजाण ॥ त्यावरीव्हावयाकायकारण ॥ तेंसंपूर्णपरिसावें ॥ ९ ॥ मूलकवित ॥ हनूमानबंसहीमें जनम प्रसिद्ध जाकों भयो दृगहीन सो नवीन बात धारिये ॥ उमरि बरस पांच मानिकें अकाल आंच माता बन छोडि गई विपत्ती विचारिये ॥ कील्ह वो अगर ताहि डगर दरस दियो लियो यो अनाथ जानि पूछो सो उचारिये ॥ बडे सिद्ध जल ले कमंडलसों सीचे नैन चैन भयो खुले चख जोरिको निहारिये ॥ १२ ॥ ॥ टीकाओवी ॥ दक्षिणेसतैलंगदेशांत ॥ गोदावरीसमीपउत्तरभागांत ॥ रामभद्राचलविख्यातपर्वत ॥ वनवाससमयींरामराहिले ॥ ११० ॥ रामदासनामेंविख्याततेथ ॥ महाभक्तआणितैसाचिपंडित ॥ त्यासीलोकह्मणतीहनुमंत ॥ अंशरूपेंहाजाहला ॥ ११ ॥ त्यापासोनिजालाजोपरिवार ॥ सर्वहीरामयशगाणार ॥ तद्देशासीगायकनर ॥ तेचिविख्यातअसती ॥ १२ ॥ त्याहनुमंताचेवंशींजाण ॥ नाभाजीहेझालेउत्पन्न ॥ व्यवहारार्थत्याचेवडिलजाण ॥ ग्वाल्हेरीयेऊनराहिले ॥ १३ ॥ तंवतोपितापावलानिधन ॥ नाभाजीअसेनेत्रहीन ॥ माताकरीतसेपालन ॥ झालाकुमरपांचवर्षांचा ॥ १४ ॥ तद्देशींकाळपडिला ॥ माताघेऊनकुमाराला ॥ प्राप्तजालीजयपुराला ॥ तोंतेथेंहीअन्ननमिळेचि ॥ १५ ॥ गलथ्यासमीपनिकटवन ॥ बालकासतेथेंबैसवोन ॥ मातागेलीचुकावोन ॥ पोसवेनाह्मणोनि ॥ १६ ॥ क्षुधितआणिनेत्रहीन ॥ करीतसेतैंबाळरुदन ॥ तोकील्हआणिअगरजाण ॥ त्याचिमार्गानेंनिघाले ॥ १७ ॥ तोबालकदेखिलाहीनदीन ॥ हृदयआलेंकळवळोन ॥ उभयतांहीसमीपयेऊन ॥ वर्तमानपूसती ॥ १८ ॥ कोठीलकोणतूंरेबाळ ॥ कांपडिलासीयेथेंविकळ ॥ येरूवर्तमानसांगेसकळ ॥ मातेनेंविव्हळसोडिलें ॥ १९ ॥ मोठेसिद्धतेदोघेजण ॥ दयाआलीतेंपरिसोन ॥ कमंडलूचेंजलघेऊन ॥ केलेंसिंचनबाळावरी ॥ १२० ॥ तोंतयातेंदिसूंलागलें ॥ अरोगसर्वहीशरीरझालें ॥ उभयांसीसन्मुखदेखिलें ॥ केवळहरिहरआलेकीं ॥ २१ ॥ बाळासीझालेंपरमसुख ॥

नाभाजी चरित्र

ज्यासीउपमानदिसेआणिक ॥ नारदासीपहातांध्रुवबाळक ॥ जैसाअलोलिकहर्षपावला ॥ २२ ॥ ॥ मूलकवित ॥ ॥ पाई परि
आसु आए कृपा करि संग ल्यायो कील्ह आज्ञा पाइ मंत्र अगर सुनायोहे ॥ गलते प्रगट साधु सेवा सो बिराजमान जानी उन
मान ताहि टहल लगायोहे ॥ चरन प्रछालि संत सीतसो अनंत प्रीति जानी रसरीति ताते हृदैं रंग छायोहे ॥ भई बढवारि ताको
पावे कोन पारावार जैसो भक्तिरूप सो अनूप गिरा गायोहे ॥ १३ ॥ ॥ टीकाओवी ॥ कील्हदासअग्रदासातेंपाहून ॥ उभय
तांचेहीचरणींपडोन ॥ बाळकरीतसेदीर्घरुदन ॥ उभयतांआश्वासितीनाभींह्मणोनि ॥ २३ ॥ तेंचित्यासीनामाभिधान ॥ संतींठेविलें
नाभाह्मणून ॥ उभयतांनींहीकृपाकरून ॥ निजाश्रमासीअणिला ॥ २४ ॥ अग्रदासासीविनवोन ॥ कील्हदासबोलतीवचन ॥ बाळ
नठेविजेसंस्कारहीन ॥ उपदेशयासीकरावा ॥ २५ ॥ कील्हदासाच्याआज्ञेवरून ॥ अग्रदासेंउपदेशिलेंजाण ॥ नारायणदासनामा
भिधान ॥ त्याबाळकासीठेविलें ॥ २६ ॥ गलत्यासीसाधुफारयेती ॥ त्याचियेचरणींअतिशयरती ॥ बाळाचीजाणोनितैंगुरुमूर्ति ॥ सं
देवासीमुगुटकरीजाण ॥ तोश्रीरंगनाथेंआपण ॥ मस्तकलवोनघेतला ॥ ६ ॥ ॥ कथाजसुस्वामीची ॥ ॥ मू०क०॥ जसु नाम स्वामी गंगाजमुनाके मध्य रहे साधुसेवा करे ताको खेती उपजावही ॥ चौरि गये बैल ताकी इनको न सुधी कछु तैसे दिये शाम हल जूते मन भावही ॥ आये वृजबासी पैंठ वृषभ निहारि कही इहै कोन लायो घर जाइ देखि आवही ॥ ऐसे बार दोइ चारि फिरे उन ठीक होत पूछी पुनि ल्याये आये इन्है पै न पावही ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ गंगायमुनांचामध्यभाग ॥ अंतरवेदीह्मणतीजग ॥ तेथेंजयाचीवस्तीसांग ॥ जसुस्वामीनामत्याचें ॥ ७ ॥ त्यातेंचह्मणतीजनजसवंत ॥ साधुसेवेचीइच्छाबहुत ॥ त्याचिहेतूलागींसत्य ॥ शेतीनिपजवीसर्वदा ॥ ८ ॥ जेंकांहींनिघेधान्यत्यांत ॥ साधुसंतांलागींदेत ॥ एकदांचरित्रझालेंअद्भुत ॥ बैलचोरांनींचोरिले ॥ ९ ॥ यासीकांहींनसेशुद्धी ॥ परीश्रीहरीकार्यसाधी ॥ तैसेचिबैलतयेसंधी ॥ उत्पन्नकरोनिठेविले ॥ १० ॥ जसुस्वामीनित्यजाण ॥ त्याबैलांसीहलजोतून ॥ खेतीकरीतसेपूर्ण ॥ मनासीआवडेज्यापरी ॥ ११ ॥ तयादेशांतचालऐसी ॥ चोरांसीह्मणतीव्रजवासी ॥ जसुस्वामीच्याशेतीसी ॥ पुनरपिआलेएकदां ॥ १२ ॥ चोरीसीलोटलेंवर्षएक ॥ पाहूंआतांकायकौतुक ॥ गाईच्यागोठणीपाहतीसम्यक ॥ तोंतैसेचिबैलदेखिले ॥ १३ ॥ ह्मणतीआतांचिहोतेघरीं ॥ येथेंआणिलेकोणीझडकरी ॥ तेव्हांसदनींयेवोनिसत्वरी ॥ पाहतीतोंबैलआहेती॥१४॥ ह्मणतीकैसेंनवलझालें ॥ पुन्हाघराहूनयेथेंआले ॥ तंवतैसेचिबैलदेखिले ॥ जसुस्वामीच्यागोठणी ॥ १५ ॥ सारखीचरंगदेहाकृती ॥ पाहोनिविस्मितझालेचित्तीं ॥ दोनचारदायेतीजाती ॥ ह्मणतीहेंकायजाहलें॥१६॥ जसुस्वामीतें विचारिती ॥ कधींतुमच्यागोठणीनिश्चिती ॥ बैलांचीचोरीझालीहोती ॥ तंवतेह्मणतीनसेकीं ॥ १७ ॥ तेव्हांचित्तींआश्चर्यकरोन ॥ जसुस्वामीसीबोलतीवचन ॥ आह्मीतुमचेबैलचोरोन ॥ नेलेतयासीवर्षझालें ॥ १८ ॥ पहादावितोंआणोन ॥ मगसदनासीजाऊन ॥ बैलांसीजोंआलेघेऊन ॥ तोंयेथीलवृषभगुप्तझाले ॥ १९ ॥ जसुस्वामीतेबैलपाहोनी ॥ आपुलेपहावयागेलेगोठणी ॥ तेथेंकांहींनदिसेनयनीं ॥ चोरांसीयेऊनिमगबोलती ॥ २० ॥ तुह्मीचकांहींकृत्यकेलें ॥ इतुक्यांतगोठणीहोतेभले ॥ तेव्हांअंतरींचोरसमजले ॥ ह्मणतीहेंसाधिलेंदेवांनीं ॥ २१ ॥ ॥ ॥

छप्पा ४९

॥ ॥ मू०क० ॥ बडोइ प्रभाव देख्यो तैसे प्रभु बैल दिये भयो हिये भाव आइ पाइ नमे परेहे ॥ निपट अधीन दीन भाषि अ
भिलाष जानि दयाके निधान स्वामी सिष्य लैके करेहे ॥ चोरी त्यागि दई अति सुधि बुधि भई नई रीति गही लई साधु पंथ
अनुसरेहे ॥ अन्न पहुचावे दूध दही दे लडावे आवे संत गुन गावै वे अनंत सुख भरेहे ॥ २ ॥ ॥ टी०ओ० ॥ थोरपाहोनिप्रभा
व ॥ चोरांचेअंतरींउपजेभाव ॥ ह्मणतीसाह्यहोवोनिदेव ॥ तैसेचिबैलदीधले ॥ २२ ॥ चित्तींअनुतापहोवोन ॥ मगतेचोरयेऊन ॥ ज
सुस्वामीचेधरितीचरण ॥ ह्मणतीअनन्यशरणअसों ॥ २३ ॥ फारचिदावितीदीनपण ॥ ह्मणतीआह्मीपातकीपूर्ण ॥ तरीदयाळाकृपाक
रोन ॥ उद्धारकरावाआमुचा ॥ २४ ॥ पाहोनिचोरांसीअनन्यशरण ॥ स्वामीकेवळदयानिधान ॥ तयांच्यामस्तकींकरठेऊन ॥ उपदेश
देवोनशिष्यकेले ॥ २५ ॥ तेहींचोरीचीसोडिलीव्याधी ॥ अत्यंतजाहलीशुद्धबुद्धी ॥ सद्गुरूच्याकृपावबोधीं ॥ नव्याचिधरिलेंरीतीस
॥ २६ ॥ साधूचामार्गअवलंबून ॥ दूधदहींआणीकअन्न ॥ अर्पितीगुरूसीआणोन ॥ संतांचेंसेवनकरावया ॥ २७ ॥ जेजेकोणीयेती
संत ॥ त्यांतेंपूजितीप्रकारेंबहुत ॥ गुणतयांचेचिगातीसतत ॥ तेणेंअनंतसुखपावले ॥ २८ ॥ ॥ कथानंददासाची ॥ ॥ मू०क० ॥
निकट बरेली गांव तामे सो हवेली रहे नंददास विप्र भक्त साधु सेवा रागीहे ॥ करै द्विज दोष तासो मुई एक बछिया लें डारी द
ई खेतमांझ गारी जक लागीहे ॥ हत्याको प्रसंग करे संतजनहूसो लरे हिंदुसो न मारे यह बडोइ अभागीहे ॥ खेतपर जाय वही
लई है जिवाइ देखि दोषी परे पाइ भक्तिभाव मती पागीहे ॥ ३ ॥ ॥ टी०ओ० ॥ नंददासब्राह्मणथोर ॥ गंगेच्यापैलतीरावर ॥
बासबरेलीगांवसुंदर ॥ राहण्याचेंघरअसेतेथें ॥ २९ ॥ ब्राह्मणांचींघरेंशंभर ॥ सकुटुंबराहतीनिरंतर ॥ त्यांतचिनंददासाचेंघर ॥ भगवद्भ
क्तअसेहो ॥ ३० ॥ तेथेंविप्रांचीऐसीरीती ॥ भिक्षामागोनिनिर्वाहकरिती ॥ नंददासकरीभगवद्भक्ती ॥ त्यायोगेंभजतीसर्वजन ॥ ३१ ॥
साधुसेवेचीअतिप्रीती ॥ इतरजनहीअनुकूलहोती ॥ हेंपाहोनिविप्रचित्तीं ॥ बहुसंतापतीतेधवां ॥ ३२ ॥ ह्मणतीहाकेवळमूर्ख ॥ यासी
चभजतीसर्वलोक ॥ आह्मीविद्वानअसोनिसम्यक ॥ भिक्षामागतोंघरोघरीं ॥ ३३ ॥ तरीकांहींकरोनिचेष्टा ॥ याचीभंगावीसर्वप्रतिष्ठा ॥

यापरीविचारिताबुद्धिभ्रष्टा ॥ तोंवासरीमेलेलीपाहिली ॥ ३४ ॥ रात्रीचेठाईंउठोनित्वरित ॥ नंददासाच्याशेताआंत ॥ वासरीतेथेंनेऊ
नटाकित ॥ गलबलाकरितीतेधवां ॥ ३५ ॥ नंददासासीहांकमारिती ॥ अनेकप्रकारेंशिव्यादेती ॥ अरेतूंकेवळपापमूर्ति ॥ गोहत्यारी
अससी ॥ ३६ ॥ वासरीयेतांशेतांत ॥ तिचाकेलाप्राणघात ॥ आमुच्यादेशांतूनिनिश्चित ॥ नीघचांडाळायेवेळे ॥ ३७ ॥ नंददासके
वळसाधुजन ॥ त्यासींभांडतीसर्वब्राह्मण ॥ अरेतूंअससीशुद्धयवन ॥ हिंदुकायतोगायमारी ॥ ३८ ॥ अरेअभाग्याथोरपापिष्ठा ॥ अन
र्थाच्याकरिसीचेष्टा ॥ मुखनदाखवींआह्मांभ्रष्टा ॥ यापरीअनेकबोलती ॥ ३९ ॥ नंददासेंहेंऐकोन ॥ तयांसीविचारीयेऊन ॥ कोठेंवा
सरीपडलीजाण ॥ दावायेवेळेमजलागीं ॥ ४० ॥ विप्रह्मणतीकैसेंढोंग ॥ आपणमारोनिधेनूसांग ॥ दाखवाह्मणोनिबोलेसवेग ॥ बरेंये
नष्टातुजदावितों ॥ ४१ ॥ नंददासासीनेऊन ॥ धेनूदिधलीदावोन ॥ येरूसत्वरजवळजाऊन ॥ कायतियेसीबोलती ॥ ४२ ॥ येथेंतुवां
दिधल्याप्राण ॥ मजवरीयेतेंतेंनिदान ॥ तरीआणीकजागींजाऊन ॥ सुखेंप्राणासीसोडावें ॥ ४३ ॥ नंददासाच्यामुखांतून ॥ ऐसेंनिघतां
चिवचन ॥ तत्काळतेवासरीउठोन ॥ निघालीतेथोनतेधवां ॥ ४४ ॥ दोनचारशेतेंओलांडोन ॥ तेथेंजाऊनसोडीप्राण ॥ ऐसेंपाहतांवि
न्मुखजन ॥ पडतीयेऊनचरणावरी ॥ ४५ ॥ विपरीतझालीत्यांचीमती ॥ भक्तिभावांतजडलीप्रीती ॥ संप्रदायघेऊननिश्चिती ॥ भगव
द्भजनींलागले ॥ ४६ ॥ ॥ कथाआल्हजीची ॥ ॥ मू०क० ॥ चले जात आल्ह मग लगे बाग दीठि पर्‍यो करी अनुराग ह
रिसेवा विस्तारिये ॥ पकि रहे आंब मांगे मालियास भोग लिये कहो लीजे कही झुकी आई सब डारिये ॥ चल्यो दौरि राजा ज
हां जाइके सुनाइ बात गात भई प्रीति आये खुटत पाव धारिये ॥ आवतही लोटि गयो मैतो ज्ञु सनाथ भयो दयो ले प्रसाद भ
क्ति भाव ईस भारीये ॥ ४ ॥ ॥ टी०ओ० ॥ आल्हदाससंतनिर्मळ ॥ करीतफिरतीयात्रासकळ ॥ एकदांएक्यागांवाजवळ ॥ बा
गउत्तमपाहिला ॥ ४७ ॥ तेथेंसुंदरवाहेपाणी ॥ गोडवाटलेंयाचेमनीं ॥ ह्मणेएथेंचिउतरोनी ॥ प्रभूचेंपूजनकरावें ॥ ४८ ॥ मगकरोनि
यांस्नान ॥ वृक्षाच्याखालींबैसोन ॥ श्रीहरीचेंकरीपूजन ॥ प्रेमभावेंकरोनियां ॥ ४९ ॥ तेथेंआंब्याचेंझाडहोतें ॥ पिकलेलेआंबेलागले

त्यातें ॥ मनींह्मणेहेश्रीहरीतें ॥ अर्पणकरावेंनिश्चित ॥ ५० ॥ मगमाळ्यासीबोलाऊन ॥ नम्रपणेंमागेआपण ॥ दोनचारआंबेतोडोन ॥
नैवेद्यासीदेइजे ॥ ५१ ॥ तेव्हांमाळीबोलेवचन ॥ तुझीइच्छागेलीजाण ॥ पुढेंदेवाचेंनांवकरून ॥ खावयाआपणामागसी ॥ ५२ ॥ ज
रीपाहिजेदेवास ॥ तरीपाहायाआम्रवृक्षास ॥ आंबेलागलेबहुवस ॥ करावेअर्पणसर्वही ॥ ५३ ॥ तेणेंआवेशेंकेलेंभाषण ॥ आल्हदासें
सत्यमानोन ॥ तत्काळशंखोदकेंकरून ॥ केलेंप्रोक्षणवृक्षासी ॥ ५४ ॥ तोंजाहलाचमत्कार ॥ फांद्यावृक्षासीअसतीफार ॥ सर्वहीलवोनि
येतीसमोर ॥ आंबेझडझडांटाकिती ॥ ५५ ॥ आल्हासन्मुखतेवेळां ॥ सर्वआंब्यांचाढीगझाला ॥ हेंपाहोनिमाळीतेवेळां ॥ धांवतगेलानृ
पाजवळी ॥ ५६ ॥ जेथेंबैसलाहोताराव ॥ त्यासीवृत्तांतकथीसर्व ॥ ऐकतांअंगींप्रेमभाव ॥ उपजलातेव्हांरायासी ॥ ५७॥ तत्काळअन
वाणीधांवत ॥ आलासेबागांतनृपनाथ ॥ येतांचिपायांवरीपडत ॥ आल्हदासाचेतयेवेळीं ॥ ५८ ॥ करजोडोनिकरीस्तवन ॥ ह्मणेमी
आजझालोंधन्य ॥ तेव्हांस्वामीप्रसन्नहोऊन ॥ देतीप्रसादरायासी ॥ ५९ ॥ रायानेंतेआंबेघेऊन ॥ सर्वसैन्यासीदेवांटोन ॥ सर्वहीप्रसा
देंझालेपावन ॥ आल्हुदासासीशरणआले ॥ ६० ॥ उपदेशदिधलासर्वांस ॥ भक्तिभावप्रगटेत्यांस ॥ यापरीकृपाळूजगदीश ॥ पावेभक्तांस
पदोपदीं ॥ ६१ ॥ ॥ कथावारांगनेची ॥ ॥ मू०क० ॥ वेश्याको प्रसंग सुनो अति रसरंग भऱ्यो भऱ्यो घर धन अहो ऐपे कोन कामको ॥
चले मग संतजन ठोर सुछ आई मन छाई भूमि आसनसो लोभ नही दामको ॥ निकसी झमकि द्वार हंससे निहारि सब को न भाग
जागे भेद नही मेरे नामको ॥ मोहोरनि पात्र भरि ले महंत आगे धऱ्यो ढऱ्यो जल नैन कही भोग करो शामको ॥ ५ ॥ ॥ टी०ओ० ॥
वारांगनेचाएकप्रसंग ॥ मनलावोनिऐकासांग ॥ अत्यंतज्यामाजीरसरंग ॥ भरिलाअसेप्रेमाचा ॥ ६२ ॥ कर्नाटकप्रांतांत ॥ रंग
पट्टणअसेख्यात ॥ तेथेंवेश्याहोतीराहत ॥ रूपेंअत्यंतसुंदरअसे ॥ ६३ ॥ गायनांतजैसीगंधर्व ॥ जिसीअनकूलसर्ववैभव ॥
घरपाहतांअसेअपूर्व ॥ बागसरोवरेंज्यामाजी ॥ ६४ ॥ जवळीजीचेबहुधन ॥ परीत्याचाउपयोगकोण ॥ असोहरीच्याकृपेकरून ॥ स
त्संगतीसींजाहला ॥ ६५ ॥ कोणीएकमोठेमहंत ॥ शतावधीज्यांसवेंसंत ॥ श्रीरंगाच्यादर्शनार्थ ॥ रंगपट्टणींपातले ॥ ६६ ॥ मार्गी

बहुतझालेश्रम ॥ पाहतीघ्यावयाविश्राम ॥ तोंयावेश्येचेंपाहिलेंधाम ॥ ह्मणतीहेंउत्तमअसेकीं ॥ ६७ ॥ दोनीद्वारेंमोकळींहोती ॥ अंतर्यामीशिरोनिपाहती ॥ तोंनिर्मळजळाचेपाटवाहती ॥ कारंजेशोभतीठाईंठाईं ॥ ६८ ॥ अनेकतऱ्हेचेवृक्षशोभती ॥ फळपुष्पेंकरोनिडोलती ॥ ठाईंठाईंचौकअसती ॥ शाळादिसतीबहुतेथें ॥ ६९ ॥ परीकोणीहीनसेजन ॥ ह्मणतीयाचेंकायकारण ॥ असोपरंतुउत्तमस्थान ॥ ह्मणोनिआसनघातलें ॥ ७० ॥ मोठ्यांचावाडापाहोन ॥ ह्मणालराहिलेआशेकरून ॥ तरीद्रव्याचालोभजाण ॥ किंचितमनांतनसेची ॥ ७१ ॥ मगसर्वांनींकरोनिस्नान ॥ कोणीकरितीविष्णुपूजन ॥ कोणीकरितीभगवद्भजन ॥ करितीगीतापाठकोणी ॥ ७२ ॥ एकचिजाहलागलबला ॥ वेश्येचेकर्णींशब्दगेला ॥ झरोक्यांतूनितेवेळा ॥ खालींदृष्टीनेंपाहातसे ॥ ७३ ॥ तोंशतावधीसाधुजन ॥ करीतबैसलेआहेतभजन ॥ ऐसेंपाहोनितिचेंमन ॥ प्रेमरंगांतबुडालें ॥ ७४ ॥ कागाचेघरींहंसआले ॥ त्यांसीपाहोनिऐसेंमानिलें ॥ कोणतेंआजिभाग्यउदेलें ॥ तेंकांहींनकळेमजलागीं ॥ ७५ ॥ माझियानामाचाभेद ॥ नाहींकळलायांसीविशद ॥ ह्मणोनिझालेंघरहेंशुद्ध ॥ तरीआपणहीपावनव्हावें ॥ ७६ ॥ जामदारखानामगखोलोन ॥ काढोनिमोहरासहस्रदोन ॥ चांदीच्यातबकांतठेवोन ॥ निघालीआपणदर्शना ॥ ७७ ॥ टमकतझमकतबाहेरआली ॥ महंतांच्याजवळीगेली ॥ ताटमोहरांचेंतयेवेळीं ॥ समोरठेवोनिउभीराहे ॥ ७८ ॥ महंतजोंपाहतीवर ॥ तोंजोडोनीदोनीकर ॥ नेत्रींवाहतसेनीर ॥ सप्रेमअंतरउभीअसे ॥ ७९ ॥ महंतह्मणतीहेंकाय ॥ वेश्यावदेजाणतीपाय ॥ द्वारकानाथयादवराय ॥ त्यासीनैवेद्यकरायाचा ॥ ८० ॥ ॥ मू० क० ॥ पूछि तुम कोन काके भौनमे जनम लियो कियो सुनि मौन मह्रा चिंता जिय धरीहे ॥ खोलिके निसंक कहो संका जिनि आनो मन कही बारमुखी ऐपे पाइ आइ परीहे ॥ भऱ्योहे भंडार धन करो अंगिकार आशु करिये विचार जोपे तोपे यह धरीहे ॥ एक हे उपाइ हाथ रंगनाथजूके अहो कीजिये मुकुट जामे जातिमती हरीहे ॥ ६ ॥ ॥ टी०ओ० ॥ तेव्हांतीतेंमहंतपुसती ॥ अहोतुमचीकोणयाती ॥ कोणाचेघरींजन्मलेती ॥ समूलवृत्तांतसांगावा ॥ ८१ ॥ ऐसेंतिणेंऐकतांवचन ॥ तेव्हांधरोनिराहेमौन ॥ जीवामाजीचिंताधरून ॥ दुः

खांतनिमग्नजाह्लली ॥ ८२॥ ह्मणेआतासांगतांयाती॥ तत्काळउठोनिसंतजाती॥ गहिंवरोनिआलेंतियेप्रति ॥ मगरुदनासीआरंभिलें ॥
॥ ८३ ॥ तेणेंसमजलेमनींमहंत ॥ कांहींन्यूनतादिसेयेथ ॥ ह्मणतीशंकानाणींमनांत ॥ प्रगटनिःशंकसांगावें ॥ ८४ ॥ सप्रेमअंतरपा
होन ॥ महंतझालेसुप्रसन्न ॥ तैंतीबोलेकरजोडोन ॥ अहोवारांगनामीअसें ॥ ८५॥ महापातकीमीअसेंपूर्ण॥ आपणसाधूपतितपावन॥
माझाउद्धारकराह्मणोन ॥ पडलीयेऊनचरणावरी ॥ ८६ ॥ अपराधमाझेघालोनिपोटीं ॥ परिसावीमाझीएकगोष्टी ॥ धनमजपासींचार
कोटी ॥ अंगिकारत्याचाकरावा ॥ ८७ ॥ तेंव्हांमहंतबोलतीवचन ॥ आह्माद्रव्याचेंकायकारण ॥ यामाजीबहुतअनर्थजाण ॥ नघडे
भजनश्रीहरीचें ॥ ८८ ॥ जरीतूंह्मणसीआह्मादिलें॥ तरीतेंआम्हुचेंद्रव्यझालें॥ सांभाळोनियांठेवींवहिलें॥ आम्हुचेंह्मणोनियेधवां॥८९॥
ऐसेंऐकतांउद्विग्नहोय ॥ महंतपाहोनिबोलतीकाय ॥ जरीतुजअंतरींसंशयहोय ॥ तरीएकउपायसांगतों ॥ ९० ॥ जरीकेलाऐसाविचा
र ॥ आह्माअर्पणेंसर्वभांडार ॥ तरीहेघटिकानयेसत्वर ॥ तुजलासांगतोंतेंकार्यकरीं ॥ ९१ ॥ तरीएकउपाययासीआहे॥ श्रीरंगनाथजी
सीपाहे ॥ मुगुटकरावालवलाहें ॥ सर्वहीतुझ्याद्रव्याचा ॥ ९२ ॥ तुझेजातीचीजेकांमती ॥ दूरहोईलयेणेरीती ॥ मुगुटघालऊंतुझेहातीं॥
सत्यनिश्चितींजाणावें ॥ ९३ ॥ ॥ मू०क० ॥ विप्रहू न छुवे जाको रंगनाथ कैसे लेत देत हम हाथ तोको रहे इंहाकीजिये ॥ कि
योइ बनाई सब घरको लगाइ धन बनी ठनी चली थारमध्य धरी दीजिये॥संतआज्ञा पाइके निसंक गई मंदिरमे फिरी यो ससंक धृग
तियाधर्म भीजिये ॥ बोले आप याको लाइ आइ पहराइ जाइ दियो पहिराइ नयो सीस मती भीजिये ॥ ७ ॥ ॥ टी०ओ० ॥
तेंव्हांविनंतीतेकरी ॥ रंगनाथाचेंसोंवळेंभारी ॥ विप्रहीनशिवतीसत्वरी ॥ तेथेंमजलाकोणपुसे ॥ ९४ ॥ महंतह्मणतीऐसेंनघडे॥ तुझ्या
चिहस्तेंकरींनिवाडे ॥ रंगनाथासीवाडेंकोडें ॥ मुगुटघालीनपाहाकीं ॥ ९५ ॥ ऐसेंतीतेंआश्वासून ॥ तेथेंचिमहंतराहेआपण ॥ सर्वही
सोनारबोलाऊन ॥ ह्मणेआतांचिकामलावा ॥ ९६ ॥ मगतयावेश्येनेंजाण ॥ अनेकसावकारबोलाऊन ॥ हिरेमाणिकेंरत्नेंपूर्ण ॥ विक
तघेतलींतेधवां ॥ ९७॥ सर्वघरचेंलावीधन ॥ आणीकआपुलावाडाविकून ॥ मुगुटासीकामलाविलेंजाण ॥ सर्वहीसोनारबोलाउनी ॥

॥ ९८ ॥ साहामहिन्यांनंतर ॥ सिद्धझालामुगुटसुंदर ॥ तोंवरीराहिलेकरुणाकर ॥ प्रेमेंकरोनिवेश्येच्या ॥ ९९ ॥ मातफांकलीगांवांत ॥
कळलारायासीवृत्तांत ॥ तिजवरीत्याचीहोतीप्रीत ॥ ह्मणेविपरीतकायझालें ॥ १०० ॥ इजलाहोतांसत्संगती ॥ गेलीपालटोनिपूर्ववृ
त्ती ॥ तिचीनिराशाझालीचित्तीं ॥ असोहेवदंतीकायकीजे ॥ १ ॥ मुगुटाचेंकामझालेंपूर्ण ॥ त्यामहंतेंऐसेंपाहून ॥ पुजारीब्राह्मणबो
लाऊन ॥ साहित्यपूजेचेंलाविलें ॥ २ ॥ पंचामृतादिउपचार ॥ आणीकमहावस्त्रेंसुंदर ॥ दागदागिनेअंगावर ॥ धाडिलेसत्वररंगना
था ॥ ३ ॥ गांवींचेसंतबोलाऊन ॥ दिंड्यापताकालावोनिजाण ॥ गातनाचतकरीतभजन ॥ महंतआपणनिघाले ॥ ४ ॥ सहस्रावधी
मिळालेलोक ॥ पुढेंवाजतीवाद्येंअनेक ॥ ब्रह्मानंदजाहलाएक ॥ कितीतेंकौतुकवर्णावें ॥ ५ ॥ तैंवेश्येतेंअलंकारून ॥ उत्तमवस्त्रेंनेसऊ
न ॥ कनकताटींमुगुटजाण ॥ देतीमस्तकींठेवोनितीच्या ॥ ६ ॥ मगतीवेश्यागातनाचत ॥ साधुजनांच्यामंडळीआंत ॥ सप्रेमयुक्तहोऊनि
चालत ॥ आलीमिरवतमंदिराशी ॥ ७ ॥ मंदिराच्यादारापाशीं ॥ उभीराहिलीमर्यादेसी ॥ साधुह्मणतीनिःशंकतेसी ॥ मंदिरामाजी
चलावें ॥ ८ ॥ संतांच्याआज्ञेकरोनिनिर्मळ ॥ निःशंकपातलीदेवघराजवळ ॥ तोंविटाळशीझालीतत्काळ ॥ परतलीमाघारीतेधवां ॥ ९ ॥
साधुह्मणतीकांसशंक ॥ तीह्मणेमाझेंफळलेंपातक ॥ धिःकारस्त्रियेच्याधर्मासदेख ॥ विटाळशीसम्यकझालेंकीं ॥ १० ॥ ह्मणोनिगहिव
रेंकरीरुदन ॥ कळवळोनिसंतांबोलेमोहन ॥ तिजलाचयेथेंजवळआणोन ॥ मुगुटघालोनदेइजे ॥ ११ ॥ महंतेंतिचाकरधरोन ॥ देवापा
शींनेलीजाण ॥ ह्मणतीमुगुटदेघालोन ॥ आपुल्याहस्तेंकरोनियां ॥ १२ ॥ मुगुटतीजोंघालूंपाहे ॥ देवाचेंमस्तकदूरराहे ॥ तेथवरीहस्त
लवलाहें ॥ तिचेनपुरतीतेधवां ॥ १३ ॥ तेव्हांमहंतकरजोडोन ॥ देवासीविनंतीकरीआपण ॥ अहोजीरंगनाथइणेंपूर्ण ॥ सर्वस्वहीअर्प
णकेलेंतुह्मां ॥ १४ ॥ आतांइचामुगुटघ्यावया ॥ कायसंकोचवाटेदेवा ॥ थोडेंसेंमस्तकलवोनियां ॥ कृपेनेंकरावाअंगिकार ॥ १५ ॥
ऐसेंऐकतांतैंमस्तक ॥ खालींकरीजगन्नायक ॥ वेश्येनेंआपुलेहातींसम्यक ॥ घातलामुगुटतेधवां ॥ १६ ॥ बुद्धीसकळांचीतयेवेळीं ॥ प्रेम
रंगामाजीबुडाली ॥ जयजयकारेंवाजलीटाळी ॥ हर्षसमेळींतेधवां ॥ १७ ॥ ऐसाश्रीहरीदीनदयाळ ॥ नपाहेचियातिकुळ ॥ एकसद्भा

वपाहिजेनिर्मळ ॥ तेणेंघननीळवशहोय ॥ १८ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृ
त ॥ एकुणपन्नासावाछप्पागोडहा ॥ १९ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरुदीनदयाळा ॥ सर्वस्वेंमाझापाळिसीलळा ॥ जेवींमाताआपुल्याबा
ळा ॥ वेळोवेळादूधपाजी ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ ओरज्जुगनिते कमलनैन कलज्जुग बहुत कृपा करी ॥ बीच दिये रघुनाथ भक्तसंग
ठगिया लागे ॥ निर्जनवनमे जाइ दुष्ट कर्म किये अभागे ॥ बीच दिये सो कहा राम कहि नारि पुकारी ॥ अये सारंगपानि सोक
सागरतें तारी ॥ दुष्ट किये निर्जीव सब दास प्रानसंज्ञा धरी ॥ ओरज्जु० ॥ ५० ॥ ॥ टी०ओ० ॥ आणीकतीनीयुगांहून ॥ कली
माजीकमलनयन ॥ बहुतकृपाकरीजाण ॥ तेंचिआख्यानपरिसावें ॥ २ ॥ भक्तांच्यासवेंचोरलागतां ॥ मध्यस्थीदिलेंश्रीरघुनाथा ॥ नि
र्जनवनींजाऊनितत्त्वता ॥ दुभार्ग्येंदुष्टकर्मकेलें ॥ ३ ॥ मध्यस्थीदिलारघुनंदन ॥ कोठेंयेवेळींगेलाह्मणोन ॥ कांताबोलावीआक्रंदोन ॥
तेव्हांधनुर्धरधांवले ॥ ४ ॥ शोकसागरांतूनितारी ॥ त्यादुष्टांतेंनिर्जीवकरी ॥ आपुल्याप्राणसंज्ञेसीधरी ॥ निजनिर्धारींदासतेव्हां ॥ ५ ॥
॥ ॥ मू०क० ॥ विप्र हरिभक्त करी गोनो चल्यो तिया संग जाके दूनो रंग जाकी बात ले जनाइये ॥ मग ठग मिले द्विज पूछे आहो
कहां जात जहां तुम जात यामे मन न पत्याइये ॥ पंथको छुटायो चाहे बनमे लिवाइ जाई कहे अति सुध्यो पेंडो उरमे न आइये ॥
बोले बीच राम तऊ हिये नेकु धकधकी कही उही भाम शाम नाम कहा पाइये ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ कोणीब्राह्मणभगवद्भक्त ॥
संसारआणिपरमार्थ ॥ साधोनियांदोनीराहात ॥ तोंलग्नतयाचेंजाहलें ॥ ६ ॥ आपुल्यागांवांहूनिदूर ॥ कांहींमुक्कामअसेसासर ॥ एक
दालग्नझाल्यावर ॥ गेलास्त्रियेसीआणावया ॥ ७ ॥ सासराहोतातोधनवान ॥ याचादिधलागोनाकरून ॥ बहुतअर्पिलेंवस्त्रधन ॥ मग
स्त्रीघेऊनह्मानिघे ॥ ८ ॥ एकभाड्याचेंघोडेंकरून ॥ त्यावरीसर्वभरिलेंधन ॥ वरीस्त्रियेसीबैसवोन ॥ सवेंआपणचालतसे ॥ ९ ॥ जैसेंभ
क्तीचेंयासीअंग ॥ त्याहूनस्त्रियेसीदुप्पटरंग ॥ तेगोष्टीचापरिसाप्रसंग ॥ प्रगटकरोनिदावितों ॥ १० ॥ मार्गींस्त्रियेसीघेऊनजातां ॥ तोंचोरां

नींगांठिलेंतत्त्वता ॥ शस्त्रधारीतेउभयतां ॥ विप्राच्यासवेंचालती ॥ ११ ॥ सासुरवाडीमिळालेंधन ॥ हेंसमजलेंत्यांलागोन ॥ ह्मणोनि
तेथेंआलेधांवून ॥ चोरीचेंसंधानपाहती ॥ १२ ॥ तयांसीविचारीब्राह्मण ॥ तुह्मीकोठेंकरितांगमन ॥ तेव्हांतेह्मणतीजेथेंआपण ॥ जा
तांतेथेंचिजातसों ॥ १३ ॥ ऐसेंतयांचेंऐकतांवचन ॥ विप्राचेंशंकितझालेंमन ॥ ह्मणेहाआतांमार्गसोडून ॥ दुसऱ्यामार्गानेंचलावें ॥ १४ ॥
जरीहाजवळचाहोतामार्ग ॥ परीहालागलादुष्टसंग ॥ तरीहेलपटापडोसांग ॥ राजवाटेनेंजाऊंआतां ॥ १५ ॥ इकडेचोरांचीइच्छाऐसी ॥
सोडऊंपाहतीराजवाटेसी ॥ वनींघेऊनिजावेंयासी ॥ ह्मणोनिविप्रासीबोलती ॥ १६ ॥ अहोजीयावनांतून ॥ नीटचिरस्तापडेजाण ॥
आपुलेंकैसेंशंकितमन ॥ कोणतेंसंकटवाटतें ॥ १७ ॥ आह्मीउभयतांशस्त्रधर ॥ असतांतुमच्याबरोबर ॥ कांहोकांपतेंतुमचेंअंतर ॥ च
लासत्वरयाचिमार्गें ॥ १८ ॥ परंतुतयाब्राह्मणास ॥ यांचावाटेअविश्वास ॥ तोंचोरह्मणतीतयास ॥ भलतेंचित्तासआणूंनका ॥ १९ ॥
जरीतुह्मासीवाटतेशंका ॥ आमुच्यातुमच्यामध्येंदेखा ॥ साक्षीठेविलेंरघुनायका ॥ यत्किंचितधोकामानूंनये ॥ २० ॥ तथापिब्राह्मणांधुक
धुक ॥ तेव्हांतीभामिनीबोलेसम्यक ॥ ऐसामध्यस्थमिळतोठीक ॥ याहूनिदुसराकोणअसे ॥ २१ ॥ ॥ मू०क० ॥ चले लागि संग
अब रंगको कुरंग कऱ्यो तिया पर रीझे भक्ति साची इन जानीहै ॥ गये बनमध्य ठग लोभ लगी माऱ्यो विप्र छिप्र लैकें चले ब
धू अति बिलखानीहै ॥ देखे फिरि फिरि पाछे कहे कहा देखो माऱ्यो तवतो उचाऱ्यो देखो वाही बिच प्रानीहै ॥ आये राम प्यारे
सब दुष्ट मारि डारे साधु प्रान दे उवारे हित रीति यो वखानीहै ॥ २ ॥ ॥ टी०ओ० ॥ रामठेऊनिजामीन ॥ आपुल्यासवेंकरिती
गमन ॥ तुह्मीवैष्णवअसोनिपूर्ण ॥ कल्पनाकैसीआणितां ॥ २२ ॥ हरीचेनामींरंगलेअसतां ॥ कैसाकुरंगकरिताआतां ॥ ऐसेंस्त्रियेचें
वाक्यऐकतां ॥ विप्रप्रसन्नजाहला ॥ २३ ॥ सत्यसत्यतुह्मीभक्ती ॥ रामनामींऐसीप्रीती ॥ पूर्णजाणलेंमाझेचित्तीं ॥ धन्यत्रिजगतींतूंए
क ॥ २४ ॥ मगतोअंतरींब्राह्मण ॥ रामींविश्वासठेवोन ॥ चोरासवेंकरीगमन ॥ घोरवनांतगेलेतें ॥ २५ ॥ विप्रासीतृषालागलीबहुत ॥
ह्मणोनिएकानाल्याआंत ॥ पाणीपियावयासीजात ॥ तोंचोरहीसवेंपातले ॥ २६ ॥ तेव्हांठकानेंलोभेंकरोन ॥ त्याविप्राचाघेतलाप्रा

ण ॥ बाहेरआलेनलगतांक्षण ॥ स्त्रियेसीघेऊनचालिले ॥ २७ ॥ तेव्हांतीअंतरींतळमळे ॥ चोरांसीपुसेतेकोठेंगेले ॥ तंवतेह्मणतीमृत्यु
पावले ॥ चालतूंवहिलेंआमुचेघरीं ॥ २८ ॥ आतांझालीसआमुचीकांता ॥ चित्तींकांहींनकरींचिंता ॥ परीतियेसीबहुव्याकुळता ॥
मागेंवारंवारपाहतसे ॥ २९ ॥ चोरह्मणतीकायपाहसी ॥ आह्मीमारिलेंतवपतीसी ॥ तोंतेकामिनीबोलेत्यांसी ॥ अरेमीतयासीनपाहि
लें ॥ ३० ॥ अवलोकितेंमीत्यासीजाण ॥ तुह्मांआह्मातजोसाक्षीपूर्ण ॥ कोठेंतोगेलारघुनंदन ॥ ह्मणोनिगहिंवरतिसीदाटला ॥ ३१ ॥
ऐसीपाहतांतिचीचेष्टा ॥ कळवळोनिआलेंरघुश्रेष्ठा ॥ तत्काळप्रगटोनितटतटा ॥ सर्वहीदुष्टांमारिले ॥ ३२ ॥ तिचेजवळीयेऊनिराम ॥
ह्मणेगेझालातुजविश्राम ॥ तोंतीह्मणेहेंतुमचेंकाम ॥ युगायुगांतकरीतआलां ॥ ३३ ॥ रामहोऊनिसुप्रसन्न ॥ सर्वेतिसीमगघेऊन ॥ जेथें
पडलाहोताब्राह्मण ॥ तयास्थानासीपातले ॥ ३४ ॥ विप्रावरीअमृतहस्त ॥ फिरवितीतैंश्रीरघुनाथ ॥ तत्काळजाहलातोजिवंत ॥ करी
प्रणिपातराघवा ॥ ३५ ॥ तीनींयुगांहूनिबहुत ॥ कलियुगींभक्तांचेंकरीहित ॥ तयाचीहेरीतीसांप्रत ॥ वर्णनकरोनिदाविली ॥ ३६ ॥
मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ पन्नासावाछप्पागोडहा ॥ ३७॥ ॥ ६ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयाजीसद्गुरुनाथा ॥ माझ्ानरजन्मजातोवृथा ॥ तरीतूंकृपाकरोनिआतां ॥
भक्तीच्यापंथामजलावीं ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ एक भूप भागोतकी कथा सुनत हरि होइ रति ॥ तिलकदाम धरि कोइ ताहि गुरुगो
विंद जाने ॥ षडदरसनि अभाव सर्वथा घट करि माने ॥ भांडभक्तको भेष हासहित भांडकुल लाये ॥ नरपतिके दृढ नेम ताहिपै पाइ
धुवाये ॥ भांड भेक गाढ्यो गह्यो दरस परस उपजी भगति ॥ एक भूपभा० ॥ ५१ ॥ ॥टी०ओ० ॥ कोणीएकराजाभागवत ॥ त्या
चीश्रवणींऐकतांमात ॥ हरीचेठाईंरतीसत्य ॥ होतसेत्वरितजाणावें ॥ २ ॥ कोण्याहीजातीचाअसोजन ॥ तिलकमालेसीकरीधारण ॥
त्यासीगुरुगोविंदसमान ॥ भूपतीपूर्णमानीतसे ॥ ३ ॥ षड्दर्शनादिसाधन ॥ सर्वथामानीतसेन्यून ॥ तयाचेठाईंअभावपूर्ण ॥ करीतसेसे
वनसंतांचें ॥ ४ ॥ भांडहोऊनिभक्तवेष ॥ रायाचाकरायाउपहास ॥ आपुलेंसाहित्यघेऊनिविशेष ॥ हाहाहूहूकरीतआले ॥ ५ ॥ परंतुरा

याचादृढनेम ॥ त्यातेंचिसाधुमानीउत्तम ॥ होवोनिअंतरींसप्रेम ॥ चरणप्रक्षाळीतयाचे ॥ ६ ॥ त्यासीरायाचेंहोतांदर्शन ॥ आणीकतें
सेंचिझालेंस्पर्शन ॥ भांडासीभक्तीउपजलीपूर्ण॥ तोचितैंवेषदृढकेला ॥ ७ ॥ ॥ मू०क० ॥ राजा भक्तराज डोंमभांडको न काज होइ
भोइगई याकें धन हरिजनकों दीजिये ॥ आये भेखधारि ले पुजाइ नाचे दैके ताल नृपति निहारि कही यो निहाल कीजिये ॥ भो
जन कराई भरि मोहोरनि थार लाये आगे धरि बिनय करी आजू यह लीजिये ॥ भई भक्तिरासि बोले आवै वास भावे नाहि बाह ग
हे रहे कैसें चले मति भीजिये ॥ १ ॥ ॥ टी०ओ०॥ कोणीभूपतीभक्तराज ॥ संतसेवनींप्रीतीसहज ॥ नगरींयेतांसंतसमाज ॥ अत्या
दरेंपूजीतसे ॥ ८ ॥ कांहींद्रव्याचेंपडेअंतर ॥ केलातेणेंमगविचार ॥ राज्यांतीलपाहेभांडार ॥ कितीकउत्पन्नअसेकीं ॥ ९ ॥ तोंदोनको
टिद्रव्यजाण ॥ वर्षासहोतसेउत्पन्न ॥ पन्नासलक्षतयांतून ॥ नटभांडाकडेलागलें ॥ १० ॥ मगह्मणेहाऐवज ॥ वृथाजातोवाटेमज ॥ तरी
करोनियांबंदसहज ॥ संतांचेसेवनींलावावा ॥ ११ ॥ याचेचित्तींजडलाभाव ॥ संतसेवनावीणसर्व ॥ व्यर्थहेंराज्यादिकवैभव ॥ ह्मणोनि
गौरवकरीसाधूचा ॥ १२ ॥ एककोटींतराज्यभार ॥ चालवीतसेतोभक्तचतुर ॥ दुसरेकोटीचाहाविचार ॥ संतसेवनकरीतसे ॥ १३ ॥ ते
व्हांभांडनटादिकांस ॥ अन्ननमिळेखावयास ॥ संतांवांचोनिइतरांस ॥ भिक्षाहीराज्यांतनमिळेचि ॥ १४ ॥ तेव्हांतिहींकेलाविचार॥
वेषसंतांचाघ्यावासत्वर ॥ रायेंपूजितांएकंदर ॥ उडवावीभगलतयाची ॥ १५ ॥ ऐशापरीविचारकरून ॥ सहस्रावधीआलेमिळोन ॥
तिलकमाळाधारणकरून ॥ रायाचेसदनींपातले ॥ १६ ॥ रायेंऐकतांवर्तमान॥ कींद्वारींआलेतिसंतजन॥ तत्काळसामोराजावोन ॥ आ
दरकरोनिआणिले ॥ १७ ॥ आसनावरीबैसवोन ॥ सकळांचेंहीकरीपूजन ॥ चरणतीर्थकेलेंप्राशन ॥ तोंनवलविंदानतेकरिती ॥ १८॥
हाहाहूहूकरोन ॥ नाचतीटाळ्यावाजऊन ॥ ऐसाहीचमत्कारपाहोन ॥ रायाचानिश्चयनढळेची ॥ १९ ॥ मनींसर्वांसीओळखिले ॥ परीत
यांसीमानीभले ॥ असोनिहीनीचयेवेळे॥ भक्तजाहलेश्रीहरीचे ॥२०॥ माझेइष्टांचाघेतलावेष ॥ तरीयांसीपूजूंविशेष ॥ द्रव्यदेऊनिबहुवस॥
आशासर्वांचीपूर्णकरूं ॥ २१ ॥ जोंवरीचेष्टाहोतेकरीत ॥ उभातोवरीजोडोनिहात ॥ नंतरपात्रेंघालोनित्वरित ॥ भोजनकरवीतसकळां

सी ॥ २२ ॥ मगतांबूलादिदेऊन ॥ जामदारखान्यातजाऊन ॥ असंख्यमोहराकाढोन ॥ बिदागीतयांचीलावीतसे ॥ २३ ॥ एकाएका
तबकांत ॥ भरोनिमोहरापंचशत ॥ सकळांच्याहीसन्मुखठेवित ॥ हातजोडोनिउभाराहे ॥ २४ ॥ तयांलागींविनंतीकरी ॥ अंगिकारिजे
जीझडकरी ॥ तंवतेझालीनवलपरी ॥ वृत्तिसर्वांचीपालटली ॥ २५ ॥ आह्मीकरावयाआलोंछळ ॥ परीरायाचेंचित्तनिर्मळ ॥ आपुलीजाती
महाचांडाळ ॥ धिःकारअसोतयासी ॥ २६ ॥ तरीआतांजोघेतलावेष ॥ पूर्णघेइजेयाचारस ॥ यापरीभक्तीवाढलीविशेष ॥ मगरायासका
यबोलती ॥ २७ ॥ अहोतुमच्यादर्शनेंकरून ॥ आह्मीसर्वहीजाहलोंपावन ॥ आतांआह्मासीनलगेधन ॥ येतसेदुर्गंधीतयाची ॥ २८ ॥
यापरीरायासीबोलोन ॥ सर्वहीधांवोनिधरितीचरण ॥ आतांआह्मावरकृपाकरोन ॥ वैष्णवपूर्णकरावे ॥ २९ ॥ मगरायाचाउपदेशघेऊन ॥
तेथेंचिराहिलेकरीतसेवन ॥ आतांकैसेनिघतीजाण ॥ मतिरंगांतभीजली ॥ ३० ॥ सत्संगाचेंहेंमहिमान ॥ खळाचेंहीपालटेमन ॥ तरीन
रजन्मासीयेऊन ॥ सत्संगसर्वदाधरावा ॥ ३१ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥
एकावन्नावाछप्पागोडहा ॥ ३२ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयाजीसद्गुरुनाथा ॥ वरदहस्तठेवींमाथा ॥ कृपाकरोनियाअनाथा ॥ भक्तिपं
थासीलावावें ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ अंतरनिष्ठ नरपाल इक परमधरम नाहिन धुजी ॥ हरिसुमिरन हरिध्यान आनि काहू न
जनावे ॥ अलग न इहि विधि रहै अंगना मरम न पावे ॥ निद्राबस सो भूप वदनतै नाम उचाऱ्यो ॥ रानि पतिपर रीझि बहूत वसु
तापर वाऱ्यो ॥ रिषिराज सोंचि कह्यो नारिसो आज भक्ति मेरी कजी ॥ अंनरनिष्ठ० ॥ ५२ ॥ ॥ टी०ओ० ॥ कोणीएकराजापरमश्रे
ष्ठ ॥ भक्तिमार्गांतअंतर्निष्ठ ॥ दुसरेधर्मनकरीस्पष्ट ॥ जनांसीविषईभासतसे ॥ २ ॥ जेंकांहींकरणेंनामस्मरण ॥ अथवाहरीचेंपूजाध्यान ॥
हृदयामाजीकरीपूर्ण ॥ प्रगटलोकांसीनदाखवी ॥ ३ ॥ एकदानिद्रेमाजीजाण ॥ नामोच्चारणमुखांतून ॥ नृपाळाच्यानिघतांजाण ॥ रा
णीसआनंदवाटला ॥ ४ ॥ तयाहरिनामावरून ॥ बहूधनवांटीओवाळून ॥ राजर्षिह्मणेकायकारण ॥ आजिउत्साहकरावया ॥ ५ ॥

राणीसाद्यंतसांगेरीती ॥ रावअनुतापोनह्मणेचित्तीं ॥ आजिमाझीगेलीभक्ती ॥ तत्काळमुक्तीपावला ॥ ६ ॥ ॥ मू०क० ॥ तिया
हरिभक्त कहे पति पै न भक्तिपायो रहे मुरझायो मन सोच बढ्यो भारीहे ॥ मरम न जान्यो निसि सोबत पिछान्यो भाव विरहप्र
भाव नाम निकस्यो बिहारीहे ॥ सुनतही रानी प्रेमसागर समानी भोर संपति लुटाई मानो नृपती जियारीहे ॥ देखि उत्साह भूप
पूछो सुनि वाहि कह्यो रह्यो तन ठोर नांम जीवा यो विचारीहे ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ एकराजाअंतर्निष्ठ ॥ त्याचीभक्तीनदिसे
स्पष्ट ॥ राणीभजनकरीउद्भट ॥ सदाखटपटतेचतीसी ॥ ७ ॥ कथाकीर्तननामस्मरण ॥ हरीचीपूजासंतसेवन ॥ रात्रंदिवसकरीजाण ॥
एकविपरीतमनींवाटे ॥ ८ ॥ रात्रंदिवसकरीखंत ॥ पतीनजाणेभक्तिपंथ ॥ लज्जावाटेबहुमनांत ॥ दुःखहृदयांतथोरवाटे ॥ ९ ॥ परंतुत
यारायाचेंवर्म ॥ राणीकांहींनजाणेउत्तम ॥ रायाचावरीऐसाधर्म ॥ राजकार्यकरीसर्वदा ॥ १० ॥ एकदांरात्रीकरितांशयन ॥ राणीचु
रीतबैसेचरण ॥ तेव्हांरायाचेंभावचिन्ह ॥ कळण्यांतआलेंतियेच्या ॥ ११ ॥ एकाएकींमुखांतून ॥ विरहप्रभावयुक्तजाण ॥ हेराधाकृष्ण
ह्मणोन ॥ नामस्मरणनिघालें ॥ १२ ॥ ऐसीकोमळऐकतांवाणी ॥ प्रेमसागरींबुडेराणी ॥ प्रातःकाळींमगउठोनी ॥ थोरउत्साहकरीतसे
॥ १३ ॥ गुढयातोरणेंघरोघरीं ॥ तोफासोडिल्यापरोपरी ॥ चौघडेसनयावाजतीभेरी ॥ आनंदेंसाखरीवांटल्या ॥ १४ ॥ साधुसंतबोला
ऊन ॥ आणीकब्राह्मणांपाचारोन ॥ संपत्तीदेतसेलुटवोन ॥ परमानंदेंकरोनियां ॥ १५ ॥ ऐसातिणेंउत्साहकेला ॥ कींरायासीमुलूख
मिळाला ॥ किंवाकोठेंसमरजिंकिला ॥ अथवाझालापुत्रकीं ॥ १६ ॥ ऐसाउत्साहपाहोन ॥ राणीसीविचारीनृपआपण ॥ उत्साहाचें
मूळकोण ॥ करीनिवेदनमजलागीं ॥ १७ ॥ राणीऐकतांऐसेंवचन ॥ आनंदेंसांगेवर्तमान ॥ रात्रीआपुल्यामुखांतून ॥ श्रीकृष्णनाम
निघालें ॥ १८ ॥ ऐसेंऐकतांचिवचन ॥ भूपतीपडेमूर्च्छापन्न ॥ ह्मणेमाझेंजेंनामजीवन ॥ निघालेंतेंबाहेरमुखावाटे ॥ १९ ॥ एकवेळ
ऐसेंबोलोन ॥ रायेंतत्काळसोडिलाप्राण ॥ वैकुंठींपावलामुक्तहोऊन ॥ कितीमहिमानसांगावें ॥ २० ॥ ॥ मू०क ॥ देखि तन
त्यागियति भइ ओर गति याकी ऐसे रतिवान मे न भेद कछू पायोहे ॥ भयो दुःख भारी सुधिबुधि सब टारी तब नेक न

बिचारी भावरासी हिये छायोहे ॥ निसिदिन ध्यान विरह प्रबल तजे प्रान भक्त रसखान रूप कापे जात गायोहे ॥ जाके यह
होइ सोई जाने रस भोइ यामे डांरे मति खोइ सब प्रगट दिखायोहे ॥ २ ॥ ॥ टी०ओ० ॥ मुखावाटेनामनिघालें॥ ह्मणोनिरायेंशरीर
सोडिलें ॥ ऐसेंराणीनेंपाहतांवहिलें ॥ गतीविचित्रजाहली ॥ २१ ॥ कंठगहिंवरोनआलासद्गद ॥ मुखावाटेननिघेशब्द ॥ मजनकळला
कांहींभेद ॥ ऐसेरतिवंतनाथमाझे ॥ २२ ॥ ह्मणोनिझालेंदुःखथोर ॥ शुद्धिबुद्धीचापडलाविसर ॥ तेव्हांनसुचेकांहींविचार ॥ हृदयींभा
वराशीव्यापिल्या ॥ २३ ॥ रायाचीभक्तीआठवोन ॥ तेंचिनिशिदिनींलागलेंध्यान ॥ त्याच्याप्रबळविरहेंकरून॥ राणीनेंप्राणसोडिला
॥२४॥ प्रियादासह्मणतीआपण ॥ उभयतांभक्तिरसाचीखाण॥ त्याच्याप्रेमाचेंस्वरूपपूर्ण॥ होईलवर्णनकोणातें॥ २५॥ जयासीऐसाअसेल
भाव ॥ तोचिजाणेहारसप्रभाव ॥ यामाजीमतीटाकितांसर्व ॥ बुडोनिगेलीतेधवां ॥ २६ ॥ कांहींसंतांच्याकृपेजाण ॥ दाखविलेंप्रगट
करोन ॥ याचीमाहितीजेसंपूर्ण ॥ संतांलागींअसेलकीं ॥ २७ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभा
षेंतभक्तिप्रेमामृत ॥ बावन्नावाछप्पागोडहा ॥ २८ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरुपरमश्रेष्ठा ॥ माझीहरावीमतिभ्रष्टा ॥ आपुलेचरणींवसोनिष्ठा ॥ हेचिप्र
तिष्ठामागतसें ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ गुरुगदित वचन सिष्य सत्य अति दृढ प्रतीति गाढ्यो गह्यो ॥ अनुचर आज्ञा मागि कह्यो
कारजको जैहो ॥ आचारजइ बात तोहि अयेते कैहो ॥ स्वामी रह्यो समाइ दास दरसनको आयो॥ गुरुकी गिरा विस्वास फेरि सब
घरको लायो ॥ शिष्यपन साचौं करनकौं विभु सब सुनत सोई कह्यो ॥ गुरुगदित० ॥ ५३ ॥ ॥ टी०ओ० ॥ सद्गुरुजेशब्दबो
लत ॥ तयांसीजोमानीसत्य ॥ अत्यंतकरीदृढप्रतीत॥ हृदयींबळकटधरीतसे ॥२॥ अनुचरआज्ञामागेजाण ॥ ह्मणेमीजातोंकार्यालागुन॥
आतांजेंसांगणेंतुजकारण ॥ आल्यावरसांगूंगुरूह्मणे ॥ ३ ॥ तोंवरीस्वामीझालेसमाप्त ॥ मगदासआलादर्शनार्थ ॥ गुरूचेवचनींविश्वास
सत्य ॥ परतसर्वांसीघरींआणिले ॥ ४ ॥ शिष्याचासत्यकरावयापण॥ सर्वऐकतांसद्गुरूआपण ॥ तेंचितयासीकेलेंभाषण ॥ पूर्वींजेंवचन

दिलेंहोतें ॥ ५ ॥   ॥ मू०क० ॥ बडो गुरुनिष्ठ कछू घटि साधु इष्ट माने स्वामी संत पूज्ये माने कैसे समुझाइये ॥ नितही वि
चारे पुनि टारे पे उचारे नाही चल्यो जब रामतिकौ कही फिरि आइये ॥ सपत दिवाइ न जराइवेकों दियो तन लायो यो फिराइ
वहे वात जू जताइये ॥ सांचो भाव जानि प्रान आइ सो बखान कियो करो भक्तसेवा करी वर्षलो दिखाइये ॥ १ ॥   ॥ टी०ओ० ॥
कोणीएकगुरुनिष्ठ ॥ गुरूसीचमानीइष्ट ॥ इतरसाधुगणीकनिष्ठ ॥ परीतेंगुरूसीनावडे ॥ ६ ॥ गुरूचेमनींऐसाआव ॥ माझेठायींजैसाअ
पूर्व ॥ याचाजडलाअसेभाव ॥ सज्जनींतैसाचिअसावा ॥ ७ ॥ आपणजरीसांगूंयासी ॥ तरीहाकरीलअवश्यतेसी ॥ परीतीसमजूतप
डेलकैसी ॥ जेणेंसत्सदींभावजडे ॥ ८ ॥ तयासीकरावेंपाचारण ॥ पुन्हाविचारकरोनिजाण ॥ उदईकसांगूंह्मणऊन ॥ द्यावेंटाळूनतयासी
॥ ९ ॥ यापरीनित्यच्यानित्य ॥ सद्गुरूत्यासीपाचारित ॥ पुनरपिटाळोनियांदेत ॥ नाहींसांगतआज्ञेसी ॥ १० ॥ यायोगेंत्याशिष्या
प्रती ॥ त्याआज्ञेवरीजडलीप्रीती ॥ वारंवारपुसेनिगुती ॥ सद्गुरुटाळूनदेतसे ॥ ११ ॥ पुढेंकांहींकार्यामुळें ॥ देशांतरात्यासीधाडिलें ॥
तेव्हांऐसेंसांगीतलें ॥ कथूंआल्यावरीआज्ञेसी ॥ १२ ॥ दोनचारमहिनेलागलेत्यासी ॥ देहांतझालातोंसद्गुरूसी ॥ विमानींघालोनिदे
हासी ॥ घेऊनचालिलेसर्वशिष्य ॥ १३ ॥ तोंहागांवींहूनआला ॥ तोंचमत्कारनेत्रींपाहिला ॥ पुढेंयेऊनिमगतेवेळां ॥ पडेआडवावाटेव
री ॥ १४ ॥ गुरुचरणाचीघालीशपथ ॥ ह्मणेदहनासीगुरुनाथ ॥ तुह्मीनन्यावेंअरण्यांत ॥ चलावेंघेऊनघरासी ॥ १५ ॥ गांवासीजातां
मजलागोन ॥ सद्गुरूनेंदिधलेंवचन ॥ आल्यावरीआज्ञाकरीन ॥ तेंनसांगतांनेतांकैसें ॥ १६ ॥ तेव्हांतयासीह्मणतीसकळ ॥ ऐसेंसं
सारींकार्यपुष्कळ ॥ राहतातीतूंमूर्खकेवळ ॥ भलताहट्टकरितोसी ॥ १७ ॥ परीतोनायकेकांहींकेल्या ॥ सर्वहीह्मणतीएकदाचला ॥ पर
तोनिमठासीतेवेळां ॥ सद्गुरूलागींआणिले ॥ १८ ॥ तेव्हांयाशिष्येंजाण ॥ विमानातूनसोडोन ॥ गुरूचेंप्रेतउचलोन ॥ आसनावरीबै
सविलें ॥ १९ ॥ करोनिसाष्टांगनमस्कार ॥ जोडोनियांदोनीकर ॥ श्रवणाजवळीयेऊनसत्वर ॥ विनवीतसेतेधवां ॥ २० ॥ ह्मणेजीम
जलाकेलेंकबूल ॥ आल्यावरीमीसांगेनबोल ॥ तेनसांगतांमजदयाळ ॥ कैसेंप्रयाणकेलेंकी ॥ २१ ॥ त्याचाजाणोनीसत्यभाव ॥ कृपेनेंव

ळलागुरुराव ॥ तत्काळदेहींप्रवेशेजीव ॥ सावधहोवोनीबैसले ॥२२॥ ह्मणतीमजवरीजैसाभाव ॥ तैसाचिसंतांचाकरींगौरव ॥ ऐसीसेवाकरींअपूर्व ॥ जेणेंतेसंतोषपावती ॥ २३ ॥ तेणेंतेंकेलेंशिरसावंद्य ॥ आणीकसद्गुरूसीकरीछंद ॥ आज्ञेप्रमाणेंमीकरीनविशद ॥ पाहीलकोणजीहेदयाळा ॥ २४ ॥ तरीएकवर्षराहाआपण ॥ ऐसीविनंतीकरितांजाण ॥ तैंशिष्याच्याप्रेमेंकरून ॥ वर्षभरसद्गुरुराहिले ॥ २५ ॥ मगसर्वांसीआनंदझाला ॥ ऐसाविश्वासअसतोभला ॥ निश्चयाजवळीदेवथोरला ॥ येतवेळोवेळाधांवोनी ॥ २६ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ त्रेपन्नावाछप्पागोडहा ॥ २७ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरुवर्णरहिता ॥ वर्णावर्णनपाहतां ॥ सद्भावयुक्तशुद्धचित्ता ॥ पाहोनितेथेंप्रगटसी ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥संदेहग्रंथिखंडननिपुन बानी विमल रैदासकी॥ सदाचार श्रुतिशास्त्र बचन अबिरुद्ध उचान्यो ॥नीर छीर विवरन परमहंसनि उर धान्यो ॥ भगवतकृपा प्रसाद परम गति इहि तन पाई ॥ राजा सिंहासन बैठि ज्ञाति परतीति दिखाई ॥ वरनाश्रमअभिमान तजि पदरज बंदही जासकी॥ संदेह० ॥ ५४ ॥ ॥ टी०ओ० ॥ संदेहगांठीचेंखंडन ॥ करावयासीजेनिपुण ॥ ऐसीविमलवाणीपूर्ण ॥ रोहिदासभक्ताची ॥ २ ॥ सदाचारसंपन्न ॥ जेंश्रुतिशास्त्रांचेंवचन ॥ तयासीअविरुद्धपूर्ण ॥ वाणींतशब्दउच्चारिले ॥ ३ ॥ नीचयोनींतज्याचेंजनन ॥ परीयादेहामाजीजाण॥ भगवत्कृपाप्रसादेंकरून ॥ परमगतीतेंपावला ॥ ४ ॥ राजसिंहासनाप्रती ॥ रोहिदासबैसोनिजगती ॥ ज्ञातीसदाविलीप्रतीती ॥ ऐसामहामतिभक्तराजतो ॥ ५ ॥ वर्णाश्रमाचाअभिमान ॥ सर्वहीसोडोनियांजाण ॥ ज्याचेपदरजाचेंवंदन ॥ सकलजनकरिताती ॥ ६ ॥ ॥ मू०क० ॥ रामानंदजूको शिष्य ब्रह्मचारि रहे एक गहे ब्रह्म चुकटीकी तासो कहे बानिये ॥ करो अंगिकार सीधो कहो दसबी सवार बरखे प्रबल धारा तामे वापे आनिये ॥ भोगको लगावे प्रभु ध्यान नाही आवे अरे कैसेकरि लावे जाइ पूछि नीच मानिये ॥ दियो श्राप भारि बात सुनी न हमारि घटि कुलमे उतारी देह सोइ याको जानिये ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ पूर्वजन्मींरोहिदास ॥ ब्राह्मणब्रह्मचारीविशेष ॥ रामानंदाचाउपदे

श ॥ घेवोनिजवळीराहतसे ॥ ७ ॥ याचीपाहोनिउत्तमस्थिती ॥ सद्गुरुतयासीआज्ञापिती ॥ भिक्षामागोनियांनिगुती ॥ आणावीनै
वेद्यादेवाचिया ॥ ८ ॥ तीनबोटांचीचुंगटी ॥ तितुकीचभरोनिआणितांनिकटी॥ तेचिभिक्षाघेतजाओंटीं ॥ अधीकआणितांघेऊंनये ॥
॥ ९ ॥ यापरीजेमिळेलभीक ॥ तयाचाकरोनीस्वयंपाक ॥ देवासीअर्पोनीसम्यक ॥ मगतोप्रसादआपणघ्यावा ॥ ११ ॥ रामानंदाचें
मानोनिवचन ॥ तैसेंचिकरीभिक्षाटण ॥ चुंगटीभरीघेतसेअन्न ॥ यापरीदिवसलोटलेबहु ॥ ११ ॥ एकावाण्यासीउपजेनिष्ठा ॥ हातजो
डोनिविनवीश्रेष्ठा ॥ शिधाघेइजेदाळआटा ॥ परीब्रह्मचारीनघेचितो ॥ १२ ॥ दहावीसवेळांजोडोनिकर ॥ तेणेंप्रार्थिलाविप्रवर ॥ मा
झाकरावाअंगिकार ॥ घेइजेशिधादयाळा ॥ १३ ॥ एकेदिवसींब्रह्मचारी ॥ भिक्षेसीजोंनिघेनगरीं ॥ तोंपर्जन्यलागलाभारी ॥ जावया
सीमार्गनमिळे ॥ १४ ॥ भिक्षेसीझालाउशीर ॥ वाणीविनवीजोडोनिकर ॥ माझ्याशिध्याचाअंगिकार ॥ करणेंआजिदयाळा ॥ १५॥
येणेंविचारिलेंमानसीं ॥ विलंबहोतसेनैवेद्यासी ॥ तथास्तुह्मणोनिवाणियासी ॥ उभातेथेंचिराहिला ॥ १६ ॥ तेव्हांवाणीदामघेऊन ॥
शिधादिधलातयाआणोन ॥ ब्रह्मचारीआश्रमींयेऊन ॥ स्वयंपाकसिद्धकेला ॥ १७ ॥ रामानंदजीकरीपूजन ॥ ब्रह्मचारीताटवाढोन ॥
सन्मुखठेवीत्वरेंनेऊन ॥ सद्गुरूदेवासीअर्पिती ॥१८॥ ध्यानींनप्रगटेदेवाधिदेव ॥ रामानंदेंतोजाणोनिभाव ॥ शिष्यातेंपाचारीस्वयमेव॥
तंवतोजोडोनिकरउभा ॥ १९ ॥ सद्गुरुह्मणतीअपवित्रअन्न ॥ कोठोनिआणिलेंतेंकरींकथन ॥ सर्वहीकरितीनिवेदन ॥ तेधवांतोब्रह्मचा
री ॥ २० ॥ बहुतदिवसएकवाणी ॥ माझीकरीतसेविनवणी ॥ आजिपर्जन्यबहुजाणोनी ॥ आणिलाशिधातयाचा ॥ २१ ॥ स
द्गुरुबोलतीवचन ॥ वाण्यासीयेंईविचारून ॥ कवणाचेंतेंधनघेऊन ॥ शिधाआणोनिदीधला ॥ २२ ॥ जावोनिब्रह्मचारीविचारी ॥ वा
णीतैंनिवेदीसत्यपरी ॥ आणिलेंहोतेंव्याजचांभारीं ॥ आणिलाशिधातयाचा ॥ २३॥ ब्रह्मचारीतेंवर्तमान॥ स्वामीसीकरीनिवेदन ॥ स
द्गुरुह्मणतीमाझेंवचन ॥ कैसेंतूंमूर्खानायकिलें ॥ २४ ॥ चर्मकधनाचेंआणिलेंअन्न ॥ तरीतेकुळींतुजहोयजनन ॥ थोरशापदेतांचिजाण॥
जाहलाखिन्नब्रह्मचारी ॥ २५ ॥ तोचिब्रह्मचारीदेखा ॥ रोहिदासचांभारनेटका॥ तेणेंसोडिलाश्रीहरीसखा ॥ सद्गुरुसेवनेंजाणावें ॥२६ ॥

॥ ॥ मू० क० ॥ मात दूध प्यावे याको छुयोहु न भावे सुधि आवे सब पाछिली सो सेवाको प्रतापहे ॥ भई नभवानी रामानंद
मन जानी बडो दंड दियो मानि बेग आयो चल्यो आपहे॥ दुखी पितु मात देखी धाइ लपटाइ पाइ कीजिये उपाय किये शिष्य
गयो पापहे ॥ स्तनपान कियो जियो लियो उन्हैं ईस जानि निपट अजान फेरि भूले भयो तापहे ॥ २ ॥ ॥ टी० ओ० ॥ स
द्गुरुवचनेंकरून ॥ चर्मकाघरींपावलाजनन ॥ परीपूर्वींचेंसर्वस्मरण ॥ सद्गुरुसेवनेंराहिलें ॥ २७ ॥ पूर्वींमीहोतोंब्राह्मण ॥ चर्मकसंस
र्गाचेंअन्न ॥ कोरडेंघरींमीआणिलेंजाण ॥ तेणेंचांभारझालोंकीं ॥ २८॥ माताकरवीस्तनपान ॥ येरूपूर्वीलआठऊन ॥ ह्मणेमीकरितांदु
ग्धप्राशन ॥ कोणत्यागतीसीजाईनमी ॥ २९ ॥ रोहिदासाचाजोपिता ॥ चांभाराचाचवधरीहोता ॥ तेणेंपरिसोनिपुत्रवार्ता ॥ महो
त्साहकरीतसे ॥ ३० ॥ महारवाड्यांतघरोघरीं ॥ गुढ्याउभवितीनरनारी ॥ वाद्येंवाजतीनानापरी ॥ बहुतआनंदजाहला ॥ ३१ ॥
परीपांचसातलोटलेदिवस ॥ बाळासीनावडेस्तनाचास्पर्श ॥ तेणेंसर्वहीझालेउदास ॥ कांहींउपायसुचेना ॥ ३२ ॥ तोंरामानंदआपुले
सदनीं ॥ सुखेंबैसलेहोतेआसनीं ॥ तितुक्यामाजीआकाशवाणी ॥ पडेश्रवणींसद्गुरूच्या ॥ ३३ ॥ हेरामानुजाअपराधावरी ॥ तुह्मीजो
शापिलाब्रह्मचारी ॥ तोजन्मपावलाचर्मकाघरीं ॥ परीतोनकरीदुग्धपान ॥ ३४ ॥ तयासीबोधकरून ॥ जगराहाटीसलावाजाण ॥
थोरदंडदिलात्यालागोन ॥ आपुलेमानसींउमजावें ॥ ३५ ॥ यापरीस्वामीनेंपरिसोन ॥ त्यावचनासीमानदेवोन ॥ सत्वरउठोनिआप
ण ॥ चालोनिआलेचर्मकघरीं ॥ ३६ ॥ दुःखरूपहोतेमातापिता ॥ स्वामीसीपाहोनिअवचिता ॥ धांवोनिचरणींठेवितीमाथा ॥ ह्मणती
अनाथापावनकेलें ॥ ३७ ॥ आह्मीसर्वथाजातिहीन ॥ आमुचेघरींहेआलेचरण ॥ तरीआमुचीविनवण ॥ समर्थेंश्रवणींआणावी ॥३८॥
आह्मासीनहोयसंतान ॥ स्वामीच्याप्रसादेंकरोन ॥ एकजाहलेंपुत्ररत्न ॥ परीतेंस्तनपानकरीना ॥ ३९ ॥ काययासीझालाअपाय ॥
हेंजाणतीस्वामीचेपाय ॥ तरीकांहींकरतीलउपाय ॥ जेणेहापयप्राशनकरी ॥ ४० ॥ स्वामीनेंऐसेंपरिसोन ॥ सर्वजनांसीदूरकरोन ॥
बालकापाशींयेवोन ॥ कायतयासीबोलती ॥ ४१ ॥ अरेतूंब्रह्मचारीपरम ॥ शापेंपावलासियेथेंजन्म ॥ तरीमजआवडेसत्यप्रेम ॥ वर्ण

धर्माश्रमनपाहें ॥ ४३ ॥ नीचयोनीचेंत्यजोनिदुःख ॥ श्रीहरीसंतांचाहोईसेवक ॥ मातृस्तनपानकरींसम्यक ॥ वृथाअभिमानधरूनको
॥ ४४ ॥ ऐसातयासीबोधकेला ॥ नामओपोनिशिष्यकेला ॥ तत्काळनिरभिमानझाला ॥ त्यायोगेंसर्वहीपापगेलें ॥ ४५ ॥ बाळासी
लाधलेंपूर्णपण ॥ मगसद्गुरुमुखातेंअवलोकून ॥ दहशक्तीहीनह्मणोन ॥ मनेंचिवंदनकेलेंतैं ॥ ४६ ॥ सद्गुरूमातेसीपाचारुन ॥ ह्मण
तीकरवावेंस्तनप्राशन ॥ तिणेंबाळकाघेतांचिजाण ॥ मटमटांदुग्धप्राशीतसे ॥४७॥ ऐसापाहतांचमत्कार ॥ मायबापांसीआनंदथोर ॥
आमुचावांचविलाआजिकुमर ॥ तेणेंतेअंतरींउमजले ॥ ४८ ॥ रामानंदसाक्षातईश्वर ॥ तयाचेमानसींहोयनिर्धार ॥ परीहेमायामहादु
र्धर ॥ पुनरपिअज्ञानेंविसरले ॥ ४९ ॥ सद्गुरूगेलेनिजाश्रमा ॥ उभयतांलागलेसंसारकर्मा ॥ नानापरीच्याकरितांश्रमा ॥ त्रिविधता
पापावले ॥ ०५ ॥ ॥मू०क०॥ बडेई रैदास हरिदासनिसो प्रीति बडि पिता न सुहाइ दई ठोर पिछवारही ॥ हुतो धनमान कन
हियोह्नू निहाल तिया पति सुख जाल अहो किये जब न्यारही ॥ गाढे पगहासी काहू यात न प्रकासि लावे खाल करे जूति सा
धुसंतको संभारही ॥ डारि केक छानि कियो सेवाको अस्थान रहै चौडो आप जानि वांटि वावे यहे धारही ॥३॥ ॥टी०ओ० ॥
परीतोरोहिदासमोठासमर्थ॥सद्गुरूनेंजोकथिलाअर्थ ॥ तोहृदराखोनिहृदयांत ॥ दिवसेंकरोनिथोरझाला ॥ ५१ ॥ जेथेंहोतसेपुराण ॥
तेथेंजाऊनबैसेआपण ॥ जेथेंभेटतीसंतसज्जन ॥ साष्टांगदंडवतकरीत्यांसी ॥ ५२ ॥ पुढेंतयाचेंझालेंलग्न ॥ परीसंसारींनसेनिमग्न ॥ घरीं
जेंसांपडेलवस्त्रधन ॥ संतांसीनेऊनदेतसे ॥ ५३ ॥ सर्वदासत्संगआवडे ॥ लक्षनसेसंसाराकडे ॥ तेणेंवडिलांसीनावडे ॥ ह्मणेतूंवेगळारा
हींरे ॥ ५४ ॥ मीकमावितोंकष्टेंकरोन ॥ तूंसंतांसीदेतोसनेऊन ॥ तरीतूंबायकोसवेंघेऊन ॥ संसारवेगळाकरावा ॥ ५५ ॥ मगआपुल्या
घराचेमागां ॥ कांहींहोतीओसाडजागा ॥ रोहिदासासीह्मणेबागा ॥ येथेंचितुवांराहावें ॥ ५६ ॥ जेंकांहींजवळीहोतेंधन ॥ वस्त्रादिमाल
धान्यकण ॥ कलहनकरावाह्मणोन ॥ प्रसन्नहोवोनीदीधलें ॥ ५७ ॥ उभयतांलागींजेवेळे ॥ वडिलांनींठेविलेवेगळे ॥ नवराबायकोसी
तेवेळे ॥ अत्यंतसुखजाहलें ॥ ५८ ॥ आपुलाजोभक्तिप्रकार ॥ प्रगटनकरीवैष्णववीर ॥ कोणीव्यवहारीचांभारथोर ॥ यापरीलोकांतप्रका

शिले ॥५९॥ आणोनियांकातडें ॥ तयाचेकरावेजोडे ॥ साधुसंतांसीनिवाडे ॥ जाऊनिपायांतघालावे ॥६०॥ तेथेंएकझोंपडीघालोन ॥ सेवेसीकेलेंदेवस्थान ॥ अंगणातराहेआपण ॥ चित्तींविचारहाचित्याच्या ॥ ६१ ॥ जेंकांहींउत्तमवस्त्रअन्न ॥ अलंकारादिसुंदरस्थान ॥ संतांहरीसीकरावेंअर्पण ॥ अलिप्तआपणराहावें ॥ ६२ ॥ याचिधारणेंकरोन ॥ भक्तीचीवाटपावेपूर्ण ॥ जेंकांहींहोतेंमालधन ॥ याहेतूसर्वस्ववेचिलें ॥ ६३ ॥ ॥ मू०क० ॥ सहे अति कष्ट अंग हिये सुख शील रंग आये हरिप्यारे लियो भक्तिभेख धारिकें ॥ कियो बहु मान खान पान सो प्रसन्न व्हैके दीनौ कह्यों पारसहे राखियो संभारिकें ॥ मेरे धन राम कछु पाथर न सरे कांम दाम मैन चाहो डारो तन बारिकें ॥ रापी एक सोनो कियो दियो करि कृपा राखो राख्यो वह छां निमांझ लेहुगोंनिकारिकें ॥ ४ ॥ ॥ टी०ओ० ॥ जेव्हांसर्वहीगेलेंधन ॥ अन्नावीणपडतीलंघन ॥ तेणेंजाहलेंशरीरक्षीण ॥ अत्यंतकष्टसहनकरितां ॥ ६४ ॥ परीअंतरींशांतिरंग ॥ प्रेमसुखभरलेंअभंग ॥ तैंकळवळोनिश्रीरंग ॥ भक्तप्रियकरधांवला ॥ ६५ ॥ भक्तांचाधरोनिवेष ॥ तेथेंप्रगटलेजगदीश ॥ हेंपाहोनिरोहिदास ॥ धांवोनिपायांसलागला ॥ ६६ ॥ बहुप्रकारेंकरून ॥ तयाचाकेलामानपान ॥ वरीजोंघालावेंभोजन ॥ तोंजवळीधनअसेना ॥ ६७ ॥ तंवकांताविनवीपतीसी ॥ माझेबंधूनेंमजपाशीं ॥ रुपयादिधलातोयेवेळेसी ॥ साधूचेसेवेसीलावावा ॥ ६८ ॥ रोहिदासहर्षोनितेवेळां ॥ जाऊनिवेळींशिधाआणिला ॥ घातलेंभोजनसंतांला ॥ तेणेंतोजाहलाप्रसन्न ॥ ६९ ॥ रोहिदासासीकरीविनंती ॥ जाणेंआहेमजयात्रेप्रती ॥ तरीएकवस्तुअसेनिगुती ॥ आपणापाशींठेवावी ॥ ७० ॥ मार्गीचोरांचाउपद्रव ॥ जवळीजेंजेंअसेवैभव ॥ तेंतेंलुटूनघेतीसर्व ॥ हातोंमुख्यपरीसअसे ॥ ७१ ॥ यासीठेवावेंसांभाळून ॥ लोखंडलाऊनिकरासुवर्ण ॥ आपुलासंसारचालवापूर्ण ॥ येतांनाघेऊनजाईनमी ॥ ७२ ॥ रोहिदासह्मणेहेंनलगेमज ॥ आह्मापाषाणाचेंकायकाज ॥ आमुचेंधनतोश्रीरघुराज ॥ इच्छादामाचीमजनसे ॥ ७३ ॥ हरीच्यागुणरूपावरून ॥ वाटेदेहटाकावाओंवाळून ॥ साधूह्मणेप्रतीतीवीण ॥ यासीलोभतोनसुटेची ॥७४ ॥ तयाचेरांपीसीमगघेऊन ॥ परिसासीलाऊनकेलेंसुवर्ण ॥ रोहिदासासीह्मणेकृपाकरोन ॥ हेवस्तुजवळीराखींआपुल्या ॥७५॥ साधूचाअत्यंतआग्रहपाहोन ॥ रोहिदा

सह्मणेस्वकरेंकरून ॥ छपरींतठेवावाखोंऊन ॥ ऐकोनिसाधुआनंदला ॥ ७६ ॥ मगअपुल्याहस्तेंजाण ॥ छपरींतठेवीखोंऊन ॥ येतांनाकाढोनीघेईन ॥ ऐसेंसांगोनिनिघोनिगेला ॥ ७७ ॥ परीरोहिदासनिःस्पृहपूर्ण ॥ तिकडेनपाहेअवलोकून ॥ सर्वदाश्रीहरीचेंध्यान ॥ त्यामाजोनिमग्नराहतसे ॥ ७८ ॥

॥ मू०क० ॥ आये फिरि शाम मास तेरह बितीत भये प्रीति करि बोले कहो पारसकी रीतिकों ॥ वाहि ठोर लीजे येरो मन न पतीजे अब चाहो सोई कीजे मेतो पावतहो भीतिकों ॥ लैके उठि गये नये कौतुकसो सुनो पावे सेवत मुहर पाच नितही प्रतीतिको ॥ सेवाहु करत डर लाग्यों निसि कह्यो हरी छांडो अर आपनी वो राखो मेरि जीतको ॥५॥

॥ ॥ टी०ओ० ॥ तेरामहिनेगेल्यापाठीं ॥ परतोनिआलेजगजेठी ॥ कैसीपरिसाचीकेलीराहाटी ॥ प्रीतीनेंह्मणेसांगामज ॥ ७९ ॥ रोहिदासह्मणेमीनपाहिला ॥ तुह्मीजेथेंअसेलठेविला ॥ तेथोनआपणघ्यावाजीवहिला ॥ आणीकमजलाठाऊकअसे ॥ ८० ॥ परिसावरीमाझेंमन ॥ नविश्वासेकिंचितपूर्ण ॥ आपुल्याइच्छेसवाटेलजाण ॥ तैसेंचिआपणकरावें ॥ ८१ ॥ हरीनेंहेंवचनऐकोन ॥ लटिकाचित्यावरीरागकरून ॥ गेलेपरिसासीघेऊन ॥ परंतुअंतरींतगमगलागली ॥ ८२ ॥ आणीकएककौतुकनवीन ॥ परिसाचानाशकरोनिश्रवण ॥ रोहिदासतेथेंबैसेआपण ॥ करावयासेवनश्रीहरीचें ॥ ८३ ॥ पांचमोहराआणून ॥ तेथेंठेवीजगज्जीवन ॥ रोहिदासत्रासपावोन ॥ दुसरेजागींबैसतसे ॥ ८४ ॥ जेथेंजेथेंरोहिदासबैसती ॥ तेथेंतेथेंमोहरानिघती ॥ याप्रकारेंहोयनित्यप्रती ॥ तेणेंतोचित्तींत्रासला ॥ ८५ ॥ रोहिदासह्मणेहरिसेवन ॥ आजिपासोनिसोडावेंजाण ॥ येथेंउपजतेंमहाविघ्न ॥ भीतीमजलावाटते ॥ ८६ ॥ मगरात्रींदेवभेटोन ॥ रोहिदासाचीहनवटीधरून ॥ वारंवारकरीविनवण ॥ तूंआपुलाहट्टसोडोनिदेई ॥ ८७ ॥ तुझ्यानिरपेक्षतेपुढें ॥ बापामीहरलोंनिवाडें ॥ ईश्वरजाणोनिवाडेंकोडें ॥ कांहींतरीजयराखींमाझा ॥ ८८ ॥

॥ मू०क० ॥ मानि लई बात नई ठोर ले बनाइ चाइ संतनि बसाई हरिमंदिर चिनायोहे ॥ विविध बितांन तांन गनो जो प्रमान होई भोइ भक्तिमई पुरी जग जस छायोहे ॥ दरसन आवे लोग नानाविधि राग भोग रोग भयो विप्र निके तन सब छायोहे ॥ बडे खिलारि वे रहे हे छानि डारि करि घरपे अटारि फेरि द्विजनि सिखा

योहे ॥ ६ ॥ ॥ टी०ओ० ॥ देवाचीइच्छाजाणोन ॥ रोहिदासकरीमान्य ॥ तोंसांप्रदाईजेहोतेजन ॥ तेकरितीविनवणरोहिदासा
॥ ८९ ॥ याद्रव्याचाविनिमयकराया ॥ आज्ञाद्यावीजीगुरुराया ॥ रोहिदासह्मणेलवलाह्या ॥ विस्तीर्णधर्मशाळाबांधावी ॥ ९० ॥ त्या
माजीअसावेंसर्वसाहित्य ॥ जेणेंआनंदोनउत्साहयुक्त ॥ तेथेंराहतीलसाधुसंत ॥ कामहीपोक्तकरावें ॥ ९१ ॥ दुसरेंकरावेंहरिमंदिर ॥ ऐ
सीआज्ञाहोतांचिसुंदर ॥ शिष्यकरितीतदनुसार ॥ भक्तमचिरेबंदीकामझालें ॥ ९२ ॥ छपरामाजीनिरंतर ॥ मोहरानिघतीवारंवार ॥
खर्चहीकरितांअपार ॥ परीत्यातेथेंतैशाची ॥ ९३ ॥ मगत्यामंदिरामाजीजाण ॥ नानापरीचेंबांधिलेंवितान ॥ पडदेतसबिराहंड्यावि
जणे ॥ आणीकहीसामाननगणवेची ॥ ९४ ॥ कायतयाचेंसांगूंप्रमाण ॥ भक्तिमयतेंझालेंभुवन ॥ भजनपूजनहरिकीर्तन ॥ रात्रंदिव
सहोतसे ॥ ९५ ॥ जगामाजीयशव्यापिलें ॥ दर्शनायेतीलोकभले ॥ नानाप्रकारचेतेवेळे ॥ सप्रेमउपचारहोताती ॥ ९६ ॥ यापरीहो
तांरागभोग ॥ विप्राचेअंतरींवाढलारोग ॥ तेणेंव्यापिलेंसर्वहीअंग ॥ बोलतीअनेकप्रकारें ॥ ९७ ॥ रात्रंदिवससंतभोजन ॥ होतसेवि
प्रांसीनमिळेअन्न ॥ तेणेंतयांसीकोपयेवोन ॥ नानाप्रकारेंचेष्टाकरिती ॥ ९८ ॥ पहाकैसाखेळतोखेळा ॥ छपरीटाकोनिराहेनिराळा ॥
वाड्यांतमोठ्याबांधिल्याशाळा ॥ चुनेगच्चीचेंकामकेलें ॥ ९९ ॥ आपणदाऊनिढोंग ॥ भोंदोनिभावार्थीलोक ॥ धनमिळवीतसेअनेक ॥
ह्याकपट्याचामागकोणानलागे ॥ १०० ॥ यापरीअनेकचेष्टाकरिती ॥ आणीकहीब्राह्मणांहेंचिशिकविती ॥ रोहिदासाचीघटेमहंती ॥
ऐसीअपकीर्तीयाचीकरा ॥ १ ॥ ॥ मू०क० ॥ प्रीति रसरासि सौ रैदास हरि सेवतहै घरमे दुराइ लोकरंजनादि टारिहे ॥ प्रेरि
दिये हृदै जाई द्विजनी पुकार करी भरी सभा नृप आगे कह्यो मुख गारीहे ॥ जनको बुलाई समुझाइ न्याई प्रभू सोपि कीनौ
जग जस साधुलीला मनुहारिहे ॥ जिते प्रतिकूल मैतो माने अनुकूल याते संतन प्रभाव मनि कोठरींकी तारीहे ॥ ७ ॥
॥ ॥ टी०ओ० ॥ परीतोप्रेमरसाचीराशी ॥ रोहिदासकरीहरिसेवेसी ॥ जेणेंनकळेचिकोणासी ॥ यापरीगुप्तराहतसे ॥ २ ॥ कोणीसु
खेंकरोतनिंदा ॥ कोणीभावार्थेंयेवोनिवंदा ॥ परीलोकरंजनाचाधंदा ॥ रोहिदासेंदूरटाळिलासे ॥ ३ ॥ परीभक्तांचावाढावामहिमा ॥

हेंतोंआवडेमेघश्यामा ॥ विप्राचेहृदयींछलनकामा ॥ तेणेंचिप्रेरणाकेलीसे ॥ ४ ॥ सर्वहीब्राह्मणमिळोन ॥ आणीकहीजेदुष्टजन ॥ रा
जवाड्यांतजावोन ॥ दीर्घआरोळ्यामारिती ॥ ५ ॥ भरसभेमाजीकेवळ ॥ रायाच्यासमक्षतेवेळ ॥ ब्राह्मणकरितीशिव्यागाळ ॥ नाना
प्रकारेंबोलती ॥ ६ ॥ ऐकोनिबोलेनृपनाथ ॥ तुह्मीब्राह्मणआणितेसंत ॥ आह्मासीपूज्यदोघेमहंत ॥ न्यायमीयाचाकैसाकरूं ॥ ७ ॥
जरीतुमचाअसेआग्रह ॥ तरीन्यायकरीललीलाविग्रह ॥ मगबोलाविलेसज्जनासह ॥ रोहिदासासीतेवेळां ॥ ८ ॥ सवेंतोघेऊनसमुदाय ॥
गंगातीरींपातलाराय ॥ नावाडीबोलाऊनलवलाहें ॥ आणविलीनावएकतेव्हां ॥ ९ ॥ त्यामाजीठेऊनसिंहासन ॥ वरीबैसविलेजगज्जी
वन ॥ गंगेच्यापारनेऊन ॥ नावरेतींतठेविली ॥ ११० ॥ रावबोलेब्राह्मणांसी ॥ तुह्मीपाचारावेंदेवासी ॥ मगबोलावितीलसंतत्यासी ॥
पाहीनकोणाकडेदेवयेतो ॥ ११ ॥ ज्याच्यापाचारणेंकरून ॥ जवळीयेतीलजगज्जीवन ॥ त्याचाचिन्यायसत्यजाण ॥ आह्मासीमान्य
होईलकीं ॥ १२ ॥ ऐसेंबोलोनियांराव ॥ धरूनबैसलामौनभाव ॥ तोंहरीसीपाचारितीभूदेव ॥ वेदमंत्रपढोनियां ॥ १३ ॥ कोणीशा
स्त्रव्युत्पत्तीपढती ॥ नानापरीचींपुराणेंवाचिती ॥ एकप्रहरझालानिश्चिती ॥ परीकांहींश्रीपतीयेईना ॥ १४ ॥ मगउठलेसंतजन ॥ आ
धींकरोनिसाष्टांगनमन ॥ देवासीविनवितीकरजोडोन ॥ पतीतपावनाधांववेगीं ॥ १५ ॥ ऐसाभक्ताचाऐकोनिशब्द ॥ हृदयींकळव
ळलागोविंद ॥ ऐलतीरासीनावविशद ॥ सज्जनाजवळीआलीसे ॥ १६ ॥ एकचिझालाजयजयकार ॥ सज्जनासीसाह्यश्रीधर ॥ अधो
मुखहोवोनविप्रवर ॥ मौनेंचिगेलेउठोनी ॥ १७ ॥ जगामाजीझालेंयश ॥ चित्तींरायाचेवाढलाहर्ष ॥ साष्टांगघालोनिसंतांस ॥ करजो
डोनिस्तुतीकरी ॥ १८ ॥ साधूचीलीलामनोहर ॥ जयासीवश्यसारंगधर ॥ वृथानिंदितीविप्रवर ॥ तुमचापारनलागेची ॥ १९ ॥ रोहि
दासह्मणेजीराया ॥ प्रतिकूलनह्मणावेंविप्रवर्या ॥ तयाचीतोअनुकूलचर्या ॥ मीआपुलेचित्तींजाणतसें ॥२२०॥ संतप्रभावमहामणी ॥
खोलींतअसतोगुप्तपणीं ॥ तयातेंदावितीप्रगटकरोनी ॥ विप्रहेकुंचीचजाणावे ॥ २१ ॥ ॥ मू०क० ॥ वसत चितोरमांझ रांनी एक
झाली नाम नाम बिन कान खाली सिष्य आनि भईहै ॥ संग हुते विप्र सुनि छिप्र तन आगि लागि मागी मति नृपआगे भीर

सब गईहे ॥ बैसेही सिंघासनपै आइके बिराजे प्रभू पढे बेदबानी पै न आये यह नईहे ॥ पतितपावननाम कीजिये प्रगट आज
गायो पद गोद आई बैठे भक्ति लइहे ॥ ८ ॥ ॥ टी०ओ० ॥ आणीकऐकाचरित्र ॥ चितोडीचानृपवर ॥ तयाचीकांतासुंदर ॥
नामतेंझ्यालीअसेतिचें ॥ २२ ॥ चितोडीमाजीअसेवास ॥ निघालीयात्राकरावयास ॥ तंवतेआलीवाराणशीस ॥ नित्ययात्राकरीत
से ॥ २३ ॥ परीहरीच्यानामाविण ॥ रिकामेहोतेतिचेकर्ण ॥ गुरूपदेशघ्यावापूर्ण ॥ इच्छाबहुततीसहोती ॥ २४ ॥ तोंरोहिदासाचा
महिमाऐकिला ॥ तियेचेहृदयींभावजडला ॥ शरणयेवोनितेवेळां ॥ उपदेशघेऊनिशिष्यझाली ॥ २५ ॥ राणीसंगेंब्राह्मणबहुत ॥ होते
शास्त्रीवैदिकपंडित ॥ तयांसीकळतांहावृत्तांत ॥ शरीरांतआगलागली ॥ २६ ॥ सकळांचीमतीझालीभ्रष्ट ॥ आणीककाशीचेविप्रवरि
ष्ठ ॥ सर्वहीहोवोनिएकवट ॥ काशिरायाजवळीपातले ॥ २७ ॥ ह्मणतीचितोडीचानृपती ॥ त्याचीतुमचीएकजाती ॥ तयाच्याराणी
नेंचांभाराप्रती ॥ जाऊनउपदेशघेतला ॥ २८ ॥ हातोंजाहलाभ्रष्टाकार ॥ कैसातूंआहेसिनृपवर ॥ करिसीधर्माचाअव्हेर ॥ अधर्मव्य
वहारपहातअसतां ॥ २९ ॥ रायेंपरिसोनिविप्रउक्ती ॥ पूर्ववत्पुनरपिकरीयुक्ती ॥ रोहिदासासीआणोनिनियुती ॥ सिंहासनींमूर्तीठेवि
ली ॥ १३० ॥ संतांसीआणीब्राह्मणां ॥ भूपतीकरीविज्ञापना ॥ उभयतांकरावीपाचारणा ॥ जगज्जीवनालागोनी ॥ ३१ ॥ जयाचा
असेलन्यायसत्य ॥ त्याकडेचियेतीलभगवंत ॥ ऐसेंबोलोनियांनिवांत ॥ भूपतीपहातबैसला ॥ ३२ ॥ मगतेब्राह्मणघडघडाट ॥ वेद
शास्त्रांचाकरितीपाठ ॥ पाचारितांहीवैकुंठपीठ ॥ नयेचिजवळीतयांच्या ॥ ३३ ॥ देवतोप्रेमाचाभुकेला ॥ स्वभक्तांसीवश्यझाला ॥ न
वीनचितेथेंदाविलीलीला ॥ चित्तदेऊनपरिसावी ॥ ३४ ॥ सकळहीप्रार्थितीसंतजन ॥ तुझेंतोंनामपतितपावन ॥ आजिप्रगटदावींक
रोन ॥ रोहिदासपदगातसे ॥ ३५ ॥ रोहिदासेंकरितांगायन ॥ कळवळोनिधांवलाजगज्जीवन ॥ भक्ताचेओंटींतबैसलाआपण ॥ भक्ती
चीटेंकराखिली ॥ ३६ ॥ एकचिझालाजयजयकार ॥ मौनेंचिगेलेविप्रवर ॥ भूवरीतेअभाग्यनर ॥ भक्तीचेघरनजाणती ॥ ३७ ॥ रोहि
दासविप्रांसीकरीनमन ॥ आजितुमच्यायोगेंकरून ॥ आह्मासीवोळलाजगज्जीवन ॥ भजनींविश्वासदृढजडला ॥ ३८ ॥ ॥ मू०

क० ॥ गई घर झाली पुनि बोलिके पठाये अहो जैसे प्रतिपाली अब तैसें प्रतिपालिये ॥ आपहु पधारे उन बहु धन पट वारे विप्र सुनि पाव धारे सीधौ दै निवारिये ॥ करिके रसोइ द्विज भोजन करन बैठे द्वैद्वै मधि एक यो रैदासको निहारिये ॥ देखि भई आखै दीन भाखे शिष्य भये लावे स्वर्नको जनेऊ काढ्यो तुचा कीनी न्यारिये ॥ ९ ॥ ॥टी०ओ० ॥ चितोडीसचालतीझाली राणी ॥ सर्वेजेहोतेब्राह्मणकोणी ॥ रायातेंसांगतीपुढेंजाऊनी ॥ भ्रष्टाकारकेलास्त्रियेनें ॥ ३९ ॥ आह्मीजातीचेशुद्धब्राह्मण ॥ आमुचातोअपमानकरोन ॥ चर्मकाचाउपदेशपूर्ण ॥ घेतलाकाशींतराणीनें ॥ १४० ॥ तंवतेमागूनराणीआली ॥ नृपतीपुसतसेतयेवेळीं ॥ राणीनेंवर्तमानसमूळीं ॥ रायालागींनिवेदिलें ॥ ४१ ॥ रायासीजाहलाआनंदपूर्ण ॥ मगतोकरीगंगापूजन ॥ विप्रांसीदेतांआमंत्रण ॥ परीतेअंगिकारनकरिती ॥ ४२ ॥ रायासीटाकिलेंवाळीत ॥ रावराणीसीसर्वसांगत ॥ येरूह्मोवोनिभयभीत ॥ सद्गुरूतेंपत्रधाडी ॥ ४३ ॥ आपणपूर्वींप्रतिपाळिलें ॥ तैसेंचिआतांपाहिजेरक्षिलें ॥ आह्माअनाथांसीयेवेळे ॥ आपणावांचोनिनसेचित्राता ॥ ४४ ॥ ऐसेंपत्रींलिहून ॥ आणीककांहींधनदेऊन ॥ आणायाधाडिलेसभ्यजन ॥ तंवतेकाशींतपोहोंचले ॥ ४५ ॥ रोहिदासासीवंदोन ॥ सन्मुखेंसीपत्रठेवोन ॥ सर्वहीकथिलेंवर्तमान ॥ परिसतांदयाघनकळवळे ॥ ४६ ॥ तत्काळतेथोनिनिघाले ॥ चितोडीनगराप्रतिआले ॥ रावराणीसीकळतांवहिलें ॥ सामोरेआलेधांवोनी ॥ ४७ ॥ अतिशयेंकेलासन्मान ॥ बहुतआणोनिवस्त्रधन ॥ टाकीतसेओंवाळून ॥ सद्गुरूवरुनितेधवां ॥ ४८ ॥ विप्रांसीकळतांवर्तमान ॥ सर्वहीआलेभेटीकारण ॥ ऐसाउत्तमसमयजाणोन ॥ सद्गुरूसीविनवीतसे ॥ ४९ ॥ अहोकरणेंजीगंगापूजना ॥ तैंसद्गुरुपुसतीब्राह्मणा ॥ तेह्मणतीशिधाआह्मासीजाणा ॥ देऊनिगंगापूजनकरावें ॥१५०॥ ऐकोनिरोहिदासह्मणेराया ॥ विप्रांचासंतोषठेवोनियां ॥ आपुल्यासाधोनिघेइजेकार्या ॥ रावतैसेंचिसत्वरकरी ॥ ५१ ॥ सहस्रपात्राचातेवेळां ॥ ब्राह्मणांसीशिधादीधला ॥ तेहींस्वयंपाकसिद्धकेला ॥ संकल्पाआलारावतेथें ॥ ५२ ॥ रोहिदासहीतेथेंआले ॥ दूरबाजूसीउभेराहिले ॥ तंवतेपात्रेंवाढूनवहिले ॥ ब्राह्मणजेवायाजोंबैसती ॥ ५३ ॥ तंवदोनदोनब्राह्मणांमाजी ॥ मध्येंबैसलेरोहिदासजी ॥ ऐसेंपाहतांविप्रसमा

जीं ॥ मगसर्वांचीदृष्टीउघडली ॥ ५४ ॥ करितीउठोनिसाष्टांगनमन ॥ ह्मणतीतुह्मीतोंअवतारपूर्ण ॥ आह्मीतोंसर्वहीशिष्यजाण ॥ क्ष
माकरणेंजीदयाळा ॥ ५५ ॥ आपणचिराखिजेस्वधर्मकर्म ॥ रोहिदासह्मणेतुह्मानकळेवर्म ॥ मीतोआहेंब्राह्मणउत्तम ॥ खूणआतांचिदा
वितों ॥ ५६ ॥ सत्वरआणवोनिकटार ॥ दावीफाडोनिआपुलेंउदर ॥ सोन्याचेंयज्ञोपवीतसुंदर ॥ अंतरींसर्वांनींपाहिलें ॥ ५७ ॥ सर्व
हीकरितीजयजयकार ॥ ऐसासाधूचानकळेपार ॥ नाभाज़ीचेवचनानुसार॥ किंचितहेकीर्तिगाइली ॥ ५८ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥
भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ चौपन्नावाछप्पागोडहा ॥ १५९॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरुजगन्नाथा ॥ तुवांमोडोनिसकळमता ॥ कलियुगामाजीभक्तिपंथा ॥
करुणाकरास्थापिलेंसी ॥ १ ॥ ॥ मू०छ ॥ कबीर कानि राखी नही वर्णाश्रमषडदर्शनी ॥ भक्तिविमुख जो धर्म सो अधर्म करि
गायो ॥ जोग जज्ञ व्रत दान भजन बिन तुछ दिखायो ॥ हिंदु तुरक प्रमान रमैनी सबदी साखी ॥ पछपात नहि बचन सबहिके
हितकी भाखी ॥ आरूढ दशा व्हे जगतपर मुख देखि नाहिन भनी॥ ५५ ॥ ॥टी०ओ० ॥ वर्णाश्रमषड्दर्शन॥ श्रेष्ठतायाचीनरा
खिलीजाण ॥ ऐसाकबीरभक्तपूर्ण॥ तयाचेंमाहात्म्यपरिसावें॥२॥ भक्तीसीजोविन्मुखधर्म॥ तेणेंतोगाइलाकरूनिअधर्म ॥ तैसेंचियज्ञयोग
व्रतदान ॥ भजनाविणतुच्छदाविलें॥३॥ हिंदुआणिमुसलमान॥ उभयतांलागींजोप्रमाण॥ ज्याचियाशब्दादेतीमान॥ ऐसारमणीयग्रंथके
ला ॥ ४ ॥ पक्षपातनकरितांजाण ॥ सर्वांच्याहितावेंबोलिलावचन ॥ जेणेंजगांतवागोनिजाण ॥ खुशामतीभाषणनकेलें ॥ ५ ॥
॥ मू०क० ॥ अतिही गभीर मति सरस कबीर हियो लियो भक्तिभाव जाति पाति सब टारिये ॥ भई नभ बानि देह तिलक र
वानी करो करो गुरू रामानंद गरै माल धारिये ॥ देखे नही मुख मेरौ जानिके मलेंछ मोको जात न्हान गंगा क
ही मग तन डारिये ॥ रजनीके सेसमे आवेससो चलत आप परै पग राम कहे मंत्र सो विचारिये ॥ १ ॥ ॥टी०ओ० ॥ जो
काअत्यंतगंभीर॥ जयाचीमतीसरसफार॥ ऐसामहाभक्तकबीर॥ तयाचेंचरित्रपरिसावें॥ ६ ॥ रामानंदाचीकन्यका ॥ बाळपणींचगतभर्तृ

का ॥ परीसेवाकरीसम्यका ॥ रात्रंदिवससद्गुरूची ॥ ७ ॥ रामानंदाचाउपदेश ॥ सेवाकरीतसेविशेष ॥ यापरीलोटलेबारावर्षं ॥ तोंसद्गुरुप्रसन्नजाहले ॥ ८ ॥ पूजाकरीतविशद ॥ बैसलेहोतेरामानंद ॥ तोंपुष्पेंउचलोनिप्रसाद ॥ तिचेओंटींतघातला ॥ ९ ॥ ध्यानांतआणिलेंदेवाधिदेवा ॥ बाहेरीविसरलेदेहभावा ॥ नाठवेचिकन्याबाळविधवा ॥ ह्मणतीतूतेंपुत्रहोईल ॥ १० ॥ तेव्हांतेमनांतलाजली ॥ तैसींचओंटींतपुष्पेंघेतलीं ॥ गंगेंतटाकावयागेली ॥ पदरउघडोनिपाहातसे ॥ ११ ॥ साधूचेंखोटेंनहोयवचन ॥ ओंटींतनिघालेंपुत्ररत्न ॥ तिचेंशंकितझालेंमन ॥ मजलोककायह्मणतील ॥ १२ ॥ मीतोंआहेंपतिहीन ॥ तोंडावरीथुंकतीलजन ॥ स्वामीसीकलंकलावितीलजाण ॥ ह्मणोनिउद्विग्नमनझालें ॥ १३ ॥ मगतेंबत्तीसलक्षणीबाळ ॥ गंगेंतसोडिलेंतत्काळ ॥ परीतेंनभिजतांअळुमाळ ॥ वाहतवाहतजातसे ॥ १४ ॥ तंवतेथेंहोतामोमिण ॥ परीतोअसेपुत्रहीन ॥ तयाचीकांतासगुण ॥ स्नातधूतबैसलीसे ॥ १५ ॥ तोमोमिणेंबाळदेखिला ॥ तत्काळउचलोनिघेतला ॥ कांतेचेओंटींतघातला ॥ तोंफुटलापान्हातियेतें ॥ १६ ॥ दोघांसीपरमानंदझाला ॥ मगतोबाळघरींआणिला ॥ पुत्रोत्साहबहुकेला ॥ कबीरनांवठेविलें ॥ १७ ॥ दिवसेंदिवसझालामोठा ॥ पित्यानेंसोडिलेंदेहघांटा ॥ तेवेळींप्रपंचाचावांटा ॥ आलाकबिराच्याहिःशासी ॥ १८ ॥ परीतोलहानपणापासोन ॥ भक्तिभावेंहृदयींनिमग्न ॥ जातीपातीचाअभिमान ॥ जेणेंटाळूनदीधला ॥ १९ ॥ परीअंतरींचिंतातुर ॥ संसारसमुद्रमहादुस्तर ॥ केवींयाचामीपावेनपार ॥ कैसेनिसद्गुरूभेटती ॥ २० ॥ यापरीतयाचीचिंता ॥ कळोंसरलीजगन्नाथा ॥ तेव्हांआकाशवाणीतत्त्वता ॥ कबीराकारणेंजाहली ॥ २१ ॥ देहावरीतिलकमाळा ॥ तुवांल्यावीरेप्रेमळा ॥ स्वामीरामानंददयाळा ॥ शरणजाऊनिगुरुकरीं ॥ २२ ॥ कबीरकरीतसेविनवण ॥ मजलाजाणोनिम्लेंछहीन ॥ नपाहतीचमाझेंवदन ॥ केवींउपदेशतेदेतील ॥ २३ ॥ स्वामीजीचाथोरआचार ॥ तैसाचिअसेदूरवरविचार ॥ सोंवळेंओंवळेंसाचार ॥ त्यासमनसेचिकोणाचें ॥ २४ ॥ पुनरपिकायवदेवाणी ॥ प्रातःकाळींस्नानालागुनी ॥ स्वामीजातअसतांतेक्षणीं ॥ मार्गांतदेहटाकावा ॥ २५ ॥ मागिलेरात्रींअंधारांत ॥ स्वामीजातीआवेशयुक्त ॥ नकळतांतूतेंपायलागत ॥ तैंरामरामऐसेंह्मणतील ॥ २६ ॥ तोचिजाणावामहामंत्र ॥ सर्वहीसोडोनिद्यावेंतं

त्र ॥ जपकरावादिवसरात्र ॥ मगतूंस्वतंत्रहोशील ॥ २७ ॥ ऐसीऐकोनिआकाशवाणी ॥ आनंदेंकबीरतेचिदिनीं ॥ स्वामीच्यामार्गी
तजावोनी ॥ रात्रीचेठाईनीजला ॥ २८ ॥ ॥ मू०क० ॥ कीनी वही बात माला तिलक बनाइ गात मानी उतपात मात सोर
कियो भारिये ॥ पहुंचि पुकार रामानंदजुके पास आइ कही कोऊ पुछे तुम नाम ले उचारिये ॥ लावो जु पकरि वाको कब हम
कियो शिष्य लाये करी परदामे पूछि कही डारिये ॥ रामनाम मंत्र यही लिख्यो सब तंत्रनिमे खोलि पट मिले सांचो मत्त उर धा
रिये ॥ २ ॥ ॥ टी०ओ० ॥ आवेशेंजोंस्वामीयेती ॥ पायलागलाकबीराप्रती ॥ रामराममुखानेंह्मणती ॥ येणेंतोउपदेशमानिला ॥
॥ २९ ॥ देहावरीलाविलेतिलक ॥ कंठींतुलसीमाळासम्यक ॥ मुखामाजीरघुतिलक ॥ अखंडस्मरणकरीतसे ॥ ३० ॥ पाहोनितयाचें
लक्षण ॥ माताउत्पातमानीपूर्ण ॥ ह्मणेरेआपणजातीचेयवन ॥ हाकायअनर्थकरितोसी ॥ ३१ ॥ हेतोंराहटीसोडोनिद्यावी ॥ पांचवे
ळानिमाजपढावी ॥ कबीरकानासीबोटेंलावी ॥ नायकेचिवाणीमातेची ॥ ३२ ॥ येतांजातांपुसतीलोक ॥ कोणेंदीधलेतुजमालातिल
क ॥ कोणतुझागुरुसम्यक ॥ उपदेशयवनासीकेलातेणें ॥ ३३ ॥ रामानंदस्वामीसमर्थ ॥ तेहींकेलेंमजकृतार्थ ॥ सर्वहीयेतीगंगास्नाना
र्थ ॥ तेकायनीचानकोह्मणे ॥ ३४ ॥ गांवांतजाहलाबोभाट ॥ ह्मणतीकैसेस्वामीश्रेष्ठ ॥ नीचासीदिधलामंत्रसुभट ॥ सर्वहीथट्टालावि
ती ॥ ३५ ॥ कोणीएकानेंजाऊनतत्त्वता ॥ निवेदिलीस्वामीसीवार्ता ॥ उपदेशिलेंकींकबीरासमर्था ॥ तोतरीतुमचेंनांवसांगे ॥ ३६ ॥
जातीचातोमुसलमान ॥ कैसाउपदेशदिधलाजाण ॥ स्वामीह्मणतीमजलागोन ॥ कबीरकोणतोठाऊकनसे ॥ ३७ ॥ दाहापांचशिष्य
बोलाऊन ॥ ह्मणतीकबिराआणाधरून ॥ आह्मीत्यायवनासीउपदेशपूर्ण ॥ कोणतेसमयासीदीधला ॥ ३८ ॥ तंवत्याशिष्यांनींजाऊन ॥
कबिरासीआणिलेंधरून ॥ यवनाचेंनपाहावेंवदन ॥ ह्मणोनिपडदाआडटाकिला ॥ ३९ ॥ आंतूनविचारितीस्वामी ॥ कधींरेउपदेशदि
धलाआह्मी ॥ मंत्रकोणताकथिलातुजमी ॥ बळेंचिह्मणसीगुरुमज ॥ ४० ॥ कोणेंहेदिधलीदीक्षा ॥ सत्यनिवेदींनतद्रक्षा ॥ नातरीतुज
लावीनशिक्षा ॥ यापरीस्वामीबोलिले ॥ ४१ ॥ कबीरघालोनिदंडवत ॥ साद्यंतवर्तमाननिवेदित ॥ प्रभातेस्नानासीजातांसमर्थ ॥ तेथें

मीमार्गीतनिजलोंहोतों ॥ ४२ ॥ आपुलामजसीलागतांचरण ॥ स्वामीनेंकेलेंनामस्मरण ॥ तोचिउपदेशझालापूर्ण ॥ तेणेंमीकृतार्थजाह
लों ॥ ४३ ॥ रामनामाहूनअधिक ॥ दुसरामंत्रनसेचितारक ॥ सर्वतंत्रांमाजीदेख ॥ लिहिलेंअसेकींस्वामियां ॥ ४४ ॥ यापरीतयाचेंपरि
सोनिवचन ॥ स्वामीसीआलेंगहिवरोन ॥ लगबगेंपडदादूरकरोन ॥ कबिरासीहृदयींधरियेलें ॥ ४५ ॥ ह्मणतीरामनामाचामहिमा ॥
न ॥ तुह्मासीत्याणेंजिंतिलेंपूर्ण ॥ तैसाचिपंडिततोअसे ॥ १७ ॥ पंडितह्मणेकायवाचतां ॥ चांगलेदृष्टीनेंपहातत्त्वता ॥ तंवतेह्मणती
आह्मांअंधता ॥ आपणचिनेत्रींपहावें ॥ १८ ॥ तेव्हांपंडितपाहेआपण ॥ माधवदासेंजिंतिलेंजाण ॥ ऐसींचअक्षरेंपाहिलींपूर्ण ॥ मग
तोअंतरींसंतापला ॥ १९ ॥ ह्मणेतोदिसतोउत्तमसाधू ॥ परंतुकेवळतोअसेभोंदू ॥ तरीत्यासीघालोनिवादू ॥ जगींकरावीविटंबना ॥
॥ १२० ॥ ऐसेंअंतरींविचारून ॥ नीलाचलासीयेपरतोन ॥ माधवदासाचीभेटघेऊन ॥ कायआपणबोलतसे ॥ २१ ॥ अरेतूंमजसींके
लीलबाडी ॥ तरीबैसोनियेचघडी ॥ मजसींवादघालींतांतडी ॥ नाहींतरीएककरावें ॥ २२ ॥ गाढवावरीतुवांबैसोन ॥ काळेंवदनासी
घेमाखोन ॥ वरीचुन्याचेथेंबलाऊन ॥ सर्वगांवांतफिरावें ॥ २३ ॥ आणीककानांतबांधींजोडे ॥ तेव्हांचिमाझ्याचित्तींनिवाडे ॥ उत्तम
वाटेलवाडेंकोडें ॥ ह्मणोनिगाढवआणवी ॥ २४ ॥ आणिसर्वहीसाहित्यजोडिलें ॥ माधवदासह्मणेजीभलें ॥ हेंचिमजलाकबूलवहिलें ॥

आतांस्नानकरोनियेतोंमी ॥ २५ ॥ यापरीत्यासीबोलोनिवचना ॥ माधवदासजीगेलेस्नाना ॥ परीनिजभक्ताचीविटंबना ॥ जगज्जीव
नाकैसीसाहवे ॥ २६ ॥ माधवदासाचेंरूपधरोन ॥ पंडितासीभेटेयेऊन ॥ पूर्वपक्षदुर्घटकरोन ॥ तयाजिंतोनघेतलें ॥ २७ ॥ मगह्मण
तीआतांआपण ॥ गादवावरीबैसापूर्ण ॥ काळेंकरूनघ्यावेंवदन ॥ जोडेकानांसीबांधावे ॥ २८ ॥ तेव्हांपंडितखिन्नहोऊन ॥ तैसेंचिआ
पणघेकरून ॥ गादवावरीनिघेबैसोन ॥ हाटोहाटींफिरतसे ॥ २९ ॥ गांवांतीलमिळोनिपोर ॥ करितीतयासीशेणमार ॥ ऐसेंपाहोनि
सारंगधर ॥ हृदयामाजीरीझले ॥१३०॥ तोंमाधवदासस्नानकरून ॥ लगबगेंजोंयेतीजाण ॥ तोंगादवावरीबैसोन ॥ पंडितहाटींफिरत
से ॥ ३१ ॥ ऐसेंविपरीततेंपाहोन ॥ आपणतेथेंगेलेधांऊन ॥ पंडितालागींबोलेवचन ॥ हेंकायआपणकेलेंकीं ॥ ३२ ॥ मजलास्नाना
सीझालाउशीर ॥ तोंवरीनाहींधरिलाधीर ॥ आपणचिबैसोनिगादवावर ॥ निघालांबाजारपहावया ॥ ३३ ॥ आतांतरीतुह्मीउतरावें ॥
मजलायावरीबैसोंद्यावें ॥ यापरीविनंतीकरितांभावें ॥ पंडितअंतरींसमजला ॥ ३४ ॥ अहोहाअसेपूर्णभक्त ॥ यासीछळितांचिजगन्ना
थ ॥ येऊनमजलाविटंबित ॥ भक्तवत्सलतोअसे ॥ ३५ ॥ ऐसाअनुतापकरोन ॥ माधवदासासीजायशरण ॥ यावरीपुढेंचरित्रजाण ॥
माधवदासानेंकायकेलें ॥ ३६ ॥ ॥ मू०क० ॥ ब्रजहीकी लीला सब गांवे नीलाचलमांझ मन भइ चाह जाई नैननी निहारिये ॥
चले वृंदावन मग लगे एक गांव जहां बाई भक्ति भोजनको लाइ चाव भारिये ॥ बैठे ये प्रसाद लेत लेत दृग भरि अहो कहो
कहा बात दुख हियेको उघारिये ॥ सांवरो कुवर यह कोनको भुराइ लाये माइ कैसे जीवे सुनि मती ले बिसारिये ॥ ८ ॥ ॥
टी०ओ० ॥ जगन्नाथक्षेत्रींसर्वजन ॥ ब्रजलीलेचेंकरितीगायन ॥ माधवदासेंतेंऐकोन ॥ मनांतइच्छाजाहली ॥ ३७॥ ब्रजभूमीचेंघ्या
वेंदर्शन ॥ ह्मणोनिजगदीशाभेटोनिआपण ॥ जावयाचीआज्ञाघेऊन ॥ निघेसत्वरतेधवां ॥ ३८ ॥ मार्गीमाजीएकत्यानगरीं ॥ एक
विप्रस्त्रीअसेह्मातारी ॥ भोळाभावतिचेअंतरीं ॥ नित्यभागवतऐकतसे ॥ ३९ ॥ तेथेंहोतसेदशमस्कंध ॥ बाललीलाऐकोनिविशद ॥
बाईच्याअंतरींलागलाछंद ॥ नयनींतोगोविंदपहावा ॥ १४० ॥ करोनिपंचपक्वान्न॥ तयासीघालावेंभोजन ॥ परीतोश्रीमंतअसेपूर्ण ॥

आपुल्यासदनींयेईलकीं ॥ ४१ ॥ यापरीअंतरींकरीतळमळ ॥ पक्वान्नांचालावीमेळ ॥ वर्षभरामाजीसकळ ॥ साहित्यासीसिद्धकेलें ॥
॥ ४२ ॥ जोकोणीभेटेलत्यासी ॥ बाईविचारीभावार्थेंसी ॥ श्रीकृष्णमाझेसदनासी ॥ भोजनासीयेईलकीं ॥ ४३ ॥ ऐकोनसर्वहीलोक
हांसती ॥ ह्मणतीहेवेडीझालीनिश्चिती ॥ तोंएकभेटलाविप्रभावार्थी ॥ तयासीतैसेंचिविचारिलें ॥ ४४ ॥ त्याणेंतिचाभावपाहोन ॥ ह्म
णेयेतीलजगज्जीवन ॥ परीतयासीअसेकारण ॥ कोणीतरीसज्जनपाहिजे ॥ ४५ ॥ संतांसीघालितांभोजन ॥ तुझेमनोरथहोतीलपूर्ण ॥
तरीएकयुक्तीतुजलागोन ॥ सांगतोंजाणलक्षठेवीं ॥ ४६ ॥ जगन्नाथक्षेत्रींमाधवदास ॥ श्रीकृष्णाचेभक्तसुरस ॥ हाल्लींतेजातीवृंदावना
स ॥ याचिमार्गेंकरोनियां ॥४७॥ ऐसीतिणेंऐकतांवार्ता ॥ बहुतआनंदझालाचित्ता ॥ तोचिवेधमगलागेतत्त्वता ॥ झोंपहीतिसीनयेची
॥ ४८ ॥ रात्रंदिवसमार्गींजाऊन ॥ वाटपहातबैसेआपण ॥ तोंएकऐकिलेंवर्तमान ॥ चारकोसांवरउतरलेती ॥ ४९ ॥ मगबाईनेंतोब्रा
ह्मण ॥ गांठोनित्यासीबोलेवचन ॥ माधवदाससाधूजाण ॥ चारकोसांवरराहिलेती ॥ १५० ॥ माझेंआहेह्मातारपण ॥ तरीतेथवरजावें
आपण ॥ त्यांसीसांगोनयावेंआमंत्रण ॥ जेणेंतेभोजनायेतील ॥ ५१ ॥ तेव्हांतोतेथेंगेलाब्राह्मण ॥ माधवदासासीनमनकरोन ॥ बाई
चेंसाद्यंतवर्तमान ॥ केलेंनिवेदनतेधवां ॥ ५२ ॥ जरीआपणयालभोजना ॥ तरीचतिचीपुरेलकामना ॥ नातरीतीत्यजीलप्राणा ॥
यापरीभावनाअसेकीं ॥ ५३ ॥ माधवदासह्मणेपूर्ण ॥ अवश्ययेऊनभोजनकरीन ॥ तेव्हांतोब्राह्मणयेऊन ॥ बाईसीसर्वनिवेदिलें ॥
॥ ५४ ॥ चारघटकादिवसासी ॥ उदईकयेतीलभोजनासी ॥ ऐकतांचबाईच्यामानसीं ॥ परमानंदजाहला ॥ ५५ ॥ मगदोनप्रहररात्रीं
उठोन ॥ स्वयंपाकासीलागलीजाण ॥ सर्वहीपाकसिद्धकरोन ॥ वाटपहातबैसली ॥ ५६ ॥ तोंचारघटकादिवसास ॥ येऊनपातलेमा
धवदास ॥ बाईसीआनंदबहुवस ॥ पाटरांगोळीकरीतसे ॥ ५७ ॥ माधवदासतीतेंह्मणती ॥ दोनपात्रेंघालींनिश्चिती ॥ तेव्हांतीसमज
लीआपुल्याचित्तीं ॥ दुसरासोबतीअसेलकोणी ॥ ५८ ॥ तेव्हांवाढिलींपात्रेंदोन ॥ माधवदासबैसेयेऊन ॥ प्रभूसीनैवेद्यसमर्पून ॥ प्रसाद
आपणभक्षीतसे ॥ ५९ ॥ तंवतोदुसऱ्यापात्रावर ॥ येऊनबैसलेमुरलीधर ॥ सकुमारअत्यंतसुंदर ॥ सांवळेंशरीरशोभतसे ॥ १६० ॥ कंठींवन

माळावैजयंती ॥ मुगुटकुंडलेंकर्णींझळकती ॥ चरणींनेपुरेंरुणझुणती ॥ मनोहरमूर्तींशोभतसे ॥ ६१ ॥ यापरीमूर्तींपाहोन ॥ बाईचेभरो
निआलेनयन ॥ वाढणेंसर्वसांडोन ॥ रुदनकरीतबैसली ॥ ६२ ॥ माधवदासेंहेंपाहोन ॥ ह्मणतीकांहोकरितांरुदन ॥ कोणत्यागोष्टीचें
दुःखजाण ॥ हृदयींचेंखोलूनसांगावें ॥ ६३ ॥ बाईह्मणेहासांवळाकुमर ॥ कोणाचाचुकवोनआणिलासुंदर ॥ याविणयाच्यामातेनेंसत्व
र ॥ सोडिलाप्राणअसेलकीं ॥६४॥ ऐसेंपाहोनिबाळसगुण ॥ तुमचेंदेखोनकठोरपण ॥ मजलाअत्यंतआलेंरुदन ॥ नपडेचैनमनासी ॥६५॥
माधवदासेंहेंऐकोन ॥ गेलेशुद्धीविसरोन ॥ ह्मणतीबाईचेंभाग्यगहन ॥ हरीचेंदर्शनजाहलें ॥६६॥ मगबाईसीकायबोलत ॥ तुझेहोतेजेमनोर
थ ॥ तेचियेऊनजगन्नाथें ॥ सर्वहीपूर्णकेलेकीं ॥ ६७ ॥ आतांहीमूर्तीलक्षलावोनी ॥ सर्वदाठेवींआपुलेध्यानीं ॥ यापरीबाईकृतार्थ
करोनी ॥ पुढेंआपणनिघाले ॥ ६८ ॥ ॥ मू०क० ॥ चले ओर गांव जहा महाजन भक्त रहे गहे मनमांझ आगे
बिनतिहु करीहे ॥ गए वाके घर वह गयो काहु ओर घर भावभरी तिया आप पायनिमे परीहे ॥ ऊपर महंत कही अब एक संत आयो
यहातो समाइ नही आई अर बरीहे ॥ कीजिये रसोइ जोइ सिद्ध सोइ लावो दुध नीकेके पिवावो नाम माधो आस भरीहे ॥ ९ ॥
॥ ॥ टी०ओ० ॥ दुसऱ्यागांवासीकरितीगमन ॥ तेथेंएकसावकारमहाजन ॥ राहतसेतोभक्तजाण ॥ त्याकडेमनलावोनी ॥ ६९ ॥
पूर्वींएकदांजगन्नाथीं ॥ तयाचीभेटझालीहोती ॥ तेव्हांतेणेंकेलीविनंती ॥ माझियेसदनींयावेंएकदा ॥ १७० ॥ तेंचिधरोनिमानसीं ॥
गेलेत्याचियाघरासी ॥ तंवतोकोठेंकार्यासी ॥ गेलाहोताघरींनसे ॥ ७१ ॥ तेणेंस्त्रियेसीहोतेंकथिलें ॥ माधवदासेंवचनदीधलें ॥ घ
रींयेण्याचेंकबूलकेलें ॥ तरीतेअगत्ययेतील ॥ ७२ ॥ कधींमजसीलागल्याधंदा ॥ तरीतूंसावधराहेंसर्वदा ॥ जेवेळींयेतीलतेआपुल्याछं
दा ॥ आदरकरोनिघरींठेवीं ॥ ७३ ॥ तोंमाधवदासअकस्मात ॥ पातलेत्याच्यासदनांत ॥ उभेराहूनिद्वारांत ॥ ह्मणतीक्षुधितअसोंकीं
॥ ७४ ॥ तंवतीहोवोनिभावयुक्त ॥ माधवदासाचेपाईपडत ॥ अंतरींजाहलीचिंताक्रांत ॥ आतांमीकैसेंकरूंहो ॥ ७५ ॥ माझेंतोंजाह
लेंभोजन ॥ आतांस्वयंपाककरीलकोण ॥ तोंअंतरींजाहलीआठवण ॥ तेचिआपणकरीतसे ॥ ७६ ॥ कोणीवरच्यामजल्यावर ॥ म

हंतराहातहोताथोर ॥ तयाचेघरींअन्नसत्वर ॥ सिद्धजाहलेंहोतेंकीं ॥ ७७ ॥ तेथेंसत्वरजाऊनआपण ॥ तयालागींकरीविनवण ॥ खा
लींआलासेसाधुजन ॥ तयासीभोजनघालावें ॥ ७८ ॥ महंतेंतिचेंऐकोनिवचन ॥ कायबोलिलाकोपेंकरून ॥ आतांकोणाचासमाव
जाण ॥ आमुच्यायेथेंनसेकीं ॥ ७९ ॥ तेव्हांतीझालीअत्यंतखिन्न ॥ माधवदासाजवळयेऊन ॥ विनंतीकरीकरजोडोन ॥ अहोजीस्वा
मीपरिसावें ॥ १८० ॥ माझेंतोंभोजनझालेंअसे ॥ स्वयंपाकाचाअधिकारनसे ॥ तरीतुह्मासीसाहित्यदेतसें ॥ स्वयंपाककरूनभोजनक
रा ॥ ८१ ॥ येरूह्मणेकींहोतोउशीर ॥ जोकांहींसिद्धअसेलआहार ॥ तोचिआणोनिदेईंसत्वर ॥ करूंअंगिकारतयाचा ॥ ८२ ॥ तंव
तीशोधोनिपाहेघर ॥ दूधतैंहोतेंदोनशेर ॥ त्यांतमेळवोनिसाखर ॥ आलीसत्वरघेऊनी ॥ ८३ ॥ माधवदासप्रेमयुक्त ॥ दुग्धप्राशनकरी
सत्य ॥ आशीर्वाददेऊनबहुत ॥ आलियामार्गेंपरतले ॥ ८४ ॥ जातांजातांनाबोलिलेतीस ॥ बाईतूंसांगेंआपुल्यापतीस ॥ आलेहोतेकीं
माधवदास ॥ तुमचीभेटनाहींजाहली ॥ ८५ ॥ ऐसेंबोलोनिसत्वर ॥ निघोनिगेलेझडकर ॥ बाईचेंतळमळेअंतर ॥ ह्मणेहेंकायजाहलें ॥
॥ ८६ ॥ पतीनेंमजलाकथिलेंहोतें ॥ माधवदासयेतीलघरातें ॥ आदरकरोनिबहूतयांतें ॥ राहवोनिघ्यावेंसदनासी ॥ ८७ ॥ ॥
॥ मू०क० ॥ गये उठि पाछे भक्त आयो सो सुनायो नाम सुनि अभिराम दौरे संगहीमहंतहे ॥ लिये जाइ पाइ लपटाये सुख पाइ
मिले झिले घरमांझ तिया धन्य तोसो कंपहे ॥ संतपती बोले मे अनंत अपराध किये जिये अब कही सेवो सीत मानि जंतहे ॥
आवत मिलाप होइ यही राखो बात गोइ आये वृंदाबन जहां सदाई वसंतहे ॥ १० ॥ ॥ टी०ओ० ॥ तंवतेगेलेउठोन ॥ ह्म
णोनिझालीखेदखिन्न ॥ तोंइतुक्यामाजीमहाजन ॥ बाहेरूनघरींआला ॥ ८८ ॥ स्त्रियेनेंकथिलेंसर्वत्यास ॥ आलेहोतेकींमाधवदास ॥
मीनपावलेंपरिचयास ॥ इतुक्यांतनिघूनगेलेते ॥ ८९ ॥ ऐसेंऐकतांवचनास ॥ तयासीजाहलाउल्हास ॥ घरींनघेतांविसाव्यास ॥ तै
साचमागेंपळाला ॥ १९० ॥ तोंमाधवदासाचेंनामऐकोन ॥ वरतीजोहोतामहंतजाण ॥ तोहीत्यासवेंकरीगमन ॥ अनुतापोनमनामा
जी ॥ ९१ ॥ कोणीसंतेंऐसेंवर्णन ॥ याकथेचेंकेलेंजाण ॥ कींत्यामहंताच्याघरींपूर्ण ॥ ब्राह्मणभोजनहोतेंकीं ॥ ९२ ॥ शेंदोनशेंपात्रें

वादिलीं ॥ इतुक्यांतमाधवदासआले ॥ येणेंतयासीविन्मुखधाडिलें ॥ तैंकिडेपडलेअन्नांत ॥ ९३ ॥ ऐसेंपात्रींपाहतांजाण ॥ सर्वहीब्राह्मणगेलेउठोन ॥ महंतबैसलाखिन्नहोऊन ॥ ह्मणेहेंकायजाहलें ॥ ९४ ॥ तोंखालींऐकिलेंवर्तमान ॥ जयासीविन्मुखधाडिलेंजाण ॥ माधवदासतेहोतेपूर्ण ॥ तेव्हांतोमहंतधांवला ॥ ९५ ॥ महाजनआणिमहंत ॥ दोघेहीगेलेधांवत ॥ गांवाच्याबाहेरजोंपाहत ॥ तोंवृक्षाखालींबैसलेतेती ॥ ९६ ॥ दोघेहीधांवोनिधरितीचरण ॥ येरूनेंधरिलेआलिंगोन ॥ आनंदसमुद्रलोटलापूर्ण ॥ तेंसुखकितीकवर्णावें ॥ ९७ ॥ अत्यंतआग्रहमगकरोन ॥ माधवदासासीहातींधरोन ॥ आपुल्यासदनींआणिलेजाण ॥ स्त्रियेसीआनंदजाहला ॥ ९८ ॥ माधवदास ह्मणेमहाजनासी ॥ ह्मणेधन्यरेतुझ्यास्त्रियेसी ॥ आमुच्यानसतांपरिचयासी ॥ बहुतआदरकेलाइणें ॥ ९९ ॥ ऐसेंसज्जनींइचेंमन ॥ तुझ्यासारिखापतिपूर्ण ॥ उभयतांजोडामिळालासमान ॥ कायतुमचेगुणवर्णावे ॥ २०० ॥ मुख्यजयासीपरमार्थसाधणें ॥ तेणेंअगत्यसंतसेवणें ॥ साधूसीविन्मुखजेणेंहोणें ॥ तयानपावेभगवत्पद ॥ १ ॥ माधवदासाचेंऐसेंवचन ॥ ऐकोनिमहंतलज्जायमान ॥ हातजोडोनिबोलेआपण ॥ अहोमीअनंतअपराधी ॥ २ ॥ आतांमजलाकरावेंपावन ॥ ऐसेंकांहींसांगावेंसाधन ॥ जेणेंहोईलशुद्धमन ॥ कृपाकरोनदयाळा ॥ ३ ॥ माधवदासह्मणेऐक ॥ तुजलासांगतोंएक ॥ हरिद्वारींसंतलोक ॥ बहुतदेखजमाहोती ॥ ४ ॥ तरीतूंतेथेंजावोन ॥ सकळांचेंघेईंदर्शन ॥ उच्छिष्टशीतकरींभक्षण ॥ तेणेंपावनहोसील ॥ ५ ॥ संतांसीजेनठेवितीमान ॥ तेतोंकेवळजंतचिजाण ॥ नामहीत्यांसीनफळेपूर्ण ॥ निरभिमानयास्तवहो ॥ ६ ॥ यापरीत्यासीबोधकरोन ॥ तेथेंराहिलेदिवसतीन ॥ महोत्साहझालाजाण ॥ महाजनेंथाटबहूकेला ॥ ७ ॥ मगसकळांसीविचारून ॥ माधवदासनिघेआपण ॥ तेव्हांविनवीमहाजन ॥ आणीकमीएकमागतों ॥ ८ ॥ जेव्हांआपुलेंहोईलपरतणें ॥ तेव्हांयेथेंअगत्ययेणें ॥ येवढीगोष्टध्यानांतठेवणें ॥ कृपाकरणेंमजवरी ॥ ९ ॥ तथास्तुत्यासीबोलोन ॥ वृंदावनासीआलेआपण ॥ जेथेंनित्यवसंतजाण ॥ आनंदपूर्णहोतसे ॥ २१० ॥ ॥ मू० क० ॥ देखि देखि वृंदावन मनमे मगन भये गये श्रीबिहारिजुके द्वार रचना तहां पायेहे ॥ कही रह्यो द्वारपाल नेकमै प्रसादलाल यमुनारसालतट भोगकौ लगायोहे ॥ नानाविधि पाक धरे स्वामी आप

ध्यान करे बोले हरि भावे नाही बेइले खवायेहे ॥ पूछ्यो सो जनायो ढूंढि लायो आगे गायो सब तुमतो उदास हासरस समझायेहे ॥ ११ ॥
॥ ॥ टी०ओ० ॥ वृंदावनासीपहातांपहातां ॥ त्यामाजीनिमग्नझालेतत्त्वता ॥ यापरीप्रेमघेतांघेतां ॥ मंदिरींबिहारीच्यापातले ॥
॥ ११ ॥ बिहारीजीचेंघेऊनदर्शन ॥ पूजारिकासीह्मणेआपण ॥ कांहींभोजनाद्यावेंअन्न ॥ क्षुधामजफारलागली ॥ १२ ॥ तंवतेह्मण
तीक्षणभर ॥ थोडासाआपणधराधीर ॥ प्रभूसीनैवेद्यहोईलसुंदर ॥ प्रसादमिळेलमगतुह्मा ॥ १३ ॥ हेह्मणतीमजनधरवेधीर ॥ जेंअसेल
तेंचिद्यावेंसत्वर ॥ तेव्हांपूजारीओंजळभर ॥ चणेआणोनदेतसे ॥ १४ ॥ तेचिघेऊनमाधवदास ॥ चित्तींजयाच्याअल्पसंतोष ॥ मगये
वोनियमुनातटास ॥ प्रभूसीअर्पणकरीतसे ॥ १५ ॥ नंतरआपणकरीभक्षण ॥ इकडेमंदिरामाजीजाण ॥ नानापरीचींपंचपक्वान्नें ॥ स
मोरठेविलींबिहारीजीच्या ॥ १६ ॥ स्वामीजीपुढेंबैसोन ॥ बिहारीचेंकरोनिध्यान ॥ नैवेद्यजोंकरितीअर्पण ॥ तोंजगज्जीवनकायबोले ॥
॥ १७॥ अन्नमजलाभावतनाहीं ॥ बहुतपोटफुगलेंपाहीं ॥ प्रियकरभक्तेंमजलवलाहीं ॥ खाऊंघातलेचणेआतां ॥ १८ ॥ स्वामीविनवितीकर
जोडोन ॥ ऐसाप्रियकरआहेकोण ॥ तोआह्मासीद्यासांगोन ॥ त्याचेचरणधरूंआह्मी ॥ १९॥ बिहारीह्मणेऐकावृत्त ॥ जगन्नाथाचापरमभक्त ॥
माधवदासनामेंख्यात ॥ तोआलासेआजियेथें ॥२२०॥ कोणीत्यासीचणेदीधले ॥ मजलात्याणीतेअर्पिले ॥ तेणेंमाझेंपोटफुगलें ॥ क्षु
धानसेचिमजलागीं ॥ २१ ॥ स्वामीनेंऐसेंवचनऐकतां ॥ बाहेरिधांवोनिआलेतत्त्वता ॥ द्वारपाळासीह्मणतीआतां ॥ चणेकोणासीदीध
ले ॥ २२ ॥ सत्वरत्याचाकरोनिशोध ॥ मजलायेऊनसांगाविशद ॥ ऐसास्वामीचाऐकतांशब्द ॥ सर्वहीपहावयाधांवले ॥ २३ ॥ तों
यमुनातीरींमाधवदास ॥ चणेभक्षीतसावकाश ॥ बैसलेऐसेंपाहोनित्यास ॥ येऊनस्वामीसनिवेदिती ॥ २४ ॥ स्वामीनेंऐकोनितेचिक्ष
णीं ॥ धांवोनिआलेतेठिकाणीं ॥ माधवदासाचेलागोनिचरणीं ॥ ह्मणतीजीमंदिरींचलावें ॥ २५ ॥ आपणअंगींवैराग्यधरिलें ॥ घन
नीळासीतैसेंचिकेलें ॥ नैवेद्यासीचणेअर्पिले ॥ तेणेंफुगलेंउदरत्याचें ॥ २८ ॥ माधवदासेंहेंऐकतांवचन ॥ स्वामीसीबोलेहास्यकरोन ॥
लीलानाटकीजगज्जीवन ॥ नवीनचरित्रकरीतसे ॥ २७ ॥ ऐसेंस्वामीसीबोलोन ॥ मंदिरामाजीआलेंजाण ॥ बिहारीपुढेंउभाराहून ॥

कायआपणह्मणतसे ॥ २८ ॥ बारागांवेंअग्नीगिळितां ॥ तेव्हांनपावलीअजीर्णता ॥ माझेथोडेसेचणेखातां ॥ उदासहोऊनबैसलेती ॥
॥ २९ ॥ मजलासमजलेंयावरोन ॥ माधवदासाचेंहास्यकरोन ॥ लोकांमाजीदाविसीपूर्ण ॥ लीलानाटकीमीजाणें ॥ २३० ॥ ऐसेंत्या
चेंऐकोनिवचन ॥ बाकेबिहारीदेहांसोन ॥ मगनैवेद्यकरीग्रहण ॥ यापरीआनंदहोतसे ॥ ३१ ॥ ॥ मू०क० ॥ गये वृजदेखिवेको
भांडिरमे प्रेम रहे निसिको दुराइ पाइ क्रम ले दिखायेहे ॥ लीलासुनिवेको हरियाने गाव रहे जाइ गोबरहु थापि पुनि नीलाचल
धायेहे ॥ घरहुको आये सुत सुखी सुनि माता बानी मारगमे सुपन दैके बनिक मिलायेहे ॥ याही बिधि नानाभाति चरित आपा
र जानो जिते कछु जाने तिते गाइके सुनायेहे ॥ १२ ॥ ॥ टी०ओ० ॥ पुढेंव्रजांतीलसर्वस्थान ॥ पहावयासीगेलेआपण ॥ भां
डीरवनींप्रेमजाण ॥ तेस्थळींजायप्रथमता ॥ ३२ ॥ तेथेंकोणीएकमहंत ॥ खेमगुसांईनामेंख्यात ॥ पुढेंतोजाहलामहाभक्त ॥ नाभाजी
नेंवर्णिलेंत्या ॥ ३३ ॥ परंतुत्याचीप्रथमवृत्ती ॥ तेचिवर्णनकरितोंरीती ॥ साधकशिष्यकरोनिनिश्चिती ॥ कायलोकांसीसांगतसे ॥
॥ ३४ ॥ महंतकांहींनखातीअन्न ॥ अहोरात्रकरितीउपोषण ॥ ऐसेंऐकोनिअनेकजन ॥ दर्शनालागोनयेताती ॥ ३५ ॥ यापरीदिव
सालागेमेळा ॥ रात्रींकोणानराखीजवळा ॥ सिंहव्याघ्रादिहोतीगोळा ॥ ह्मणोनिलोकांसांगतसे ॥ ३६ ॥ सर्वहीलोकगेल्यावरी ॥ आ
पणतेव्हांभोजनकरी ॥ यापरीमांडिलीकपटाचारी ॥ नकळेकोणासीतेधवां ॥ ३७ ॥ तयाचेंमाहात्म्यऐकोन ॥ माधवदासहीआलेजा
ण ॥ महंतांचेंघेतांदर्शन ॥ गेलेसमजोनमनामाजी ॥ ३८ ॥ आपुलेंराखोनिगुप्तपण ॥ तेथेंराहिलेवेडेहोऊन ॥ तोंजाहलीरात्रजाण ॥
महंतेंजनदूरकेले ॥ ३९ ॥ माधवदासासीउठविती ॥ तंवतेत्यांसीवांकुल्यादाविती ॥ राखेमाजीलोळेनिश्चिती ॥ पिशाचपणदावितसे
॥ २४० ॥ महंतह्मणतीहाभ्रमिष्टआहे ॥ यासीतोंसुखेंपडोंद्यावें ॥ आतांसत्वरअन्नकरावें ॥ क्षुधाबहुतलागलीसे ॥ ४१ ॥ साधकेंक
रोनिमोहनभोग ॥ महंतांपुढेंठेविलासांग ॥ माधवदासेंतेंपाहोनिमग ॥ येवोनिभिक्षामागती ॥४२॥ माधवदासासीपहातां ॥ क्रोधआला
त्यामहंता ॥ शिष्याहातींधक्केतत्त्वतां ॥ देउनीयासीदूरकेलें ॥ ४३ ॥ संतांसीकरितांकर्मकुडे ॥ अन्नामाजीपडलेकिडे ॥ महंतेंऐसेंपहा

तांनिवाडे ॥ ह्मणेहासिद्धकोणीअसे ॥ ४४ ॥ महंतचित्तींअनुतापोन ॥ माधवदासाचेधरीचरण ॥ अहोमीअन्याईपातकीपूर्ण ॥ क्षमासंपूर्णकराआतां ॥ ४५ ॥ तेव्हांबोलतीमाधवदास ॥ अरेयाकरिसीअन्यायास ॥ योग्यनसेचिवैष्णवास ॥ येणेंनरकासजासीलतूं ॥ ॥ ४६ ॥ तेव्हांतोहोऊनअनन्यशरण ॥ ह्मणेमजआतांकरावेंपावन ॥ ऐसासुमार्गद्यादावोन ॥ जेणेंक्रमासलागेनमी ॥ ४७ ॥ तेव्हांत्यासीसांगतीयुक्ती ॥ मथुरेसीविश्रांतघांटाप्रती ॥ तुवांजावोनिशीघ्रगती ॥ झाडीतजाईनित्यघांट ॥ ४८ ॥ संतचरणींचेरजःकण ॥ नित्यमस्तकींकरींधारण ॥ पादोदकाचेंकरींप्राशन ॥ सज्जनउच्छिष्टसेवीतजा ॥ ४९ ॥ ऐसेंसांगताआज्ञावचन ॥ तैशाचमार्गीलागलापूर्ण ॥ तेणेंमहाभक्तझालाजाण ॥ असेप्रख्यातखेमगुसांई ॥ २५० ॥ यापरीत्यासीउपदेशून ॥ माधवदासनिघेतेथून ॥ हरियानेगांवींआलेजाण ॥ तेथेंपुराणहोतसे ॥ ५१ ॥ हरीचीलीलाकरावयाश्रवण ॥ माधवदासतेथेंचराहेआपण ॥ गवळ्याचागांवतोहोताजाण ॥ शेणथापोनपोठभरी ॥ ५२ ॥ तोंकोणीसंतेंओळखिलें ॥ सकळधांवोनिपाईलागले ॥ यावरीतेथोनिमगनिघाले ॥ सत्वरचालिलेनीलाचला ॥ ५३ ॥ मार्गींचालतांसुचेबुद्धी ॥ कींसदनाचीघ्यावीशुद्धी ॥ नदियाशातीपुरीत्रिशुद्धी ॥ मगयेवोनिपोहोंचले ॥ ५४ ॥ आपुल्याघरासीपाहेसत्वर ॥ तंवनिरखिलेंमोठेंमंदिर ॥ त्यामाजीमाधवदासाचापुत्र ॥ भागवतपुराणवाचितसे ॥ ५५ ॥ श्रवणकरावयानरनारी ॥ बहुतचिझालीभीडभारी ॥ तेथेंबैसलीसेएकह्मातारी ॥ तिसीआपणविचारीतसे ॥ ५६ ॥ अहोकोणीमाधवदास ॥ येथेंतयाचाहोतावास ॥ एकपुत्रहोतातयास ॥ आणीकवृद्धमायहोती ॥ ५७ ॥ जोसीविचारिलेंतत्त्वतां ॥ तीचहोतीयाचीमाता ॥ तिणेंयाचाशब्दओळखतां ॥ ह्मणेरेमहाद्याआलासी ॥ ५८ ॥ अरेहेंमंदिरतुझेंघर ॥ पुराणवाचीहातुझापुत्र ॥ येणेंलौकिककेलाफार ॥ भगवद्भक्तजाहला ॥ ५९ ॥ अरेमीतुझेंऐसेंऐकिलें ॥ माधवेंवैराग्यथोरधरिलें ॥ परंतुमेल्याव्यर्थझालें ॥ लक्षलाविलेंघराकडे ॥ २६० ॥ माझापुत्रमाझीमाता ॥ विचारीतयेथेंआलासिआतां ॥ वैराग्यासीधिक्कारतत्त्वतां ॥ काळेंहेंवदननकोदाऊं ॥ ६१ ॥ यापरीतिचेंवचनऐकतां ॥ माधवदासाच्याअनुतापचित्ता ॥ ह्मणेहेमाझीसत्यमाता ॥ इचेनीवैराग्यमजजाहलें ॥ ६२ ॥ मगतियेसीकरोनिनमन ॥ तैसाचिपरतो

निनिघेआपण ॥ पुत्रासीकळतांवर्तमान ॥ आडवाधांवोनतोआला ॥ ६३ ॥ आणिगांवींचेमिळोनिजन ॥ माधवदासासीआग्रहकरो
न ॥ निजसदनासीआणिलेजाण ॥ माताहीधांवोनगळांपडे ॥ ६४ ॥ घरींराहोनिकांहींदिवस ॥ पुन्हानिघालेमाधवदास ॥ मार्गींये
तांजगन्नाथास ॥ त्यामहाजनासस्वप्नदिलें ॥ ६५ ॥ माझेंजाहलेंआगमन ॥ आतांसत्वरजाभेटोन ॥ ऐसेंतेणेंपहातांस्वप्न ॥ आलामहा
जनधांवोनी ॥ ६६ ॥ माधवदासासीभेटोन ॥ गेलाघरासीघेऊन ॥ बहुतआदरकरोन ॥ तयासीभोजनघातलें ॥ ६७ ॥ तेथोनिनि
घालेमाधवदास ॥ मगपावलेजगन्नाथास ॥ रात्रंदिवसप्रेमरस ॥ नित्यआपणघेतसे ॥ ६८ ॥ याचिविधीकरून ॥ नानाप्रकारेंचरित्र
जाण ॥ माधवदासेंकेलेंधन्य ॥ पारजयाचानपावेची ॥ ६९ ॥ जितुकेंकांहींजाणण्यांत ॥ तितुकेंचमीगावोनियेथ ॥ श्रवणकरविलें
जीसमस्त ॥ कृपेकरोनितयाच्या ॥ २७० ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥
पासष्टावाछप्पागोडहा ॥ २७१ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयाजीसद्गुरुदेवा ॥ भक्तिभावाचादेईठेवा ॥ जेणेंविषयाचानचलेदावा ॥
जायमीभवाउतरोनी ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ श्रीरघुनाथगुसांई गरुड ज्यो सिंहपौरि ठाडे रहे ॥ सीत लगत सकलाद विदित पुरुषो
त्तम दीनो ॥ सौच गये हरि संग कृत्य सेवककी कीनी ॥ जगन्नाथपदप्रीती निरंतर करत खवासी ॥ भगवद्धर्मप्रधान प्रसन्न नीला
चलवासी ॥ उत्कलदेश उडिसानगर वैनतेय सबकोउ कहे ॥ श्रीरघुनाथ० ॥ ६६ ॥ ॥ टी०ओ० ॥ रघुनाथगुसांईपरमभक्त ॥
जगन्नाथापुढेंदारांत ॥ गरुडासारिखेउभेराहत ॥ सर्वदापहातप्रभूकडे ॥२॥ थंडीलागतांसकलाद ॥ पुरुषोत्तमेंदिधलीविशद ॥ सर्वलोकांत
असेविदित ॥ आणीकचरित्रऐकावें ॥ ३ ॥ सौचलागतांतयेवेळे ॥ श्रीहरीत्याच्यासवेंगेले ॥ सेवकासारिखेंकृत्यकेलें ॥ तैंघननीळेंत
याचें ॥ ४ ॥ जगन्नाथाचेचरणींप्रीती ॥ निरंतरसेवाकरीनिश्चिती ॥ नीलाचलींवासप्रसन्नरीती ॥ भागवतधर्मीप्रधान ॥ ५ ॥ उत्कल
देशींउडिसागर ॥ पूर्वींतयाचावाससुंदर ॥ जयासीसर्वहीनारीनर ॥ ह्मणतीहागरुडअसेकीं ॥ ६ ॥ ॥ मू०क० ॥ अति अनुराग घर

संपती सो रह्यो पागि ताह करी त्याग नीलाचला कियो वासहे ॥ धनको पठावे पिता ऐपे नहि भावे कछू देखिवो सुहावे महाप्रभुजूको पासहे ॥ मंदिरके द्वार रूप सुंदर निहारो करे लग्यो सीत गात सकलात दई दासहे ॥ सौच संग जाइवेकी रीतीको प्रमान वहे वसे सव जानो माधोदास सुखरासहे ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ रघुनाथगुसांईभक्तथोर ॥ उत्कलदेशींउडिसानगर ॥ तेथेंतयाचीवस्तीघर ॥ संपत्तीअपारअसेज्याची ॥ ७ ॥ परीअत्यंतअनुरागझाला ॥ घरादाराचात्यागकेला ॥ आपणयेऊननीलाचला ॥ तेथेंचिवासकरीतसे ॥ ८ ॥ सदनींहोतींपितामाता ॥ तयांसीपुत्राचीबहुममता ॥ माणसांहातींद्रव्यतत्त्वता ॥ खर्चावयासीधाडिताती ॥ ९ ॥ परीहेंत्यासीकांहींनआवडे ॥ महाप्रभूचेंरूपनिवाडे ॥ तेंचिपाहतसेवाडेंकोडें ॥ जवळीराहातसेसर्वदा ॥ १० ॥ सर्वदामंदिराचेद्वारीं ॥ उभाराहेजोडिल्याकरीं ॥ हरीचेंसुंदररूपनिहारी ॥ शुद्धीतनूचीनसेची ॥ ११ ॥ शीतकाळाचेयेतांदिवस ॥ थंडीलागलीशरीरास ॥ तेव्हांयेऊनजगन्निवास ॥ सकलातत्यावरीघालिती ॥ १२ ॥ एकदांझालाअतिसार ॥ दुर्घटअवस्थाहोयफार ॥ तेव्हांआपणश्यामसुंदर ॥ सर्वप्रकारेंसेवाकरी ॥ १३ ॥ कैसेंत्याचेंकेलेंसेवन ॥ यासीसाक्षआहेप्रमाण ॥ सर्वहीलोकजाणतीपूर्ण ॥ माधवदासाचेंचरित्रकीं ॥ १४ ॥ जैसेंत्याचेंकरोनिसेवन ॥ सुखाच्याराशीदिधल्यापूर्ण ॥ तैसेंचियाचेंकेलेंपालन ॥ भक्तवत्सलेंजगदीशें ॥ ॥ १५ ॥ ॥ मू०क० ॥ महाप्रभुकृष्णचैतन्यजूकी आज्ञा पाई आये वृंदावन राधाकुंड वास कियोहे ॥ रहनी कहनी रूपचहनी कहनी सके थके सुनी तन भाव रूप करि लीयोहे ॥ मानसीमे पायो दुधभात सरसात हिये लिये रस नारी देखी वैद कही दियोहे ॥ कहांलो प्रताप कहो आपही समझ लेहु देहु वही रीझी जासो आगे पाइ जियोहे ॥ २ ॥ ॥ टी०ओ० ॥ मगतयासीदेईआज्ञा ॥ शरणजावेंतूंकृष्णचैतन्या ॥ तेणेंपावसीभक्तिधन्या ॥ जीतेंसर्वपराह्मणती ॥ १६ ॥ रघुनाथगुसांईतेंऐकोन ॥ कृष्णचैतन्याजायशरण ॥ तेणेंतयासीउपदेशोन ॥ यापरीआज्ञासांगती ॥ १७ ॥ जैसेंहरीचेंघेतलेंदर्शन ॥ तैसेंचित्याचेंक्रीडास्थान ॥ पाहोनियावेंवृंदावन ॥ येरूतेंवचनमान्यकेलें ॥ १८ ॥ सद्गुरुसीनमनकरोन ॥ जगन्नाथासिवंदोन ॥ शीघ्रपावलावृंदावन ॥ क्रीडास्थानपहातसे ॥ १९ ॥

यापरीव्रजासीपहातपहात ॥ राधाकुंडासीझालेप्राप्त ॥ तेथेंतयाचेंरमलेंचित्त ॥ मगरहाततेस्थळीं ॥२०॥ तेथेंराहोनिभक्तिसुख ॥ तयानेंघे
तलेंअलोलिक ॥ वर्णूनशकेसहस्रमुख ॥ कितीमीएकमुखेंगाऊं ॥२१॥ कैसीकैसीत्याचीराहणी ॥ कैसीकैसीत्याचीबोलणी ॥ कैसीरूपाची
प्रीतीमनीं ॥ तेंनवर्णवेमजलागीं ॥ २२ ॥ परिसासारांशकरितोंकथन ॥ रघुनाथगुसांईमुख्यआपण ॥ त्याप्रेमानेंगेलेथकोन ॥ भावरू
पतनुसर्वकेली ॥ २३ ॥ अहोरात्रतयाचेंचित्त ॥ लागलेंमानसीउपचारांत ॥ अन्नोदकहीतेचिसेवित ॥ बाह्यपदार्थनभक्षी ॥ २४ ॥ ए
कदांमानसपूजेंत ॥ प्रभूसीअर्पिलादूधभात ॥ तोचिआपणभक्षणकरीत ॥ तेणेंअजीर्णजाहलें ॥ २५ ॥ कोणीजेहोतेसांप्रदाई ॥ तेहीं
जावोनिलवलाहीं ॥ वैद्यालागींआणिलेंपाहीं ॥ मगतोनाडीपाहातसे ॥ २६ ॥ वैद्यसांगेपरीक्षाकरोन ॥ स्वामीनेंकेलेंदुग्धप्राशन ॥ ते
णेंअजीर्णजाहलेंपूर्ण ॥ दुसरारोगकांहींनसे ॥ २७ ॥ तेव्हांतयासीशिष्यह्मणती ॥ हेतोंकांहींसेवननकरिती ॥ वैद्यबोलेदुग्धनिश्चिती ॥
प्राशनकेलेंस्वामीनें ॥ २८ ॥ रघुनाथजीचीरीतपाहोन ॥ वैद्यगेलामनींसमजोन ॥ तयासीविनवीकरजोडोन ॥ अहोजीधन्यमहारा
जा ॥ २९ ॥ आपुल्याप्रतापाचेंवर्णन ॥ कोठवरीमीकरूंजाण ॥ आतांआपणचिसमजोन ॥ घ्यावेंजीअंतरींदयाळा ॥ ३० ॥ ज्यायो
गेंपूर्वींपासोन ॥ निजदेहाचेंकेलेंपालन ॥ तेंचिआतांदेऊनजाण ॥ आरोग्यकरावेंशरीरा ॥ ३१ ॥ ऐसेंभक्तांचेंचरित्रअद्भुत ॥ त्याचान
लागेकोणाअंत ॥ अंतरींधरोनिभावार्थ ॥ शरणअसावेंतयासी ॥ ३२ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महा
राष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ सासष्टावाछप्पागोडहा ॥ ३३ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ ६ ॥ ॥ ६ ॥ ॥ ६ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरुदयाघन ॥ तुझेंकिंचितनघडेसेवन ॥ सर्वदाविषयींलोलुपमन ॥ दया
करूनतूंचितारीं ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ श्रीनित्यानंदकृष्णचैतन्यकी भक्ति दशोदिस विस्तरी ॥ गौडदेशपाखंड मेटि कियो भजन
परायन ॥ करुनासिंधु कृतज्ञ भये अगतिन गति दाइन ॥ दशधा रस अक्रांति महतजन चरन उपासे ॥ नाम लेत निहिपाप दुरित तिहि
नरके नासे ॥ अवतार बिदित पूरब मही उभय महंत देही धरी ॥ श्रीनित्यानंद०॥६७॥ ॥ टी०ओ०॥ श्रीनित्यानंदकृष्णचैतन्य ॥ दोघां

चिभक्तिमहामान्य ॥ दशदिशांसीं विस्तारजाण ॥ असेहोपूर्णजियेचा ॥ २ ॥ गौडदेशामाजीउदंड ॥ जनांमाजीवसेपाखांड ॥ तेंकरोनि
यांखंडविखंड ॥ भजनपरायणसर्वकेले ॥ ३ ॥ करुणेचेतेंकेवळसागर ॥ थोडेंचिसेवितांमानितीफार ॥ जयाच्यागतीसिनसेचिथार ॥ तया
गतिदायकझालेहे ॥ ४ ॥ दशधारसांचेंआक्रमण ॥ जेहींसहजेंकेलेंजाण ॥ मोठेमोठेमहंतजन ॥ जयाचेचरणउपासिती ॥ ५ ॥ जो
कोणीयाचेंनामघेत ॥ तत्काळतोनिष्पापहोत ॥ तयानराचेंसर्वदुरित ॥ जळोनिनाशपावती ॥ ६ ॥ देहधारीउभयमहंत ॥ पूर्णावतार
मूर्तिमंत ॥ पूर्वदिशेसीबंगाल्यांत ॥ असतीविदितसर्वत्रां ॥ ७ ॥ ॥ कथानित्यानंदाची ॥ ॥ मू०क ॥ आप बलदेव सदा वारु
निसो मत्त रहे चाहे मन मान्यो प्रेममत्तताइ चाखिये ॥ सोइ नित्यानंदप्रभुमहंतकी देही धरी भरी सब आनि तऊ पुनि अभि
लाखिये ॥ भयो बोझ भारि किहुं जात न संभारि तब ठोरठोर पारषदमांझ धरि राखिये ॥ कहतकहत अरु सुनतसुनत जाके भये
मतवारे बहु ग्रंथ ताकी साखीये ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ नित्यानंदआणिकृष्णचैतन्य ॥ उभयतांबंधुअवतारपूर्ण ॥ नित्यानंदहेबळि
रामजाण ॥ कृष्णचैतन्यकृष्णची ॥ ८ ॥ सदासर्वदाबळिरामआपण ॥ मत्तराहतीवारुणीपिवोन ॥ तोंमनींआलेंकींयथेच्छपूर्ण ॥ प्रेमम
त्तताचाखावी ॥ ९ ॥ मगतेनदियाशांतिपुरांत ॥ बंगालदेशांतजन्मघेत ॥ नित्यानंदप्रभुमहंत ॥ तेचिनिश्चितझालेकीं ॥ १० ॥ ते
हींआपुल्यादेहांत ॥ प्रेमाचासांठवकेलाबहुत ॥ तथापिआणीकइच्छाकरित ॥ वारंवारभरीतप्रेमासी ॥ ११ ॥ ओझेंभारीझालेंबहुत ॥
सांभाळलेत्यानांहीजात ॥ मगजागोजागींठेवोनिदेत ॥ आपुल्याशिष्यामाझारी ॥ १२ ॥ कितीसांगावेंप्रेमगहन ॥ नित्यानंदाचेग्रं
थजाण ॥ जेहींजेहींकेलेपठण ॥ अथवाश्रवणकेलेंजिहीं ॥ १३ ॥ तेतेझालेप्रेमोन्मत्त ॥ तयाचीसाक्षीअसेबहुत ॥ जेजेकोणीग्रंथवाचि
त ॥ अथवाश्रवणकरितीजे ॥ १४ ॥ अद्यापित्याजनांप्रेमदाटत ॥ ऐसाजयाचामहिमाअद्भुत ॥ नित्यानंदप्रभुमहंत ॥ असेविख्यात
सर्वजनां ॥ १५ ॥ ॥ कथाकृष्णचैतन्याची ॥ ॥ मू०क० ॥ गोपिनके अनुराग आगे आप हारे शाम जान्यौयह लालरंग कै
से आवे तनमे ॥ एतो सब गौरतनी नखसिख बनी ठनी खुल्यो यो सुरंग रंग अंगरगे बनमे ॥ शांमताई मांझ सो ललाईहु समाइ

जाइ ताते मेरे जान फिरि आई यह मनमे ॥ जसुमतिसुत सोइ सचीसुत गौर भये नये नये नेह चोज नाचे निचगनमे ॥ २ ॥ ॥ टी०ओ० ॥ कृष्णचैतन्यहेश्रीकृष्ण ॥ अवतारघ्यावयाकायकारण ॥ गोपींच्याप्रेमासन्मुखजाण ॥ गेलेआपणहरोनियां ॥१६॥ ह्मणतीयाचेंप्रेमगहन ॥ हेंअसावेंआपणापूर्ण ॥ लालरंगप्रेमाचाजाण ॥ केवींमिळेलदेहामाजी ॥ १७ ॥ नखशिखांतपरमसुंदर ॥ सकलगोपींचेंगोरेंशरीर ॥ त्यावरीहाशोभलाफार ॥ लालरंगप्रेमाचा ॥ १८ ॥ रासक्रीडेमाजीसांग ॥ गोपींच्याअंगींशोभलारंग ॥ तोमीपाहोनिझालोंदंग ॥ वृंदावनांतअसतांतैं ॥ १९ ॥ माझेअंगींअसेश्यामता ॥ यामाजीलालरंगमिळवितां ॥ एकहोवोनिजाईलतत्त्वता ॥ शोभाशरीरींनयेची ॥ २० ॥ मजलाऐशीवाटेरीती ॥ तेंचिहरीच्याआलेंचित्तीं ॥ यशोदातनयश्यामनिश्चिती ॥ सचीसुतगौरजाहले ॥ २१ ॥ सचीबाईभक्तउत्तम ॥ तिचेउदरींघेतलाजन्म ॥ गौरशरीरझालेंपरम ॥ प्रेमाचारंगघ्यावया ॥ २२ ॥ नवेनवेचमत्कार ॥ प्रेमाचेंसुखघेतलेंफार ॥ वैष्णवगणांतवारंवार ॥ नृत्यरासाचेंकरीतसे ॥ २३ ॥ ॥ मू०क० ॥ अबे कबू प्रेम हेमपिंडवत तन होई कभू संधीसंधी छूटि अंग बढी जातहे ॥ ओर एक न्यारी रीती आंसु पिचकारी मानो उभै लालप्यारी भावसागर समातहे ॥ ईशता बखानि कहा करो सो प्रमान याको जगन्नाथक्षेत्र नेत्र निरखि साक्षातहे ॥ चत्रभुज षडभुज स्वरूप ले दिखाइ दियोदियो जो अनूप हित बात पातपातहे ॥ ३ ॥ ॥ टी०ओ० ॥ ऐसेंयेतसेकधींप्रेम ॥ शरीरव्हावेंकनकासम ॥ संधीसंधीरोमरोम ॥ कधींशरीर वाढतसे ॥ २४ ॥ आणीकएकनवीनरीती ॥ जेव्हांनेत्रींअश्रुवाहती ॥ पिचकाऱ्याचकेवळसुटती ॥ भोंवतेभिजतीलोकसर्व ॥ २५ ॥ कितीसांगूंमीत्याचीप्रेमता ॥ ज्याच्याभावसागरींतत्त्वता ॥ लालप्यारीहेउभयतां ॥ एकरूपताहोताती ॥ २६ ॥ ऐसेंत्याचेंईश्वरपण ॥ कोठवरमीकरूंवर्णन ॥ प्रत्यक्षसांगतोंप्रमाण ॥ मीचअनुभवघेतला ॥ २७ ॥ श्रीजगन्नाथक्षेत्रांत ॥ नेत्रींपाहिलेसाक्षात ॥ जयाचेंचरित्रअद्भुत ॥ प्रियादासह्मणतसे ॥ २८ ॥ कधींचतुर्भुजव्हावेंसहज ॥ कधींकधींव्हावेंषड्भुज ॥ ऐसेंस्वरूपरोजच्यारोज ॥ जनांलागोनिदावितसे ॥ २९ ॥ यापरीदावोनिरूपअद्भुत ॥ जनांचेंकेलेंपरमहित ॥ त्याचेंतात्पर्ययाग्रंथांत ॥ शिष्यबहुतवर्णिलेती ॥ ३० ॥ तैसी

चिमजवरीकृपाकरोन ॥ अनुपमहितदिलेंदाऊन ॥ त्यागोष्टीचाचप्रतापजाण ॥ पहायाग्रंथींपत्रोपत्रीं ॥ ३१ ॥ ॥ मू०क०॥ कृष्णचै
तन्य नाम जगत प्रगट भयो अति अभिराम लै महंतदेहि धारीहे ॥ जितो गोडदेश भक्तिलेसहू न जाने कोऊ सोऊ प्रेमसागर
मे बोऱ्यो कही हरीहै ॥ भये शिरमोर एकएक जग तारिवेको धारिवेको कोन साखि पोथिनिमे धरीहे ॥ कोटिकोटि अजामेल वारि
डारे दुष्टतापे ऐसेहू मगन किये भक्ति भूमि भरीहे ॥ ४ ॥ ॥ टी०ओ० ॥ कृष्णचैतन्यहेंनामाभिधान ॥ प्रगटझालेंजगांतपूर्ण ॥ अ
त्यंतसुंदरदेहधारण ॥ केलाआपणमहंताचा ॥ ३२ ॥ जितुकातोगौडदेश ॥ तेथेंभक्तीचालवलेश ॥ माहीतनसेचिकोणास ॥ तेहींबुड
विलेंप्रेमसागरीं ॥ ३३ ॥ ऐसीटाकिलीकृपालहरी ॥ सर्वह्मणोंलागलेहरीहरी ॥ शिरमोरभक्तझालेभारी ॥ जगदोद्धारीएकएक ॥ ३४ ॥
याचीसाक्षकोठेंजाण ॥ याचिग्रंथामाजीपूर्ण ॥ ठेवीलीतीवर्णनकरोन ॥ नाभाजीनेंपदोपदीं ॥ ३५ ॥ ऐसेऐसेएकैकजन ॥ जयांचिये
दुष्टतेवरून ॥ कोटिकोटिओवाळून ॥ अजामिळटाकावे ॥ ३६ ॥ केलेतेहीप्रेमांतमग्न ॥ भूमीभरिलीभक्तीकरोन ॥ ऐसेजाहलेकृष्णचैत
न्य ॥ कायमीमाहात्म्यवर्णूशकें ॥ ३७ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ सद
सष्टावाछप्पागोडहा ॥ ३८ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरुगंगाधर ॥ तूंचिहोसीमजआधार ॥ सत्वरमाझाधरोनिकर ॥ संसार
पारकरावें ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ सूरकबित सुनि कोन कवि जो नहि सिरचालन करे ॥ उक्ति चोज अनुप्रास वरन अस्थि
त अति भारी ॥ वचन प्रीति निर्वाह अर्थ अद्भुत तुक धारी ॥ प्रतिबिंबित दिबि दृष्टि हृदै हरिलीला भासी ॥ जनम कर्म गुन रू
प सबै रसना परकासी ॥ बिमल बुद्धि गुन ओरकी जो यह गुन श्रवननि धरै॥ सूरकबित०॥ ६८॥ ॥ टी०ओ०॥ सुरदासजीचें
कवन ॥ जयाच्याश्रवणींपडेजाण ॥ ऐसाकोणताकविजन ॥ सिरनडोलवीतयातें ॥ २॥ जयाचीउक्तीचमत्कारिक ॥ अनुप्रासाचेवर्ण
देख ॥ तयाचीठेवणअसेसम्यक ॥ थोरपणतैसेंचि ॥ ३ ॥ ऐसेंकवित्वींकेलेंभाषण ॥ ज्यांतप्रीतीचानिर्वाहपूर्ण ॥ एकेचरणामाजीजाण ॥

अर्थअद्भुतठेविलासे ॥ ४ ॥ कांहींचनदिसेनेत्रांस ॥ दिव्यदृष्टीअसेत्यास ॥ हरिलीलेचाहृदर्यीं भास ॥ प्रतिबिंबितजयाच्या ॥ ५ ॥ जेंजें हरीचेंआचरण ॥ जन्मकर्मस्वरूपगुण ॥ सर्वप्रकाशिलेंवाणीकरून ॥ कितीमाहात्म्यवर्णूंत्याचें ॥ ६ ॥ सुरदासेंजेवर्णिलेगुण ॥ तेजोश्रवर्णीठेवीपूर्ण ॥ तयाचाहीबुद्धिगुण ॥ निर्मलहोतसेहरिकृपे ॥ ७ ॥ छप्प्यांतीलहेअर्थझाले ॥ आणीकसंतांच्यामुखेंऐकिलें ॥ जेंकांहींसें मनींआलें ॥ तयाचेंवर्णनकरीतसें ॥ ८ ॥ सुरदासाचेंइच्छीमन ॥ सुरसागरग्रंथींजाण ॥ सवालक्षपदेंकरीतपूर्ण ॥ ऐसानिश्चयदृढकेला ॥ ॥ ९ ॥ तोपंचाहत्तरसहस्र ॥ संख्यारचिलींपदेंसुंदर ॥ मगत्यामाजीआलेंअंतर ॥ देहांतसमयपावला ॥ १० ॥ पुढेंयेऊनजगज्जीवन ॥ पन्नाससहस्रपदेंकरोन ॥ सुरसागरकेलापूर्ण ॥ सुरशामछापघातली ॥ ११ ॥ पसरलातोग्रंथबहुत ॥ त्याचानलागेकोणाअंत ॥ अकबरबादशाहमनींइच्छित ॥ सर्वहीग्रंथप्राप्तव्हावा ॥ १२ ॥ एकेकापदासीएकेकमोहर ॥ देईनजोकोणीआणीलसत्वर ॥ ऐसेंसर्वहीपृथ्वीवर ॥ प्रख्यातकेलेंतेधवां ॥ १३ ॥ ऐसेंऐकतांवर्तमान ॥ ज्याज्याजवळीहोतींजाण ॥ तेतेसर्वहीदेतीनेऊन ॥ कोणीनवीनकरोनिनेलें ॥ ॥ १४ ॥ तेणेंवाढलाग्रंथविशेष ॥ संख्याजाहलीदोनलक्ष ॥ बादशाहअसेईश्वरीअंश ॥ तयाचानिवाडाकरीतसे ॥ १५ ॥ बहुतअग्नीचेतवोन ॥ सर्वहीपदेंगोळाकरून ॥ त्यामाजीदिधलींटाकोन ॥ एकचिभडकाउठिला ॥ १६ ॥ यापरीसर्वहीगेलेजळोन ॥ तेव्हांहळुहळूक्रमेंकरून ॥ शांतजाहलाहुताशन ॥ तोंआश्चर्यपाहिलें ॥ १७ ॥ सुरदासाचींपदेंहोतीं ॥ तींमात्रराहिलींनिश्चिती ॥ इतरांचींतींजळोनजाती ॥ यापरीनिवाडाजाहला ॥ १८ ॥ सर्वहीकरितीजयजयकार ॥ सुरदासातेंवर्णितीफार ॥ यापरीत्याचामहिमाअपार ॥ कितीमीपामर वर्णूंशकें ॥ १९ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ अडसष्टावाछप्पागोडहा ॥ २० ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयाजीसद्गुरुराव ॥ तुझेचरणींदेईठाव ॥ संतभजनींउपजोभाव ॥ ऐसेंदयाळाकरावें ॥ १ ॥ ॥ मू०छं० ॥ ब्रजवधूरीती कलजुगविखे परमानंद भयो प्रेमकेत ॥ पौगंड बाल किशोर गोपलीला सब गाई ॥ अचिरज कहा इही बात हुतो पहिलो ज्ञु सखाई ॥ नैननि नीरप्रवाह रहत रोमांच रैन दिन ॥ गदगद गिरा उदार शांमसोभा भी

ज्यों तन ॥ सारंग छाप ताकी भई श्रवन सुनत अवेस देत ॥ व्रजवधूरीति० ॥ ६९ ॥ ॥ टी०ओ० ॥ व्रजस्त्रियांचीजैसीरीती ॥ कलियुगामाजीतैसीप्रीती ॥ परमानंदानेंकेलीनिश्चिती ॥ प्रेमाचेकेवलध्वजझाले ॥ २ ॥ बाळवयापासोन ॥ सोळावर्षेंपर्यंतजाण ॥ कृष्णानेंजेकेलेगुण ॥ येणेंसर्वहीतेचिगाइले ॥ ३ ॥ पांचवर्षांपर्यंत ॥ कुमारआणिबाळह्मणत ॥ जोंवरीदहावर्षेंहोत ॥ पौगंडबोलततयासी ॥ ४ ॥ सोळावर्षांचाहोतांनर ॥ शास्त्रीतयासीह्मणतीकिशोर ॥ यावरीपुढेंयौवनभर ॥ त्याचेंकारणनसेआह्मां ॥ ५ ॥ यापरीतीनीवयाआंत ॥ जीजीलीलाकृष्णनाथ ॥ करिताजाहलासाद्यंत ॥ तीतीगाइलीपरमानंदें ॥ ६ ॥ परीयागोष्टीचेंआश्चर्यकोण ॥ पूर्वींचाहोतासुखेंपूर्ण ॥ तेचिलीलामनींआठवोन ॥ प्रेमेंगायनकरीतसे ॥ ७ ॥ रात्रंदिवसतेथेंमन ॥ श्रीहरीचेआठवोनगुण ॥ सर्वदाकरीतसेगायन ॥ सप्रेमयुक्तहोवोनियां ॥ ८ ॥ नेत्रींजलप्रवाहवाहत ॥ निशिदिनराहेरोमांचित ॥ गदगदवाणीगीतगात ॥ उदारवृत्तीजयाची ॥ ९ ॥ प्रभूच्यासेवेंतसर्वकाळ ॥ रंगलाज्याचादेहसकळ ॥ दुसरीकांहींतळमळ ॥ जयाच्याचित्तींनसेची ॥ १० ॥ मीराकेप्रभुगिरधरनागर ॥ मिराबाईचीछापसुंदर ॥ तैसीचकवनांतयाच्याप्रियकर ॥ परमानंदसारंगछापझाली ॥ ११ ॥ ऐसेंतयाचेंवरदीगीत ॥ ज्याच्याज्याच्याश्रवणींपडत ॥ तत्काळत्यासीआवेशदेत ॥ भक्तिप्रेमवैराग्याचा ॥ १२ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकुणसत्तरावाछप्पागोडहा ॥ १३ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयाजीसद्गुरुनाथा ॥ तुझेचरणींजडोमाथा ॥ तेणेंमीपावेनसकळअर्था ॥ कृतकृत्यार्थहोईन ॥१॥ ॥मू०छ०॥ श्रीकेशोभट नरमुग्रुटमनी जिनकी प्रभुता विस्तरी ॥ काशमीरकी छाप पापतापन जगमंडन ॥ दृढ हरिभक्तिकुठार आनधर्म बिटप बिहंडन ॥ मथुरामध्य मलेंछ बद्ध करि बर बट जीते ॥ काजी अजित अनेक देखि परचे भयभीते ॥ विदित बात संसार सब संत साखि नाहिन दुरी ॥ श्रीकेशोभट नर० ॥ ७० ॥ ॥ क्षे०क० ॥ करि दिगविजै सब पंडित हराईदिये लिये बडे बडे जीती भीत उपजाईहै ॥ फिरत चौडोलचढे गजवाज लोलसंग प्रतिभाकौ रंग आटा नदिया प्रभाईहै ॥ डरे द्विज भारि

महाप्रभुज्ञु बिचारि तब लीलाबिसतारि गंगातीर सुखदाईहै ॥ वैते ढीग जाइ बोले नम्रता जनाई रह्यो जगजसछाई नेकु सुने मनभा
इहै ॥ १ ॥ लरका निसंग पढौ वाते वडिवडि गढो टोपे रढो कहो सोई सीलतापै रीझियै ॥ गंगाको सरूप कहो चहो दृगआगे सोई न
ये सो श्लोक किये सुनि मति भीजियै ॥ तामें एक कंठकरि पढिके सुनायो अहो बडो अभिलाख याकी व्याख्या करिदीजियै ॥
अचरज भारि भयो केसे तुम सिखलयो दयो लै प्रभाव तुमे वाने दयो जीजियै ॥ २ ॥ दुखन असुखनहु किजियै वखान याके सु
नि दुःख मानि कही दोष कहा पाईयै ॥ कविताप्रबंधमध्य रही खोदि गंध अहो आग्या मोको देहु कह्यो कहिके सुनाईयै ॥ व्या
ख्या करि दई नई ओगुन सगुनभई आटानिजधाम भोर मिले समजाईयै ॥ सरस्वतिध्यानकियौ आई ततकाल बालबालपै
हरायौ सब जगजिते वाइयै ॥ ३ ॥ बोलिसरस्वति मेरे ईश भगवान वेतो मान मेरो कियो सनमुख वत्तराईयै ॥ भ
यो दसन तुह्मे मनपनरस होत सुनि सुखसोज वानि आटा प्रभुपाईयै ॥ विने बहु करि करि कृपा आप बोले अज्ञु भक्ति
फल लीजे काहु भुलि नहराईये ॥ हिये धरिलई भीरभार छोडि दई पुनि नई यह भई सुन दुष्ट मरवाईये ॥ ४ ॥ ॥
टी०ओ०॥ केशवभटधन्यजनीं ॥ नरांमाजीमुगुटमणी ॥ जयाचीप्रभुतात्रिभुवनीं ॥ विस्तारातेंपावली ॥ २ ॥ पूर्वींकाश्मीरचेरहाणार ॥
ह्मणोनिकाश्मीरीद्विजवर ॥ लोकांमाजीछापसुंदर ॥ पडलीअसेजयाची ॥ ३ ॥ पातकांसीकरीदहन ॥ ऐसाज्याचाप्रतापगहन ॥ ज
गाचेंतोकेवळमंडन ॥ ज्याचेनीशोभाजगासी ॥ ४ ॥ हरिभक्तीहेंचकुठार ॥ जेणेंघेऊनदृढतर ॥ इतरधर्मवृक्षजेसाधार ॥ तयांचेंखंडनकेलें
कीं ॥ ५ ॥ मथुरेंतमातलेदुष्टयवन ॥ केशवभटजीनेंत्यांसीजाण ॥ बलात्कारेंबद्धकरून ॥ तयांसीजिंकोनिघेतले ॥ ६ ॥ मोठेमोठेकाजी
अनेक ॥ लोकांमाजीजेअजिंक्य ॥ याचाप्रतापपाहोनिदेख ॥ भयाभीतहोऊनपळाले ॥ ७ ॥ संसारामाजीहीगोष्ट ॥ सकळांसिविदित
असेस्पष्ट ॥ साक्षीसंतसाधुश्रेष्ठ ॥ वार्ताहीगुप्तनसेकीं ॥ ८ ॥ आतांयाचीपूर्वकथा ॥ श्रवणकरावीसर्वथा ॥ अभिमानाचीबहुव्यथा ॥
केशवभटजीसीअसेहो ॥ ९ ॥ काश्मीरदेशामाजीरहात ॥ साहीशास्त्रेंमुखोद्गत ॥ तयासारिखामहापंडित ॥ पहातांकोठेंनसेची ॥ १० ॥

जयासीप्रसन्नसरस्वती ॥ तेणेंत्याचीमहामती ॥ सहस्रावधीशिष्यपढती ॥ अभ्यासकरितीशास्त्राचा ॥ ११ ॥ तेनिघालेदिग्विजयार्थी ॥
सहस्रावधीसवेंविद्यार्थी ॥ चारीदिशेमाजीफिरती ॥ जयपत्रेंघेतीसर्वांचीं ॥ १२ ॥ जेथेंकोठेंऐकिलापंडित ॥ तेथेंआपणअगत्यजात ॥
तयासींवादघालोनित्वरित ॥ जयपत्रघेततेधवां ॥ १३ ॥ उष्ट्रांचेउष्ट्रभरोन ॥ जयाच्यासवेंपुस्तकेंजाण ॥ वाद्यांचेंहोतगडगर्जन ॥ दि
वसामशालीचालती ॥ १४ ॥ ऐशाऐश्वर्येंफिरतफिरत ॥ चारीदिशांचींजयपत्रेंघेत ॥ बंगालदेशामाजीत्वरित ॥ येवोनियांपोहोंचले
॥ १५ ॥ तद्देशींनदियाशांतिपुर ॥ तेथेंपंडितरहातीथोर ॥ बहुशातेथीलनारीनर ॥ संस्कृतभाषणकरिताती ॥ १६ ॥ केशवभटजीनेंहा
लौकिक ॥ ऐकोनितेथेंआलेसम्यक ॥ तंवतेथीलपंडितलोक ॥ तयांसीधाकपडियेला ॥ १७ ॥ केशवभटजीचीकीर्ती ॥ पूर्वींचतयांसी
श्रुतहोती ॥ कींजयासीप्रसन्नसरस्वती ॥ इतरांचीगतीकायतेथें ॥ १८ ॥ केशवभटजेथेंस्तब्धहोती ॥ तेव्हांबोलतसेसरस्वती ॥ तेथेंइत
रांचीकायमती ॥ जेतयासीजिंकील ॥ १९ ॥ ऐसाचित्तींविचारकरोन ॥ सर्वहीपंडितगेलेपळोन ॥ कोणीसदनासीराहेलपोन ॥ केश
वभटजीच्याभयानें ॥ २० ॥ तोंतेगांवींकृष्णचैतन्य ॥ करीतहोतेअध्ययन ॥ जयाचेजवळीहोतेजाण ॥ तेगेलेपळोनतेधवां ॥ २१ ॥
गुरुमाताह्मणेयासी ॥ आजिनकराअध्ययनासी ॥ जरीकांकरालपठणासी ॥ जुल्मआह्मांवरहोईल ॥ २२ ॥ तियेतेंविचारीकृष्णचैत
न्य ॥ ऐसातोजुल्मकायह्मणोन ॥ तेव्हांतीसांगेवर्तमान ॥ केशवभटयेथेंआलेती ॥ २३ ॥ तेआहेतमहापंडित ॥ बळेंचिपंडितांधरोनि
नेत ॥ वादघालोनित्यासीजिंकित ॥ जयपत्रेंघेतलिहोनीं ॥ २४ ॥ तयाच्याआजिभीतीकरून ॥ तुमचेगुरुबैसलेलपोन ॥ तुह्मासीयेथें
पढतांजाण ॥ वर्तमानकळेलतयासी ॥ २५ ॥ मगतेयेथेंशिष्यधाडोन ॥ तुमच्यागुरूचेंकरितीलशोधन ॥ तेणेंआह्मांसीजुल्मजाण ॥
बहुतप्रकारेंहोईल ॥ २६ ॥ ऐसेंऐकतांकृष्णचैतन्य ॥ ह्मणेमीत्याचेंघेतोंदर्शन ॥ लगबगेंतेव्हांआलेआपण ॥ केशवभटजीच्याशिबिरा
सी ॥ २७ ॥ तोंगंगेच्यातीरावरी ॥ मंडपघालोनियांभारी ॥ केशवभटजीसहपरिवारीं ॥ उतरलेतीतेस्थळीं ॥ २८ ॥ केशवभटजीस्नान
करोन ॥ संध्याकरीतबैसलेजाण ॥ तोंकृष्णचैतन्ययेऊन ॥ करितीनमनतयांसी ॥ २९ ॥ दोन्हीहातजोडोन ॥ सन्मुखबैसलाजाऊन ॥

केशवभटजीनेंहेंपाहोन ॥ गोडबहुतवाटलें ॥ ३० ॥ सातवर्षांचेंज्याचेंवय ॥ तेजःपुंजदिसेकाय ॥ जैसाकोणीसभ्यपाहें ॥ तैसाआपण
बैसलासे ॥ ३१ ॥ चांचल्यदिसेस्वभाव ॥ सुंदरज्याचेअवयव ॥ बहुतधरोनिगौरव ॥ भटजीकडेपहातसे ॥ ३२ ॥ आश्चर्यभटजीपावो
न ॥ तयालागींकरितीभाषण ॥ अरेबाळकाकायह्मणोन ॥ येथेंसत्वरआलासी ॥ ३३ ॥ कृष्णचैतन्यतेव्हांबोले ॥ आपुलेंयशमींबहुऐ
किलें ॥ तुमच्यासमानयेवेळे ॥ भूवरीकोणीनसेचि ॥ ३४ ॥ पूर्वींजैसेव्यासवाल्मिक ॥ यासमईआपणतैसेएक ॥ जाणोनियांऐसालौ
किक ॥ दर्शनघ्यावयापातलों ॥ ३५ ॥ केशवभटजीऐसेंऐकतां ॥ बहुतसंतोषवाटलाचित्ता ॥ ह्मणतीबाळकाकांहींतत्त्वता ॥ इच्छा
असेलतीबोलावी ॥ ३६ ॥ तेव्हांबोलेकृष्णचैतन्य ॥ कांहींआपुल्यामुखांतोन ॥ श्रवणींपडावेंभाषण ॥ हेतूधरूनआलोंहा ॥ ३७ ॥ भ
टजींसकांहींरोषवाटोन ॥ ह्मणतीमुलाकायकरितोसभाषण ॥ कांहींअध्ययनतूंकेलेंसपूर्ण ॥ यांतीलज्ञानकायतुजला ॥ ३८ ॥ तंवतोह्म
णेमीरूपावळी ॥ कांहींपढलोंसद्गुरूजवळी ॥ परंतुइच्छाबहुतउपजली ॥ आपुलेंभाषणऐकावें ॥ ३९ ॥ केशवभटजीहांसोन ॥ पाहोनि
बाळाचेंधीटपण ॥ ह्मणतीरेमीझालोंप्रसन्न ॥ कायभाषणकरूंसांग ॥ ४० ॥ तेव्हांबोलेकृष्णचैतन्य ॥ जिचेतीरींबैसलोंजाण ॥ तिचें
कांहींकरावेंस्तवन ॥ तेणेंसंतुष्टमनमाझें ॥ ४१ ॥ तेव्हांभटजीनेंसम्यक ॥ गंगेवरीकेलेंअष्टक ॥ त्याचेअर्थकरोनिअनेक ॥ दाविलेते
व्हांबाळकासी ॥ ४२ ॥ तंवतेंसर्वहीगंगाष्टक ॥ ह्मणोनदाखवीतोबाळक ॥ भटजीपहातीटकमक ॥ ह्मणतीकायहीबुद्धीयाची ॥ ४३ ॥
बाळह्मणेयाअष्टकांत ॥ कोव्यावधीनिघतीअर्थ ॥ गुणदोषपरकांहींयांत ॥ वर्णनकरोनसांगावे ॥ ४४ ॥ तेव्हांकेशवभटजीह्मणती ॥
याअष्टकांतगुणवर्णिलेती ॥ तेथेंकैसेदोषनिघती ॥ सत्वरमजप्रतीसांगावें ॥ ४५ ॥ बाळकह्मणेजीसर्वज्ञा ॥ जरीमजलाहोयआज्ञा ॥ त
रीमीअर्थआपुल्याप्रज्ञा ॥ तुह्मासीकरोनदावितों ॥ ४६ ॥ भटजीह्मणतीबोलसत्वर ॥ तेव्हांबाळकेंगुणदोषपर ॥ त्यांतोनिअर्थकाढिले
फार ॥ भटजीसउत्तरनसुचेची ॥ ४७ ॥ बाळकह्मणेजीआपणसमर्थ ॥ आपुल्याकृपेमीऐसेअर्थ ॥ कोव्यावधीकाढीनयांत ॥ जरीमज
आज्ञाकरालकीं ॥ ४८ ॥ भटजीसवाटलाचमत्कार ॥ तेव्हांकांहींनसुचेउत्तर ॥ बाळासीह्मणतीउदईकसुंदर ॥ तुह्मांसींभाषणकरूंकीं ॥

॥ ४९ ॥ तेव्हांगेलेकृष्णचैतन्य ॥ केशवभटजीउदासहोऊन ॥ सरस्वतीचेंकेलेंध्यान ॥ परमआर्तहोवोनियां ॥ ५० ॥ सरस्वतीतेव्हां
प्रगटझाली ॥ येरूवंदिलीचरणकमळीं ॥ ह्मणेमायगेयेवेळीं ॥ मजवरीकेलीअवकृपा ॥ ५१ ॥ सर्वभूवरीयशदीधलें ॥ शेवटींयेथेंआणो
निवहिलें ॥ बाळकाहातींमजविटंबिलें ॥ कायमींकेलेअपराध ॥ ५२ ॥ सरस्वतीह्मणेएकसम्यक ॥ साक्षातहावैकुंठनायक ॥ मजसारिख्या
दासीअनेक ॥ ज्याच्यासन्मुखतिष्ठती ॥ ५३ ॥ तरीतुझेंभाग्यगहन ॥ तुजलात्याचेंझालेंदर्शन ॥ सत्वरआतांजाईशरण ॥ आपुला
उद्धारकरोनिघेई ॥ ५४ ॥ केशवभटजीहेंऐकोन ॥ तत्काळबाळाचाशोधकरोन ॥ धांवोनितयाचेधरीचरण ॥ ह्मणेमीशरणसर्वस्वें ॥ ५५ ॥
जेणेंउद्धारहोयपूर्ण ॥ ऐसेंकरावेंआज्ञापन ॥ तेव्हांबोलतीकृष्णचैतन्य ॥ अभिमानदूरकरावा ॥ ५६ ॥ नरदेहहाउत्तमोत्तम ॥ देवादि
कांसीइच्छापरम ॥ तोतुजपावलाअविश्रम ॥ कांहींसुकृतेंकरोनियां ॥ ५७ ॥ जेणेंअभिमानवाढेपरम ॥ ऐसेंसर्वहीसोडींकर्म ॥ अवलं
बोनिवैष्णवीधर्म ॥ भूतींभगवंतपहावा ॥ ५८ ॥ ऐसेंप्रभूचेंऐकतांवचन ॥ चित्तींवैराग्यजडलेंपूर्ण ॥ सर्वस्वाचात्यागकरोन ॥ निघेआ
पणतेवेळीं ॥ ५९ ॥ निंबार्काचेधरोनिपाय ॥ त्याचाघेतलासांप्रदाय ॥ अद्यापित्याचेंनामपाहें ॥ त्यापरंपरेंतगातातीं ॥ ६० ॥ बोध
गुरूकृष्णचैतन्य ॥ मंत्रगुरूनिंबार्कपूर्ण ॥ उभयमार्गीतह्मणोनिजाण ॥ तयासीसज्जनवर्णिती ॥ ६१ ॥ ऐसेहोवोनिपूर्णभक्त ॥ पातले
काश्मीरदेशांत ॥ तेथेंलोकांतभक्तिपंथ ॥ तेणेंबहुतविस्तारला ॥ ६२ ॥ ॥ मू०क० ॥ आप काश्मीर सुनि वसत विश्रांततीर तुर
कसमूह द्वार जंत्र इक धारिये ॥ सहजसुभाइ किंउ निकसत आइ ताको पकरत धाइ ताके सुनतही निहारिये ॥ संग ले हजार
शिष्य भरे भक्तिरंग महा अरे वाहिठोर बोले नीचपट टारिये ॥ क्रोध भरि झारे आई सुभापे पुकारे वेतो देखि सबै हारे मारे जल
बोरि डारिये ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ यापरीकाश्मीरींकरितांवास ॥ तेथेंएकऐकिलेंआश्चर्यास ॥ यवनमातलेमधुपुरीस ॥ बहुतअनर्थ
मांडिला ॥ ६३ ॥ तेथेंविश्रांतघांटींएक ॥ यंत्रगाडिलेंचमत्कारिक ॥ सहजस्वभावेंहिंदुलोक ॥ त्यामार्गानेंजेनिघती ॥ ६४ ॥ तेथेंय
वनांचेसमूहबैसती ॥ तत्काळत्यांसीधांवोनिधरिती ॥ त्याचेंधोतरसोडोनिपहाती ॥ सुन्तादावितीतयांतें ॥ ६५ ॥ त्यासीह्मणतीमुसल

मान ॥ आपुलेपंक्तीसघालितीभोजन ॥ तयाचीफिर्यादऐकेकोण ॥ राज्ययवनांचेंअसेकीं ॥ ६६ ॥ यापरीसहस्त्रावधीवेळे ॥ हिंदुलोकांसीयवनकेले ॥ तेव्हांकोणीफिर्यादगेले ॥ कृष्णचैतन्यासमक्ष ॥ ६७ ॥ तेव्हांस्वामीऐसेंबोलिले ॥ काश्मीरदेशांतजावेंवहिलें ॥ केशवभटजीसीसांगाभले ॥ तेकार्यतुमचेंकरतील ॥ ६८ ॥ तेव्हांतेकाश्मिरांतसर्वआले ॥ केशवभटजीसीवृत्तकथिलें ॥ आज्ञामानोनिहे निघाले ॥ सत्वरपातलेमथुरेंत ॥ ६९ ॥ सवेंहजारोंशिष्यभले ॥ महाभक्तिरंगांतभरले ॥ विश्रांतघांटींनीटआले ॥ उभेराहिलेयंत्रावरी ॥ ७० ॥ तैंधांवोनिआलेयवन ॥ ह्मणतीसत्वरफेडावसन ॥ ऐकतांभटजीक्रोधेंकरोन ॥ यंत्रखोदोनटाकिती ॥ ७१ ॥ तयासीफोडून तोडून ॥ दिधलेंयमुनेंतटाकोन ॥ शिष्यांसीसांगोनतेयवन ॥ केलेपिटोनमोकळे ॥ ७२ ॥ तेव्हांतेजाऊनसत्वरगती ॥ सुभ्याच्याजवळींपुकारकरिती ॥ ससैन्यहोवोनिपक्षपाती ॥ तोंयुद्धार्थपातला ॥ ७३ ॥ केशवभटजीचेशिष्यफार ॥ जयांचेअंगींतेजअपार ॥ तयांसी पहातांचिकांपलेंअंतर ॥ जाहलीहारयवनांची ॥ ७४ ॥ तेव्हांयांचेशिष्यधांवोन ॥ कितीकांचेघेतलेप्राण ॥ कितीकदिधलेबुडवोन ॥ यमुनाजळांततेधवां ॥ ७५ ॥ ॥ मू०क० ॥ गये सब दोरि जहां काजिकीज्ञु पौरि अति कियो तिन सोइ आज्ञु किजिये पुकार हे ॥ आज्ञु कोउ ऐसो एक आयो हे ज्ञु मथुरामें संग हे हजार सिष्य तेजको न पारहे ॥ लेके झरकारे धरकारे मती भांति कह्यो क्यारे अधर्मी हिंदुधर्म कियो खारहे ॥ होहु रांड कियो पुरुषारथ भांड जोइ हरिसो विमुख ताको नही पारावारहे ॥ ३ ॥ ॥ टी०ओ० ॥ त्यांतूनकांहींजेराहिलेयवन ॥ सर्वहीसुभ्याच्यासहवर्तमान ॥ जेथेंकाजीचीसभाजाण ॥ जेहींहेंउत्पन्नबंडकेलें ॥ ७६ ॥ त्याचियाबळेंकरोनिअधम ॥ ऐसेंअत्यंतकेलेंहेंकर्म ॥ आतांतयासीहेंवर्म ॥ सांगोनपुकारकरावी ॥ ७७ ॥ ऐसाविचारकरोन ॥ तेथेंपातलेसर्वजाण ॥ तयासीसांगतीवर्तमान ॥ ऐसाअनर्थजाहला ॥ ७८ ॥ आजिकोणीऐसादेख ॥ मथुरेमाजीआलाएक ॥ जयाच्यासवें शिष्यसम्यक ॥ सहस्त्रावधीअसती ॥ ७९ ॥ तयाचेअंगींतेजअपार ॥ आह्मासीदिधलादुर्धरमार ॥ ललकारोनीदिधलेसमग्र ॥ तेजहीनकेलेसकळा ॥ ८० ॥ जैसेंत्याच्याबुद्धीसआलें ॥ तैसेंआह्मासीभाषणकेलें ॥ कांरेअधर्मीहोखराबकेले ॥ हिंदूचेधर्मबळेंतुह्मी ॥ ८१ ॥

केवळतुह्मीअह्मातरांड ॥ पुरुषार्थकेलाजैसाभांड ॥ हरीसीजोविन्मुखउदंड ॥ पारावारपापाचानसेत्याच्या ॥८२॥ ॥ मू०क०॥ काजी अति
डऱ्यो हिय पऱ्यो खरभऱ्यो यह कोन आइ अऱ्यो अब करोका उपाइ मे ॥ रचे भूत वेताल मूठि दीठी मायाजाल सुदर्शननी किये ख्याल सह
जसुभाइमे ॥ असुरके तनमे सो अगिनी लगाइ दई दई कहो दई कहा कहा कियो हाइमे ॥ येतो हे बडे प्रतापी मेतो रहो महापापी अहो मति
थापीआबे परो भेद पाइमे ॥४॥ ॥ टी०ओ०॥ऐसेंऐकतांवर्तमान ॥ काजीसीवाटलीभीतीगहन ॥ हृदयींगेलागडबडोन ॥ ह्मणेहायेऊनको
णअडला॥८३॥आतांयासीकोणउपाय ॥ ह्मणोनितेणेंरचिलाअपाय ॥ मंत्रेंकरोनिलवलाहें ॥ मायाजाळप्रेरिलें ॥८४॥ भूतप्रेतपिशाचगण॥
वेताळमुठीदृष्टीजाण ॥ समुदायआलेधांवोन ॥ केशवभटावरीतेधवां ॥८५॥ भटजीनेंतेंपाहतांजाण ॥ श्रीहरीचेंकेलेंस्मरण ॥ तत्काळपावलें
सुदर्शन ॥ चमत्कारकेलातयानें ॥ ८६ ॥ सहजचिस्वभावेंकरून ॥ मायाजाळाचेंकेलेंदहन ॥ आणियवनाचेदेहींजाण ॥ अग्नीलावो
नदीधला ॥ ८७ ॥ देहामाजीआगउठतां ॥ हायहायसर्वहीकरितीतत्त्वता ॥ काजीलागींह्मणतीआतां ॥ कायअनर्थाकेलेंसी ॥ ८८ ॥
तेथेंआपणकाययोजिलें ॥ तेणेंआह्मासीत्रासोनदीधलें ॥ तोंकाजीच्यादेहींभडकेउठले ॥ गडबडांलोळेभूवरी ॥ ८९ ॥ ह्मणेमींकाय
हाअनर्थकेला ॥ माझामजसीतोभोंवला ॥ हायहाययेसमईमजला ॥ कोणआतांवांचवील ॥ ९० ॥ तेतोंआहेतमोठेप्रतापी ॥ मीतोंके
वळमहापापी ॥ दुष्टकर्मतेंबळेंचिस्थापीं ॥ आपुल्याबुद्धिकरोनियां ॥ ९१ ॥ आतांत्यांतीलसर्वभेद ॥ समजण्यामाजीआलाविशद ॥
बहुतशिक्षापावलोंसुबद्ध ॥ तयाचिदोषेंकरूनिमी ॥ ९२ ॥ ॥ मू०क० ॥ आइ पाइ पऱ्यो नीर नैननिते ढऱ्यो वैन कहे मऱ्यो म
ऱ्यो प्रभु मेरी रक्षा कीजिये ॥ तव स्वामी कह्यो तोहि लेहो मे बचाइ पुनि एक हे उपाइ सीख सुनि मेरी लीजिये ॥ फेरि जो अध
र्म एसो करोगे न कर्म अब मेटो सब गर्भ सदा सीतल व्है जीजिये ॥ ओर जिते बादि हरिविमुख प्रसादी तिन्हे लिये सतमारगमे नो
धारस पीजिये ॥ ५ ॥ ॥ टी०ओ० ॥ ऐसाअंतरींअनुतापोन ॥ भटजीपार्शीयेधांवोन ॥ बळकटतयाचेधरीचरण ॥ नयनींनीरवाह
तसे ॥ ९३ ॥ मुखानेंह्मणेजीमेलोंमेलों ॥ जैसेंकेलेंमीतैसेंफळलों ॥ आतांयेवोनमीचरणींजडलों ॥ रक्षाकरावीमाझीदेवा ॥ ९४ ॥ संतांचा

स्वभावदयाळुपूर्ण ॥ तेव्हांअंतरींकळवळोन ॥ कायतयासीबोलिलेवचन ॥ तुजवाचवीनअरेमी ॥ ९५ ॥ परीएकउपायत्यासीआहे ॥ मी
जीशिक्षाकरीनपाहें ॥ श्रवणकरोनिलवलाहें ॥ हृदयींसदृढधरावी ॥ ९६ ॥ तंवतोह्मणेआज्ञावचन ॥ सांगालतेंप्रमाणकरीन ॥ भटजीह्म
णतीऐकपूर्ण ॥ लक्षलावोनियेधवां ॥ ९७ ॥ ज्यामाजीनिपजेऐसाअधर्म ॥ पुनरपितैसेंनकरींकर्म ॥ सर्वभूतांसींअसावेंनरम ॥ अभिमा
नसर्वनिवटावा ॥ ९८ ॥ तरीहादाहमिटेलसकळ ॥ जरीतूंअंतरींहोसीशीतळ ॥ बाहेरदेहाचीजावोनितळमळ ॥ शीतळहोवोनिस्वस्थराहा
वें ॥ ९९ ॥ ऐसेंतयासीबोलिलेवचन ॥ आणीकवादीजेहोतेजन ॥ श्रीहरीसीविन्मुखपूर्ण ॥ तयांसीधरूनआणिले ॥ १०० ॥ सकळां
सीशिक्षाकरितांजाण ॥ सर्वहीतेव्हांआलेशरण ॥ भटजीनेंत्यांवरीकृपाकरोन ॥ सन्मर्गासीलाविले ॥ १ ॥ सकळहोवोनिभगवद्भक्त ॥
नवधारसातेंप्राशनकरीत ॥ यापरीतेथेंलाविलीख्यात ॥ महिमाअद्भुतवाढविला ॥ २ ॥ ॥ मू०क० ॥ जिते हिंदु तुरकनी सेकरा
नि मारि हारे भरे दुख भारे वेतो स्वामीजूपे आयेहे ॥ प्रभु कह्यो आवो अब दुख जिनि पावो कैसोराइगुन गावो जमुनाजल अ
न्हायेहे ॥ मिहिन एक बस्तर लाये तिनको ले पहराये हिंदुको चिन्ह पाये जग जस गायेहे ॥ तुरकतिया कान्ह धरी आई सब पाइ
परी करी प्रभु दया नरनारी दरसायेहे ॥ ६ ॥ ॥ टी०ओ० ॥ यवनानेंकरोनिबलात्कार ॥ भ्रष्टकेलेजेदेऊनमार ॥ सहस्रावधीतेहिं
दुनर ॥ सर्वहीधांवोनआलेती ॥ ३ ॥ दुःखभारानेंभरोन ॥ जेकाअत्यंतझालेदीन ॥ केशवस्वामीसीआलेशरण ॥ ह्मणतीपावनकराआ
ह्मां ॥ ४ ॥ स्वामीह्मणतीयारेसकळ ॥ दुःखेंआतांनकरातळमळ ॥ केशवप्रभूचेगुणनिर्मळ ॥ सप्रेमगायनकरारे ॥ ५ ॥ यमुनाजळांतक
रारेस्नान ॥ ऐसेंभटजीचेंऐकतांवचन ॥ सकळहीस्नानेंकरितीउठोन ॥ मगएकवस्त्रआणविलें ॥ ६ ॥ कातिनीच्याजाळ्यासमान ॥ अ
त्यंतबारीकहोतेंजाण ॥ सकळांसीदिधलेंनेसवोन ॥ तोंहिंदूचेंचिन्हजाहलें ॥ ७ ॥ सर्वकरितीजयजयकार ॥ तेव्हांतयाचेंयशसुंदर ॥
जगामाजीवाढलेंफार ॥ सर्वनारीनरगाताती ॥ ८ ॥ यवनजेहोतेजर्जरीभूत ॥ आणिजेझालेमृत्युप्राप्त ॥ तयांच्याकांताधांवोनियेत ॥
कानधरोनितेधवां ॥ ९ ॥ शरणहोवोनिकरितीनमन ॥ तेव्हांस्वामीनेंदयाकरोन ॥ जयांचेपतीतयांलागोन ॥ पूर्ववतकरोनदीधले ॥

॥ ११० ॥ ऐसीसंतांचीअघटितकरणी ॥ तीकायवर्णवेमाझियेवाणी ॥ किंचितगुरूच्याकृपेकरूनी ॥ दीनहोवोनिगातसें ॥ ११ ॥ मूल
भक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ सत्तरावाछप्पागोडहा ॥ ११२ ॥ ॥ ६ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरुपरमानंदा ॥ निवटोनिमाझ्यापापकंदा ॥ सद्भजनाच्यालावींछंदा ॥
अनाथनाथाकृपाकरीं ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ श्रीभट सुभट प्रगव्यो अघटरस रसकनि मनि मोद घन ॥ मधुर भाव संमिलित ल
लित लीलासु वलित छबि ॥ निरखत हरखत हृदै प्रेम बरखत सुकलित कवि ॥ भवनिस्तारन हेत देत दृढभक्ति सबनि नित ॥ जा
सु सुजस शशि उदै हरन अति तम भ्रम श्रम चित्त ॥ आनंदकंद श्रीनंदसुत श्रीवृषभानसुता भजन ॥ श्रीभट सुभट ॥ ७१ ॥
॥ ॥ टी०ओ० ॥ श्रीभटऐसेकवीसुभट ॥ भूवरीप्रगटलेमहाश्रेष्ठ ॥ ज्याचियाकवितींरसअघट ॥ कायमीवर्णनकरूंत्याचें ॥ २ ॥ र
सिकजनांच्यामनासी ॥ केवळसुखाचीधनराशी ॥ मधुरभावसंयुक्तेंसी ॥ ललितलीलागातसें ॥ ३ ॥ हरीनेंजेजेकेलीलीला ॥ त्यामा
जीजेआनंदवेळा ॥ उभयदंपत्यसुखसमेळा ॥ सप्रेमहोउनीराहाती ॥ ४ ॥ तेंचिस्वरूपध्यानींपहात ॥ हृदयहोतसेहर्षभरित ॥ तयातेंव
र्णोनगीतगात ॥ प्रेमवर्षततेवेळां ॥ ५ ॥ ऐसाकवीप्रेमाकळित ॥ भवनिस्तारकरावयार्थ ॥ अत्यंतसद्दृढभक्तीदेत ॥ सर्वलोकांसीसर्वदा
॥ ६ ॥ जयाचेंसुयशप्रगटलेंजाण ॥ जैसाचंद्रोदयझालापूर्ण ॥ चित्ताभोंवतेंजेंतमगहन ॥ भ्रमश्रमेसींहरपतसे ॥ ७ ॥ पूर्णजोकांआनं
दकंद ॥ नंदनंदनश्रीमुकुंद ॥ श्रीवृषभानुसुताविशद ॥ दोघांचेंभजनकरीतसे ॥ ८ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीका
ख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकाहत्तरावाछप्पागोडहा ॥ ९ ॥ ॥ ६ ॥ ॥ ६ ॥ ॥ ६ ॥ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरुदीनदयाळा ॥ कृपेनेंमाझापाळींलळा ॥ सज्जनांचीगाईनलीला ॥ ऐ
सीकळामजद्यावी ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ श्रीहरीव्यास तेज हरिभजन बल देवीको दीक्षा दई ॥ खेचरनरकी शिष्य निपट अचि
रज यह आवे ॥ बिदित बात संसार संतमुख कीरति गावे ॥ वैरागिनके वृंद रहत संग शाम सनेही ॥ ज्यो जोगेसुरमध्य मनो सो

भित वैदेही ॥ श्रीभटचरनरज परसिके सकलसृष्टि जाको नई ॥ श्रीहरिव्यास ॥ ७२ ॥ ॥ टी०ओ० ॥ श्रीहरिव्यासाचेंतेजगहन ॥ हरिभजनाच्याबळेंपूर्ण ॥ जेणेंदेवीसीदीक्षाजाण ॥ कृपाकरोनदीधली ॥ २ ॥ खेचरनरासीशिष्यकेले ॥ अत्यंतआश्चर्यहेंवाटलें ॥ संसारामाजीहीगोष्टवहिलें ॥ विदितअसेकींसर्वांसी ॥ ३ ॥ संतआपुल्यामुखेंकरोन ॥ तयाचीकीर्तीकरितीगायन ॥ बैराग्यांचेसमूहजाण ॥ जयाच्यासंगेंराहाती ॥ ४ ॥ कवण्यापरीतोसंतसमूह ॥ ज्याचाहरीशींपरमस्नेह ॥ तयांतजैसानृपविदेह ॥ योगेश्वरांतशोभतसे ॥ ५ ॥ श्रीभटजीचेचरणरज ॥ मस्तकावरीहोतांविराज ॥ तयातेंसकळसृष्टीसहज ॥ नम्रजाहलीगुरुकृपें ॥ ६ ॥ ॥ मू०क ॥ चढतावर गांव बाग देखि अनुराग भयो लयो नितनेम करी चाहे पाक कीजिये ॥ देविको अस्थान काहु बकरा ले मान्यो आनि देखत गिलानि इहां पानी नहि पीजिये॥ भूखे निसि भई भक्तितेज मीडिगई नई देह धरी लई आई लखि मति भीजिये॥ करोजू रसोइ कोन करे कछू औरे भोइ सोई मोको दीजे दांन शिष्य करि लीजिये ॥ १ ॥ ॥ टी०ओ०॥ श्रीभटजीचेशिष्य ॥ महाभक्तहरिव्यास ॥ सर्वदाफिरतीयात्रेस ॥ चढतावरगांवींपातले ॥ ७ ॥ तेथेंपाहोनिसुंदरबाग ॥ चित्तींजाहलाअनुराग ॥ तेथेंचिउतरोनिसवेग ॥ नित्यनेमसारूंआपला ॥ ८ ॥ ऐसाविचारकरून ॥ समाजासहवर्तमान ॥ तेथेंचिआपणउतरोन ॥ भजनपूजनालागले ॥ ९ ॥ नैवेद्यअर्पायाश्रीनायका ॥ ह्मणतीसत्वरकरापाका ॥ ऐसाजोंविचारकरितीदेखा ॥ तोंआश्चर्यएकजाहलें ॥ १० ॥ तेथेंदेवीचेंहोतेंस्थान ॥ कोणाचानवसझालापूर्ण ॥ तेणेंदेवीसीबलिदान ॥ बकराआणोनमारिला ॥ ११ ॥ मेषाचीतेपाहतांग्लानी ॥ हरिव्यासाच्याखेदमनीं ॥ ह्मणतीऐशादुष्टस्थानीं ॥ जलप्राशननकरावें ॥१२॥ स्वयंपाकाचेंसर्वसाहित्य ॥ तैसेंचिपडोनिराहिलेंतेथ ॥ अंतरींक्षुधाखेदयुक्त ॥ निजोनिराहिलेतेधवां ॥ १३ ॥ ऐसेचिचारप्रहरलोटले ॥ देवीसतेव्हांसंकटपडलें ॥ परमभक्तहायेवेळे ॥ उपाशींराहतसेस्थानींमाझ्या ॥ १४ ॥ येणेंक्षोभेलदेवाधिदेव ॥ जगांतमजलानमिळेठाव ॥ ऐसाभीतीचाउपजोनिभाव ॥ देवीप्रगटलीतेधवां ॥ १५ ॥ नवादेहधारणकरून ॥ यासीजोंपाहिलेंयेवोन ॥ तियेचीमतीरंगलीपूर्ण ॥ हातजोडोनविनवीतसे ॥ १६ ॥ अहोहेंमाझेंआहेस्थान॥ आपण

मजवरीकृपाकरोन ॥ स्वयंपाकशीघ्रसारोन ॥ हरीसीनैवेद्यअर्पावा ॥ १७ ॥ तंवतोह्मणेऐसेस्थानीं ॥ सहसानसेऊंअन्नपाणी ॥ जेथेंभू
तांचीदयामनीं ॥ यत्किंचितहीनसेहो ॥ १८ ॥ ऐसेंत्याचेंऐकतांवचन ॥ देवीचेंपालटोनगेलेंचिन्ह ॥ आणीकचिकांहींरंगजाण ॥ ति
चेअंतरींजाहला ॥ १९ ॥ सप्रेमयुक्तहोवोन ॥ हरिव्यासाचेधरीचरण ॥ आतांहेंमजलाद्यावेंदान ॥ शिष्यकरोनमजघ्यावें ॥ २० ॥
॥ ॥ मू०क० ॥ करी देवी शिष्य सुनी नगरको सट कियो पटकी ले खाट जाकी बडो सिरदारहे ॥ चढी सुख बोले होंतो भई ह
रिदासदासी जो न दास होंहु तोपे अभी डारो मारिहे ॥ अये सब भृत्य भये मानो तन नये लये गये दुख पाप ताप किये भवपा
रहे ॥ कोऊदिन रहे नानाभोग सुख लहे एक श्रद्धाके सुपच आयो पायो भक्तिसारहे ॥ २ ॥ ॥ टी०ओ० ॥ देवीसीयेतांशरणा
गत ॥ हरिव्यासमनींविचारकरीत ॥ हेजरीजाहल्याभगवद्भक्त ॥ हिंसापुनरपिनहोय ॥ २१ ॥ मगहोवोनिकृपान्वित ॥ तिचेमस्तकीं
हस्तठेवित ॥ तुळसीमाळागळांघालित ॥ हरिनाममंत्रदीधला ॥ २२ ॥ मगतियेसीआज्ञाकरीत ॥ आजपासोनिहिंसानिश्चित ॥ नकरा
वीतूंजाणसत्य ॥ आणीकएकपरिसावें ॥ २३ ॥ तुवांहेंकेलेंनगरशठ ॥ याचेहृदयींभावउद्भट ॥ शीघ्रकरोनिखटपट ॥ उत्पन्नआतांकरावा
॥ २४ ॥ तंवतीह्मणेजीसर्वज्ञा ॥ जैसीआपुलीअसेआज्ञा ॥ तैसीचआतांकरितेंप्राज्ञा ॥ ह्मणोनिशीघ्रनिघाली ॥ २५ ॥ नगरींचाजोन
रपती ॥ निजलाहोतामंचकाप्रती ॥ त्यातेंधरोनिशीघ्रगती ॥ पलंगाखालींआपटिला ॥ २६ ॥ आणीकत्याच्याउरावरी ॥ बैसोनिभयं
कररूपधरी ॥ रायानेंपहातांसत्वरी ॥ गेलाअंतरींघाबरोन ॥ २७ ॥ ह्मणेहेमातेआज्ञाकाय ॥ सोडींतूंमजलाधरितोंपाय ॥ देवीह्मणेरेल
वलाहें ॥ माझेंहेंवचनसत्यकरीं ॥ २८ ॥ आजिमाझ्यासंस्थानास ॥ उतरलेतीश्रीहरिदास ॥ तयांचाघेऊनउपदेश ॥ दासीमीझालेंस
र्वथा ॥ २९ ॥ तरीतूंप्रजेसहवर्तमान ॥ तयाचाउपदेशघ्यावाजाण ॥ नाहींतरीमीतुजलागोन ॥ आतांचिटाकीनमारोनी ॥ ३० ॥ तो
ह्मणेमीऐसेंचकरीन ॥ आतांमजलादेसोडोन ॥ यापरीतयासीकबूलकरोन ॥ गुप्तजाहलीतेधवां ॥ ३१ ॥ प्रातःकाळींनृपउठोन ॥ गां
वांतदौंडीदेपिटोन ॥ कींसकळांनींजावेंशरण ॥ हरिव्यासासीयेधवां ॥ ३२ ॥ उपदेशघ्यावासकळांनीं ॥ यापरीजोनकरीकरणी ॥ तया

सीशूळावरीदेवोनी ॥ प्राणहरणकरीन ॥ ३३ ॥ ऐसेंऐकतांचितेक्षणीं ॥ आलेतेथेंसर्वधांउनी ॥ हरिव्यासाचामंत्रघेउनी ॥ कृतार्थझा
लेतेधवां ॥ ३४ ॥ जाणोंनवीनदेहझाले ॥ पापतापादिदुःखगेलें ॥ सर्वहीभवाच्यापारकेले ॥ हरिव्यासानेंतेधवां ॥ ३५ ॥ मगकांहीं
एकदिवस ॥ तेथेंराहिलेहरिव्यास ॥ नानाभोगसुखविलास ॥ भक्तिपंथासदाविले ॥ ३६ ॥ यापरीसर्वहीसुखपावले ॥ तोंएकअतिनी
चभावबळें ॥ हरिव्यासाचीकृपाफळे ॥ अंतरींइच्छीसर्वदा ॥ ३७ ॥ ह्मणेमजकैसेंशिवतील ॥ कृपाकैसेनिकरतील ॥ ऐसीमनासीतळम
ळ ॥ सर्वदालागलीतयाच्या ॥ ३८ ॥ नित्यघालीतयेरझार ॥ हरिव्यासयेतांबाहेर ॥ तयांसीकरोनिनमस्कार ॥ जोडोनिकरउभाराहे
॥ ३९ ॥ यापरीलोटलेकांहींवर्ष ॥ तेव्हांपावलाभाग्यदिवस ॥ सहजेंकरीश्रीहरिव्यास ॥ अरण्यामाजीनिघाले ॥ ४० ॥ सवेंआलेदा
हावीसजन ॥ श्वपचेंठेवोनितेंवर्तमान ॥ आपणसत्वरपुढेंयेऊन ॥ वृक्षींबांधोनघेतसे ॥ ४१ ॥ वरतीबांधोनिपायदेख ॥ अधोभागींकेलामस्त
क ॥ तोंत्यामार्गेंआलेसम्यक ॥ श्रीहरिव्यासतेधवां ॥ ४२ ॥ तयाकडेजोंपाहतीजाण ॥ तोंतयाच्यानेत्रांतोन ॥ प्रेमाश्रूचेंवाहेजीवन ॥
लावोनिघेतलेनयनदोन्ही ॥ ४३ ॥ देहावरीप्रेमबिंदु ॥ भक्तिभावाचापूर्णसिंधु ॥ ऐसेंपाहतांचिआनंदु ॥ सद्गुरूलागींजाहला ॥ ४४ ॥
त्याचाआशयकळलाचित्तीं ॥ दयेनेंवळलेकृपामूर्ती ॥ ह्मणतीऐसीजेथेंरीती ॥ तेथेंयातीसीकायपहावें ॥ ४५ ॥ आपुल्याहस्तेंसोडोनिसत्व
र ॥ तयाचेमस्तकींठेविलाकर ॥ तत्काळपावलाभक्तिसार ॥ सद्गुरूकृपेनेंतेधवां ॥ ४६ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटी
काख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ बहात्तरावाछप्पागोडहा ॥ ४७ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयजगद्गुरुपरमश्रेष्ठा ॥ पुरविसीतूंमाझ्याहट्टा ॥ संसाराच्याअनेकथट्टा ॥ वा
रोनिमजलापाळिसी ॥ १ ॥ ॥ मू०छ०॥ अज्ञानध्वांत अंतही करन द्वितीय दिवाकर अवतऱ्यो ॥ उपदेशे नृपसिंह रहत नित आ
ज्ञा कारी ॥ पक्ववृक्षजो नाय संत पोषक उपकारी ॥ वानी भोलाराम सुहृद सबहिनि परछाया ॥ भक्तचरनरजजाचि विशद राघो
गुन गाया ॥ करमचंदकश्यपसदन बहुरि आइ मनो वपु धऱ्यो ॥ अज्ञानध्वांत० ॥ ७३ ॥ ॥ टी०ओ० ॥ दिवाकरभटाचेगुणअ

पार ॥ अज्ञानतमाचेअंतकर ॥ केवळदुसरेदिवाकर ॥ भूवरीजाणप्रगटले ॥ २ ॥ उग्रजेंसिंहासारिखेनृपती ॥ उपदेशदिधलातयाप्रती ॥
आज्ञानुसारनित्यराहती ॥ यापरीमहंतीजयाची ॥ ३ ॥ पक्कफळांचाजैसावृक्ष ॥ तृप्तिपूर्वकदेसुखास ॥ त्यापरीपोषकजोसंतांस ॥ सर्व
दाजगासउपकारी ॥ ४ ॥ वाणीजयाचीकल्पनारहित ॥ भोळारामजैसापार्वतीनाथ ॥ सकळजनांसीकेवळआप्त ॥ सर्वांवरछायासारि
खी ॥ ५ ॥ भक्तचरणरजाचादेख ॥ केवळजैसादीनयाचक ॥ राघवाचेगुणआलोलिक ॥ जेणेंनिर्मळगाइले ॥ ६ ॥ कश्यपापासोनिपूर्व
संभव ॥ तेणेंवाढलाबहुप्रभाव ॥ ऐसाअंतरींधरोनिभाव ॥ त्याचगोत्रांतजन्मले ॥ ७ ॥ कश्यपगोत्रींकरमचंद ॥ तयाचेसदनींतनुप्रबु
द्ध ॥ धारणकेलीयेवोनिविशद ॥ दिवाकरानेंवाटतें ॥ ८ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभ
क्तिप्रेमामृत ॥ त्र्याहत्तरावाछप्पागोडहा ॥ ९ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयाजीसद्गुरुराया ॥ निर्विकल्पसत्वरदावींपाया ॥ जेणेंनपावेकधींअपाया ॥
ऐसियाउपायाकरींवेगीं ॥ १ ॥ तूंआहेसिपतीतपावन ॥ ह्मणोनिहट्टेंबोलतोंवचन ॥ आतांसत्वरकृपाकरोन ॥ भवापासोनदूरकरीं ॥
वरी ॥ ५३ ॥ जनांतमिरवीसंतपण ॥ परीतेंकेवळजंतपण ॥ एकहीनाहींकेलासण ॥ यापरीखणखणकरीतसे ॥ ५४ ॥ नानापरीगा
लिप्रदान ॥ सासूदेतसेरात्रंदिन ॥ हृदयींअत्यंतअभावपूर्ण ॥ परमदुर्जनअसेती ॥ ५५ ॥ तेणेंव्याकुळकुंवरसेना ॥ खानपानादिकां
हींरुचेना ॥ मगचोरोनिनिरोपजाणा ॥ सांगोनिधाडिलाबापाशीं ॥ ५६ ॥ सासूसीबोलतीसकळजन ॥ मुलीच्याबापासीधाडासांगो
न ॥ तेव्हांलोकांच्याबोलावरून ॥ मोठ्यात्रासानेंसाखरधाडी ॥ ५७ ॥ त्याहस्तेंचिनिरोपजाण ॥ कुवरसेनावडिलांकारण ॥ सांगोन
धाडीकींमजलागून ॥ सासुरवासबहूतयेथें ॥ ५८ ॥ कांहींनदिधलेंलभापासून ॥ त्यायोगेंबोलतीसकळजन ॥ तेणेंजळतसेहृदयजा
ण ॥ नपडेचैनरात्रंदिवस ॥ ५९ ॥ जरीतुह्मासीकांहींदेववे ॥ तरीकृपेनेंयेथेंयावें ॥ सर्वांचेंतोंडकाळेंकरावें ॥ आजियाप्रसंगींअसेडाव ॥
॥ १६० ॥ ॥ मू०क० ॥ चले गाडि टूटीसी लै बूढ उभै बैल जोरि पहुंचे नगर छोर द्विज कही जाइके ॥ सुनतही आइ देखि
मूह पियराइ फिरि दाम नही एक तुम कियो कंहा आइके ॥ चिंता जिनि करो जाइ सासुढिंग ढरो लिखि कागदमे धरो अति
उत्तम अघाइके ॥ कही समुझाइ सुनि निपट रीसाइ उठि कियो परिहासि लिख्यो गांव खुनसाइके ॥ ११ ॥ ॥ टी०ओ० ॥ या
परीतोनिरोपघेऊन ॥ जुन्नागडासीआलाब्राह्मण ॥ कन्येचेंसांगोनिवर्तमान ॥ साखरदिधलीनरशीसी ॥ ६१ ॥ येरूनिघालेसंतोषो
न ॥ एकमोडकीगाडीघेऊन ॥ लोकांपाशींयाचनाकरून ॥ वृद्धसेबैलमिळविले ॥ ६२ ॥ मगतोब्राह्मणआणिआपण ॥ ऐसियागाडीव
रीबैसोन ॥ कन्येच्यासासुरवाडीसजाण ॥ पोहोंचलेयेऊनतेधवां ॥ ६३ ॥ बरोबरइतुकासरंजाम ॥ चिपळ्याएकताराभोंपळाउत्तम ॥
लंगोटीआणिहरीचेंनाम ॥ याविणधनकांहींनसे ॥ ६४ ॥ नगराच्याशिवेपाशींजातां ॥ पुढेंनिघोनिविप्रेंतत्त्वता ॥ कुवरसेनेसीवृत्तां
ता ॥ आधींजाऊनसांगीतलें ॥ ६५ ॥ तिणेंऐकतांवर्तमान ॥ सासूसासऱ्यांसचोरोन ॥ बापासीभेटलीयेऊन ॥ पाहिलेंचिन्हसर्वते
व्हां ॥ ६६ ॥ तोंडपडलेंपिंवळेंफटिक ॥ तैसीचपरतोनचालिलीदेख ॥ नरसीनेंतेंपाहोनिसम्यक ॥ कन्येसीकायबोलती ॥ ६७ ॥ मज

सींनकांहींकरितांभाषण ॥ कैसीपरतसीम्लानहोऊन ॥ तीह्मणेमाझेंप्रालब्धहीन ॥ ऐसेंबोलोनरडतसे ॥ ६८ ॥ तुह्मासीधाडिलेंसांगो
न ॥ कांहींजवळीअसल्याधन ॥ यासंधीसीयेथेंयेऊन ॥ माझेंगाऱ्हाणेंचुकवावें ॥ ६९ ॥ तेंतोंकांहींनकेलेंकाम ॥ एकहीजवळीनसेचि
दाम ॥ मजलागोनिद्यावयाश्रम ॥ कायकेलेंजीयेवोनियां ॥ १७० ॥ आर्धींचमजलासासुरवास ॥ तुमच्यायेण्यानेंआणीकत्रास ॥
सर्वहीदेतीलआतांबहुवस ॥ ह्मणोनिपरतलेंम्लानवदनें ॥ ७१ ॥ ऐसेंऐकतांनरसीआपण ॥ कन्येसीदेतसेआश्वासन ॥ कांहींचिंतान
करींतूंजाण ॥ सर्वहीसाधीलश्रीहरी ॥ ७२ ॥ तुवांजावोनसासूपाशीं ॥ माझ्यासांगावेंनिरोपासी ॥ जेंजेंकांहींपाहिजेकोणासी ॥ त
याचीयादकरोनिधाडा ॥ ७३ ॥ जैसाज्यासीपाहिजेअहेर ॥ धनवस्त्रादिअलंकार ॥ तेंतेंलिहोनिपोटभर ॥ यादीवरीठेवावें ॥ ७४ ॥
ऐसेंपित्याचेंऐकतांवचन ॥ कुवरसेनेसीविश्वासपूर्ण ॥ तिणेंलहानपणापासोन ॥ बहुतअनुभवपाहिले ॥ ७५ ॥ मगअत्यंतसंतोषेंसी ॥
पातलीआपुल्यानिजसदनासी ॥ आनंदयुक्तपहातांतिजसी ॥ सासूचेमानसींक्रोधउपजे ॥ ७६ ॥ तोंत्याविप्रेंवर्तमान ॥ कथिलेंव्या
हीआलेजाण ॥ ऐसेंतिणेंऐकतांवचन ॥ तेव्हांअत्यंतखवळली ॥ ७७ ॥ ह्मणेसर्वांच्याआग्रहेंकरून ॥ साखरतयासीधाडिलीजाण ॥
आमुचेंकाळेंकरायावदन ॥ मेलातोयेऊनपोहोंचला ॥ ७८ ॥ तयासीआमुचासोयराह्मणतां ॥ लोकांमाजीलाजतत्त्वता ॥ तोंसासूसी
सांगेवार्ता ॥ कुंवरसेनातयेवेळीं ॥ ७९ ॥ ह्मणेजीतातानेंकथिलानिरोप ॥ जेंजेंजयासीपाहिजेअमूप ॥ आपुल्याआपुल्यामानानुरूप ॥
अहेरलिहोनधाडावे ॥ १८० ॥ धनवस्त्रादिअलंकार ॥ जेंजेंज्यासीपाहिजेसुंदर ॥ तयाचीयादकरोनिसत्वर ॥ धाडावीशीघ्रमजपाशीं
॥ ८१ ॥ ऐसेंतिचेंऐकतांवचन ॥ अग्नीवरजैसेंघृतसिंचन ॥ त्यापरीसासूखवळेजाण ॥ बोलेदुर्वचननानापरी ॥ ८२ ॥ तेथेंबैसलेहोते
चार ॥ तेसासूसीसांगतीविचार ॥ व्याह्यापासींकवडीमात्र ॥ नसेठाउकीअसेआपणा ॥८३॥ तरीतयाचेंजैसेंसांगणें ॥ तैशाचपरीआ
पुलेंलिहिणें ॥ तुमचेंयांतकायखर्चणें ॥ ह्मणोनिबैसलेलिहावया ॥ ८४ ॥ मगहोवोनिएकवटा ॥ परस्परांतकरोनिथट्टा ॥ जैसेंज्याच्या
आलेंवाटा ॥ विनोदेंकरोनिलिहिती ॥ ८५ ॥ ह्मणतीऐसाव्याहीउदार ॥ तरीलिहावागांवसमग्र ॥ एकूनएकनारीनर ॥ मगयादीवरलि

हिती ॥ ८६ ॥ रोषेंकरोनिभरिलेंअंतर ॥ लक्षावधीचालिहिलाअहेर ॥ तयासीशिव्यादेतीफार ॥ सासूकुरकुरकरीतसे ॥ ८७ ॥ मगसुनेच्याअंगावर ॥ यादफेंकोनदिलीसत्वर ॥ ह्मणेत्यामेल्याच्याउरावर ॥ नेवोनिघालकाळतोंडे ॥८८॥ ॥ मू०क० ॥ कागद ले आइ देखि दोसरे फिराइ पुनि भूलेपै न पाइ जात पाथर लिखायेहे ॥ रहिवेको दई ठोर फूटि दई पौरि जहां बैठे सिरमोर आपु बहु सुख पायेहे ॥ जल दे पठायो भलो भातिके ओटायो भई बरषा सिरायो सो समोइके अन्हायेहे ॥ कोठरी संभारि आंगे परिदा सो दियो डारि ले बजावे ताल वेस अगनित आयेहे ॥१२॥ ॥ टी०ओ० ॥ कुंवरसेनातीयादघेऊन ॥ बापापाशींआलीजाण ॥ नरसीनेंतीयादआपण ॥ पाहिलीवाचोनसर्वही ॥८९॥ पुनरपिकन्येच्यादिलीहातीं ॥ ह्मणेहीघेऊनजाईनिश्चिती ॥ जेजेचुकोनिराहिलेअसती ॥ स्मरणकरोनिलिहावेते ॥ १९० ॥ जेकोणीराहतीलचुकोन ॥ पुन्हातयांसीनमिळेजाण ॥ ऐसेंपित्याचेंऐकतांवचन ॥ यादघेऊनपरतआली ॥ ९१ ॥ सासूलागींकथिलानिरोप ॥ तिणेंपरिसतांआलाकोप ॥ आजवरीउजेडपडलाअमूप ॥ लाजनवाटेतुजबोलतां ॥ ९२॥ तोंलिहीतहोताजोयाद ॥ आणिसांगतहोताजोविशद ॥ उभयतांबोलतीकरोनिविनोद ॥ आमुचेंनांवराहिलें ॥ ९३ ॥ यादघेवोनिमगसत्वर ॥ दोघांच्यानावेंलिहिलेपत्थर ॥ ऐसाउपहासकेलाथोर ॥ संतमहिमाननकळेतयां ॥ ९४ ॥ कुंवरसेनेच्याहस्तेंजाण ॥ याददिधलीपाठवोन ॥ व्याह्यासीराहावयास्थान ॥ पशूचेंगोठणदीधलें ॥ ९५ ॥ पुराणेंतेंअसेछप्पर ॥ मोडोनिगेलेंत्याचेंद्वार ॥ तेथेंचिउतरेभक्तसुंदर ॥ विषमअंतरींनसेत्याच्या ॥ ९६ ॥ बैलगाडीचीलावोनिसोय ॥ स्वस्थजोंबैसेभक्तराय ॥ तोंत्यास्थानांतलवलाहें ॥ मच्छरअपारअसती ॥ ९७॥ तेणेंकांहींनपडेचैन ॥ निद्रानलागेएकहीक्षण ॥ तेव्हांचित्तींनरसीआपण ॥ परमसंतोषपावले ॥ ९८॥ ह्मणेहरीचेंकरितांभजन ॥ आडयेतसेनिद्राआपण ॥ आजियामच्छरेंकरूनजाण ॥ अखंडकीर्तनहोतसे ॥ ९९ ॥ यापरीजागलेरात्रभर ॥ प्रातःकाळहोतांचिसत्वर ॥ स्नानालागूनधाडिलेंनीर ॥ कुंवरसेनेच्यासासूनें ॥ २०० ॥ उत्तमप्रकारेंआटवोन ॥ ज्यासीकडकडीतआलेंआधण ॥ ऐसेंधाडिलेंपाणीउष्ण ॥ करितांस्नानप्राणजावा ॥ १ ॥ विसणघालावयालागुन ॥ दुसरेंनाहींधाडिलेंजीवन ॥ यापरीतीकठोरजाण ॥ परमदुर्जनअसेकीं ॥ २ ॥ नरसीनेंतेंपहा

तांआपण ॥ आठवोनियांजगज्जीवन ॥ आकाशाकडेपाहिलेंजाण ॥ तोंनवलअद्भुतजाहलें ॥ ३॥ एकाएकींमेघनसतां ॥जलाचीवृष्टी
झालीतत्त्वता ॥ मेळवोनितेंपाणीसर्वथा ॥ नरसीआपणस्नानकरी ॥ ४ ॥ इकडेमिळालेसर्वजन ॥ आणिगांवींचेसर्वब्राह्मण ॥ ऋतुशां
तीहोतसेजाण ॥ कुंवरसेनेचीतयेवेळीं ॥ ५ ॥ तोंअहेराचीआलीवेळ ॥ व्याह्यासीबोलावाह्मणतीसकळ ॥ तेव्हांतीविहीणकरीतळमळ ॥
कायहोथट्टाकरीतसां ॥ ६ ॥ नरसीसीआणावयालागून ॥ एकजाऊनपोहोंचलाब्राह्मण ॥ ह्मणेजीआतांचलावेंआपण ॥ वेळआलीसे
अहेराची ॥ ७ ॥ ऐसेंत्याचेंवचनऐकतां ॥ नरसीह्मणेजीचलावेंतत्त्वता ॥ मागूनमीयेतोंआतां ॥ ऐसेंबोलोनकायकरी ॥ ८ ॥ तेथेंए
कहोतीखोली ॥ तेझाडोनिस्वच्छकेली ॥ आसनघालोनितयेस्थळीं ॥ दारासीपडदालाविला ॥९॥ तेथेंचिआपणबैसेजवळ ॥ एकतारे
सीवाजवीटाळ ॥ नेत्रांवाटेवाहेजळ ॥ प्रेमेंहरीचेंभजनकरी ॥ २१० ॥ ह्मणेजीदेवाविश्वंभरा ॥ परमउदाराकरुणाकरा ॥ तुजवांचोनि
मजलाथारा ॥ आणीकदुसरानसेचि ॥ ११ ॥ तुझ्यानांवेंहुंडीधाडितां ॥ पूर्णकेलीतूंभगवंता ॥ प्रसंगतैसाचिआलाआतां ॥ तुझ्याचि
आधारेंयादलिहिविली ॥ १२ ॥ ऐसीनानाप्रकारेंकरुणा ॥ भाकोनिआळवीजगज्जीवना ॥ तोंपाचारणकरावयाजाणा ॥ वारंवारयेती
विप्र ॥ १३ ॥ तेणेंव्याकुळनरसीमेहता ॥ ह्मणेजीदेवाश्रीभगवंता ॥ पतीतपावनअसोनितत्त्वता ॥ आजिकांलागलाउशीर ॥ १४ ॥
गणिकेसारिखीमहापापिण ॥ पक्ष्याच्यामिसेंकरितांस्मरण ॥ तिचाउद्धारकेलाधांवून ॥ आजिकांउशीरलागला ॥ १५ ॥ दैत्यकुळांत
ज्याचाजन्म ॥ ऐसाप्रल्हादभक्तसत्तम ॥ त्यालागींधांवलेपुरुषोत्तम ॥ आजिकांउशीरलागला ॥ १६ ॥ कुब्जेलागींनीटकेली ॥ द्रौपदी
चीलाजराखिली ॥ ऐसेंऐकतांश्रीवनमाळी ॥ आजिकांउशीरलागला ॥ १७ ॥ चरणद्रोहीजराव्याध ॥ त्याचाउद्धारकेलाविशद ॥ ऐ
सेदयाळूश्रीगोविंद ॥ आजिकांउशीरलागला ॥ १८ ॥ गजेंद्रेंठोकितांआरोळी ॥ त्वरेंधांवसीतूंवनमाळी ॥ सुदामाविप्रासीसांभाळी॥
आजिकांउशीरलागला ॥ १९ ॥ ऐसादयाळूसारंगधर ॥ माझेचिवेळेलागलाउशीर ॥ यापरीऐकतांआर्तस्वर ॥ करुणासागरधांवला
॥ २२० ॥ ॥ क्षे०क० ॥ लेकरी ताल बानि बोले सो रसाल सुनियो नंदलाल मै कहावत व्रजराजको ॥ तुम गनकासी तारी प्र

हलाद भीर टारी कुबिजा सुधारी कान्ह द्रौपदीकी लाजको ॥ चरनद्रोही बधिक तार्‍यो गजने पुकार्‍यो अति केवल राम आये
श्रीसुदामाग्रह काजको ॥ नरसीकी वारि हरि क्यों अबार लांगे अब आये ततकाल रूप धरिके बजाजको ॥ १ ॥ ॥ टी०
ओ० ॥ बजाजाचेंरूपधरून ॥ तेथेंप्रगटलेजगज्जीवन ॥ नरसीलागींह्मणतीआपण ॥ सोयर्‍याससत्वरपाचारीं ॥ २१ ॥ तोंबोलाऊंआ
लाब्राह्मण ॥ त्यासीनरसीह्मणेआपण ॥ अहेराचीगरजअसेलजाण ॥ तरीसकळांनींयेथेंयावें ॥ २२ ॥ ऐसेंत्यासीभाषणकरून ॥ नेत्र
लावोनिकरीभजन ॥ तेव्हांब्राह्मणकरीविनवण ॥ व्यवहारऐसानसेजी ॥ २३ ॥ तेथेंयेऊनआपणसत्वर ॥ सकळांसीकरावाअहेर ॥ न
रसीत्यासीनदेईउत्तर ॥ प्रेमांतअंतररंगलें ॥ २४ ॥ ब्राह्मणतयाचाधरीहात ॥ ह्मणेचलाजीआतांत्वरित ॥ नरसीझिडकावोनिदेत ॥
तोंपडद्यासीधक्कालागला ॥ २५ ॥ तेणेंपडदापडलागळून ॥ भीतरीजोंपाहेब्राह्मण ॥ तोंअगणितअहेरजाण ॥ वस्त्रेंभूषणेंपडिलेती ॥
॥ २६ ॥ ऐसेंकरितांअवलोकन ॥ ब्राह्मणतेथेंगेलाधांऊन ॥ सर्वांसीसांगेवर्तमान ॥ ह्मणेजीचलावेंतेथेंआतां ॥ २७ ॥ तुमचाव्याही
दिसेदरिद्री ॥ परीधनवंतआहेभारी ॥ कायवर्णूंमीत्याचीथोरी ॥ लागलेढेरअहेराचे ॥ २८ ॥ विहीणह्मणेकांकरितांथट्टा ॥ पहिलेंचि
माहितहोताकरंटा ॥ तुह्मीसर्वहीपडिलांहट्टा ॥ ह्मणोनित्यासीबोलाविलें ॥ २९ ॥ विप्रह्मणेसत्यसाचार ॥ बोलतोंशपथपुरःसर ॥ आश्चर्य
सकळांवाटलेंथोर ॥ ह्मणतीपाहूंचलाकैसें ॥ २३० ॥ ह्मणोनिधांवलेचौघेचार ॥ तेथेंयेऊनपाहतीसत्वर ॥ तोंअमोल्यशरीरींअलंकार ॥ ऐसा
गुमास्ताबैसलासे ॥ ३१ ॥ अहेराचेलागलेढेर ॥ धनवस्त्रादीअलंकार ॥ गुमास्ताह्मणेकायउशीर ॥ चलासत्वरयाआतां ॥ ३२ ॥ ऐसापहातां
चमत्कार ॥ विहिणीसीकळवितीसमाचार ॥ मगधांवोनिआलेसमग्र ॥ योग्यतेनुसारपुढेंहोती ॥ ३३ ॥ ॥ मू०क० ॥ गांव पहरायो छबि छायो
जस गायो अहो हाटक रजत उभै पाथरहूं आयेहे ॥ रही गई एक भूले लिखन अनेक जहां लैहो ताहिपास जापे सब मिल पायेहे ॥ बिनती
करति बेटि दीजियेज्यु रहे लाज दियो मंगवाई हरि फेरिके बुलायेहे ॥ अंग न समाति सुता तातको निरखी रंग संग चली आई पतिआदि
बिसरायेहे ॥ १३ ॥ ॥ टी०ओ० ॥ जांवयापासूनआरंभझाला ॥ प्रथमतयासीअहेरकेला ॥ जोपहातांसर्वजनांला ॥ प्राप्तजहालीतटस्थता

॥३४॥अमौल्यवस्त्रेंअलंकार ॥ कधींनपाहिलेदृष्टीवर ॥ यापरीदेतसेअहेर॥पाहोनिआनंदसर्वत्रां॥ ३५ ॥ यादीप्रमाणेंएकएक ॥ अहेर
लाहोनिपावतीसुख ॥ परीत्यादोघांसीहोतसेदुःख ॥ जिहींपाषाणलिहिलेहोते ॥ ३६ ॥ ह्मणतीआह्मीभाग्यहीन ॥ लिहिलेआपुल्याच
करेंपाषाण ॥ अत्यंतहोवोनिम्लानवदन ॥ दीनहोऊनबैसले ॥ ३७ ॥ सर्वगांवींचेनारीनर ॥ पावोनिवस्त्रेंअलंकार ॥ सुखानेंकरिती
जयजयकार ॥ नरशीचेंयशगाताती ॥ ३८ ॥ त्याअलंकारवस्त्रेंकरून ॥ सर्वदिसतीशोभायमान ॥ परीउभयतांदीनवदन ॥ जिहीं
पाषाणलिहिलेहोते ॥ ३९ ॥ तयाउभयतांलागोन ॥ एकासीसोन्याचादिलापाषाण ॥ चांदीचादिधलाएकाकारण॥ दोघाचेंमनतोष
विलें ॥२४०॥ ऐसाकरोनिचमत्कार ॥ गुप्तजाहलेशार्ङ्गधर ॥ तेंअद्यापियशअपार ॥ संतसज्जनगाताती ॥ ४१॥ विहीणजेनिंदाकरी
तहोती ॥ तेचिनरसीचीकरीस्तुती ॥ माझ्याऽव्याह्यासारिखानिश्चिती ॥ दुसराजगतींकोणीनसे ॥ ४२ ॥ मुख्यजगाचीहेचिरीती ॥
जेकांकोणीघेतीदेती ॥ तेचिसकळांमान्यहोती ॥ येरवींकोणासीकोणीनपुसे ॥४३॥ असोयेवोनिजगज्जीवन॥ अहेरदिधलासकळांला
गून ॥ परंतुवराचीआतेबहिण ॥ नाहींमिळालातिजलागीं ॥४४॥ यादीमाजीगांवलिहितां ॥ तिचेंविसरलेंनांवतत्त्वता ॥ तेयेवोनिक
रीआकांता ॥ कुंवरसेनेच्यासासूजवळी ॥ ४५ ॥ तेह्मणेमीकायकरावें ॥ कुंवरसेनेसीत्वांप्रार्थावें ॥ जिचेनियोगेंसकळांपावे ॥ तिचेचि
भावेंचरणधरीं ॥ ४६ ॥ मगतीबाईघरांतजाऊन ॥ कुंवरसेनेसीकरीविनवण ॥ तेव्हांतेसासूसीह्मणेआपण ॥ पुन्हालचांडकायलावि
लें ॥ ४७ ॥ पहिलेंचितुह्मासीकथिलाभाव ॥ कोणाचेंयादींतनरहावेंनांव ॥ आतांलाविलापुन्हाउपद्रव ॥ कायह्माणावेंतुह्मासी ॥ ४८ ॥
तेव्हांसासूहनूधरून ॥ कुंवरसेनेसीविनवीआपण ॥ ह्मणेमजवरीकृपाकरून ॥ इजलाकांहींदेववावें ॥ ४९ ॥ मगजाऊनीकुंवरसेना ॥
बहुताताचीकरीप्रार्थना ॥ इजलाकांहींदेइजेजाणा ॥ तेणेंराहीललाजमाझी ॥२५०॥ नरसीनेंतिचापहातांआग्रह ॥ प्रार्थिलापुन्हालीला
विग्रह ॥ ज्यापासावसर्वसंग्रह ॥ त्रैलोक्यवैभवअसेकीं ॥ ५१ ॥ ह्मणेजीयावेंदीनदयाळा ॥ आपुल्यालेंकीचापाळावालळा ॥ ऐसेंह्मण
तांघनसांवळा ॥ घेऊनआलाअहेर ॥ ५२ ॥ केलात्यास्त्रियेचासत्कार ॥ ऐसापहातांचमत्कार ॥ कन्येसीदाटलागहिंवर ॥ ताताचाअ

पारमहिमापहातां ॥ ५३ ॥ प्रेमनसांवरेशरीरांत ॥ ह्मणेकींमाझेंधिग्जीवित ॥ ऐसामाझासमर्थतात ॥ जयाश्रीनाथवश्यअसे ॥ ५४ ॥
तयाचामीसोडोनिसंग ॥ संसाराचेंकरितेंसोंग ॥ ऐसेंबोलतचढलारंग ॥ पडलाविसरपतिआदीचा ॥ ५५ ॥ तैसीचबापासवेंजाण ॥
कुंवरसेनानिघेआपण ॥ राधारमणाचेंलागलेंध्यान ॥ देहाचेंभाननसेचि ॥ ५६ ॥ ॥ मू०क० ॥ ॥ सुता हूति दोइ भाइ भक्ति
रहि घरहोंमें एक पतित्यागि एक पतिहू न कियोहे ॥ भूमिमे फिरत उभै गाइनि सो चाइनिसो धनसेन भेट काहु नाम कहि दि
योहे ॥ आइ लागि गाइवेको कही समुझाइ अहो पाइवेको नही कछू पावे दुःख हियोहे ॥ चाहे हरिभक्ति तो मुंडाइके लडाय
लीजे कीजे बार दूरि रही प्रेमरस पियोहे ॥ १४ ॥ ॥ टी०ओ० ॥ यापरीतेकुंवरसेना ॥ आणीदुसरीरतनसेना ॥ ह्यानरसीच्या
दोघीकन्या ॥ पूर्णभिजल्याभक्तिरंगीं ॥५७॥ दोघीहीराहिल्याघरींसवेग ॥ एकीनेंकेलापतित्याग ॥ नघडलाएकीसकांतयोग ॥ मुळीं
चलमकेलेंनाहीं ॥ ५८ ॥ श्रोत्यांलागींऐसेंऐकतां ॥ कांहींशंकाउपजेलचित्ता ॥ ऐशाथोराच्याअसोनिसुता ॥ आचरल्याकैशाविपरीत
॥ ५९ ॥ कैसीहीकामिनीअधमजाती ॥ दशदोषयुक्तअसल्यापती ॥ तरीतयाचात्यागनकरिती ॥ विपरीतरीतीकेलीयांणीं ॥२६०॥
तरीतयाचेंऐकावर्म ॥ देवमिळेतरीकरिजेअधर्म ॥ ऐसेंबोलतीसंतउत्तम ॥ तैसेंचीकर्मकेलेंतेहीं ॥ ६१ ॥ पहाप्रल्हादबळीगोपिका ॥
बिभीषणेंकायकेलेंदेखा ॥ एकाजोडिलेंवैकुंठनायका ॥ शास्त्रधर्मासीनपाहिलें ॥६२॥ मुख्यतोचिभाग्यवंत ॥ जेणेंजोडिलालक्ष्मीकांत ॥
इतरजेकांहींधर्मयुक्त ॥ सौभाग्यहीनजेवींस्त्रिया ॥ ६३ ॥ असोआणीकऐकाचरित्र ॥ दोघीजणीवेश्यासुंदर ॥ नृत्यगायनींपरमचतु
र ॥ देशावरासीनिघाल्या ॥ ६४ ॥ ऐसातयांसीलागलामुहूर्त ॥ कोठेंनद्रव्याचीगांठपडत ॥ देशोदेशींफिरतफिरत ॥ जुनागडासी
पातल्या ॥ ६५ ॥ तेथेंहीबहूतउपायकरिती ॥ परीहोईनाधनप्राप्ती ॥ कुटिलदुर्जनउपहासिती ॥ कायसांगतीदोघींतें ॥ ६६ ॥ एथेंए
कअसेमहाजन ॥ नरसीतयाचेंनामाभिधान ॥ तुह्मासीतयाचेंदावितोंसदन ॥ मोठाधनवंतअसेतो ॥ ६७ ॥ तुमच्यागुणांचीजाणेथो
री ॥ परमउदारअसेभारी ॥ उदासराहेलोकाचारी ॥ दावीवरीवरीवैराग्य ॥ ६८ ॥ तुह्मासारिखेगेल्याजाण ॥ आर्धीदेतसेतोटाळोन ॥

ज्यासीहिठाऊकीअंतरखूण ॥ राहतीदृढपणधरोनिते ॥ ६९ ॥ मगतयासीमिळेअपार ॥ ऐसातयाचाअसेविचार ॥ तुह्मीकरोनिदृढअंतर ॥
निःशंकहोऊनगावेंतेथें ॥ २७० ॥ ऐसाविचारसांगोनियां ॥ घरदिधलेंदावोनियां ॥ मगत्यावेश्यादोघीस्त्रिया ॥ करित्याजाहाल्यातैशा
चि ॥ ७१ ॥ सारंगीतबलामेळवून ॥ देहावरीसाजघालोन ॥ नरसीच्याघरांतजाऊन ॥ एकाएकींउभ्याराहिल्या ॥ ७२ ॥ गायना
सीआरंभकरिती ॥ हावभावनृत्यांसीदाविती ॥ नरसीतयातेंसमजाविती ॥ हेंकायआपणकरीतसां ॥ ७३ ॥ येथेंतुह्मासीकरितांगाय
न ॥ एकहीकवडीनमिळेधन ॥ आह्मीदरिद्रीअकिंचन ॥ द्रव्यकोठूनद्यावेंतुह्मा ॥ ७४ ॥ वृथातुह्मासीहोतीलकष्ट ॥ पावालहृदयींदुःख
वरिष्ठ ॥ कायतुह्मासीनदिसेस्पष्ट ॥ कटीकौपीनविराजे ॥ ७५ ॥ त्यादोघींचेंमहत्पुण्य ॥ नरसीजीचेंघेतांदर्शन ॥ वृत्तीगेलीपालटोन ॥
बोलतीवचनकायतेव्हां ॥ ७६ ॥ आह्मीआपुलीसेवाकरून ॥ येथेंचिआतांघालवूंदिन ॥ ऐसेंदोघींचेंऐकतांवचन ॥ नरसीआपणका
यबोलती ॥ ७७ ॥ जरीश्रीहरीचीकरावीभक्ती ॥ ऐसीइच्छाअसेलचित्तीं ॥ तरीअलंकारवस्त्रेंनिश्चिती ॥ सर्वसंपत्तीत्यागावी ॥ ७८ ॥
मस्तकावरीजेंवैभव ॥ त्याचेंमुंडनकरावेंसर्व ॥ हृदयामाजीधरोनिभाव ॥ हरीसीशरणरिघावें ॥७९॥ ऐसेंत्याचेंऐकतांवचन ॥ दोघींसी
उपजेवेराग्यजाण ॥ बरोबरीजेहोतेजन ॥ वैभवदेऊनवाटेलाविले ॥ २८० ॥ नापिकासीबोलावून ॥ मस्तकाचेंकेलेंवपन ॥ नरसीचा
उपदेशघेऊन ॥ करितीप्राशनप्रेमरसा ॥ ८१ ॥ ॥ मू०क० ॥ मिली उभयसुता रंग झिली संग गाइनि वे चाइनिसो नृत्य
करे भाइनि बताइके ॥ सालंग हे नाम मामा मंडलीक मंत्री रहे कहे बिपरीति बडी राजासो सुनाइके ॥ बडेबडे दंडी अरु पंडित स
माज कियो करो वाको भंडी देस दीजिये छुडाइके ॥ आये चार चोबदार चलोजू विचार कीजे भयो दरबार हमे दियोहे पठा
इके ॥ १५ ॥ ॥ टी०ओ० ॥ मगत्यावेश्यांच्यासवेंजाण ॥ दोघीकन्याकरितीगायन ॥ प्रेमरंगींनिमग्नहोऊन ॥ परमानंदेंनृत्यकरि
ती ॥ ८२ ॥ सन्मुखनिरखोनिदेवाधिदेव ॥ निःशंकदावितीहावभाव ॥ मनींप्रेमाचाभरेआव ॥ नाठवेभानदेहाचें ॥ ८३ ॥ प्रेमतयांचें
ऐसेंपाहून ॥ भजनायेतीभाविकजन ॥ सद्भावअंतरींउपजोन ॥ उपदेशघेतीनरसीचा ॥ ८४ ॥ बहुतमिळतीनारीनर ॥ होतसेभजनानं

दथोर ॥ तेंपाहोनिद्विजवर ॥ मनामाजीद्वेषकरिती ॥८५॥ कलीमाजीबहुधापुरुष ॥ नसाहतीपरोत्कर्ष ॥ सर्वब्राह्मणधरोनिरोष ॥ करिती
विचारपरस्परें॥८६॥ ह्मणतीनरसीनेंभ्रष्टाकार ॥ आपुल्यानगरींकेलाफार ॥ सर्वमोडोनिकर्माचार ॥ नामींतत्परजनकेले॥ ८७॥ कोणी
आपणानपुसेजन ॥ नरसीमेहत्याचेधरितीचरण ॥ तरीतेंकांहींयुक्तीकरोन॥ दूरकरावेंबंडयाचें ॥८८॥ तंवतोसालंगनामेंकरून॥ नरसी
मेहत्याचामामाजाण॥ रायाचाअसेनायबदिवाण॥ मोठाकर्मठतोअसे ॥८९॥ तयापाशींगेलेब्राह्मण॥ सांगतीनरसीचेंवर्तमान ॥ ह्मणती
तुमच्यावंशींजाण ॥ यापरीभ्रष्टनिघाला ॥ २९० ॥ कर्मसोडोनिकरीभजन ॥ त्याचिमार्गासीलावीजन ॥ ऐसेंविप्रांचेंऐकतांवचन ॥
तोहीदुर्जनकोपला ॥ ९१ ॥ सवेंघेऊनिसर्वब्राह्मण ॥ रायापाशींगेलाआपण ॥ तयाचेकर्णींवर्तमान ॥ करीनिवेदनविपरीत ॥ ९२ ॥
ह्मणेजीमाझाभाचासत्य ॥ नरसीनामेंअसेविदित ॥ तेणेंमांडिलेंविपरीतकृत्य ॥ बहुतअनर्थकरीतसे ॥ ९३ ॥ मेळवोनिगांवींच्यासर्व
अंगना ॥ तयांतेंशिकवीनृत्यगायना ॥ नानाप्रकारेंकरीवल्गना ॥ करूंमीवर्णनाकोठवरी ॥ ९४ ॥ ऐसेंरायेंऐकतांजाण ॥ सकळविप्रां
सीपुसेआपण ॥ तेहीतैसेंचिकरितीभाषण ॥ तेव्हांरायासीकोपआला ॥ ९५॥ मोठेमोठेदंडीजाण॥ आणीकपंडितविद्वज्जन ॥ सर्वगांवीं
चेमेळवून॥ सभाकरविलीरायानें ॥९६ ॥ सकळांलागींपुसतांराय ॥ सर्वांचापडेहाचिआशय ॥ नरसीकरितोबहूअन्याय ॥ त्याचीविटंबना
करावी ॥९७॥ करोनियांकाळेंवदन ॥ गाढवावरीबैसवोन॥ काढोनद्यावेंगांवांतोन॥ ऐसाविचारसिद्धजाहला ॥९८॥ तोंएकबोलिलासुज्ञ
ब्राह्मण ॥ त्यासीयेथेंआणवोन॥ नानाप्रकारेंप्रश्नकरोन॥ वादघालोनजिंकावा ॥९९॥ मगतयाचीकराविटंबना॥ सर्वांच्याहीआलेंमना ॥
चोपदारतैंचौघेजाणा ॥ बोलावणेंधाडिलेंतयासी ॥३००॥ भूपतीदूतांआज्ञाकरी॥नरसीलागींआणाझडकरी॥ नयेजरीत्याबलात्कारीं ॥
धरोनियेथेंआणावा ॥ १ ॥ ॥ मू०क० ॥ चारो तुम जावो टरि भयो हमे राजाडर सकै कहा करी आजु चले संगसंगही ॥
नाचत बजावत ये चली ढिंग गावत सुभावत मगन जानि भीजिगई रंगही ॥ आये वाहिभांति सभा प्रबल बहूत भई तऊ
बोले रीती यह युवती प्रसंगही ॥ कही भक्तिगंध दूरि पढे पोथी परी धूरि श्रीशुकसराही तिया माथुरनि भंगही ॥ १६ ॥

॥ ॥ टी०ओ० ॥ ऐशारायाच्याआज्ञेवरून ॥ चोपदारआलेरोषेंकरून ॥ नरसीचेद्वारींउभेराहून ॥ दीर्घशब्देंहाकामारिती ॥ २ ॥
अहोमेहतेजीचलासत्वर ॥ रावपाचारीतुह्माझडकर ॥ यावरीबाहेरननिघालजर ॥ तरीओढूननेऊंबळें ॥ ३ ॥ यापरीचेंऐकतांवचन ॥
नरसीबाहेरआलेजाण ॥ दूतांसीत्यांचेंहोतांदर्शन ॥ नम्रहोऊनहातजोडिती ॥४॥ ह्मणतीआपणारावपाचारी ॥ येरूह्मणेजीयेतोंसत्वरी ॥
तुह्मीचलावेंपुढेंझडकरी ॥ यावरीसांगतीदूतआज्ञा ॥ ५ ॥ आमुच्यासवेंचलावेंसत्वर ॥ नातरीरायाचीआज्ञाक्रूर ॥ आणावेंकरोनिबलात्कार ॥
ऐकतांचनरसीसिद्धझाले ॥ ६ ॥ कन्याआणिकळवांतिणी ॥ चौघीजणींतेंबोलेवचनीं ॥ तुह्मीआमुचासंगसोडोनी ॥ जावेंयेथोनिस्वस्थआतां ॥ ७ ॥
आह्मावरीआलाप्रसंग ॥ भूपतीचाअसेराग ॥ तुह्मीकरोनिवृत्तीअभंग ॥ भजाश्रीरंगसर्वदा ॥ ८ ॥ यावरीत्याकायबोलती ॥
जैसीतुमचीहोईलरीती ॥ तैसीआमुचीहोवोगती ॥ परीनसंगतीसोडूंआतां ॥ ९ ॥ कायआपुलेंकरीलराव ॥ साह्यआपणादेवाधिदेव ॥
ऐसाधरोनिसद्दृढभाव ॥ सर्वेंनरसीच्यानिघाल्या ॥ ३१०॥ नूपुरेंबांधोनिचरणांस ॥ हातींघेऊनवाद्यसुरस ॥ आरंभोनिनृत्यगीतास ॥
प्रेमेंवाद्यांसवाजविती ॥ ११ ॥ यापरीभजनकरीतसुभट ॥ राजसभेच्याजातीनिकट ॥ प्रेमांतनिमग्नझालेउद्भट ॥ रंगअचाटओढवला ॥ १२ ॥
ऐसियापरीभजनकरीत ॥ नरसीआलेराजसभेंत ॥ भगवद्भक्तीचेंतेजअद्भुत ॥ सर्वहीस्तब्धबैसले ॥ १३ ॥ बहुतप्रबळझालीसभा ॥
परीसकळांचीगेलीशोभा ॥ मध्येंज्यापरीसूर्यउभा ॥ नरसीत्यापरीदिसतसे ॥ १४ ॥ जैसासूर्यापुढेंउल्लूक ॥ तैसापंडितबोलेएक ॥
अहोजीआपुलामार्गठीक ॥ परीहेंमतकोणतें ॥ १५ ॥ वारांगनेसारिखेंजाण ॥ भोंवतींबायकामेळवून ॥ भजनींकरितांनृत्यगायन ॥
यासीप्रमाणकायअसे ॥१६॥ ब्रह्मचारीवैष्णवपूर्ण ॥ तुमचेंऐसेंविषयाचरण ॥ सर्वगांवींच्यास्त्रियाजाण ॥ भ्रष्टआपणकेल्याकीं ॥१७॥
तेव्हांनरसीबोलेउत्तर ॥ आपणदिसतांपंडितचतुर ॥ बहुतपढल्यापोथ्यासुंदर ॥ परीत्याधुळींतटाकिल्या ॥१८॥ कांहींभक्तीचानसेगंध ॥
विद्याभिमानेंचढलामद ॥ तुमचीदृष्टीझालीअंध ॥ सारतात्पर्यकळेना ॥१९॥ वेदशास्त्रांचेंमुख्यसार ॥ भागवतपुराणांमाजीथोर ॥ तेथेंकोणताअसेप्रकार ॥
ऋषिपत्न्यादिगोपिकांचा ॥३२०॥ तिहींसांडोनिआपुलेभ्रतार ॥ तैसेचिसोडोनिआचारविचार॥ श्रीकृष्णभजनींझाल्या

तत्पर ॥ अष्टाकारसर्वकेला ॥ २१ ॥ शुकाचार्यब्रह्मचारी ॥ जोनिःसंगीसर्वप्रकारीं ॥ परीगोपींचेंप्रेमभारी ॥ वर्णितांअंतरींझुरतसे ॥ २२ ॥
त्यांतीलकायअसेविचार ॥ तुह्मीआह्मासीसांगासत्वर ॥ तेव्हांकोणासीनसुचेउत्तर ॥ म्लानहोऊनबैसले ॥ २३ ॥ ॥ मू०क० ॥ बोलि
उठ्यो विप्र एक छुछुकप्रसंग देखो कह्यो रसरंग भन्यो ढन्यो नृप पाइमे ॥ कहीजू बिराजो गाजो नितसुख साजो जाइ किये हरिराइ
बस भीजे रहो भाइमे ॥ धारो उर ओर सिरमोर प्रभूमंदिरमे सुंदर केदारो राग गावे भरे चाइमे ॥ शामकंठमाल टूट आवत रसाल
हिये देखि दुःख पाये परे विमुखसुभाइमे ॥ १७ ॥ ॥ टी०ओ० ॥ सर्वहीझालेतेजहीन ॥ तोंएकबोलोनिउठिलाब्राह्मण ॥ नरसीमे
हताभक्तपूर्ण ॥ याचाअनुभवअसेमजला ॥ २४ ॥ जेव्हांकन्येसीआलेंनहाण ॥ नरसीएकलेगेलेजाण ॥ साह्यजाहलेजगज्जीवन ॥
अहेरकेलासोयऱ्यांसी ॥ २५ ॥ अमोलिकवस्त्रेंभूषणें ॥ सकलगांवासीदिल्हींपूर्ण ॥ मीहीतेथेंहोतोंजाण ॥ देखिलेंनेत्रींआपुल्या ॥
॥ २६ ॥ ऐसेंरायासीकरितांकथन ॥ प्रेमरंगांतभरेब्राह्मण ॥ कंठआलासेगहिवरोन ॥ नेत्रींअश्रुवाहताती ॥ २७ ॥ ऐसेंरायानेंपहातां
लक्षण ॥ त्यासीहीआलेंगहिवरोन ॥ उठोनिसिंहासनावरून ॥ नरसीचेचरणबळकटधरी ॥ २८ ॥ हातजोडोनिकरीविनंती ॥ तैसीच
आपणकरावीरीती ॥ भजनकरावेंपरमप्रीती ॥ प्रेमसुखासीभोगावें ॥ २९ ॥ आतांआपणघरींजाऊन ॥ नृत्यगायनादिवाद्येंकरून ॥
परमानंदासीघ्यावेंपूर्ण ॥ क्षमाअपराधकरामाझे ॥ ३३० ॥ हरीसीवश्यकेलेंआपण ॥ तेथेंआमुचीगतीकोण ॥ कोणतुह्मासीकरी
विघ्न ॥ भावांतभिजोनरहासुखें ॥ ३१ ॥ यापरीतेथेंसभाजिंकोन ॥ नरसीमेहतानिघेआपण ॥ आपुल्यामंदिरींयेऊन ॥ भजनकरीत
अहर्निशीं ॥ ३२ ॥ हृदयामाजीजीवसेमूर्ती ॥ मंदिरींतेचिस्थापिलीहोती ॥ तिचेसन्मुखअतिप्रीती ॥ रागरागिणीगातसे ॥ ३३ ॥
नरसीमेहत्याचेमुखेंसुंदर ॥ प्रभूसीआवडेरागकेदार ॥ जेव्हांगायनाचायेतसेभर ॥ उत्साहदेवासीदाटतसे ॥ ३४ ॥ हरिकंठींचीमाळतु
टोन ॥ नरसीचेगळ्यांतपडेयेऊन ॥ हृदयींरसाळशोभेपूर्ण ॥ कायतोआनंदवर्णावा ॥ ३५ ॥ ऐसेंपहातांभाविकजन ॥ अनेकमिळती
तेथेंयेऊन ॥ प्रेमामाजीहोतीनिमग्न ॥ परमानंदवर्षतसे ॥ ३६ ॥ ऐसेंपहातांपरमसुख ॥ विन्मुखासीतेंवाटेदुःख ॥ तयाचास्वभावऐसा

देख ॥ पूर्वींपासोनपडिलासे ॥ ३७ ॥ ॥ मू०क० ॥ नृपती सिखायो जाइ वृथा जस छायो काचे सूतमे पुहायो हार टूटे ख्या
त करीहे ॥ माता हरिभक्त भूप कहो जिन करो कान तऊ बानि राजसकी माया मती हरीहे ॥ गयो दिंगि मंदिरके सुंदर मंगाइ
पाट ताको बटवाइ करी माला गुही धरीहे ॥ प्रभु पहिराइ कह्यो गाइ अब जानि परे भरे सुर राग और गायो पै न परीहे॥ १८॥
॥ ॥ टी०ओ० ॥ विप्रांलागीं आलाराग ॥ ह्मणतीयाचेंमाजलेंढोंग ॥ आम्हुचीप्रासीबुडालीसांग ॥ सर्वहीपूजितीलोकयातें ॥ ३८ ॥
यासीभजनांतकेदारराग ॥ प्रेमेंगायनकरितांसांग ॥ वश्यहोवोनियांरमारंग ॥ प्रसादमाळादेतसे ॥ ३९ ॥ तेणेंयासीलोकभजती ॥
येथेंकांहींनचलेयुक्ती ॥ यापरीअंतरींफारतळमळती ॥ तोंकायप्रसंगजाहला ॥ ३४० ॥ यात्राकरीतसंतमेळा ॥ नरसीमेहत्याचेघरींआ
ला ॥ तयाचाआदरकरावयाभला ॥ घरांतकांहींनसेचि ॥ ४१ ॥ लोकांपाशींमागेउधार ॥ कोणीनकांहींदेतीतिळभर ॥ ह्मणतीहातों
दिवाळखोर ॥ मगकायघ्यावेंयापासोनी ॥ ४२ ॥ तोंएकसाधुसावकार ॥ नरसीतयातेंविनवीफार ॥ गहाणठेवोनिरागकेदार ॥ द्या
वेंसाहित्यमजलागीं ॥ ४३ ॥ जोंवरीतुमचेंनफिटेउधार ॥ तोंवरीभजनींरागकेदार ॥ सर्वथानमीगाईसुंदर ॥ हासत्यनिश्चयजाणावा
॥ ४४ ॥ सावकारेंहेंघेतलेंलिहोनी ॥ साहित्यदेतसेमगकाढोनी ॥ नरसीमेहत्यानेंतेंघेवोनी ॥ घातलेंसंतांसीभोजन ॥ ४५ ॥ दुर्जनां
सीकळलेंवर्तमान ॥ केदाररागठेविलागहाण ॥ ह्मणतीसुंदरवेळाजाण ॥ आपणालागोनिसांपडली ॥ ४६ ॥ मगमिळोनिसर्वदुर्जन ॥
रायापाशींगेलेजाण ॥ जेणेंकल्पनाउठेपूर्ण ॥ ऐसेंरायातेंशिकविलें ॥ ४७ ॥ ह्मणतीपूर्वींआपणाजवळ ॥ नरसीमेहत्याचेअपराधसक
ळ ॥ निवेदिलेतेमनींकेवळ ॥ कांहींचनाहींआणिले ॥ ४८ ॥ आतांएकतयाचेंकपट ॥ तुह्मालागोनिदावितोंस्पष्ट ॥ लोकांमाजीय
शउद्धट ॥ वृथातोदुष्टमिरवीतसे ॥ ४९ ॥ ओवोनिकच्च्यासुतांतमाळा ॥ श्रीरंगाच्याघालीगळां ॥ भजनींनाचतांवेळवेळां ॥ तुटतसेमा
ळदणक्यानें ॥३५०॥ लोकांमाजीकरीप्रगट ॥ पाहोनिआम्हुचेंप्रेमउद्धट ॥ प्रसन्नहोवोनिवैकुंठपीठ ॥ माळाप्रसाददेतसे ॥ ५१ ॥ ऐसें
दुष्टांचेंऐकतांवचन ॥ कोपलेंरायाचेंअंतःकरण ॥ ह्मणेमीपरीक्षापाहीनपूर्ण ॥ ह्मणोनिजावयासिद्धजाहला ॥ ५२ ॥ तोंरायाचीमाताबृ

द्ध ॥ भगवद्भक्तीअसेशुद्ध ॥ पुत्रालागोनिकरीबोध ॥ हेंकायकरिसीबाळका ॥ ५३ ॥ अरेह्याद्दुर्जनांचेंवचन ॥ सर्वथाहीनकरींश्रवण ॥ सज्जनांसीअसावेंशरण ॥ करितांछलणनाशपावे ॥ ५४ ॥ पूर्वींपासोनिचारीयुगांत ॥ जिहींछळिलेभगवद्भक्त ॥ तयांसीझालाअधःपात ॥ पुराणींप्रख्यातअसेकीं ॥ ५५ ॥ ऐसेंशिकवीनानारीती ॥ परीभूपतीनाणीचित्तीं ॥ रजोगुणाचाबाणानिश्चिती ॥ हरिलीसेमतीमायेनें ॥ ५६ ॥ निजमातेचेंनायकोनिबोल ॥ भूपतीनिघालाउतावेळ ॥ नरसीमेहत्याचेमंदिराजवळ ॥ येऊनिआपणकायकरी ॥ ५७ ॥ किरमेजिरेशीममागवोन ॥ त्याचेंपक्केंसूत्रवळोन ॥ तयामाजीफुलेंओंवोन ॥ हारदेवासीसिद्धकेला ॥ ५८ ॥ मंदिरामाजीयेवोन ॥ श्रीहरीसीनमनकरोन ॥ आपुल्याहस्तेंमाळजाण ॥ कंठींघातलीदेवाच्या ॥ ५९ ॥ नरसीमेहत्यासीकरीभाषण ॥ आतांआपणकरावेंभजन ॥ कैसाप्रसादजगज्जीवन ॥ तुह्मासीदेतोपाहीनमी ॥ ३६० ॥ बहूजनांसीदावितादोंग ॥ प्रसाददेतोकींरमारंग ॥ आतांसमजोनिपडेलसांग ॥ जरीप्रसादनमिळाल्या ॥ ६१ ॥ तेव्हांनरसीमेहताआपण ॥ साजसर्वहीसिद्धकरोन ॥ प्रथमारंभींसुरभरोन ॥ आरंभकेलागायनासी ॥ ६२ ॥ केदाररागासीसोडोन ॥ आणीकरागांचेंकेलेंगायन ॥ परीनमाळापडेतुटोन ॥ जगज्जीवनप्रसन्ननोहे ॥ ६३ ॥

॥ ॥ मू०क० ॥ ॥ विमुख प्रसन्न भये तबतो उन्हाने दैन नयेनये चोज हरीसन्मुखहू भाखिये ॥ जाने ग्वालबाल एक माल गही रहे हिये जीये लग्यो यही रूप कह्यो लाखलाखिये ॥ नारायण बडे महा अहा मेरे भाग लिख्यो करै क्यों न दूरि छबी पूरी अभिलाखिये ॥ मेरो कहां जाइ आप परसे कलंक तुह्मै राखिये निसंक हार भक्त मारि नाखिये ॥ १९ ॥ ॥

॥ टी०ओ० ॥ ऐसापहातांचमत्कार ॥ विन्मुखप्रसन्नझालेफार ॥ ह्मणतीआतांसर्वकसर ॥ नरसीमेहत्याचीनिघेलकीं ॥ ६४ ॥ माजविलेंहोतेंबहूदोंग ॥ आतांतोबाहेरपडलारंग ॥ मोठ्यानेंबोलोनऐसेंसवेग ॥ हातावरहातहाणिती ॥ ६५ ॥ नरसीमेहताहेंपाहोन ॥ मनामाजीझालाखिन्न ॥ देवाचेहृदयींलागेपूर्ण ॥ ऐसेंभाषणआरंभिलें ॥ ६६ ॥ नवेनवेकौतुकयुक्त ॥ हरीचेसन्मुखबोलबोलत ॥ हेंकायदेवातुह्मासीउक्त ॥ उपेक्षाकरणेंआजिमाझी ॥ ६७ ॥ आतांमजलाकळलेंजाण ॥ गुराख्याचेनंदनपूर्ण ॥ ह्मणोनिऐसेंकृपणपण ॥ एक

तीमाळदेववेना ॥६८॥ हृदयींधरोनिराहिलेमाळा ॥ येणेंआश्चर्यवाटेमजला ॥ एकजीवासीखेदवाटला ॥ चमत्कारहापाहोनी ॥ ६९ ॥
हेंचितुमचेंगोपरूप ॥ शुकसनकादीभक्तअमूप ॥ बोलिलेपूर्णब्रह्मस्वरूप ॥ लक्षप्रकारेंकरोनियां ॥३७०॥ तरीकायतेबोलतीखोट ॥ आ
पणनारायणमहाश्रेष्ठ ॥ अनेकभक्तांचेंहरिलेंसंकट ॥ माझेचिभाग्यींलिहिलेंऐसें ॥ ७१ ॥ सिद्धकेलेंजरीआपण ॥ मीचिएकभाग्यहीन॥
तरीआपुलीमूर्तिजाण ॥ हृदयामाजीठसलीसे ॥७२॥ हृदयींअभिलाषजडलापूर्ण ॥ तोकांनदूरकेलाआपण ॥ वृथाचिमातेंभाग्यहीन ॥
लोकांमाजीसिद्धकरितां ॥ ७३ ॥ आपणह्मणालऐसेंकांहीं ॥ तुजलामाझेंध्यानपाहीं ॥ परीमजतुझाआठवनाहीं ॥ तरीएकविनंतीऐ
किजे ॥ ७४ ॥ जैसाकैसातरीतुझा ॥ लोकांतलौकिकझालामाझा ॥ आतांसर्वहीमाझीलज्जा ॥ तुजगोविंदाअसोकीं ॥ ७५ ॥ जरी
कांहींउणेंपडतां ॥ कायजाईलमाझेंआतां ॥ कलंकलागेलतुजअनंता ॥ आपुल्याचित्ताविचारी ॥ ७६ ॥ माझियाकलंकाचीचिंता ॥
तुजकायरेनरसीमेहता ॥ ऐसेंह्मणोनिश्रीअनंता ॥ प्रसादमाळानदेसी ॥७७॥ तरीदेमाळानिःशंकहृदया ॥ धरोनिरहावीजीलवलाह्या ॥
परंतुभक्त्याहमेकयाग्राह्यः ॥ हरताळलाविजेयावचनासी ॥ ७८ ॥ भक्तभक्तीआजपासोन ॥ दूरटाळावीसत्वरपिटोन ॥ स्वस्थरहावेंनिः
शंकहोऊन ॥ कानांतबोटेंघालोनियां ॥ ७९ ॥ ऐसेंनानाप्रकारेंकरून ॥ देवासीबोलेशब्दखोंचून ॥ कळवळोनितैंजगज्जीवन ॥
कायआपणकरिताझाला ॥ ३८० ॥ ॥ मू०क० ॥ रहे तहां साह किये उभै ले बिबाह जाने तिया एक भक्त कहे हरिको
दिखाइये ॥ नरसी कहीही भले सोइ प्रभु बानि लई सांच करी दई गये राग छुटवाइये ॥ बोले पट खोली दिये किये दरसन
ताने ताने पट सोवे वह कही देवो भाईये ॥ लिये दाम काम कियो कागद गहाय दियो दियो कछु खाइवेको पायो ले भिजाइ
ये ॥२०॥ ॥ टी०ओ० ॥ केदाररागाचीबहुप्रीती ॥ गहाणठेविलातोनिश्चिती ॥ सोडवावयातयाप्रती ॥ करीतैंयुक्तीजगन्नाथ ॥ ८१ ॥
तेथेंजोराहेसावकार ॥ जयाचेघरींरागकेदार ॥ गाहाणठेविलाहोतासुंदर ॥ तयानेंलग्नेंदोनकेलीं ॥ ८२ ॥ त्यामाजीजेधाकुटीकांता ॥
भक्तभावार्थीपतिव्रता ॥ नरसीमेहत्यासीशरणतत्त्वता ॥ होउनीउपदेशघेतला ॥ ८३ ॥ सद्गुरूचेचरणधरून ॥ वारंवारविनवीआपण ॥

मजलागोनिद्यावेंदर्शन ॥ जगज्जीवनसांवळ्याचें ॥ ८४ ॥ तिचापाहोनिभावसर्वथा ॥ बरेंबोलिलेनरसीमेहता ॥ तोचिघेऊनिशब्दत
त्वतां ॥ सत्यकेलासेभक्तवत्सलें ॥८५॥ रागसोडवावयालागोन ॥ नरसीमेहत्याचेंरूपधरोन॥ तितुक्यारात्रीमाजीआपण ॥ सावकारा
चेघरींआले ॥ ८६ ॥ दारापासींउभेराहून ॥ हाकामारितीजगज्जीवन ॥ तोंधाकुटीकांताजाण ॥ सावकाराचीजागीझाली ॥ ८७ ॥
सद्गुरूचाशब्दऐकोन ॥ धांवतआलीगडबडोन॥ दारउघडोनिकरीनमन॥ भक्तिभावार्थेंकरोनियां ॥८८॥ ऐसीतिजलादिधलीभेट ॥ ति
नेंहीदर्शनकेलेंस्पष्ट ॥ शरीरावरीओढोनिपट ॥ सावकारनिद्राकरीतसे ॥ ८९ ॥ श्रीहरीतयातेंहाकमारी॥ अहोशेटजीउठाझडकरी ॥
आपुलेंदामघ्यावेंसत्वरी ॥ हिशोबकरोनिसाहित्याचा ॥ ३९० ॥ केदाररागजोअसेगहाण॥ आमुचाआह्मासीद्यापरतोन ॥ ऐसेंदेवाचेंऐ
कतांवचन ॥ सावकारआपणजागाझाला ॥ ९१ ॥ ह्मणेजीइतुक्यारात्रींकष्ट ॥ कायकारणेंकेलेउद्भट ॥ कांहींमाझातगादास्पष्ट॥ तुह्मा
लागोनिहोताकीं॥ ९२॥ अहोजीकेदाररागउत्तम ॥ त्याचीमजलाआवडीपरम ॥ त्यावीणभजनानयेप्रेम॥ ह्मणोनिधांवघेतली ॥९३॥
ऐसेंसावकारेंऐकतांवचन ॥ श्रीहरीतेंनमनकरोन ॥ दामसर्वहीघेमोजून ॥ नरसीमेहत्याचेंकामकरी ॥ ९४ ॥ केदाररागाचेंगहाणखत॥
श्रीहरीचेहातींदेत ॥ उभयतांहीजोडोनिहात ॥ विनंतीकरितीकायतेव्हां ॥ ९५ ॥ अहोजीआपुलेंकार्यझालें॥ एकविनंतीऐकावहिलें॥
आमुचेघरींउच्छिष्टभलें ॥ कृपाकरोनिटाकावें ॥ ९६ ॥ ऐसियापरीविनवून ॥ फराळासीदेतीआणून ॥ देवानेंतेंभक्षणकरून ॥ गुप्तजा
लेतेधवां ॥ ९७ ॥ ऐसापहातांचमत्कार ॥ उभयतांचेंद्रवलेंअंतर ॥ ह्मणतीयेवोनिशारंगधर ॥ कार्यसारिलेंभक्ताचें ॥ ९८ ॥ सावकारा
चीधाकुटीकांता ॥ हर्षझालातिच्याचित्ता ॥ ह्मणेअहोजीसद्गुरूनाथा ॥ सत्यवचनार्थाकेलेंजी ॥ ९९ ॥ ॥ मू०क० ॥ गहने धऱ्यो
हो राग केदारो साहघर धरी रूप नरसीको जाइके छुडायोहे ॥ कागद लै डाऱ्यो गोद मोद भरी गाइ उठे आए झनझन शाम
हार पहिरायोहे ॥ भयो जैजैकार नृप पाइ ले लपटाइ गयो गह्यो हिये भाव सो प्रभाव दरसायो हे ॥ बिमुख खिसाने भये गये उठी
नये नाही बिना हरिकृपा भक्तिपंथ जात पायोहे ॥ २१ ॥ ॥ टी०ओ० ॥ यापरीतोकेदारराग ॥ सावकाराचेघरींसांग ॥ गाहाण

ठेविलाहोतासवेग ॥ आणीश्रीरंगतयातें ॥ ४०० ॥ नरसीमेहत्याचेंरूपघेऊन ॥ सावकाराचेघरींजाऊन ॥ रागआणिलासोडवून ॥ न
लगतांक्षणश्रीहरीनें ॥ १ ॥ इकडेनरसीकरितांभजन ॥ कष्टपावलाबहूतजाण॥ थट्टाकरितीसर्वदुर्जन ॥ तेणेंउद्विग्नहोतसे ॥ २ ॥ ओंटी
पसरोनियांजाण ॥ हरीसीभाकितीदीनपण ॥ तोंगहाणखतओटींतपूर्ण ॥ जगज्जीवनटाकीतसे॥ ३ ॥ एकाएकींदचकोन॥ नरसीमेह
हतापाहेआपण ॥ तोंदेखिलारोखाजाण॥ पावतीयुक्ततेधवां ॥४॥ तेव्हांपरमानंदेंकरून॥ केदारयुक्तकरीगायन॥ प्रेमाश्रूनेंभरलेनयन॥
प्रीतीनेंदेवाआळवी ॥ ५ ॥ तंवतोआश्चर्यझालेंनवीन ॥ नित्यजोप्रसादयेतसेजाण ॥ श्रीकंठांतीलमाळतुटोन॥ नरसीच्यागळ्यांतयेतसे
॥ ६ ॥ तयेदिवशींजगज्जीवन ॥ आपुल्याहस्तेंमाळकाढोन ॥ नृत्यकरीतपुढेंयेऊन ॥ नरसीच्यागळ्यांतघातली॥ ७ ॥ ऐसाहोतांचिच
मत्कार ॥ एकचिझालाजयजयकार ॥ हेंपाहोनियांनृपवर ॥ धांवोनिचरणबळकटधरी ॥ ८ ॥ हृदयामाजीधरोनिभाव ॥ ह्मणेजीतुम
चापूर्णप्रभाव ॥ आजिदाविलामजअपूर्व ॥ देवाधिदेववश्यतुह्मां ॥ ९ ॥ ऐसेंपहातांविन्मुखजन॥ मनामाजींखिन्नहोऊन॥ सकलही
खालींमानकरोन ॥ गेलेउठोनतेधवां ॥४१०॥ परंतुऐसासाक्षात्कार ॥ दृष्टीसीपहातांनवळेअंतर ॥ नकरितांनरसीसीनमस्कार ॥ तैसेचि
दुर्जनगेलेकीं ॥ ११ ॥ यांतीलहेंचिमुख्यकारण ॥ विनाहरीच्याकृपेवांचून ॥ मार्गभक्तीचानमिळेजाण॥ सज्जनद्वेषेंनवळेहरी ॥१२॥ अ
सोभक्तांसीजगज्जीवन॥ अनेकप्रकारेंरक्षीआपण॥ आणिकएकअद्भुतजाण॥ चरित्रजाहलेंतेंऐका ॥१३॥ ॥मू०क०॥ करन सगाइ आ
यो पायो वर भायो नांहि घरघर फिरो द्विज नरसी बतायोहे॥ आय सुख पाय पूछ्यो सुतसो दिखाइ दियो कियो लै तिलक मन-देखत चुरायो
हे॥ आज्ञु हम लाइक न तुम सब लाइक हो साइकसो छूव्यो जाइ नाम ले सुनायोहे॥ सुनतही माथो ठोकी कहे तालकूटा वह वाल वोरि आ
वो जावो फेरि दुःख छायो हे॥२२॥ ॥टी०ओ०॥ जुनागडाच्यानिकट॥ शामपुरनामेंनगरउत्कृष्ट ॥ त्रिपुरांतकनामेंराजासुभट ॥ तेथीलरा
ज्यकरीतसे ॥१४॥ तयासीकन्याअसेएक॥ तिचाविवाहकरावाठीक॥ ह्मणोनीजामातपहावयासम्यक॥ पुरोहितासीधाडिलें ॥ १५॥ राज
पुत्रकोणीतरी॥ अथवासावकारतनयभारी॥ वरपाहोनिसुंदरपरी॥ तिलकतयासीदेइजे ॥१६॥ मगतोदेशोदेशींआपण ॥ पहावयासीफिरे

ब्राह्मण॥ परीकोठेंहीसुलक्षण॥ वरतयासीनमिळाला॥१७॥ यापरीतोवरपहात॥ जुनागडासीआलाफिरत॥ घरोघरींशोधकरीत॥ फिरतसे
परीमिळेना ॥ १८ ॥ तोंचांडाळचौकडींत ॥ ब्राह्मणबैसलेहोतेतेथ ॥ तिहींरायाचापुरोहित ॥ पाहोनित्यातेंबोलती ॥ १९ ॥ अहोजी
तुह्मीकायपहातां ॥ जरीपाहिजेवरतत्त्वता ॥ तरीतुह्मासीसुंदरआतां ॥ सावकारयेथेंदावितों ॥ ४२० ॥ थोरतयाचाव्यापार ॥ चाले
सर्वहीपृथ्वीवर ॥ देशोदेशींगुमास्तेसुंदर ॥ कोट्यावधीचेरहाती ॥ २१ ॥ नरसीतयाचेंनामाभिधान ॥ असेसर्वहीगुणसंपन्न ॥ परीत
याचीवृत्तीजाण ॥ वैराग्यशीळअसेकीं ॥ २२ ॥ सर्वहीधंदासोडून ॥ कौपीनघालोनिकरीभजन ॥ परीगुमास्तेपरमसज्ञ ॥ व्यापारत्या
चाचालविती ॥ २३ ॥ नरसीसहकुटुंबआपण ॥ सर्वदाराहेउदासीन ॥ रात्रंदिवसहरिकीर्तन ॥ प्रेमयुक्तकरीतसे ॥ २४ ॥ तरीतुह्मीक
रावेंएक ॥ जाऊनितयाचेघरींसम्यक ॥ नरसीजीच्यातनयातिलक ॥ लावोनिनिश्चयकरावा ॥ २५ ॥ यावरीजैसेंवाटेलमना ॥ तैसेंक
रावेंतुह्मीजाणा ॥ परंतुऐसावरशहाणा ॥ धनवंतकोठेंनमिळेचि ॥ २६ ॥ ऐसेंसर्वांचेंऐकतांवचन ॥ पुरोहिताचेंवळलेंमन ॥ मगसक
ळांसीविनवीआपण ॥ अहोजीमजवरीकृपाकरा ॥ २७ ॥ द्यावेंतयाचेंघरदावोन ॥ ऐसेंऐकतांसर्वब्राह्मण ॥ पुरोहितासीसवेंघेऊन ॥
नरसीचेंसदनदाविती ॥ २८ ॥ मार्गींजातांबाजारांत ॥ सावकारजेराहतीतेथ ॥ पुरोहितासीसर्वबोलत ॥ नरसीमेहत्याचींहींदुकानें
॥ २९ ॥ तेणेंतयासीहोयविश्वास ॥ ह्मणेकींमोठाधनवंतपुरुष ॥ तोंब्राह्मणेंपुरोहितास ॥ नरसीचेंसदनदाविलें ॥ ४३० ॥ मगतोराजपु
रोहित ॥ शिरेनरसीच्याघराआंत ॥ नेत्रींपहातांभगवद्भक्त ॥ तेजअद्भुततयाचें ॥ ३१ ॥ तेणेंपावलापरमानंद ॥ ह्मणेजोडलाबरासंबं
ध ॥ साष्टांगदंडवतघालोनिविशद ॥ नरसीमेहत्यासीकायबोले ॥ ३२ ॥ अहोजीआपुलाकुमार ॥ मजदाविजेतोसकुमार ॥ रायाची
आज्ञाअसेथोर ॥ ह्मणोनियेथेंपातलों ॥ ३३ ॥ नरसीजीनेंहेंऐकोन ॥ तयाचाआवआदरकरोन ॥ चिरंजिवासीपाचारोन ॥ विप्रास
न्मुखबैसविलें ॥ ३४ ॥ भगवत्कृपेचेंतेजगहन ॥ मुलाचेशरीरींपाहोन ॥ पुरोहिताचेंमोहिलेंमन ॥ तिलकलाविलातयासी ॥ ३५ ॥
नरसीमेहत्यासीकरीविनंती ॥ त्रिपुरांतकनामेंजोभूपती ॥ त्याच्याकन्येचाविवाहनिश्चिती ॥ तुमचेमुलासींसिद्धजाहला ॥ ३६ ॥ नर

सीजीनेंहेंऐकोन ॥ ह्मणतीहेंकायकेलेंजाण ॥ आह्मीकायहोतत्समान ॥ दरिद्रीपूर्णअसोंकीं ॥ ३७ ॥ पुरोहितह्मणेआपणासारिखा ॥ दुसराकोणीनदिसेनेटका ॥ कोव्यावधीचाव्यापारदेखा ॥ तुमच्यासदनींचालतसे ॥ ३८ ॥ हेंतुमचेंदरिद्रपण ॥ ज्यासीमाहीतनसेलजाण ॥ तयासीहेंदाखवापूर्ण ॥ वचकेलमनतयाचें ॥ ३९ ॥ सर्वगोष्टीनेंतुह्मीलायक ॥ ऐसेंतयासीबोलोनिदेख ॥ धनुष्याहूनसुटेसायक ॥ यापरीनिघालातेथोनी ॥४४०॥ आपुल्यानगरांतयेऊन ॥ त्रिपुरांतकासीभेटोन ॥ नरसीजीचेंनामकथून ॥ श्रवणींवृत्तघातलें ॥४१॥ ऐसेंरायानेंऐकतांवृत्त ॥ मस्तकावरीहाणीहात ॥ ह्मणेकेलेंहेंकायविपरीत ॥ भाग्यफुटलेंकन्येचें ॥ ४२ ॥ टाळकुव्यातोअसेमाहित ॥ खावयानसेअन्नघरांत ॥ कन्येसीमाझ्यादुःखसागरांत ॥ बुडवोनिआलांकायजी ॥ ४३ ॥ तरीआपणशीघ्रजाऊन ॥ लग्नतयाचेंघोंटाळोन ॥ अंतरींदुःखव्यापिलेंपूर्ण ॥ क्षणभरीचैननपडेची ॥ ४४ ॥ ॥ मू०क० ॥ काटिके अंगूढ डारो तव सो उचारो बात मनमे बिचारो कियो तिलक बनाइके ॥ जाने सुताभाग ऐसे रहे सोच पागि सब आवे जब ब्याहिबेको धन दे अघाइके ॥ लगनहुं लिखि दियो दियो द्विज आनि लियो डारि राख्यो कहूं गावे ताल ये बजाइके ॥ रहे दिनचारि ये बिचारि नही नेंकु मन आये कृष्णरुक्मिणीजू झूमि मिले धाइके ॥ २३ ॥ ॥ टी०ओ० ॥ ऐसेंभूपतीकरीभाषण ॥ परीत्यादेशींचालकठिण ॥ एकदांवरासीतिलकजाण ॥ केलियानपरतेपुनरपी ॥ ४५ ॥ जरीपरतल्याविवाहासी ॥ तरीप्रायश्चित्तघडेत्यासी ॥ करोनिआलाजोतिलकासी ॥ अंगुष्ठतोडावातयाचा ॥ ४६ ॥ ऐसातेथीलअसेविचार ॥ ह्मणोनिउपाध्यादेईउत्तर ॥ आधींमाझाअंगुष्ठसत्वर ॥ तोडोनिटाकानृपवरा॥४७॥ मगहेंमुखानेंबोलाउत्तर ॥ मनींयागोष्टीचाकराविचार ॥ म्यांचिनिश्चयकरोनिसुंदर ॥ केलासेतिलकतयासी ॥ ४८ ॥ ऐसेंत्याचेंऐकतांवचन ॥ रावअंतरींहोयखिन्न ॥ ह्मणेकन्येचेंभाग्यजाण ॥ ऐसेंचिह्मणोनिखेदकरी ॥ ४९ ॥ मगअंतरींविचारीएक ॥ येथेंव्याह्यासी आलियादेख ॥ तयाचीनिश्चिंतीहोयसम्यक ॥ ऐसेंतयासीधनदेऊं ॥ ४५० ॥ अंतरींऐसेंविचारूनियां ॥ लग्नाचानिश्चयकरोनियां ॥ पत्रधाडिलेंलिहोनियां ॥ नरसीसीतेधवांरायानें ॥ ५१ ॥ विप्रानेंतेंपत्रघेऊन ॥ जुनागडासीआलाजाण ॥ नरसीमेहत्यालागींदेऊ

न ॥ ह्मणेजीतयारीकराहो ॥ ५२ ॥ लग्नतिथीच्याआधींजाण ॥ चारदिवसयावेंआपण ॥ यापरीतयासीबोलून ॥ गेलाब्राह्मणघरासी
॥ ५३ ॥ नरसीनेंतेंपत्रघेऊन ॥ एकीकडेदिलेंठेवोन ॥ सप्रेमहरीचेंकरीगायन ॥ वाजवोनिटाळसर्वथा ॥ ५४ ॥ भजनामाजीसदानि
मग्न ॥ नसेलग्नाचीआठवण ॥ चारदिवसराहिलेजाण ॥ तयारीकांहींनसेची ॥ ५५ ॥ आपुल्यामुलाचेंअसेलग्न ॥ मनींकिंचितहीनसे
स्मरण ॥ परीतोकृपाळूजगज्जीवन ॥ सर्वदासाह्यभक्तांसी ॥ ५६ ॥ द्वारकेमाजीश्रीकृष्ण ॥ रुक्मिणीसीबोलावून ॥ ह्मणेभक्ताचेघरींल
ग्न ॥ सहपरिवारआपणचला ॥ ५७ ॥ नरसीभजनामाजीनिमग्न ॥ आपणकरावेंसर्वलग्न ॥ भक्ताचेंउणेंनपडावेंजाण ॥ करातयारीशीघ्र
आतां ॥ ५८ ॥ मगआठजणीसोळासहस्र ॥ कृष्णकांतानिघाल्यासुंदर ॥ एकलक्षसाठीहजार ॥ पुत्रसपरिवारनिघाले ॥ ५९ ॥ बळि
रामासीह्मणेकृष्ण ॥ भक्तकार्यासीचलाआपण ॥ छप्पन्नकोटीयादवजाण ॥ घेतलेसवेंसर्वही ॥ ४६० ॥ सकळनिघालेसहपरिवा
र ॥ नरसीमेहत्याचेंठाकिलेंद्वार ॥ एकचिझालाजयजयकार ॥ आनंदथोरभक्तासी ॥ ६१ ॥ त्वरेंश्रीहरीरुक्मिणीजाण ॥ लग्नकार्यासी
झोंबलेआपण ॥ परमानंदहोतसेपूर्ण ॥ जुनागडासीतेधवां ॥ ६२ ॥ ॥ सू०क० ॥ ठोरठोर पकवान होत तिय गांन करे घुरत निसां
न कांन सुनिये न बातहे ॥ चित्रमुख कियो ले बिचित्र पट रानि आप घोरि रंग बोरि ये चढायो सुत रातहे ॥ करी सो ज्योनार तामे मानस
अपार आये द्विजनि बिचार पोट बांधीये न मातहे ॥ मनिमयही साज वाजि गज रथ उंट कोर झमके किशोर आज सजीयो बरातहे ॥२४॥
॥ ॥ टी०ओ० ॥ सर्वहीलोकऐसेसमजले ॥ नरसीचेघरींलग्नभलें ॥ ह्मणोनिकोणीपाहुणेआले ॥ थोरधनाढ्यतेआहेती ॥ ६३ ॥
असोश्रीहरीविश्वकर्म्यासी ॥ पाचारोनिआज्ञाकरीत्यासी ॥ साह्यअसावेंतुवांलग्नासी ॥ लागल्यावस्तूसीपुरवावें ॥ ६४ ॥ जेथेंश्रीहरीनें
साह्यहोणें ॥ तेथेंकोणत्यागोष्टीचेंउणें ॥ पाकआरंभिलारुक्मिणीनें ॥ अनेकपक्वान्नेंकरिताती ॥ ६५ ॥ जागोजागींबैसल्याकामिनी ॥
पक्वान्नेंकरावयालागल्याराणी ॥ विवाहाचींगातीगाणीं ॥ आनंदेंकरूनितेधवां ॥ ६६ ॥ वाजंत्रांचाघडघडाट ॥ दुंदुभींचादणदणाट ॥
तोफासुटतीभडभडाट ॥ एकचिआनंदमातला ॥ ६७ ॥ गोष्टीबोलतीपरस्परांत ॥ श्रवणींनउमजेकांहींशब्द ॥ ऐसाव्यापोनिगेलानाद ॥

कायतोआनंदसागावा ॥ ६८ ॥ उत्कृष्टकेलेंमंडपासी ॥ विचित्रपटलागलेत्यासी ॥ विश्वकर्माकरीअंगेसी ॥ कायतेशोभावर्णावी
॥७९॥ रुक्मिणीराणीआपण ॥ तेलहळदीमेळवून ॥ नरसीजीच्यामुलासीजाण ॥ आपुल्याहस्तेंलावितसे ॥ ४७० ॥ यावरीघातलें
मंगलस्नान ॥ घाणाघातलाप्रीतीकरून ॥ सर्वगांवासीआमंत्रण ॥ गडगनेराचेंदीधलें ॥ ७१ ॥ भोजनाचाकेलाथाट ॥ बैसावयासीघा
तलेपाट ॥ सुवर्णाचेंमांडिलेंताट ॥ पक्वान्नेंअनेकवाढिती ॥ ७२ ॥ सोळासहस्रआठनायका ॥ वाढावयासिलागल्यादेखा ॥ अनेकपंक्ती
बैसल्यासुरेखा ॥ जनअपारमिळालेती ॥ ७३ ॥ तेव्हांब्राह्मणविचारकरिती ॥ नरसीचेंउणेंपडावेंनिश्चिती ॥ ह्मणोनिचोरोनीअन्नेंनेती ॥
गांठोड्याबांधोनितेधवां ॥ ७४ ॥ ऐसेंनेलेंअन्नबहुत ॥ सदनामाजीनाहींमात ॥ नरसीचेंउणेंनपडेकिंचित ॥ जेथेंराबतीऋद्धिसिद्धी
॥ ७५ ॥ असोयापरीझालेंभोजन ॥ मगनिघालीवरातजाण ॥ कोणतयाचेंकरीलवर्णन ॥ अद्भुतशोभादिसतसे ॥ ॥ ७६ ॥ चतुरंग
सेनाअपार ॥ यादवांचानिघालाभार ॥ मागेंचालतीकृष्णकुमर ॥ बळिरामआदिकरूनियां ॥७७॥ गजवाजीरथअपार ॥ उष्ट्रपालख्या
म्यानेसुंदर ॥ रत्नजडितसाजमनोहर ॥ शोभतसेसकळांवरी ॥ ७८ ॥ ऐसामातलासेनासिंधू ॥ दहायोजनेंमार्गविशद्ध ॥ पवनालागीं
नमिळेशुद्ध ॥ यापरीवरातसिद्धझाली ॥७९॥ मदनादिकजेकृष्णकुमर ॥ सनरसीच्यामुलाचाकरितिआदर ॥ रत्नजडितपालखीसुंदर ॥
त्यामाजीत्यासीबैसविती ॥ ४८० ॥ तैसेंचिरुक्मिणीआदिमाता ॥ नरसीच्यास्त्रियेलागूनतत्त्वता ॥ अंबारीमाजीअत्यादरता ॥ कन्येसीं
सहितबैसविती ॥ ८१ ॥ चवरीघेऊनियांकरांत ॥ आपणबैसेखवासखान्यांत ॥ आपणापरीसआपुलेभक्त ॥ गौरवीतआदिमाता ॥ ८२॥
॥ ॥ मू०क० ॥ नरसीसो कहे गहे हाथ तुम साथ चलो अंतरीछ मेही चलो इति बात मानिये ॥ कही आज्ञु जानो तुम मेतो
हिये अनो यहे लहे सुख मन मेरो फेट ताल आनिये ॥ आपही बिचार सब भार सो उठाइ लियो दियो डेरा पुरी समधीकी पह
चानिये ॥ मानस पठायो दिन आयो पैन आये अहो देखि छबि छाये नर पूछे जू बखानिये ॥ २५ ॥ ॥ टी०ओ० ॥ मगश्री
हरीकृष्णनाथ ॥ नरसीमेहत्याचाधरोनिहात ॥ ह्मणतीआतांहेंसर्वकृत्य ॥ सांभाळोनियांचालतूं ॥ ८३ ॥ मीहीचालतोंअंतरिक्ष ॥ केव

ळतुवांराहावेंसाक्ष ॥ नराहतांमीसमक्ष ॥ कार्यसाधीनसर्वही ॥ ८४ ॥ येवढीमाझीमानिजेगोष्ट ॥ कारभारतूंकरावास्पष्ट ॥ ऐसेंबोलतांवैकुंठपीठ ॥ नरसीविनवीतेधवां ॥ ८५ ॥ अहोजीनाथशारंगधर ॥ तुह्मीचसांभाळासर्वभार ॥ आजिमाझेंजाणतांअंतर ॥ इतरकांहींनावडेचि ॥ ८६ ॥ हेंचिआणितोंअंतःकरणीं ॥ येणेंचिसुखपावेमनीं ॥ आपुलीसेवाचक्रपाणी ॥ हेचिआवडेसर्वदा ॥ ८७ ॥ हातामाजीघेवोनिटाळ ॥ कीर्तनाचाकरावागोंधळ ॥ यावीणमजलादीनदयाळ ॥ दुसरेंकार्यनसांगावें ॥ ८८ ॥ हेंचिकरीनरात्रंदिवस ॥ याचीचमजलाअसेहौस ॥ ऐसेंऐकतांजगन्निवास ॥ मनींआश्चर्यकरीतसे ॥ ८९ ॥ आपणचिकरोनियांमगविचार ॥ सांभाळिलासर्वहीभार ॥ परमानंदेंकरोनियांगजर ॥ शामपुरासीपातले ॥ ४९० ॥ नगराबाहेरघालोनिमंडप ॥ तेथेंउतरलेवऱ्हाडीअमूप ॥ कळावेंआलेकींसुखरूप ॥ ह्मणोनिवाद्यांचागजरकेला ॥ ९१ ॥ तोंइकडेभूपतीआपण ॥ मनुष्यधाडीलगबगेंकरून ॥ विवाहाचाआलादिन ॥ अझोनिकांनआलेती ॥ ९२ ॥ मनुष्यजोंगांवाबाहेरआले ॥ तिहींवैभवहेंसर्वपाहिलें ॥ ह्मणतीकोणाचेंसैन्यउतरलें ॥ किंवापातलेंपरचक्र ॥ ९३ ॥ देखतांचिझालेतटस्थ ॥ जवळीयेवोनिभीतभीत ॥ हातजोडोनिपुसतीवृत्त ॥ सैन्यकोणाचेंउतरलें ॥ ९४ ॥ आह्मावरीकृपाकरोन ॥ सर्वहीसांगावर्तमान ॥ तेव्हांइकडीलबोलतीजन ॥ असेहीवरातनरसीची ॥ ९५ ॥

॥ मू० क० ॥ नरसी बरात मती जानों यह नरसीकी नरसी न पावे ऐसी समझ अपारहे ॥ आइके सुनाइ सुधि बुधि बिसराइ अहो करत हसाइ बात भाषो निरधारहे ॥ गयो जो सगाइ करी दरबर आयो द्विज अंगमे न मात कैसे रंग विस्तारहे ॥ कही एक घास धनराससो न पूजे किंहु चंहूदिस पूरि रही देख्यो भक्तिसारहे ॥ २६ ॥

॥ टी० ओ० ॥ इतरनरांच्यावरातीसम ॥ नजाणावीहेवरातउत्तम ॥ जैसानरांतनृसिंहपरम ॥ त्यापरीश्रेष्ठजाणावा ॥ ९६ ॥ ऐसेंऐकतांवर्तमान ॥ दूतांसीआश्चर्यझालेंजाण ॥ नरसीमेहत्यातेंकरायानमन ॥ पुढेंसरसावलेतेधवां ॥ ९७ ॥ तोंएकएकयादववीर ॥ देहींअमौल्यअलंकार ॥ शिबिरामाजीबैसलेसुंदर ॥ सेवकअपारभोंवताले ॥ ९८ ॥ राजदूतपुसतीत्यासी ॥ हेचिकायहोआहेतनरसी ॥ तेव्हांतेत्यांचीकरितीहांसी ॥ नरसीभलत्यासीकायह्मणता ॥ ९९ ॥ ऐसियापरीतेसरदार ॥ तुह्मीसमजाअसतीअपार ॥ रा

जाधिराजनरसीथोर ॥ तुह्माकिंकरांनपावेजी ॥ ५०० ॥ ऐसेंऐकतांखिन्नहोऊन ॥ रायापाशींआलेजाण ॥ सर्वहीसांगतीवर्तमान ॥
अहोजीवरातपातली ॥ १ ॥ कितीसांगावीवरातसिद्धी ॥ जेथेंराबतीरिद्धिसिद्धी ॥ नेत्रींपहातांशुद्धीबुद्धी ॥ विसरोनिगेलीतेधवां ॥ २ ॥
ऐसाऐकतांशब्दचोखटा ॥ रायासीतोवाटेखोटा ॥ दूतांसीह्मणेमाझीथट्टा ॥ कायरेकरितांसभेमाजी ॥ ३ ॥ तंवतेह्मणतीसत्यसाचार ॥
आम्हुचेंनमानावेंअसत्यउत्तर ॥ आपणबाहेरनिघोनिसत्वर ॥ पहावेंदृष्टीभरोनियां ॥ ४ ॥ ऐसेंऐकतांभूपतीआपण ॥ उपरीलमजल्याव
रीजाऊन ॥ वरातनेत्रींपहातांजाण ॥ गेलाविसरोनशुद्धीबुद्धी ॥ ५ ॥ नगराभोंवतींचाळीसकोस ॥ मार्गनसांपडेमनुष्यास ॥ शिबिरें
लागलींबहुवस ॥ सैन्येंअपारउतरलीं ॥ ६ ॥ एकेकपहातांअलंकार ॥ त्याच्यानमोलाचापावेपार ॥ त्रिपुरांतकह्मणेराज्यसमग्र ॥ वेंचि
तांआदरनव्हेयांचा ॥ ७ ॥ तोंसैन्याचाथोरगलबला ॥ नगरामाजीशब्दगेला ॥ पुरोहितेंऐकोनितेवेळां ॥ बाहेरआलापहावयासी ॥ ८ ॥
सगाईकरावयासीजाण ॥ तोचिगेलाहोताब्राह्मण ॥ तेथेंसैन्यासीकरितांप्रश्न ॥ नरसीचीवराततेसांगती ॥ ९ ॥ ऐसीतेणेंऐकतांमात ॥
धांवलासेआनंदभरित ॥ सभेमाजीआलात्वरित ॥ हर्षयुक्तबोलतसे ॥ ५१० ॥ सुखनमावेअंगांत ॥ त्रिपुरांतकासीकायबोलत ॥ पहाकै
सीआलीवरात ॥ हिणवीतहोतासमजलागीं ॥ ११ ॥ आतांकैसाआहेरंग ॥ विस्तारनयनींपाहेंसांग ॥ टाळकुव्यातोह्मणेअभंग ॥
कायबरोबरीकरीलतूझी ॥ १२ ॥ आतांवरातीच्यापहालोकांस ॥ त्यांतीलनुसत्याजनावरांस ॥ तुझ्यासकलधनाचीरास ॥ करितांही
घांसनपुरेची ॥ १३ ॥ प्रियादासह्मणेसैन्यभार ॥ नव्हेतोकेवळभक्तिसार ॥ पहाहोचारीदिशांसीसुंदर ॥ व्यापिलासेभरोनियां
॥ १४ ॥ ॥ मू०क० ॥ चले अचरज मानि देखि अभिमान गयो लयो पाछो ब्राह्मणको हमे राखि लीजिये ॥ जा
इ गही पाइ रह्यो भाइ भरी दया करो गये दृग भरे पाइ परे कृपा कीजिये ॥ मिले भरि अंक ले दिखायो सो मयंक
मुखहू जिये निसंक इन्हे भोर सुता दीजिये ॥ ब्याह करि आये भक्तिभाव लपटाये सब गाए गुन जाने जिते सुनिसुनि जीजिये ॥ २७ ॥
॥ ॥ टी०ओ० ॥ ऐसेंपहातांचिकौतुक ॥ आश्चर्यमानीनरनायक ॥ सकलअभिमानगेलादेख ॥ निघेभेटीसीतेधवां ॥ १५ ॥ पुरो

हिताचेधरोनिचरण ॥ ह्मणेमीआहेंहीनदीन ॥ लज्जाराखावीमाझीपूर्ण ॥ कृपाकरोनितुह्मीआतां ॥१६॥ मगविप्राच्यामागेंमागें ॥ हात
जोडोनियांलगबगें ॥ भेटावयासीजाईवेगें ॥ नरसीमेहत्यासीतेधवां ॥ १७ ॥ वरातीमाजीशिरलाराव ॥ एकेकाचापाहोनिआव ॥ न
रसीह्मणोनिउपजेभाव ॥ धरीतसेपायतयाचे ॥ १८॥ तंवतेह्मणतीआह्मीकिंकर ॥ पुढेंआहेतिनरसीथोर ॥ ऐसेकरितांनमस्कार ॥ भाग
लानृपवरतेधवां ॥१९॥ तंवतेंकळलेंश्रीकृष्णासी ॥ व्याहीआलेतमुख्यभेटीसी ॥ मगसामोरेंयेवोनित्यासी ॥ भेटलेश्रीहरीतयातें॥५२०॥
तंवतोसमजेहेअधिकारी ॥ ह्मणोनिधांवोनिचरणधरी ॥ तयातेंबोलतीश्रीहरी ॥ नरसीमहाराजमीनसें ॥ २१ ॥ यःकश्चितमीअसेंकिंक
र ॥ नरसीमहाराजआहेतिथोर ॥ भेटवीनमीतुह्मासत्वर ॥ धरोनिकरचालविले ॥ २२ ॥ नरसीपासींमगआणोन ॥ रायासीह्मणेकरान
मन ॥ येरूलगबगेंधांवोन ॥ बळकटचरणधरीतसे ॥ २३ ॥ हृदयामाजीभावभरोन ॥ कंठींआलेंगहिंवरोन ॥ पाणीवाहेनेत्रांतून ॥
वारंवारनमनकरी ॥ २४ ॥ ह्मणेमजवरीदयाकरोन ॥ कृपेनेंघ्यावेंसांभाळोन ॥ ऐसेंनरसीनेंऐकतांवचन ॥ सप्रेमभेटलेतयासी ॥ २५ ॥
ह्मणेजीव्याहीपरिसाआतां ॥ उभयतांलागोनिसांभाळिता ॥ हरीवांचोनिनसेसर्वथा॥ तोचिहाउभाअसेकीं ॥ २६॥ जेणेंतुह्मासीयेथें
आणिलें ॥ धरावेत्याचेचिपायवहिले ॥ ऐसेंह्मणोनिश्रीमुखदाविलें ॥ रणींघातलेंश्रीहरीच्या ॥ २७ ॥ रावअंतरींगहिंवरोन॥ बळक
टहरीचेधरीचरण ॥ येरूदेतसेआश्वासन ॥ निःशंकमनव्हावेंकीं ॥ २८ ॥ उदईकतुह्मीकरावेंलग्न ॥ यासीओपावेंकन्यादान ॥ बळिरा
मासीमगविनवोन ॥ कायश्रीहरीह्मणतसे ॥ २९ ॥ तुह्मीव्हावेंमुलीकडोन ॥ आह्मीइकडेसाह्यपूर्ण ॥ ऐसेंउभयतांविचारून ॥ लग्नला
विलेंसमारंभें ॥५३०॥ कितीतोवर्णावामहोत्साव॥ जेथेंराबतसेदेवाधिदेव ॥ ज्याचेंइच्छितीपदरजसर्व ॥ ब्रह्मेंद्रादीसर्वदा॥ ३१॥ ऐसि
यापरीविवाहकरून ॥ जुनागडासीआलेजाण ॥ ज्यांहींतोपाहिलाउत्साहपूर्ण ॥ तेभक्तिभावांतगर्कझाले ॥३२॥ प्रियादासजीह्मणेआप
ण ॥ जितुकेमीजाणिलेगुण ॥ तितुकेसर्वहीकेलेगायन ॥ पारतयांचाकोणपावे ॥ ३३ ॥ जेजेभाविकसात्विकजन ॥ सर्वदायांतेंकरो
निश्रवण ॥ नरदेहाचेंसार्थकपूर्ण ॥ करोनिराहातीजगामाजी ॥ ३४ ॥ तैसेंचिजयासार्थककरणें ॥ तेणेंयाकथेसीसादरहोणें ॥ मगया

जगांतसुखेंराहाणें ॥ परमानंदेंकरोनियां ॥३५॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥
एकशेंतिसराछप्पागोडहा ॥ ५३६ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयाजीसद्गुरुकेशव ॥ तुझियाचरणींदेईंठाव ॥ निश्चयपूर्वकजडोभाव ॥ हेंचि
तुजलामागतसें ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ दिविदासवंशजसोधरसदन भई भक्ति अनपाइनी ॥ सुतकलत्रसमेत सबै गोविंदपरायन ॥
सेवत हरिहरिदास द्रवतसुख रामरसायन ॥ सीतापतिको सुजस प्रथमही गमन बखान्यो ॥ द्वैसुत दीजे मोहि कबित सबही जग
जान्यो ॥ गिरागदित लीलामधुरसंतनि आनंददायिनी ॥ दिविदास० ॥ १०४ ॥ ॥ टी०ओ० ॥ दिविदासजीभक्तथोर ॥ तया
चावंशयशोधर ॥ यशोधराघरींसुंदर ॥ अविनाशभक्तीजाहली ॥ २ ॥ सुतकलत्रादिसमवेत ॥ सकलहीगोविंदपरायणभक्त ॥ श्रीहरी
चीसेवाकरीत ॥ तैसीचभगवद्भक्तांची ॥३॥ यशोधराच्यामुखांतोन ॥ द्रवतसेरामरसायन ॥ त्यामाजीचसदानिमग्न ॥ कायतेंवर्णनक
रवें ॥ ४ ॥ एकदांसीतापतीचेंसुयश ॥ बालकांडामाजीलविशेष ॥ प्रथमचिगेलेजेवनास ॥ तेंचरित्रवर्णिलें ॥ ५ ॥ रायादशरथापा
शींजाण ॥ येऊनविश्वामित्रब्राह्मण ॥ ह्मणेदेइंजेरामलक्ष्मण ॥ यज्ञसंरक्षणकरावयासी ॥ ६ ॥ तेव्हांदशरथाचेंकेलेंस्तवन ॥ तेवेळींजें
गाइलेंकवन ॥ सर्वजगांतमाहितपूर्ण ॥ ह्मणतीतोदोहराघरोघरीं ॥ ७ ॥ ॥ दोहा ॥ रामरामसबकोउकहेदशरथकहैनकोई ॥ एकवार
दशरथकहेकोटियज्ञफलहोई ॥ १ ॥ ॥ ओ० ॥ असोयावरीआनंदकंद ॥ सवेंजावयाझालेसिद्ध ॥ दशरथासीदुःखअगाध ॥ तळमळ
करीततेधवां ॥ ८ ॥ ऐसावर्णितांकथाभाग ॥ यशोधरासीजडेवियोग ॥ तेणेंअंतरींकरीतगमग ॥ रघुनाथासीविनवीतसे ॥ ९ ॥ म
जलागींहीसवेंन्यावें ॥ वारंवारविनवीभावें ॥ पुढेंजेंकांहींचरित्रगावें ॥ तेंविसरलासर्वही ॥ १० ॥ ऐसापहातांभावथोर ॥ प्रगटहोउनी
श्रीरघुवीर ॥ ह्मणेमीपरतयेईनसत्वर ॥ तुवांयेथेंचिरहावें ॥ ११ ॥ ऐसेंतयासीबोलोनिउत्तर ॥ गुप्तजाहलेश्रीरघुवीर ॥ यशोधराचेंजड
लेंअंतर ॥ रामरूपेसीतेधवां ॥ १२ ॥ हृदयींजडलातोवियोग ॥ तेव्हांचिकेलाप्राणत्याग ॥ ऐसातयाचाप्रेमयोग ॥ रामरूपांतमिळा

ला ॥ १३ ॥ ज्याचियाकींमुखांतोन ॥ जेजेलीलाझालीवर्णन ॥ आनंददायकसज्जनांपूर्ण ॥ अत्यंतमधुरसर्वदा ॥ १४ ॥ मूलभक्ति
मालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशेंचवथाछप्पागोडह्या ॥ १५ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरूनारायणा ॥ आतांमाझ्याकरींपालना ॥ षड्रिपूंनींछळिलेंनाना ॥
तुजवीणकरुणाकोणकरी ॥ १ ॥ ॥ मू०छं० ॥ श्रीनंददासआनंदनिधि रसिक सुप्रभुहितरगमगे ॥ लीलापदरसरीतिग्रंथरचनामे
नागर ॥ सरसउक्तिजुतजुक्ती भक्तिरसगानउजागर ॥ प्रचुर पयोधीलो सुजस रामपुरग्रामनिवासी ॥ सकल सुकुलसंवलित भक्तपदरै
नुउपासी ॥ चंद्रहासअग्रज सुहृद परम प्रेमपयमे पगे ॥ श्रीनंददास० ॥ १०५ ॥ ॥ टी०ओ० ॥ श्रीनंददासभक्तथोर ॥ आनंदा
चेकेवळसागर ॥ सागराहूनएकसुंदर ॥ रसिकत्वअंगींगुणवसे ॥ २ ॥ जेणेंप्रभूसीहोयसुख ॥ ऐसीसेवाकरीसम्यक ॥ त्यामाजीचरंगले
देख ॥ त्यावीणआणिकनावडे ॥ ३ ॥ श्रीहरीचीलीलाविशद ॥ जेणेंगाइलीपदबंध ॥ छंदशास्त्रानुरूपशुद्ध ॥ रसाचीरीतीज्यामाजी
॥ ४ ॥ ग्रंथरचनेमाजीचतुर ॥ सरसयुक्तिकउक्तीसुंदर ॥ भक्तिरसदिसेउजागर ॥ गायनकरितांपदाचें ॥ ५ ॥ समुद्रपर्यंतआसपास ॥
ज्याचेंव्यापोनिगेलेंसुयश ॥ रामपुरनगरींअसेनिवास ॥ सर्वदाउदाससंसारीं ॥ ६ ॥ जयाचेसुकुलामाजीश्रेष्ठ ॥ भगवद्भक्तझालेवरि
ष्ठ ॥ संतचरणरजाचीउद्धट ॥ असेउपासनासकळांची ॥ ७ ॥ नंददासाचेजेअग्रज ॥ चंद्रहासनामेंभक्तराज ॥ परमसुहृदअधोक्षज ॥
स्वभक्तीनेंकेलाजिहीं ॥ ८ ॥ प्रेमस्वरूपहेंचिदुग्ध ॥ सर्वदाप्राशनकरितीविशद ॥ यापरीउभयतांभक्तशुद्ध॥ तैसेंचिसुकुलसर्वही ॥ ९ ॥
मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशेंपांचवाछप्पागोडह्या ॥ १० ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरुमाधवा ॥ मजलाअनाथजाणोनिदेवा ॥ स्वभक्तीचादेईठावा ॥ परम
कृपाळादीनबंधु ॥ १ ॥ ॥ मू०छं० ॥ संसारसकलव्यापकभई जकडी जनगोपालकी ॥ भक्तितेजअतिभाल संतमंडलको मंडन ॥
बुद्धिप्रवेस भागोत ग्रंथसंशयको खंडन ॥ नरहरिग्रामनिवास देशबांगड निस्ताऱ्यो ॥ नवधा भजन प्रबोधि अनन्य दासन वृत धा

न्यो ॥ भक्तिकृपा वांछी सदा पदरजराधालालकी ॥ संसारसकलव्यापकभई० ॥ १०६ ॥ ॥ टी०ओ० ॥ जनगोपालजीचेंकवन ॥
जकडीनांवेंसाखीजाण ॥ सर्वसंसारींव्यापकपूर्ण ॥ जनांमाजीझालीसे ॥ २ ॥ जयाचेमस्तकींसूर्यासमान ॥ तेजभक्तीचेंदिसेपूर्ण ॥
संतमंडळामाजीभूषण ॥ सर्वहीसज्जनमानिती ॥ ३ ॥ तयाचाऐसाबुद्धिप्रवेश ॥ भागवतग्रंथामाजीविशेष ॥ संशयजयासीबहुवस ॥
खंडनतयाचेंकरीतसे ॥ ४ ॥ नरहरीग्रामींज्याचानिवास ॥ बांगडनामेंतोप्रख्यातदेश ॥ तयाचाउद्धारकेलाविशेष ॥ भक्तिपंथासस‍र्वला
विले ॥ ५ ॥ नवधाभक्तीचाप्रकार ॥ प्रबोधोनियांसकलनर ॥ अनन्यदास्यत्वव्रतसुंदर ॥ तेणेंशींसहधारणकेलें ॥ ६ ॥ भक्तीच्याकृपें
करोनिसहज ॥ राधाकृष्णाचेचरणरज ॥ सर्वदावांछीभक्तराज ॥ आणीकइच्छानसेचि ॥ ७ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधि
नीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशेंसाहवाछप्पागोडहा ॥ ८ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ ९ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरूगोविंदा ॥ निवटोनिमाझासर्वधंदा ॥ कृपाकरोनिआनंदकंदा ॥
संतचरित्राबोलवावें ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ माधो दृढ महिउ परे प्रचुर करी लोढा भगति ॥ प्रसिद्ध प्रेमकी रासि गढागढ परचो
दीयो ॥ ऊंचेते भयो पात शाम साचोपन कीयो ॥ सुत नाती पुनि सदृश चलत ऊही परमपाठी ॥ भक्तनिसो अतिप्रेम नेम नहि किं
हु अंगघाटी ॥ नृत्यकरत नयि तनसंभार सम सरजनकनकी सकति ॥ माधौदृढ० ॥ १०७ ॥ ॥ टी०ओ० ॥ पृथ्वीहाचिपाटा
थोर ॥ माधवदासपडोनित्यावर ॥ वरवंव्यासारिखीभक्तीसुंदर ॥ बहुतचिकेलीतयानें ॥ २ ॥ केवळप्रेमाचीराशीख्यात ॥ गढागढनग
रींदाविलीप्रचीत ॥ माडीवरोनियांझालापात ॥ हरीनेंपणसत्यकेला ॥ ३ ॥ पडतांरक्षिलेमाधवदास ॥ पुत्रपौत्रादीपुढेंतत्सदृश ॥ अव
लंबोनिभक्तिपंथास ॥ त्याचिपरिपाटींचालती ॥ ४ ॥ भक्तांचेठाईअतिप्रेम ॥ एकचिसेवेचानसेनेम ॥ कोणत्याहीप्रकारेंपरम ॥ सुखदे
तसेसज्जनांसी ॥ ५ ॥ जैसासरोवरकर्ताचतुर ॥ भोंवतीरचनारचीसुंदर ॥ जेव्हांअंतरींनिघतांनीर ॥ लोटनावरेतयासी ॥ ६ ॥ माधव
दासासीत्याचिसम ॥ भजनींकरितांनृत्यउत्तम ॥ जेव्हांदाटोनियेतसेप्रेम ॥ नसांभाळवेतनुआपुली ॥ ७ ॥ ॥ मू०क० ॥ गढाग

ढपुर नाम माधौ वढी प्रेम भूमि लोटे जब नृत्य करे भूले सुधि अंगकी ॥ भूपती विमुख झूट जानिके परिछा लई आन तीन छाती पर देखी गति रंगकी ॥ नूपुरनि बांधि नाचि सांच सो दिखाइ दियो गिऱ्योहू कराही मध्य जियो मती पंगकी ॥ बडो त्रास भयो नृप दासविसवास बढयो मढयो उर भावरीति न्यारि यो प्रसंगकी ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ गढागढनामेंनगर ॥ तेथेंमाधवदासथोर ॥ राहतसेभक्तसुंदर ॥ प्रेमअद्भुततयाचें ॥८॥ श्रीहरीचेंकरीसेवन ॥ संतसज्जनींप्रीतीगहन ॥ नामकीर्तनींसदानिमग्न ॥ प्रपंचींमननसेची ॥ ९ ॥ नूपुरचरणांतबांधोन ॥ नृत्ययुक्तकरीतभजन ॥ तेव्हांवाढेप्रेमगहन ॥ लोळेभूवरीगडबडां ॥ १० ॥ कितीप्रेमाचीसांगूंअवधी ॥ देहाचीकांहींनराहेशुद्धी ॥ ऐसीतयाचीजन्मसिद्धी ॥ कायतेंभाग्यवर्णावें ॥ ११ ॥ ऐसापहातांप्रेमभर ॥ भजनींमिळतीजनअपार ॥ उपदेशघेतीनारीनर ॥ महिमाअपारवाढला ॥१२॥ गढागढगांवींचाभूपती ॥ त्याजवळसर्वहीलोकबोलती ॥ माधवदासांचीप्रेमस्थिती ॥ ऐसीकोठेंनपाहिली ॥ १३ ॥ भजनींविसरेदेहभान ॥ भूवरीगडबडांलोळेआपण ॥ परीतोभूपतीविन्मुखपूर्ण ॥ त्यासीहेंभाषणनावडे ॥ १४ ॥ ह्मणेकैसेंतेंढोंगमाजविलें ॥ बेशुद्धभूवरीकेवींलोळे ॥ समक्षपाहूंआपुल्याडोळें ॥ ह्मणोनिभूपतीकायकरी ॥ १५ ॥ आपुल्यासदनींकरवूंभजन ॥ परीतेयेतीलकैसेपूर्ण ॥ तरीभंडाराकरावाजाण ॥ अनेकसंतबोलवावे ॥१६॥ मगसंतांच्यासमाजांत ॥ भजनासीउभेकरावेतेथ ॥ विचारूनिऐसेंनिजचित्तांत ॥ आमंत्रणधाडीसंतांसी ॥ १७ ॥ मगमेळवूनसंतमेळा ॥ रायेंउत्साहथोरमांडिला ॥ स्वयंपाकासीआरंभझाला ॥ कढयाचढविल्याचुलीवरी ॥ १८ ॥ सकलहीआलेसंतसुरस ॥ त्यांमाजीआलेमाधवदास ॥ रायेंतिसन्यामजलींविशेष ॥ सभाकरविलीबैसावया ॥ १९ ॥ सकळसंतांसमक्षआपण ॥ माधवदासासीविनवीजाण ॥ जोंवरीस्वयंपाकहोतसेपूर्ण ॥ तोंवरीभजनकरावेंजी ॥ २० ॥ तत्काळमाधवदासउठोन ॥ पायांमाजीचाळबांधोन ॥ भजनासीआरंभकरितांजाण ॥ रंगतात्काळओढवला ॥ २१ ॥ तेव्हांखरेपणरायादाविलें ॥ माधवदासासीप्रेमदाटलें ॥ भूवरीपडोनिगडबडलोळे ॥ कांहींचनसेदेहभान ॥ २२ ॥ माडीसीनसतीवरवंड्या ॥ तयासीलोळतांगडबडा ॥ एकाएकींचधडधडा ॥ तिमजल्यावरोनिखालींपडे ॥ २३ ॥ तोंघृतेंभरलीसद्यस्तप्त ॥

कढईठेविलीहोतीतेथ ॥ माधवदासपडलेत्यांत ॥ एकचिअनर्थजाहला ॥ २४ ॥ रावधांवलागडबडोन ॥ ह्मणेमींअनर्थकेलाजाण ॥ सकळसंतखालींयेऊन ॥ माधवदासासीकाढिती ॥ २५ ॥ सर्वहीजोंपहातीआपण ॥ माधवदासासीरंगपूर्ण ॥ तप्तघृताचाडागजाण ॥ शरीरींकोठेंनसेची ॥ २६ ॥ जेव्हांवरोनिकढईतपडिले ॥ तेवेळींबहुतघृतउडालें ॥ जनजेहोतेभोंवताले ॥ त्यांचेंपोळलेंशरीर ॥ २७ ॥ माधवदासासीत्यासमयांत ॥ मुख्यतोरक्षिताजगन्नाथ ॥ भक्तवत्सलहापणत्वरित ॥ सत्यकरोनिदाविला ॥२८॥ ऐसीपहातांचमत्कृती ॥ स्तब्धरायाचीहोयमती ॥ थोरउपजलात्रासचित्तीं ॥ ह्मणेम्यांनिश्चितीकायकेलें ॥ २९ ॥ अहोसंतांचाअपराधझाला ॥ ह्मणोनिचित्तीं अनुतापला ॥ माधवदासाचेतयेवेळां ॥ चरणींलागलायेवोनी ॥ ३० ॥ विश्वासवाढलासंतचरणीं ॥ भावेंव्यापिलाअंतःकरणीं ॥ याप्रसंगातेंवर्णितांवर्णनीं ॥ वेगळीचरीतीदिसतसे ॥ ३१ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशेंसातवाछप्पागोडहा ॥ ३२ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

आमुचाराजाभक्तसुभट ॥ यात्रेसीनेतांतयासी ॥ १७ ॥ भूपतीच्यायोगेंकरून ॥ पुरांतव्यापिलीभक्तीपूर्ण ॥ सदाहोतसेसंतसेवन ॥ हें
सकळहीराहीलकीं ॥ १८ ॥ आपणअंतरींविचारकरून ॥ पुरतेंपाहावेंन्याहाळोन ॥ ऐसीतेणेंकरितांविनवण ॥ कृष्णदासमनींसमजले
॥ १९ ॥ ह्मणतीजैसीइच्छाआहे ॥ उदईकतैसेंचिकरूंपाहें ॥ आमुच्याबरोबरीलवलाहें ॥ तयासीघेउननजाऊंकीं ॥ २० ॥ आतांघरा
जायसत्वरी ॥ परीहेगोष्टप्रगटनकरीं ॥ त्यासीबोलोनिऐसियापरी ॥ कायसद्गुरूकरीत ॥२१॥ प्रातःकाळींआलाभूप ॥ हातजोडोनिउ
भासमीप ॥ ह्मणेमुहूर्तआलासमीप ॥ करावीतयारीदयाळा ॥ २२ ॥ तेव्हांबोलतीकृष्णदास येथेंचिकरावारहिवास ॥ तुवांआपुलास्व
देश ॥ सोडोनिसहसानयावें ॥ २३ ॥ माझेचरणींठेवोनिभावा ॥ येथेंचिकरावीसंतसेवा ॥ ऐसेंबोलतांसद्गुरुदेवा ॥ गोडनवाटेतयासी
॥ २४ ॥ ॥मू०क०॥ द्वारावतीनाथ देख्यो गोमती सनान करो धरो भुज छाप आप मन अभिलाखिये ॥ चिंता जिन की
जे तीनो बात इहां लीजे आज्ञु दीजे जोई आज्ञा सोइ सिर धरि राखिये ॥ आये पहुचाइ दूरि नैन जल पूरि वहैं दहे उर भा
रि कंहां संग रंग चाखिये ॥ बीते दिन दोइ निसि रहे हुते सोइ भोइगई भक्ति गिरा आई बानी मधु भाषिये ॥ २ ॥ ॥टी०
ओ० ॥ उभाराहिलाखिन्नहोऊन ॥ व्याकुळझालेपंचप्राण ॥ सद्गुरूपुढेंनबोलवेवचन ॥ कांहींउपायचालेना ॥ २५ ॥ ऐसेंतयाचेंपाहो
निचिन्ह ॥ सद्गुरूकरितीसमाधान ॥ कायतुझेंइच्छितेंमन ॥ तेंमजसंपूर्णसांगावें ॥ २६ ॥ तेव्हांभूपतीकरीविनवण ॥ ऐसेंइच्छितेंमाझें
मन ॥ द्वारकानाथाचेंव्हावेंदर्शन ॥ आणीस्नानगोमतीचें ॥ २७ ॥ शंखचक्रांकितछापजाण ॥ उभयभुजांवरीकरावेधारण ॥
ऐसेंरायाचेंऐकतांवचन ॥ सद्गुरूदयेनेंबोलती ॥ २८ ॥ चिंतानकरींरायातूंही ॥ तीन्हीह्यागोष्टीयेथेंचिघेई ॥ आजिजेआज्ञादेतसेंपाहीं ॥
मस्तकींधरोनिराहींते ॥ २९ ॥ ऐसेंसद्गुरूचेंआज्ञावचन ॥ पृथ्वीरायेंकेलेंमान्य ॥ पोहोंचवावयासीमगआपण ॥ दूरपर्यंतगेलासे ॥ ३० ॥

सद्गुरूमगदेतीनिरोप ॥ साष्टांगदंडवतकरीभूप ॥ नेत्रांवाटेजलअमूप ॥ वाहातसेतेव्हांरायाच्या ॥ ३१ ॥ वियोगेंकरूनजळतसेहृदय ॥
मुखानेंह्मणतसेहायहाय ॥ ऐसेहेकोठूनमिळतीलपाय ॥ कायमीउपायकरूंआतां ॥ ३२ ॥ ऐसाकैसेनिमिळेलसंग ॥ तत्त्वचर्चादीहोती
अनेक ॥ त्यामाजीजोउठेरसरंग ॥ श्रवणींप्राशितांहोयतृप्ती ॥ ३३ ॥ यापरीविचारकरीतभला ॥ रावपरतोनिघरींआला ॥ परीतोअंतरीं
वेधलागला ॥ तळमळकरीरात्रंदिवस ॥ ३४ ॥ यापरीलोटलेदोनदिवस ॥ तोंएकचमत्कारझालाविशेष ॥ तिसरेदिवसींमध्यरात्रीस ॥
भूपतीनिद्राकरीतहोता ॥ ३५ ॥ रावभक्तीनेंव्यापिलापूर्ण ॥ तेणेंकळवळेजगज्जीवन ॥ राखावयासीगुरूचेंवचन ॥ कायआपणकरीते
व्हां ॥ ३६ ॥ रावनिद्रिस्तवरीमहालांत ॥ आंगणींप्रगटोनिद्वारकानाथ ॥ मधुरवाणीनेंबोलबोलत ॥ सद्गुरूऐसातेधवां ॥ ३७ ॥
॥ ॥ मू०क० ॥ अहो प्रथीराज कही स्वामीहीसी बानी लही आयो उठि दौरि वाही ठोर प्रभु देखेहे ॥ घूंम्यो कह्यो
कांन धरो गोतमी सनान करो सुनिके अन्हायो पुनि बेन कंछू पेखेहे ॥ शंखचक्रआदिछाप तन सब व्यापि गई भइयो
अबार रानि आई अब रेखेहे ॥ बोले रह्यो नीरमे शरीर ले सनाथ कीजे लीजे नाथ हिये निजभागकरि लेखेहे ॥ ३ ॥
॥ ॥ टी०ओ० ॥ अहोअहोप्रथीराज ॥ मंजुळबोलेगरुडध्वज ॥ रावनिद्रिस्तअसतांसहज ॥ तोशब्दकानींऐकिला ॥ ३८ ॥ सद्गुरू
सारिखीवाणीऐकतां ॥ खडबडोनिजागाहोयतत्वता ॥ धांवतखालींआलाक्षणनलगतां ॥ तोंआश्चर्यपाहिलें ॥३९॥ मुगुटकुंडलेंमनोहर ॥
कासेकसिलापीतांबर ॥ सांवळीमूर्तिउभीसुंदर ॥ हास्यवदनेंकरोनियां ॥ ४० ॥ यापरीपहातांद्वारकानाथ ॥ रायासीपरमानंदहोत ॥
सद्गदनेत्रींअश्रुवहात ॥ तोंपुनरपिनादघूमला ॥ ४१ ॥ अरेहेरायाकरींश्रवण ॥ गोमतीप्रवाहआलाजाण ॥ भक्तिपूर्वककरींस्नान ॥
ऐकोनिभूपतीसावधझाला ॥ ४२ ॥ तोंएकदांचिनभांतोन ॥ गोमतीप्रवाहआलापूर्ण ॥ भूपधांवोनिकरीस्नान ॥ होयनिमग्नप्रेमामा
जी ॥ ४३ ॥ ह्मणेहेएवढीकृपाकेली ॥ जिणेंमजलाहाकमारिली ॥ कोठेंतेमाझीसद्गुरुमाउली ॥ ह्मणोनिभावेंतैंपहातसे ॥ ४४ ॥ तों
कोठेंहीनाहींमिळाले ॥ मगदेवासीचगुरूभाविलें ॥ अर्चनकरोनिप्रेममेळें ॥ हातजोडोनिउभाराहे ॥४५॥ शरीराकडेजोंदृष्टीगेली ॥ तों

छापानेंतनुव्यापिली ॥ शंखचक्रादीमुद्रासमेळीं ॥ रायाचेअंगींशोभतसे ॥ ४६ ॥ तोंराणीवरुतेंवाटपाहे ॥ किमर्थउशीरझालापाहें ॥ ह्मणोनियांधांवतलवलाहें ॥ उतरोनचवकांतपातली ॥ ४७ ॥ तोंद्वारकानाथाचेसन्मुख ॥ हातजोडोनिउभानायक ॥ भिंतीवरीरेखिलें चित्रसम्यक ॥ यापरीतटस्थउभाराहे ॥ ४८ ॥ राणीलागींआश्चर्यहोय ॥ तंवतोभूपतीबोलेकाय ॥ पहागेमाझीसद्गुरुमाय ॥ द्वारकानाथपातला ॥ ४९ ॥ मगसर्वहीकथोनिवृत्त ॥ ह्मणेगेस्नानकरोनित्वरित ॥ आपुलेंशरीरकरींसनाथ ॥ हृदयींश्रीनाथधरींप्रेमें ॥ ५० ॥ मगतिणेंहीकरोनिस्नान ॥ द्वारकानाथाचेंकेलेंअर्चन ॥ आपुलेंभाग्यथोरमानोन ॥ उभयतांनिमग्नप्रेमामाजी ॥ ५१ ॥ ॥ मू०क० ॥ भयो जब भोर पुर बडो भक्त सोर पऱ्यो कऱ्यो आनि दरसन भई भीर भारीहे ॥ आये बहु संत ओ महंत बडे बडे धाये अति सुख पाये देहरचना निहारीहे ॥ नाना भेट आवे हित महिमा सुनावे राजा सुनत लजावे जानी कृपा बनबारीहे ॥ मंदिर करायो प्रभु रूप पधरायो सबजग जस गायो कथा मोको लागी प्यारीहे ॥ ४ ॥ ॥ टी०ओ० ॥ तोंजाहलाप्रातःकाळ ॥ नगरींतहोतहलकल्लोळ ॥ आळोआळींवहातसेजळ ॥ ह्मणतीहेंकायजाहलें ॥ ५२ ॥ जलवर्षावनहोतांकोठें ॥ कैसेनपाणीआलेंयेवढें ॥ कोठोनिप्रवाहआलानिवाडें ॥ सर्वहीलोकपहाताती ॥ ५३ ॥ ऐसेचिओघपहातपहात ॥ पातलेरायाचेमंदिरांत ॥ तोंपाहिलेद्वारकानाथ ॥ सन्मुखभूपउभाअसे ॥ ५४ ॥ रायासीपुसतीवृत्तांत ॥ तेणेंकथिलेंसर्वहीवृत्त ॥ ऐकतांसकळांआनंदहोत ॥ जयजयकारकरिताती ॥ ५५ ॥ नगरमाजीप्रगटलीमात ॥ ह्मणतीराजामहाभक्त ॥ जयासाठींद्वारकानाथ ॥ गोमतीसहितप्रगटले ॥ ५६ ॥ शरीरावरीआपोआप ॥ शंखचक्रादीउमटलेछाप ॥ केवळईश्वरआमुचाभूप ॥ दर्शनालोकधांवती ॥ ५७ ॥ नगरामधीलसकळजन ॥ येऊनरायाचेंघेतीदर्शन ॥ गोमतीचेंकरोनिस्नान ॥ द्वारकानाथासीपूजिती ॥ ५८ ॥ मोठेमोठेसाधुमहंत ॥ दर्शनालागींआलेत्वरित ॥ शंखचक्रादिचिन्हमंडित ॥ पाहतीदेहरायाचा ॥ ५९ ॥ ऐसेंभक्तिरूपपाहोनिधाले ॥ मानसींअत्यंतसुखपावले ॥ भावेंरायाचींवंदितीपाउलें ॥ सकळहीलोकतेधवां ॥ ६० ॥ तेव्हांरायाचेसन्मुखतेथ ॥ नानाप्रकारेंभेटयेत ॥ सर्वहीलोकप्रीतियुक्त ॥ महिमावर्णितीरायाचा ॥ ६१ ॥ राया

आह्मीझालोंसनाथ ॥ तुजसारिखाआम्हुचानाथ ॥ जयाच्याप्रेमेंद्वारकानाथ ॥ गोमतीसहितप्रगटझाला ॥ ६२ ॥ नानाप्रकारेंस्तवनक
रोन ॥ ऐकवितीरायालागुन ॥ तेणेंभूपतीलज्जायमान ॥ मनींअभिमाननयेची ॥ ६३ ॥ जेजेकोणीस्तवनकरीत ॥ भूपतयासीलाज
वीत ॥ माझेंवर्णनकरितांकिमर्थ ॥ कृपावनमाळीचीअसेंहे ॥ ६४ ॥ लक्षावधीधनखर्चोन ॥ मंदिरउत्तमप्रकारेंकरून ॥ प्रभूरूपासीके
लेंस्थापन ॥ प्रीतिपूर्वकतेधवां ॥ ६५ ॥ नानाप्रकारेंकरीउपचार ॥ प्रभूचेठाईंजडलेंअंतर ॥ जगांतरायाचीकीर्तिफार ॥ गातीघरोघर
सर्वही ॥ ६६ ॥ हेरायाचीकथासुंदर ॥ गोडलागलीमजलाफार ॥ बहूतजडलेंतेथेंअंतर ॥ प्रियादासजीह्मणतसे ॥ ६७ ॥ ॥ मू०
क० ॥ विप्र दृगहीन सो अनाथ वैजनाथद्वार पऱ्यो चख चाहे मास केतिक बिहानेहे ॥ आज्ञा वार दोइ चार भईहे न फेरि होहि
याको हाट सार देखि शिव पिघलानेहे ॥ प्रथीराजअंगके अंगोंछासो अंग छाइ आइके सुनाइ द्विज गौरव डरानेहे ॥ नयो मंग
वायो तन छाइ दियो छायो नैन खुले चैन भयो जन लखि सरसानेहे ॥ ५ ॥ ॥ टी०ओ० ॥ आणीकएकऐकाचरित्र ॥ कोणी
जन्मांधहोताविप्र ॥ आपणायावेदिव्यनेत्र ॥ ह्मणोनिउपायकायकरी ॥ ६८ ॥ झाडखंडीवैजनाथ ॥ धरणेंबैसलाजाऊनतेथ ॥ ह्मणेहे
दयाळाउमाकांत ॥ मजलादिव्यदृष्टिदेईं ॥ ६९ ॥ यापरीतेथेंकितीकमास ॥ लोटोनिगेलेतयाविप्रास ॥ दोनचारदादृष्टांतनिरस ॥
शंकरेंतयासदीधले ॥ ७० ॥ जन्मांधतूझेअसतीनयन ॥ आतांनदृष्टीयेईलपूर्ण ॥ माझेद्वारींनबैसेंधरण ॥ जाईंयेथूनब्राह्मणा ॥ ७१ ॥
परीतयाचानिश्चयपूर्ण ॥ तेथेंचिबैसेहट्टधरून ॥ ह्मणेहेदेवापार्वतीरमण ॥ तुजहेंवचननसाजे ॥ ७२ ॥ रचिसीअनेकप्रकारेंसृष्टी ॥ क
ठिणकायतेमाझीदृष्टी ॥ ऐसीनिश्चयाचीपाहोनिपुष्टी ॥ द्रवलेशंकरतेधवां ॥ ७३ ॥ मगविप्रासीहोयदृष्टांत ॥ पृथ्वीराजाजोमहाभक्त ॥
राहेगुजराथप्रांतांत ॥ कच्छभुजदेशअसेत्याचा ॥ ७४ ॥ तयाचेअंगावरीलवस्त्र ॥ पांघरावेंतेंतुवांपवित्र ॥ तेणेंतुजलायेतीलनेत्र ॥ नि
श्चयेंकरोनिजाणावें ७५ ॥ ऐसेंऐकतांआज्ञावचन ॥ तेथोनिसत्वरनिघेब्राह्मण ॥ कच्छभुजदेशासयेऊन ॥ पृथ्वीरायासीभेटला ॥ ७६ ॥
शंकराचेंआज्ञावचन ॥ रायासीकरोनिनिवेदन ॥ अत्यंतकाकुलतीयेऊन ॥ ह्मणेअंगवस्त्रदेइंजे ॥ ७७ ॥ ऐसेंविप्राचेंऐकतांवचन ॥

भूपतीहोयलज्जायमान ॥ ह्मणेशिवासीहेंकायकठिण ॥ धाडिलेंह्मणोनमजकडे ॥ ७८ ॥ तरीतयाच्याआज्ञेवरून ॥ कांहींएकनहोईल
जाण ॥ परीएकमजलावाटेगौण ॥ उच्छिष्टवस्त्रघ्यावेंकैसें ॥ ७९ ॥ ऐसीरायासीवाटोनिभीती ॥ स्तब्धराहोनिक्षणभरचित्तीं ॥ मगए
कअंतरींयोजोनिरीती ॥ नवीनवस्त्रमागविलें ॥ ८० ॥ तेंवस्त्रमस्तकींवंदोन ॥ किंचितपाठीसीलावोन ॥ ब्राह्मणासीनमनकरोन ॥
पांघरविलेंतेधवां ॥ ८१ ॥ विप्रेंतेंवस्त्रपांघरितां ॥ दिव्यदृष्टीझालीतत्त्वता ॥ परमसंतोषवाटलाचित्ता ॥ देआशीर्वादरायासी ॥ ८२ ॥
सर्वलोकांनींतेंपहातां ॥ परमाश्चर्यवाटलेंचित्ता ॥ सरसहृदयींहोवोनितत्त्वता ॥ पृथ्वीरायासीवर्णिती ॥ ८३ ॥ सद्गुरुवचनींज्याचाभा
व ॥ तयासीआकळेऐसादेव ॥ यापरीनिश्चयमानितीसर्व ॥ लागलेभक्तीसीतेधवां ॥ ८४ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनी
टीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशेंअकरावाछप्पागोडहा ॥ ८५ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ ६ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरुश्रीधरा ॥ उद्धरोनिमजपामरा ॥ वर्णनकरवींसंतचरित्रा ॥ कृपाकरो
नीमजवरी ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ भक्तनिको आदर अधिक राजवंसमे इन कियो ॥ लघु मथुरा मेरता भक्त अति जैमल पोषे ॥
टोडे भजननिधान रामचंद्र हरिजन तोषे ॥ अभैराम इकरस नेम नीमाके भारी ॥ करमसील सुरतांन भगवान वीरम भूपति व्रतधा
री ॥ ईश्वर आषैराज राइमल कान्हर मधुकर नृप सरबस दियो ॥ भक्तनिको० ॥ ११२ ॥ ॥ टी०ओ० ॥ जिहींजन्मोनिराजकु
लांत ॥ नहोवोनियांश्रीमदोन्मत्त ॥ भक्तांचाआदरकेलाबहुत ॥ तयांचेंयशश्रवणकरा ॥ २ ॥ जयमल्लराजापरमपावन ॥ भक्तांचेंअतिश
यकेलेंपालन ॥ धाकुटीमथुराचकेलीजाण ॥ मेरतागांवआपुलें ॥ ३ ॥ भजनाचेंकेवळनिधान ॥ टोडेगांवींज्याचेंजनन ॥ जेणेंतोषवि
लेहरिजन ॥ तोरामचंद्ररावजाणा ॥४॥ अभयरामनामेंसुरस ॥ नीमागांवींज्याचावास ॥ जयाचीभक्तीएकरस ॥ नेमविशेषहाचाले ॥५॥
कर्मशीलभगवाननृपती ॥ तिसरातैसाविरमभूपती ॥ व्रतधारीहेझालेसुमती ॥ सुरतानदेशामाजीदेखा ॥ ६ ॥ अक्षयराजआणिईश्वर ॥
रायमल्लआणिकान्हर ॥ तैसाचनृपतीमधुकर ॥ जिहींसर्वस्वदिलेंभक्तां ॥ ७ ॥ ॥ मू०क० ॥ मेरते बसत भूप भक्तिको सरूप जाने

जैमल आनूप ताकी कथा कहि आयेहे ॥ करी साधुसेवा रीति प्रीतिकी प्रतीति भई नई एक सुनो हरि कैसेके लडायेहे ॥ नीचे मान मंदिर सो सुंदर बिचारि बात छातपर बंगलाके चित्र ले बनायेहे ॥ बिबिध बिछोना सेज राजत उठोना पानदान धरि सोना जरीपरदा सिमायेहे ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ मेरतेमाजीज्याचावास ॥ जयमल्लनामेंभूपसुरस ॥ भक्तीचेंस्वरूपजाणिलेंविशेष ॥ केवळपृथुरावदूसरा ॥ ८ ॥ एकतयाचीकथाअनुपम ॥ पूर्वींसांगण्यांतआलीउत्तम ॥ साधुसेवेचीरीतीपरम ॥ निष्ठापूर्वककरीतसे ॥९॥ तेणेंनिर्मळझालीमती ॥ जिणेंआकळेलक्ष्मीपती ॥ ऐसीजेकांपरमप्रीती ॥ तिचीप्रतीतीआलीराया ॥ १० ॥ नवीनचिरीतीकेलीएक ॥ श्रवणकरातेभावपूर्वक ॥ कैसेकरोनिलाडसम्यक ॥ जगज्जीवनातोषविलें ॥ ११ ॥ एकदाभूपतीग्रीष्मऋतूंत ॥ ऐसाविचारकरीचित्तांत ॥ आपणासीगरमीहोतांबहुत ॥ निजेतोवरच्याखणावरी ॥ १२ ॥ देवाचेंमंदिरठेंगणेंअसे ॥ तेथेंगरमीबहूहोतसे ॥ कायदेवासीनिद्रायेतसे ॥ होतअसेतगमग ॥१३॥ यापरीगोष्टविचारून ॥ रात्रींदेवासीनिद्रेलागुन ॥ वरच्यामजल्यावरीजाण ॥ सुंदरबंगलाबांधिला ॥१४॥ त्यामाजीनानाप्रकारेंचित्र ॥ जडाऊकामरचिलेंविचित्र ॥ अनेकतऱ्हेचेंकळसूत्र ॥ भोंवतेकारंजेशोभती ॥ १५ ॥ चारीबाजूपुष्पवाटिका ॥ मध्येंमहालशोभेनेटका ॥ त्यामाजीछपरीपलंगदेखा ॥ वरीअंथुरणेंअतिमृदु ॥ १६ ॥ भोंवतेंशोभेउपसाहित्य ॥ सोन्याचेवरीरत्नजडित ॥ पानदानादिपात्रयुक्त ॥ नानाप्रकारेंठेविलेंसे ॥ १७ ॥ वरीचांदवाशोभेरंगीत ॥ रत्नजडितझालरीयुक्त ॥ जरीचेपडदेशिंवोनिबहुत ॥ सर्वद्वारांसीलाविले ॥ १८ ॥ ॥ मू०क० ॥ ताकि दारु शिढि कर रचना उतारि धरें भरे दूरि चौकि आप भाव सुछताइये ॥ मानसी बिचारे लै लाल सेज पग धारे पान खात ले उगारे डारे पौढे सुखदाईये ॥ तियाहू न भेद जाने सो नसेनी धरी बाने देखिके किशोर सोयो फिरि भौर आईहे ॥ पतिको सुनाइ भई अति मन भाइ वाको खीजि डरपाइ जांनी भाग अधिकाइये ॥ २ ॥ ॥ टी०ओ० ॥ महालांतजावयालागून ॥ प्रभूच्याअंतर्गृहांतून ॥ एकचिमार्गठेविलाजाण ॥ दुसरारस्तानसेचि ॥ १९ ॥ आपणकाष्ठांचेशिडीवरून ॥ चढूनजातसेबाहेरून ॥ करीसेवास्वहस्तेंकरून ॥ नसेप्रवेशदुसऱ्याचा ॥ २० ॥ सर्वहीबंगलाझाडून ॥ प

लंगबिछानामांडोन ॥ मेवामिठाईपानदान ॥ सिद्धकरूनठेवीतसे ॥ २१ ॥ आपणखालींउतरोन ॥ शिडीघ्यावीकाढोन ॥ कांहींसादूर उभाराहून ॥ चौकीदेतसेरात्रभरी ॥ २२ ॥ जयमल्लाचानिर्मळभाव ॥ मानसींविचारकरीअपूर्व ॥ जीअलेकींदेवाधिदेव ॥ राधिकेसहितशयनस्थळीं ॥ २३ ॥ आतांबैसलेफराळास ॥ परस्परमुखांतघालितीग्रास ॥ स्वस्थकरोनीभोजनास ॥ तस्तांतहातधूतले ॥२४॥ आतांबैसलेपलंगावरी ॥ राधिकाआपुल्याप्रीतीकरी ॥ तांबूलघेऊनिनिजकरीं ॥ कृष्णाचेमुखींदेतसे ॥ २५ ॥ तैसेचिआपणश्रीपती ॥ राधेच्यामुखींविडादेती ॥ उभयतांहीपीकटांकिती ॥ पिकदानीमाजीथुंकोनियां ॥ २६ ॥ विनोदाचेंभाषणकरून ॥ परस्परगळ्यांतहातटाकोन ॥ उभयतांहीकरितीशयन ॥ परमानंदेंकरोनियां ॥ २७ ॥ पूर्वरात्रीसीऐसेंचित्तीं ॥ मगदोनप्रहरराहोनिनिश्चिती ॥ मागीलरात्रींसावधमती ॥ होवोनिकायकल्पीतसे ॥ २८ ॥ आतांउठलीराधाराणी ॥ हळूहळूहरीचेचरणदाबुनी ॥ गुणगावोनिमंजुळवाणी ॥ चक्रपाणीसीउठविले ॥ २९ ॥ जागेहोऊनमदनमोहन ॥ राधाराणीचेंमुखपाहोन ॥ आपणहोवोनिहास्यवदन ॥ राधेच्यागळ्यांतहातटाकिला ॥ ३० ॥ परस्परेंगळ्यांतहातटाकोन ॥ राउळामाजीकरितीगमन ॥ नूपुरेंवाजतीरुणझुण ॥ यापरीमंदिरींपावले ॥३१॥ ऐसियापरीकरोनिकल्पना ॥ मगभूपतीजातसेस्नाना ॥ नित्यनेमकरोनियांजाणा ॥ लागेपूजनाश्रीहरीच्या ॥३२॥ यापरीकरीनित्यनेम ॥ परीभक्तवशमेघश्याम ॥ जैसारायाचाकल्पनाधर्म ॥ तैसाचश्रीहरीवर्ततसे ॥ ३३ ॥ प्रत्यक्षराधाकृष्णआपण ॥ महालांतयेऊनकरितीशयन ॥ मेवामिठाईभक्षणकरून ॥ तस्तांतमुखप्रक्षाळिती ॥३४॥ मगतांबूलभक्षोनिदेख ॥ पिकदानींतटाकितीपीक ॥ जेंजेंकल्पीनरनायक ॥ तैसेंचिआपणकरीतसे ॥ ३५ ॥ नित्यसेजघालावयासी ॥ महालांतयेतांजयमल्लासी ॥ पहातांउच्छिष्टप्रसादासी ॥ प्रेमअंतरींनसमाये ॥ ३६ ॥ भक्षणकरीभक्तिपूर्वक ॥ यापरीहोतसेनित्यकौतुक ॥ दिवसलोटलेकितीएक ॥ नसेठाउककोणासी ॥ ३७ ॥ इकडेस्त्रियेच्यामहालांत ॥ कधींहीनयेचिनृपनाथ ॥ सेवेमाजीजडलेंचित्त ॥ सादररहाततेथेंचि ॥ ३८ ॥ स्त्रियेसीहानकळेभेद ॥ तेणेंतियेसीझालाखेद ॥ ह्मणेमहालहाकरोनिविशद ॥ कायभूपतीकरीतेथें ॥ ३९ ॥ कोणीदुसरीठेविलीसवत ॥ ह्मणोनितेथेंरात्रीरहात ॥

विकल्पधरोनिह्माचित्तांत ॥ रात्रौशोधार्थआलीतेथें ॥ ४० ॥ तोंतेदिवशींनकळतां ॥ शिडीबंगल्यासीराहिलीतत्त्वता ॥ भूपतीस्वस्थ
करोनिचित्ता ॥ श्रीकृष्णनाथानिजवीतसे ॥४१॥ तंवतेसमयींराजकांता ॥ वरीचढोनिजायनलगता ॥ डोंकावोनिजोंअंतरींपहातां ॥
दिव्यलखलखाटपाहिला ॥४२॥ तेणेंदृष्टीगेलीदिपून ॥ मगथोडेंसेंधैर्यधरून ॥ बरवेंपाहेन्याहाळोन ॥ तोंउभयतांकिशोरपाहिले ॥४३॥
राधिकाआणिनंदकुमर ॥ तिणेंपहातांदृष्टीभर ॥ प्रेमेंमूर्च्छायेऊनसत्वर ॥ पडेभूवरतेधवां ॥ ४४ ॥ एकाएकींशिडीवरून ॥ भूवरी
राणीपडतांजाण ॥ तेणेंदणाटाउठिलागहन ॥ तोशब्दरायासीश्रवणझाला ॥४५॥ ह्मणेहेंयेथेंआलेंकवण ॥ धांवतयेवोनिपाहेआपण ॥
तोंराणीपडलीमूर्च्छापन्न ॥ ह्मणेहेंकायजाहलें ॥ ४६ ॥ मगतियेसीसावधकरून ॥ जयमल्लपुसेवर्तमान ॥ राणीसीगहिवरदाटोन ॥ करी
निवेदनसर्वही ॥ ४७ ॥ मनींरायासीगोडवाटलें ॥ परीतीनित्ययेईलभलें ॥ ह्मणोनितिजसीबहुदापिलें ॥ अगेह्माअनर्थकायकेला
॥४८॥ मनमोहननिद्रिस्तअसतां ॥ कैसीतेथेंगेलीसतत्त्वता ॥ यावरीऐसाअपराधकरितां ॥ लावीनशिक्षातुजलागीं ॥४९॥ वरीवरीऐसादा
वीराग ॥ परीअंतरींबहुअनुराग ॥ ह्मणेहोस्त्रीचेंमहद्भाग्य ॥ प्रत्यक्षदर्शनजाहलें ॥ ५० ॥ सत्सेवेचेंमहत्त्वपरम ॥ मानसींकल्पितांनरो
त्तम ॥ प्रत्यक्षहोऊनिमेघश्याम ॥ करीअंगिकारसेवेचा ॥ ५१ ॥ ॥ कथामधुकरशाहराजाची ॥ ॥ मू०क० ॥ मधुकरसाह नामकियो
ले सफल याते भेष गुनसार ग्राह तजत असारहे ॥ ओंडछेको भूप भक्तभूप सुखरूप भयो लयो पन भारी जाके ओर न बिचारहे ॥ कंठीं
धरि आवे कोउ धोई पग पीवे सदा भाइ दुःख खर घर डाऱ्यो भाल भारहे ॥ पाइ परछालि कही आज जू निहाल किये दिये द्रये दुःष्ट पाव ग
हे दृगधारहे ॥३॥ ॥ टी०ओ०॥ वोंडश्याचाराजाउत्तम ॥ मधुकरसाहत्याचेंनाम ॥ नामासारिखेंज्याचेंकर्म ॥ तेंचिवर्मपरिसाकीं ॥५२॥
नामाचीकेलीसफलता ॥ जातीपातीसीनपहातां ॥ संतवेषातेंधारणकर्ता ॥ पूज्यतत्त्वतामानीत्यासी ॥५३॥ कांहींनपाहतांगुणदोष ॥ प्र
भूचावेषमानीसुरस ॥ जैसामधुकरघेसुवास ॥ दोषनपहातांपुष्पाचे ॥ ५४ ॥ प्रपंचांतीलव्यवहार ॥ सर्वजाणोनिअसार ॥ त्यजोनिमा
नीमुख्यसार ॥ श्रीहरीच्यावेषातें ॥ ५५ ॥ केवळवोंडश्याचानसेनृप ॥ भगवद्भक्तामाजीभूप ॥ पूर्णजाहलासुखरूप ॥ नरजन्मासीयेऊ

नी ॥ ५६ ॥ ऐसाभारीकेलापण ॥ तेथेंविचारनपाहेआन ॥ तुळसीमाळाजोकरीधारण ॥ हरितुल्यमानीतयातें ॥ ५७ ॥ मगतोको
णीअसोजाण ॥ तयाचेचरणप्रक्षालोन ॥ भक्तीनेंतीर्थकरीप्राशन ॥ निःशंकमनहोवोनी ॥ ५८ ॥ ऐसेंतयाचेंआचरण ॥ पाहोनिभाऊ
बंदआपण ॥ मनामाजीहोतीखिन्न ॥ ह्मणतीहाभ्रष्टजाहला ॥ ५९ ॥ ऐसाकायहोयाचाभाव ॥ भलत्यासचकींमानीदेव ॥ तरीपरी
क्षापाहूंअपूर्व ॥ ह्मणोनिविचारकायकरितो ॥ ६० ॥ गाढवासीतिलकलावोन ॥ तुळसींचीमाळगळांघालोन ॥ जेथेंभूपतीबैसलाजा
ण ॥ तेथेंसोडोनदीधला ॥ ६१ ॥ रायेंपहातांगाढवासी ॥ वर्णीआपुल्याभाग्यासी ॥ आजिमाझेहोनगरवासी ॥ पशूहीवैष्णवजाहले
॥ ६२ ॥ दोनपायांचेयेतीनित्य ॥ आजिचारपायांचेआलेसंत ॥ परमानंदेंप्रेमयुक्त ॥ प्रक्षाळीचरणतयाचे ॥ ६३ ॥ भावेंतीर्थप्राशन
करून ॥ षोडशोपचारेंकरीपूजन ॥ पंचपक्कान्नेंघालीभोजन ॥ हातजोडोनस्तवनकरी ॥ ६४ ॥ मजवरीकृपाकेलीबहुत ॥ तेणेंआजि
मीझालोंपुनीत ॥ रायाचाकंठभरोनियेत ॥ करितांस्तवनगाढवाचें ॥ ६५ ॥ ऐसाभक्तीचापाहोनिआशय ॥ दुष्टजनांचेंद्रवलेंहृदय ॥
अनुतापहोवोनिलवलाहें ॥ धरितीपायनृपतीचे ॥ ६६ ॥ ह्मणतीआह्मींकेलेंकपट ॥ परीतुमचाभावउद्भट ॥ सर्वांचेभरोनिआलेकंठ ॥
नेत्रींवाहतीअश्रुधारा ॥ ६७ ॥ ह्मणतीआह्मीपापीपूर्ण ॥ आतांदयाळाकरींपावन ॥ तेव्हांरायासीदयायेऊन ॥ केलेवैष्णवसकळांसी ॥
॥ ६८ ॥ ज्यागाढवाचेंकेलेंपूजन ॥ तोहीवैष्णवझालापूर्ण ॥ कीर्तनपुराणकरीश्रवण ॥ उच्छिष्टभक्षीसंतांचें ॥ ६९॥ त्यागाढवाचेंदेहाव
सान ॥ काळेंकरूनिहोतांजाण ॥ रायेंतयासीगाडोन ॥ वरीसमाधीबांधिली ॥ ७० ॥ त्यासमाधीचेंपूजन ॥ अद्यापवरीहोतसेजा
ण ॥ नवसासपावेसकळांलागुन ॥ ऐसेंमहिमानसंतांचें ॥७१॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ माहाराष्ट्रभाषें
तभक्तिप्रेमामृत ॥ एकशेंबारावाछप्पागोडहा ॥ ७२ ॥ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरूहृषीकेशा ॥ माझीपुरवींहेचिआशा ॥ जेणेंसंतोषहोयपरेशा ॥ तेसंत
कीर्तीबोलविजे ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ खेमालरतनराठोरके अटल भक्ति आई सदन ॥ रैनापर गुन रामभजन भागोत उजागर ॥

प्रेमी प्रेमकिशोर उदर राजा रतनाकर ॥ हरिदासनिके दास दसा ऊंची धुज धारी ॥ निर्भै अनन्य उदार रसिक जस रसना भारी ॥ दशधा संपति संत बल सदा रहत प्रफुल्लित वदन ॥ खेमालरतन० ॥ ११३ ॥ ॥ टी०ओ० ॥ भीकानेरचानृपनाथ ॥ खेमालरतनमहाभक्त ॥ उपनांवराठोरअसेख्यात ॥ जातरजपूततयाची ॥ २ ॥ जयाचेकुळींवंशपरंपरा ॥ अक्षयभक्तीआलीघरा ॥ सुपुत्रजन्मलाज्याच्याउदरा ॥ रामरैनीनामत्याचें ॥ ३ ॥ कायतयाचेवर्णूंगुण ॥ सर्वदाकरीरामभजन ॥ महाभागवतभक्तपूर्ण ॥ असेप्रख्यातभूवरी ॥ ४ ॥ रामरैनीउदरींसुंदर ॥ परमप्रेमीप्रेमकिशोर ॥ जन्मलात्याचेगुणअपार ॥ वेगळेंवर्णनहोईलपुढें ॥ ५ ॥ खेमालरतनराजाचेंउदर ॥ केवळदुसरेंतेंरत्नाकर ॥ ऐसेंभक्तरत्नउपजलेंसुंदर ॥ कीर्तीअपारजयाची ॥ ६ ॥ यापरीखेमालरतनसुरस ॥ हरिदासाचेपरमदास ॥ जेणेंआपुलीऊर्ध्वदिशेस ॥ भक्तीचीध्वजाउभारिली ॥ ७ ॥ सर्वथानिर्भयकरोनिमन ॥ हरीचेठायींअनन्यशरण ॥ स्वभावेंमहाउदारपूर्ण ॥ परमरसिकअसेकीं ॥ ८ ॥ श्रीहरीआणिहरिदास ॥ उभयतांचेंसुंदरयश ॥ रसनेमाजीवसेविशेष ॥ तोचिसुरसग्रहणकरी ॥ ॥ ९ ॥ श्रीहरीचीदशधाभक्ती ॥ तेचिज्याचीमुख्यसंपत्ती ॥ बलजयाचेंसंतसंगती ॥ प्रफुल्लितवदनराहेसदा ॥ १० ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशेंतेरावाछप्पागोडहा ॥ ११ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरूपद्मनाभा ॥ शांतीचातूंपूर्णगाभा ॥ निवटोनिमाझेकामकोपा ॥ करींसद्बोधामजलागीं ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ कलियुग भक्ती कररी कमांन रामरैनिके रीझु करी ॥ अजर धरम आचऱ्यों लोकहित मनो नीलकंठ ॥ निंदकजन अनिराइ कहा महिमा जाने गो भूसठ ॥ विदित गांधर्वी व्याह कियो दुषकंत प्रमाने ॥ भरतपुत्र भागोत सुमुख सुकदेव बखाने ॥ ओर भूप कोऊ छैसके द्रष्टि जाहि नाहिन धरि ॥ कलियुग० ॥ ११४ ॥ ॥ टी०ओ० ॥ भक्तिरूपीधनुष्यजाण ॥ कलियुगींतेंपरमकठिण ॥ रामरैनीरायेंआपण ॥ केलेंनम्रसहजची ॥ २ ॥ लोकांचेंकल्याणव्हावेंभलें ॥ ऐसेरायें धर्मआचरिले ॥ तेतेसर्वहीपारपाडिले ॥ जाणोदुसरानीलकंठ ॥ ३ ॥ जगामाजीजेजेनिंदक ॥ दूरटाकिलेतेसकळिक ॥ कायमहिमाते

जाणतीमूर्ख ॥ह्मणोनित्यांसीअव्हेरिले ॥४॥ रासलीलेंतगर्कझाला ॥ कन्येचागांधर्वविवाहकेला ॥ ऐसातयाचाभावभला ॥ प्रख्यातलोकां
तअसेकीं ॥ ५ ॥ जैसियापरीरावदुष्यंत ॥ त्याप्रमाणेंचिपुत्रभरत ॥ शुकदेवानेंभागवतांत ॥ आपुल्यासुमुखेंवर्णिले ॥ ६ ॥ तैसाचिभ
क्तिबळेंकरून ॥ जैसाजाहलाखेमालरतन ॥ तैसाचिपुत्ररामरैन ॥ सर्वगुणसंपन्नजाहला ॥ ७ ॥ रामरैनीचीबरोबर ॥ कोणीनकरूंसके
नृपवर ॥ ज्याचियातेजासमोर ॥ दृष्टीनधरितीकोणीही ॥ ८ ॥ ॥ मू०क० ॥पून्योमे प्रकास भयो सरद समाज रास विविध वि
लास नृत्य रागरंग भारीहे ॥ बैठे रसा भीजि दोउ बोल्यो रामराजा रीझि भेट कहां कीजे बिप्र कही जोइ प्यारीहे ॥ प्यारको बि
चारे न निहारे कहूं नेकु छटा सुता रूपघटा आनरूप सेवा ज्यारीहे ॥ रही सभा सोच आप जाइके लिवाइ लाये भेषसो दिवाये
फेर संपतिलै बारीहे ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ एकदाशारदीपौर्णिमेस ॥ चंद्राचापडलाप्रकाश ॥रायेंसमाजमेळवूनसुरस ॥ रासलीला
आरंभिली ॥ ९ ॥ कोणीनवीनरासधारी ॥ आलेहोतेतयानगरीं ॥ त्यांतेंबोलावूनसत्वरी ॥ आरंभकरवीलीलेतें ॥१०॥नृत्यादिविवि
धविलास ॥ रागरंगहोतीविशेष ॥ रसमातलाबहुवस ॥ सभातटस्थबैसली ॥ ११ ॥ रामरैनीलीलापहात ॥ जवळीबैसलासेपुरोहित ॥
उभयतांसीहीप्रेमदाटत ॥ रसरंगांतभीजले ॥ १२ ॥ रावहोवोनिप्रसन्नचित्त ॥ पुरोहितासीविचारित ॥ ऐसियारासधारीसीयेथ ॥ को
णतीभेटकरावी ॥ १३ ॥ विप्रह्मणेजेंतुह्माप्रियकर ॥ तेंचियासीद्यावेंसत्वर ॥ रावअंतरींकरीविचार ॥ कोठेंआवडीअसेमाझी ॥ १४ ॥
सांसारिकवस्तुसर्वपहातां ॥ कांहींचप्रियकरनदिसेचित्ता ॥ थोडासाप्रीतीचाथेंबतत्त्वता ॥ कन्येवरमनाचाअसेकीं ॥१५॥ कन्येचेंरूपअ
तिसुंदर॥ गुणेंकरूनहीअतिचतुर॥मगदूतांसीसांगेसत्वर॥ आणाझडकरीमुलीसी॥१६॥ ऐसेयाचेऐकतांबोल॥ तटस्थसभाझालीसकळ ॥
ह्मणतीहेंकायविपरीतकेवळ ॥रासधाऱ्यासीकन्यादेतसे ॥१७॥ सकळहीदूतांतेंखुणाविती ॥ तुह्मीनाणावेंकन्येप्रती ॥ तेव्हांतेस्तब्धउभेरा
हाती॥ रायेंमनांतओळखिलें ॥१८॥ आपणचिमगउठोन ॥ लगबगेंभीतरीजाऊन ॥ कन्येसीसभेंतआणोन ॥ रासधारीतेंदिधली ॥१९॥
सर्वहीकरितीआश्चर्य ॥ रासधारीतैंधरितीपाय ॥ ह्मणतीरायाकरिसीकाय ॥ विचारूनपाहेंमानसीं ॥ २० ॥ हेराजेंद्रातुझीकन्या ॥ को

ण्यानृपासीदेइजेधन्या ॥ आह्मीदरिद्रीऐसीमान्या ॥ कायघेऊनकरावी ॥ २१ ॥ भीकमागतगांवोगांवीं ॥ तुझीकन्याघेऊनफिरावी ॥ तेणेंकलंकतुझेवैभवीं ॥ करींविचारदयाळा ॥ २२ ॥ ऐसेंत्याचेंऐकतांवचन ॥ रायेंजामदारबोलावोन ॥ कोव्यावधीआणोनधन ॥ रासधारीसीदीधलें ॥ २३ ॥ इतुकेंत्यासीदिधलेंधन ॥ करोनिठेविलाआपुल्यासमान ॥ जाणोंप्रभूच्यालीलेवरून ॥ ओंवाळूनसर्वटाकिलें ॥ २४ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशेंचवदावाछप्पागोडहा ॥ २५ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरूदामोदरा ॥ मजवरीआतांकृपाकरा ॥ संतचरित्रमाझेगिरा ॥ दयेकरोनिबोलवीं ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ हरिगुरुहरिदासनिसो रामघरनि साची रही ॥ आरजको उपदेश सुतो उर नीके धार्‍यो ॥ नवधा दशधा प्रीति आन धर्म सबै बिसार्‍यो ॥ अच्युतकुल अनुराग प्रगट पुरसारथ जान्यो ॥ सारासार विवेक बात तीनौ मन मान्यो ॥ दासतनि अनन्य उदारता संतन मुख राजा कही ॥ हरिगुरु० ॥ ११५॥ ॥ टी०ओ० ॥ रामरैनीचीकांता ॥ किशोरदासाचीमाता ॥ परमभाविकपतिव्रता ॥ तीचियाचरित्रापरिसावें ॥ २ ॥ हरिदासआणिश्रीनायक ॥ तैसेचिसद्गुरुनाथदेख ॥ यांचेठाईंभक्तिपूर्वक ॥ सत्यपणानेंराहिली ॥ ३ ॥ गुरूनेंदेतांउपदेश ॥ त्यामाजीहेंकथिलेंविशेष ॥ सर्वभूतांसींअसावेंसुरस ॥ नम्रत्वेंकरूनिसर्वदा ॥ ४ ॥ सर्वभूतांचेंकरावेंआर्जव ॥ यावाक्याचाकरोनिगौरव ॥ उत्तमप्रकारेंधरोनिभाव ॥ हृदयामाजीठेविला ॥ ५ ॥ नवधादशधा भक्तीकरून ॥ हरीचेठाईंप्रीतीगहन ॥ याहूनजेकांधर्मअन्य ॥ तेसर्वहीविसरली ॥ ६ ॥ अच्युतकुलजेसंतजन ॥ त्यांचेठाईंअनुरागपूर्ण ॥ प्रगटपुरुषार्थहाचिजाण ॥ तिणेंनरदेहींजाणिला ॥ ७ ॥ आणीकसारासारविवेक ॥ ऐशाह्यातीनीगोष्टीदेख ॥ मनामाजीमानिल्यासम्यक ॥ याहूनआणीकनावडे ॥ ८ ॥ दासांचेठाईंअनन्यता ॥ सर्वप्रकारेंउदारता ॥ कितीमीसांगूंथोरता ॥ रामरैनीच्याकांतेची ॥ ९ ॥ राजाबाईचीभक्तीपाहून ॥ संतांनींआपुल्यामुखेंकरून ॥ भक्तांतराजाऐसेंह्मणून ॥ नामाभिधानठेविलें ॥ १० ॥ ॥ मू०क० ॥ आये मधुपुरि राजा राम अभिराम दौउ दाम पै न राख्यो साधु विप्र भुगतायेहे ॥ ऐसे ये उदार राह खरच संभार नाही चलिवो

विचार भयो चूरा दीठ आयेहे ॥ मुद्रा सतपांच मोल खोलि तिया आगे धरे दीजे बेचि गये नाभा कर पहिरायेहे ॥ पतिको बुला
इ कही नीके देखि रीझे भीजे काढिके करज पुरआये दे पठायेहे ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ राजाबाईसहित ॥ रामरैनीप्रेमयुक्त ॥ म
धुपुरीसीएकदायेत ॥ परमानंदेंकरोनियां ॥ ११ ॥ प्रधानेंवाटखर्चास ॥ दानधर्मकरावयास ॥ द्रव्यदिधलेंबहुवस ॥ हिशोबसर्वहीकरो
नी ॥ १२ ॥ परीउभयतांमनोभिराम ॥ संतसेवनींआनंदपरम ॥ जवळीनठेविलेंकांहींदाम ॥ साधूचेकारणींलाविलें ॥ १३ ॥ ब्राह्मण
आणिसंतमहंत ॥ जेकोणहोतेवृंदावनांत ॥ तयांतेंपूजोनिविधियुक्त ॥ भंडारेबहुतकेलेकीं ॥ १४ ॥ उभयतांहीपरमउदार ॥ पुढीलमा
गीलनसेविचार ॥ घरासीजातांमार्गावर ॥ नराखिलेंखर्चावयासी ॥ १५ ॥ जेव्हांजाण्याचीझालीतयारी ॥ द्रव्यकांहींचनसेपदरीं ॥
तेव्हांस्त्रियेतेंरावविचारी ॥ आतांकायविचारकरावा ॥ १६ ॥ ऐसेंरायाचेंऐकतांउत्तर ॥ राजाबाईकरीविचार ॥ तोंकरांतीलचुडासत्व
र ॥ दृष्टीसआलातियेच्या ॥ १७ ॥ त्याकंकणाचेंपहातांमोल ॥ पांचशेंमोहराअसेकेवळ ॥ करांतोनिकाढोनितत्काळ ॥ नृपाचेसमक्षठे
विलें ॥ १८ ॥ ह्मणेजीहेंविकोन ॥ खर्चावयासीआणाधन ॥ रामरायेंतेंघेवोन ॥ आपणचिगेलाविकावया ॥ १९ ॥ जोंनिघालादा
राबाहेर ॥ तोंनाभाजीआलेसमोर ॥ रावह्मणेगिन्हाईकथोर ॥ आपणालागूनभेटला ॥ २० ॥ यालागींहादेतांमाल ॥ याचेंअनंतपा
वेमोल ॥ नाभाजीचेचरणींभाल ॥ ठेवोनितोकायकरी ॥ २१ ॥ कंकणघेवोनियांत्वरित ॥ नाभाजीचेघालीहातांत ॥ दुरोनिराणीहोती
पाहत ॥ प्रसन्नमनांतजाहली ॥२२॥ त्वरेंपतीसीबोलाऊन ॥ ह्मणेहेंउत्तमकेलेंजाण ॥ उभयतांहीमनींरिझोन ॥ प्रेमरंगांतभीजले ॥२३॥
आपुलाकांहींनपहातांविचार ॥ ऐसीजेसेवाकरितीसत्वर ॥ तेचिजाणावेसंतथोर ॥ वश्यश्रीधरहोयतयां ॥ २४ ॥ मगउभयतांकर्जका
ढोन ॥ आपुल्यापुरासीअलेजाण ॥ द्रव्यदिधलेंपाठवोन ॥ जपाचेंत्यासीतेवेळे ॥ २५ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटी
काख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशेंपंधरावाछप्पागोडहा ॥ २६ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरूहृषीकेशा ॥ पूर्णकरावीमाझीआशा ॥ संतकीर्तीचीअसेलालसा ॥

कींहेमुखानेंवर्णावी ॥ १ ॥ मू०छ० ॥ अभिलाख उभै खेमालकी ते किशोर पुरा किया ॥ पाइनि नूपुर बांधि नृत्य नगधरिहित्त
नाच्यो ॥ रामकलस मन रली सीस ताते नहि बाच्यो ॥ बानी बिमल उदार भक्तिमहिमा विस्तारी ॥ प्रेमपुंज सुटसील विनै सं
तनि रुचिकारी ॥ सृष्टी सराहे राम सुवन लघुवैस लछन आरज लिया ॥ अभिलाख० ॥ ११६ ॥ ॥ टी०ओ० ॥ खेमालरतनभक्त
सुरस ॥ नातूतयाचेकिशोरदास ॥ आजोबाचीउभयआस ॥ केलीपूर्णतयानें ॥ २ ॥ पायांतनूपुरबांधोन ॥ गिरिधरलालाच्याप्रीतीका
रण ॥ नानाप्रकारेंनृत्यकरून ॥ आनंदयुक्तनाचला ॥३॥ मनोरमसुवर्णकलशदेख ॥ ज्यामाजीप्रभूचेंअग्रोदक ॥ तोनित्यमस्तकींघेतला
सुरेख ॥ त्यामाजीमनरंगलें ॥ ४ ॥ याउभयनेमांवांचून ॥ यावज्जन्मनराहिलेजाण ॥ यापरीकिशोरदासभक्तपूर्ण ॥ आज्याचेंवचनसि
द्धकेलें ॥ ५ ॥ हरिनामानेंवाणीनिर्मळ ॥ उदारत्वेंस्वभावसरळ ॥ भक्तिमहिमाजेणेंपुष्कळ ॥ पृथ्वीवरीविस्तारिला ॥ ६ ॥ उत्तमप्रका
रेंज्याचेंशील ॥ प्रेमाचेतोंपुंजकेवळ ॥ संतांकारणेंरुचिकरनिर्मळ ॥ यापरीविनयजयाचा ॥ ७ ॥ ऐसारामरैनीचातनय ॥ जयाचेंपहा
तांअल्पवय ॥ लक्षणपहातांपरमविनय ॥ करोनिसकळांआर्जविलें ॥ ८ ॥ किशोरदासाचेंकरितांवर्णन ॥ सकळहीहेसृष्टीजाण ॥ अंत
रींआश्चर्यपूर्ण ॥ यापरीभक्तीतयाची ॥ ९ ॥ ॥ मू०क० ॥ खेमालरतन तनत्यागसमे अश्रुपात बात सुत पूछे आज्ञु नीके खोलि
दीजिये ॥ कीजे पुन्य दान बहु संपती अमान भरी धरी हिये दोइ सोइ कही सुनि लीजिये ॥ बिबिधबढाइमे समाइ मती भइपेन
नित्तही बिचार अब मनपर खीजिये ॥ नीरभरीघट सीस धरिके न लायो ओरु नूपुरनि बांधि नृत्य कियो नाहि छीजिये ॥ १ ॥
॥ ॥ टी०ओ० ॥ खेमालरतनमहाभक्त ॥ त्याचियादेहायेतांअंत ॥ नेत्रींवाहतीअश्रुपात ॥ तगमगचित्तांतलागली ॥ १० ॥
ऐसात्याचापहातांविचार ॥ पुत्रजोडोनिदोनीकर ॥ उभाराहोनिपुसेसमोर ॥ कायतेइच्छाअसेसांगा ॥११॥ आजिनिर्मळचित्तेंकरून ॥
स्पष्टसांगावेंमजलागोन ॥ बहूसंपत्तीअसेजाण ॥ नसेअनुमानजियेचें ॥ १२ ॥ जेंपाहिजेपुण्यदान ॥ इच्छानुरूपकरावेंजाण ॥ रा
ज्यादीसर्वस्वअर्पितांपूर्ण ॥ आह्मीनआडवेयेऊंकीं ॥ १३ ॥ ऐसेंपुत्रांचेंऐकतांवचन ॥ खेमालरतनप्रसन्नहोऊन ॥ ह्मणेरेबाळाधन्यधन्य ॥

छप्पा ११६

वंशींसुरत्नझालासी ॥ १४ ॥ तुझ्याऐसापुत्रजाण ॥ मजलागोनिकायउणें ॥ परंतुदोनगोष्टीकठिण ॥ हृदयींमाझ्याठेविल्याती ॥ १५ ॥
जरीतूंत्याकरिसीपूर्ण ॥ तरीमीसांगतोंकरिजेश्रवण ॥ माझेंआयुष्यसरलेंजाण ॥ परीतेंघडोननआलें ॥ १६ ॥ नानाप्रकारेंमोठेपणांत ॥
जडोनिराहिलीमतीत्यांत ॥ विचारकरितांनित्यच्यानित्य ॥ परीतेंघडोननआलें ॥ १७॥ आतांमनावरीधरितोंराग ॥ परंतुकांहींनचले
लाग ॥ तेणेंअंतरींबहूतगमग ॥ पूर्णमनोरथकरींतूं ॥ १८ ॥ प्रेमेंसेवावयावैकुंठपीठ ॥ अग्रोदकानेंभरोनिघट ॥ मस्तकावरीघेऊननी
ट ॥ नित्यआणावामनींहोतें ॥ १९ ॥ परीतेंकांहींनाहींआणिलें ॥ तैसेंचिमनींच्यामनींराहिलें ॥ आणीकदुसरेंऐकवहिलें ॥ तुजलागो
निसांगतों ॥ २० ॥ सोडोनियांलज्जालौकिक ॥ पाईंनूपुरेंबांधोनिसम्यक ॥ प्रेमेंवैकुंठनायकासन्मुख ॥ नित्यनाचावेंमनींहोतें ॥ २१ ॥
परीतेंघडोनिआलेंनाहीं ॥ आतांअंतरींझुरतोंपाहीं ॥ तूंहेंकरसीललवलाहीं ॥ सुखेंजाईनमीनिजधामा ॥२२॥ ॥ मू०क० ॥ रहे चुपचा
प सबै जानि काम आपहीको बोल्यो यो किशोर नाती आज्ञा मोको दीजिये ॥ यही नित करो नहीटरो जोलो जींवों तन मनमे हुलास
उठी छातिलाइ लीजिये ॥ बहु सुख पायापाये बैसही निवाहे पन गाये गुन लालप्यारी अति मति भीजिये ॥ भक्तिबिस्तार कि
यो बैसलघु भीज्यो हियो दियो सनमान संतसभा सब रीझिये ॥ २ ॥ ॥ टी०ओ० ॥ ऐसेंपित्याचेंऐकतांवचन ॥ पुत्रासादि
सर्वहीजन ॥ स्तब्धराहिलेधरोनिमौन ॥ कोणीहीउत्तरनदेती ॥२३॥ लौकिकलज्जासर्वसोडून ॥ आपणाहेंकरावेंलागेलजाण ॥ ऐसास
कळांनींविचारपाहोन ॥ कोणीनबोलतीतेधवां ॥२४॥ इतुक्यामाजीमहाभक्त ॥ किशोरदासनामेंख्यात ॥ रामरैनीरायाचासुत ॥ ना
तूखेमालरतनाचा ॥ २५ ॥ जोडोनियांदोनीपाणी ॥ प्रपित्यापुढेंउभाराहूनी ॥ कायबोलतसेअमृतवाणी ॥ मजहीआज्ञादेइजे ॥ २६ ॥
जैसेआपुलेमनोरथ ॥ तैसेपरीकरीननृत्य ॥ नढळेंमीहोयानेमांत ॥ यावद्देहांतजीवमाझ्या ॥ २७ ॥ खेमालरतनेंहेंऐकतांवचन ॥ जरी
जरेनेंदेहक्षीण ॥ तथापिआनंदमनींभरोन ॥ उठोनउभेराहिले ॥ २८ ॥ परमोत्साहेंकरून ॥ किशोरदासासीहृदयींधरोन ॥ देवोनिगा
ढआलिंन ॥ ह्मणेरेधन्यासत्पुत्रा ॥ २९ ॥ तुझेंऐकतांवाक्यामृत ॥ सुखपावलेंमजबहुत ॥ ऐसेंबोलोनिसंतोषयुक्त ॥ निजधामासीगमन

केलें ॥ ३० ॥ मागेंकिशोरदासेंआपण ॥ अभिमानलज्जासर्वसोडून ॥ चरणांसीनूपरेंबांधोन ॥ श्रीहरीसन्मुखनृत्यकरी ॥ ३१ ॥ तैसें
चिअग्रोदकआपण ॥ मस्तकावरीआणीभरून ॥ यावज्जन्मपर्यंजाण ॥ निर्वांहकेलानेमाचा ॥ ३२ ॥ लालप्यारीचेगुणगायन ॥
सर्वकाळकरीआपण ॥ प्रेमामाजीपूर्णनिमग्न ॥ मतीभिजोनगेलीसे ॥ ३३ ॥ कायमीत्याचासांगूंप्रकार ॥ केलाभक्तीचाजगींविस्तार ॥
वयपहातांअल्पफार ॥ रंगलेंअंतरपरीत्याचें ॥ ३४ ॥ किशोरदासाच्यागुणांवरून ॥ सकळहीसंतसभारिझोन ॥ प्रेमेंकरोनिदिलासन्मान
॥ यावरीपूर्णभक्ततो ॥ ३५ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशेंसोळा
वाछप्पागोडहा ॥ ३६ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरूपद्मनाभा ॥ चैतन्याचापूर्णगाभा ॥ निवटोनिमायेचीनित्यआभा ॥
आत्मस्वरूपामजदावीं ॥ १ ॥ ॥ मू०क० ॥ खेमालरतनराठोरके सुफल वेलि मीठी फली ॥ हरिदास हरिभक्ति भक्त मंदिरको
कलसो ॥ भजनभावपर पक्क हृदै भागीरथजलसो ॥ त्रिधा भाति अति अनन्य रामकीरती निवाही ॥ हरि गुरू हरिबल भाति ति नहि
सेवा दृढ साई ॥ पूरनइंदु प्रमुदित उदधि त्यौं दास देखि बाढे रली ॥ खेमालरतन० ॥११७॥ ॥ टी०ओ० ॥ राठोरगांवींचेखेमालरतन ॥
यांचीसुवंशवल्लीजाण ॥ उत्तमफलातेंप्रसवलीपूर्ण ॥ एकाहूनिएकगोडदेखा ॥२॥ किशोरदासाचेउदरींदेख ॥ हरिदासनामेंभक्तसम्यक ॥
जेणेंहरिभक्तीकेलीठीक ॥ कायमीवर्णनकरूंत्याचें ॥ ३ ॥ सकळहीभक्तहेंचिमंदिर ॥ हरिदासत्याचेंशिखरसुंदर ॥ हरीचेभजनींअतिशयआदर
॥ परिपक्कभावजयाचा ॥ ४ ॥ पावनआणिनिर्मळ ॥ जैसेंभागीरथीचेंजळ ॥ तैसेंजयाचेंहृदयकेवळ ॥ यापरीप्रेमळहरिदासजी
॥ ५ ॥ ज्यापरीतीनीलोकांत ॥ मायभागीरथीशोभादेत ॥ तैश्याचिपरीयशअद्भुत ॥ हरिदासाचेंशोभतसे ॥ ६ ॥ अतिअनन्यत्वेंकरून
॥ रामकीर्तीचेंकेलेंगायन ॥ जन्मपर्यंतहाचिपण ॥ नाहींगाइलेंइतरदेवा ॥७॥ सद्गुरूआणिअयोध्याधीश ॥ हरिबलह्मणजेहरीचेदास
॥ सद्दढभावेंसेवासुरस ॥ नानाप्रकारेंकेलीत्यांची ॥ ८ ॥ पौर्णिमेचापूर्णचंद्र ॥ पहातांप्रमुदितहोयसमुद्र ॥ तैसेंहरिदासासीप्रे

मथोर ॥ भगवद्भक्तासीपहातां ॥ ९ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशें
सत्रावाछप्पागोडहा ॥ १० ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ त्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरूदामोदरा ॥ कृपाकरोनिमजपामरा ॥ चरणांपाशींठेवींसत्वरा ॥ चुकवीं
फेराजन्ममरणाचा ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ हरिबंसचरनबल चतुरभुज गौडदेश तीरथ कियो गायो ॥ भक्तिप्रताप सबहि दासत्व दृढायो ॥
श्रीराधावल्लभभजन अनन्यता वरग बढायो ॥ मुरलीधरकी छाप कबीत अतिही निर्दुखन ॥ भक्तिनिकी अंघ्रिरेणु वहै धारी सिर
भूषन ॥ संतसंग महा आनंदमें प्रेमसहित भीज्यो हियो ॥ हरिबंसचरनबल चतुरभुज गौडदेश तीरथ कियो ॥ हरि० ॥ ११८ ॥ ॥
टी०ओ०॥ चतुर्भुजनामेंभक्तपूर्ण ॥ हितहरिवंशाचेशिष्यजाण ॥ सद्गुरूचरणप्रतापेंकरून ॥ गौडदेशतीर्थकेलेंकीं ॥२॥ ऐसागाइलाभक्ति
प्रताप ॥ सर्वहीदेशहोयनिष्पाप ॥ दास्यत्वाचेंदृढस्वरूप ॥ जनाचेअंगींस्थापिलें ॥ ३ ॥ देवीदेवतासर्वसांडून ॥ राधावल्लभाचेंअन
न्यभजन ॥ हाचिप्रकारवाढविलापूर्ण ॥ गौडदेशांततेधवां ॥ ४ ॥ ऐसेंउत्तमकेलेंकवन ॥ किंचितहीज्यांतनसेदूषण ॥ मुरलीधराची
छापपूर्ण ॥ सकळकवनांतघातली ॥ ५ ॥ भक्तचरणाचेरजःकण ॥ तेचिमस्तकींधरीभूषण ॥ सत्संगाचाआनंदपूर्ण ॥ प्रेमसहितहृदय
भीजलें ॥ ६ ॥ ॥ मू० क० ॥ गौडवानदेश भक्ति लेशहू न देख्यों कहु मानसको मारि इष्ट देवको बढायोहे ॥ तंहा जाय देव
ताको मंत्र ले सुनायो कान लियो उन मानि गांव सुपन सुनायोहे ॥ स्वामी चतुर्भुजजूके बेगि तुम दास होहु नातो होहि नास
सब गांव भज्यो आयोहे ॥ ऐसे शिष्य किये माला कंठि पाइ जिये पाव लीये मन दिये ओ अनंत सुख पायोहे ॥ १ ॥ ॥ टि०
ओ० ॥ गौडबंगाल्यादेशांत ॥ लेशभक्तिचानसेकिंचित ॥ सर्वतेथींचेलोकशाक्त ॥ देवीचेंइष्टवाढलें ॥ ७ ॥ परदेशीकोणीतयादेशांत॥
जातांचिधरोनिनेतित्वरित ॥ देवीचेसन्मुखबळीदेत ॥ बलात्कारेंकरोनी ॥ ८ ॥ ऐसीलोकांतप्रगटलीमात ॥ कोणीनजातीत्यादेशांत ॥
एखादाजोचुकोनिजरीजात ॥ होतसेघाततयाचा ॥ ९ ॥ तंवतीवार्तावृंदावनांत ॥ चतुर्भुजाचेकानींपडत ॥ येरूअंतरींविचारकरीत॥

हाकायअनर्थहोतसे ॥ १० ॥ आपणासअसेहरीचीआज्ञा ॥ भक्तिमार्गासीलाविजेजना ॥ तरीत्यादेशांतजाऊनजाणा ॥ करूंसकळाचा उद्धार ॥ ११ ॥ ऐसाअंतरींविचारकरून ॥ सवेंशतावधीशिष्यघेऊन ॥ गौडदेशासीकरितीगमन ॥ तेव्हांमार्गानेंलोकसांगती ॥१२॥ तुह्मांसीतेथेंजातांदेख ॥ देतीलबळिदानदेवीसन्मुख ॥ ऐसेंऐकतांएकएक ॥ शिष्यपळूनचालिले ॥ १३ ॥ शेवटींएकटेचचतुर्भुज ॥ गौडदेशासीगेलेसहज ॥ तोंधांवोनिजनसमाज ॥ धरोनिनेतीतयातें ॥ १४ ॥ बलिदानद्यावयातेवेळे ॥ देवीसन्मुखउभेकेले ॥ तेव्हांचतुर्भुजकायबोले॥ क्रुद्धहोवोनिदेवीसी ॥ १५ ॥ पूर्वींकायगेकेलेंपाप ॥ विसरोनिआपुलेंआत्मस्वरूप ॥ रांडेजहालीसपाषाणरूप ॥ अझोनिउमजनसेचि ॥ १६ ॥ नरबळीघेतलेअसंख्यात ॥ पापऐसेंहेंकेलेंबहुत ॥ पुढेंतुजहोईलअधःपात ॥ आकल्पनरकाभोगिसी ॥१७॥ ऐसेंचतुर्भुजाचेंवचनऐकोन ॥ देवीसीअनुतापझालापूर्ण ॥ प्रत्यक्षआपणप्रगटहोऊन ॥ अनन्यभावेंचरणधरी ॥ १८ ॥ ह्मणेजीदयाळा कृपाकरून ॥ आतांमजलाकरावेंपावन ॥ महापातकीमीअसेंपूर्ण ॥ तुजविणसमर्थाकोणतारी ॥ १९ ॥ ऐसेंऐकतांदीनवचन ॥ कृपेनें द्रवलेंअंतःकरण ॥ वरदहस्तशिरींठेवून ॥ उपदेशदिधलादेवीतें ॥ २० ॥ महामंत्रश्रवणींओपून ॥ वरीकरीतसेआज्ञावचन ॥ तुझियासंगेंहादेशजाण ॥ असदाचरणीजाहला ॥ २१ ॥ तरीसर्वांसीआज्ञापोन ॥ सन्मार्गासीलावींपूर्ण ॥ तेणेंहोईलपापक्षालन ॥ नातरीपतनतुजघडे ॥ २२ ॥ ऐसेंचतुर्भुजाचेंआज्ञापन ॥ जगदंबेनेंशिरींवंदोन ॥ सर्वगांवींच्याजनांसीजाण ॥ स्वप्नींप्रगटोनिसांगतसे ॥२३॥ स्वामीचतुर्भुजभक्तपूर्ण ॥ माझेमंदिरींउतरलेजाण ॥ तेथेंसर्वांनींत्वरेंयेऊन ॥ व्हावेंदासतयांचे ॥ २४ ॥ मीहीतयांचीझालेंदास ॥ तुह्मीहीसेवाकरावीविशेष ॥ नातरीहोईलसत्यानास ॥ ऐसेंबोलोनिगुप्तझाली ॥ २५ ॥ मनींसर्वांचेहीपडेवचका ॥ प्रातःकाळींचउठोनि देखा ॥ पूजासाहित्यघेऊनसम्यका ॥ चतुर्भुजनिकटींपातले ॥ २६ ॥ करजोडोनिसकलजन ॥ ह्मणतीआह्मासीकरापावन ॥ मगसकळांसीउपदेशून ॥ शिष्यकेलेचतुर्भुजें ॥ २७ ॥ कंठींपावतांतुळसीमाळा ॥ जीवींसंतोषहोयसकळां ॥ मनअर्पोनितयेवेळां ॥ सद्गुरुचरणींलोटले ॥ २८ ॥ सद्गुरूकृपाहोतांसम्यक ॥ सर्वहीपावलेअनंतसुख ॥ जीवेंभावेंकरोनिदेख ॥ सेवाकरितीसद्गुरूची ॥ २९ ॥ ॥

मू०क० ॥ भोग ले लगावे नाना संतनि लडावे कथा भागवत गावे भाव भक्ति विस्तारिये ॥ भज्यो धन लैके कोऊ धनी पाछे पऱ्यो सोऊ
आनिके दबायो बेठि रह्यो न निहारिये ॥ निकसी पुरान बात करे नयो गात दिछा सिक्षा सुनि सिष्य भयो गयो यो पुकारिये ॥ कह्यो
याजनममे न लियो कछु दियो फारो हाथ ले उवारो प्रभुरीती लागी प्यारिये ॥२॥ ॥टी०ओ०॥ मगचतुर्भुजजीभक्तश्रेष्ठ ॥ तेथेंचिराहा
वयाकरितीमठ ॥ सुंदरमंदिरबांधोनिउद्भट ॥ मुरलीधरासीस्थापिलें ॥३०॥ नानाप्रकारेंकरीसेवा ॥ नैवद्यासीमिठाईमेवा ॥ पक्कान्नादिकरो
निवैभवा ॥ देवाधिदेवापूजीतसे ॥३१॥ तैसेचिकोणीत्यागांवात ॥ जेकांयेतीसाधुसंत ॥ तयांचीसेवाकरीअनंत ॥ लडिवाळपणेंकरोनियां
॥३२॥नित्यपुराणभागवत ॥ आपणआपल्यामुखेंसांगत ॥ श्रवणासीलोकयेतीबहुत ॥ भीडअपारहोतसे ॥३३॥ भक्तिभावाचाविस्तार॥ त
यादेशांतझालाफार ॥ ऐसेदयाळूवैष्णववीर ॥ बळेंचिपावनकरितीलोकां ॥३४॥ तोंएकझालाचमत्कार ॥ एकाचेघरांतशिरोनिचोर ॥
धनघेवोनिपळालासत्वर ॥ तोंघरधण्यानेंपाहिलें ॥३५॥ धरावयासीधांवलामागें॥ चोरपळतसेबहुलगबगें ॥ चतुर्भुजाच्यामठांतवेगें ॥ येवो
निबैसलापुराणांत॥३६॥ सावधरावयाआलाजवळ ॥ ऐसीतेणेंजाणोनिवेळ ॥ तेथेंपाहोनिभीडपुष्कळ ॥ त्यामाजीलपोनबैसला ॥३७॥ पुरा
णामाजीप्रेमअद्भुत ॥ तयाचोराचेंजडलेंचित्त ॥ तोंएकवार्तानिघालीत्यांत ॥ चतुर्भुजाच्यामुखानें ॥३८॥ वैष्णवीदीक्षाघेतांउत्तम ॥ तयाचा
होतसेपुनर्जन्म ॥ पूर्वजन्मींचेंसकलकर्म ॥ दग्धहोऊनजातसे ॥ ३९ ॥ ऐसीपुराणींनिघतांगोष्ट ॥ चोरासीअनुतापहोयउद्भट ॥ ह्मणेम्यां
केलेंकर्मभ्रष्ट ॥ नरकअचाटभोगीनमी ॥ ४० ॥ तेव्हांउठोनिलगबगेंसी ॥ शरणरिघोनिचतुर्भुजासी ॥ घेवोनिवैष्णवीदीक्षात्वरेंसी ॥
शिष्यजाहलातेधवां ॥४१॥ लेवोनियांतिलकमाळा ॥ बाहेरीनिघेतेवेळां ॥ तोंसावकारेंकरोनिगलबला ॥ धरोनिघेतलेंतयासी ॥४२॥
तंवतोह्मणेमीनसेंचोर ॥ सावेंकरोनिबलात्कार ॥ धरोनिनेलेंरायासमोर ॥ आणिपुकारकरीतसे ॥ ४३ ॥ तेव्हांभूपतीपुसेचोरासी ॥ ये
रूह्मणेमीयाज़न्मासी ॥ कांहींनकेलेंचौर्यकर्मासी ॥ चतुर्भुजाचाशिष्यअसें ॥ ४४ ॥ चतुर्भुजाचाशिष्यऐकोन ॥ नृपतीशिक्षानकरीजा
ण ॥ ह्मणेयासावाचेंशांतहोयमन ॥ ऐसाप्रकारकांहींकरिजे ॥ ४५ ॥ सद्यस्तप्तजोलोहगोळा ॥ घेइजेअग्नींतूनिकरतळा ॥ येरूहोवोनि

उतावळा ॥ सिद्धजाहलाध्यावयासी ॥ ४६ ॥ प्रभूचीरीतीलागलीगोड ॥ सद्गुरुवचनींविश्वासदृढ ॥ चित्तींनवाटलेंकांहींअवघड ॥ दीधलेंदिव्यरायासी ॥ ४७ ॥ अग्नींतूनतप्तगोळा ॥ काढोनिघेतलाकरतळा ॥ रायेंपहातांतयेवेळा ॥ अनुतापहोयचित्तासी ॥ ४८ ॥ ॥ ॥ मू०क० ॥ राजा झूट मानि कह्यो करो विनप्रान याको साधु ये बिराजमान लै कलंक दियोहे ॥ चले ठोर मारिवेको धारिवेकों सके केसे नैन भरि आये नीर बोल्यो धन लियोहे ॥ कह्यो नृप साचो व्हैके झूटो जिनि हूजे संतमहिमा अनंत कहि स्वामी ऐसो कियोहे ॥ भूप सुनि आयो उपदेश मन भायो शिष्य भयो नयो तन पायो भीज गयो हियोहे ॥ ३ ॥ ॥ टी०ओ० ॥ अहोयादुष्टाच्यावचनेंकरून ॥ वैष्णवासीमींछळिलेंपूर्ण ॥ मगत्यासावासीअसत्यमानोन ॥ रावदूतांसीआज्ञापी ॥ ४९ ॥ ह्मणेयेणेंमजकडोन ॥ अन्यायासीकरविलेंपूर्ण ॥ तरीयासीतुह्मींनेऊन ॥ प्राणरहितकरावेगीं ॥ ५० ॥ अन्यायकरविलामजकडोन ॥ तैसेचिसाधुहेविराजमान ॥ यांसीकलंकलाविलापूर्ण ॥ महादुष्टजनअसेहा ॥ ५१ ॥ ऐसीरायाचीआज्ञाहोतां ॥ सेवकींतयासीधरोनितत्त्वता ॥ मारावयाचेजागीं नेतां ॥ दीर्घस्वरेंतोरडतसे ॥ ५२ ॥ सावासीदुःखीपहातांफार ॥ साधूचेंबहुतकोमलअंतर ॥ कैसातयासीधरवेधीर ॥ नेत्रींनीरभरोनि आलें ॥ ५३ ॥ तेव्हांरायासीह्मणेहेंकाय ॥ यासीनकरींकांहींअपाय ॥ याचाअसोनिसत्यन्याय ॥ तुह्मीअसत्यनकाहोऊं ॥ ५४ ॥ चोरीमींकेलीअसेसत्य ॥ परीसंतांचामहिमाअनंत ॥ उपदेशादीसर्वसाद्यंत ॥ रायालागींनिवेदिलें ॥ ५५ ॥ ऐसेंरायेंकरितांश्रवण ॥ सावकारासीदिलेंसोडून ॥ संतांचेठाईंनिश्चयपूर्ण ॥ रायाचेअंतरींठसावला ॥ ५६ ॥ आपणउपदेशघ्यावावहिलें ॥ ऐसेंरायाचेमनींआलें ॥ लगबगेंउठोनितयेवेळे ॥ चतुर्भुजासीशरणआला ॥ ५७ ॥ सर्वस्वेंसीतनमनधन ॥ सद्गुरुचरणींअर्पणकरून ॥ वैष्णवीदीक्षामंत्रघेऊन ॥ शिष्यजाहालातेधवां ॥ ५८ ॥ रायाचापालटेदेहभाव ॥ ऐसातयासीहोयअनुभव ॥ भक्तीचाअंतरींफुटलाद्रव ॥ भिजोनिगेलेंहृदयत्याचें ॥ ५९ ॥ गुरूचेसदनींसर्वकाळ ॥ संतांचेअनंतयेतीमेळ ॥ तयांचीसेवाव्हावीनिर्मळ ॥ ह्मणोनिभूपतीकायकरी ॥ ६० ॥ बोलाऊनियांकामदार ॥ जमीनजागाजहागीर ॥ गुरूचेनांवेंपरंपरासत्वर ॥ सनदकरोनदीधली ॥ ६१ ॥ ॥ मू०क० ॥ पकि रह्यो खेत

संत आयकरि तेरि लेत जिते रखवारे मुख सेत सोर कियोहे ॥ कह्यो स्वामीनाम सुन्यो कहो बडो काम भयो यहतो हमारो सोइ आपु
सुनि लियोहे ॥ लैके मिष्टान्न आपु सुमुख बखान कियो लियो आपनाइ आछु भीज्यो मेरो हियोहे ॥ लैगये लिवाइ नानाभोजन क
राइ भक्तिचरचा चलाइ चाइ हित रस पियोहे ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ चतुर्भुजाचेशिष्यथोर ॥ त्यावरीठेवितीरक्षणार ॥ पेरणी
आदिकरोनिसत्वर ॥ पैसावसूलकरिताती ॥ ६२ ॥ एकदाऐसेंझालेंजाण ॥ शेतीपिकोनिआलीसघन ॥ तोंसहस्रावधीसंतजन ॥ त
यामार्गानेंपातले ॥ ६३ ॥ त्यांसीक्षुधालागलीबहुत ॥ सर्वहीशिरोनत्याशेतांत ॥ आपुल्याहातेंमनःपूत ॥ ओंब्यातोडूनभक्षिती ॥६४॥
तोंशेताचेरक्षणार ॥ तेव्हांधांवलेकरीतपुकार ॥ संतसमुदायपाहोनिथोर ॥ मुखपांढरेंपडिलेंकीं ॥ ६५ ॥ मगबोलोनिदावितीभीती ॥
चतुर्भुजरायाचेगुरुनिश्चिती ॥ त्यांचीखुद्दहेअसेशेती ॥ तोडितांतुह्मासीशिक्षाहोईल ॥ ६६ ॥ चतुर्भुजाचेंनांवऐकतां ॥ संतांसीआनंद
होयचित्ता ॥ उत्तमकामहेंझालेंतत्त्वता ॥ तोतरीआमुचाअसेकीं ॥ ६७ ॥ सेवकांह्मणतीसाधुजन ॥ जरीचतुर्भुजाचेंशेतजाण ॥ तरी
तेंआमुचेंसत्यपूर्ण ॥ कांहींअनुमाननसेकीं ॥ ६८ ॥ तेव्हांसेवककरीतवटवट ॥ चतुर्भुजाच्याआलेनिकट ॥ ह्मणतीयेऊनसंतबहुवट ॥
करितीउजाडसर्वशेता ॥ ६९ ॥ आह्मींतुमचेंनांवसांगतां ॥ तेह्मणतीतोआमुचातत्त्वता ॥ निर्भयकरोनिआपुल्याचित्ता ॥ सर्वपिकातें
भक्षिती ॥ ७० ॥ ऐसेंत्यांचेंऐकतांवचन ॥ चतुर्भुजासीयेगहिंवरोन ॥ ह्मणेकींसकलसंतांनींजाण ॥ आपुलेंह्मणोनिमजवदले ॥७१॥
परमानंदमनींहोवोन ॥ मणोगणतीगूळघेऊन ॥ शेतावरीपातलेआपण ॥ नमनकरीतसंतांसी ॥ ७२ ॥ कंठयेतसेगहिंवरोन ॥ मुखेंसं
तांचेंकरीवर्णन ॥ ह्मणेजीमजअनाथाकारण ॥ आपुलाह्मणोनिअंगिकारिलें ॥ ७३ ॥ आजिमाझेंअंतःकरण ॥ रंगामाजीभिजलेंपूर्ण ॥
आतांकोरडेनखावेकण ॥ ह्मणोनिगूळवांटीतसे ॥ ७४ ॥ मगसकळांचाआदरकरोन ॥ घरासीनेलेसंतसज्जन ॥ करोनियांपंचपक्वान्न ॥
करविलेंभोजनसकळांसी ॥ ७५ ॥ ऐसीसर्वांचीकरोनिअर्चा ॥ मगआरंभोनिभगवच्चर्चा ॥ हितमानोनिनामामृताचा ॥ रसप्राशिलाम
नोत्साहें ॥ ७६ ॥ ऐसासज्जनींउत्साहपरम ॥ नृलोकींतयाचासफलजन्म ॥ तयापुरुषाचीलीलाउत्तम ॥ कितीमीमापरवर्णूंशकें ॥७७॥

मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशेंअठरावाछप्पागोडहा ॥ ७८ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरूहृषीकेशा ॥ आवरींमाझ्याइंद्रियांअशेषां ॥ कृपाकरोनिसर्वाध्यक्षा ॥
आपुल्याभजनींविनटवीं ॥ १ ॥ मू०क० ॥ चलककी चरचरी चंहुदिस उधधीअंतलो अनुसरी ॥ सक्रकोपि शुठ चरित प्रसिद्धि पु
न पंचाध्याई ॥ कृष्णरुक्मिनीकेलि रुचिर भोजनविधि गाई ॥ गिरिधरनकी छाप गिरा जलधर ज्यों गाजे ॥ संतसिखंडी खंड हृदै
आनंदके काजे ॥ जाडा हरन जगि जाडता कृष्णदास देही धरी ॥ चालककी० ॥११९॥ ॥ टी०ओ०॥ कृष्णदासकविप्रसिद्ध ॥
तयाच्यारचनेचेछंदबंद ॥ चारीदिशांसींसमुद्रपर्यंत ॥ प्रख्यातझालीभूवरी ॥२॥ इंद्रासीहीआवडेसुंदर ॥ जगामाजीप्रसिद्धफार ॥ तैसीच
पंचाध्यायीमनोहर ॥ प्रेमेंकरोनवर्णिली ॥३॥ कृष्णरुक्मिणीचीलीलारुचिर ॥ रुक्मिणीमंगलग्रंथथोर ॥ तैसाचिभोजनविधिप्रकार ॥ प्रेमयु
क्तगाइला ॥४॥ ज्यामाजीउपजेप्रेमस्वरूप ॥ ऐसीकविताकेलीअमूप ॥ गिरिराजधराचीसुंदरछाप ॥ सर्वकवनांतघातली ॥ ५ ॥ काय
तयाचेंवर्णूंकवन ॥ मेघासारिखेंगिरागर्जन ॥ सज्जनहेचिमयूरजाण ॥ ऐकतांजयासीगोडवाटे ॥ ६ ॥ हृदयींआनंदव्हावयासंतां ॥ सीतह्मण
जेहेजगाचीजडता ॥ याचेंहरणकरायातत्त्वता ॥ कृष्णदासानेंधरिलादेह ॥ ७ ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥
महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशेंएकोणिसावाछप्पागोडहा ॥ ८ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयजयसद्गुरूपद्मनाभा ॥ पूर्णआपुलीदावींशोभा ॥ निवटींमायेचीसकलआभा ॥
कृपाकरोनिमजवरी ॥ १ ॥ ॥ मू०छ० ॥ विमलानंदप्रबोधवंश संतदास सींवा धरम ॥ गोपीनाथपदराग भोग छपन भुंजा
ये ॥ पृथुपद्धित अनुसार देव दंपति दुलराये ॥ भगवत भक्त समानठोर द्वैको बल गायो ॥ कवित्त सूरसो मिलत भेद कछु जात न
पायो ॥ जनमकरमलीलाजुगति रहसिभक्तिभेदी परम ॥ विमलानंद० ॥ १२० ॥ ॥ टी०ओ० ॥ विमलानंदाचावंशसुंदर ॥ तया
सीकेवळप्रबोधकर ॥ संतदासहेभक्तथोर ॥ धर्माचीशिंवचिजन्मले ॥ २ ॥ गोपीनाथचरणींअनुराग ॥ छप्पन्नप्रकारेंकरोनिभोग ॥ हरी

सीभोजनघातलेंसांग ॥ कायतेरीतीवर्णूंमी ॥ ३ ॥ पृथुरायाचीजैसीपद्धती ॥ त्याचिअनुसारेंयाचीरीती ॥ राधाकृष्णाचेलाडनिश्चिती ॥
अनेकप्रकारेंपुरविले ॥ ४ ॥ भगवंतआणिभक्तसज्जन ॥ दोघांचेठिकाणींभावसमान ॥ उभयतांचेंबलगायन ॥ सप्रेमयुक्तकेलेंकीं ॥ ५ ॥
सुरदासाचेंजैसेंकवित ॥ तयासीचयाचेमेळखात ॥ शोधूनपाहतांकवनांत ॥ भेदनतयांतपावला ॥६॥ जन्मकर्मादिलीलानिर्मल ॥ ऐ
श्याउक्तीनेंवर्णिलीसरळ ॥ एकांतभक्तीचेंमर्मसकळ ॥ तयाचाभेदगाइला ॥ ७ ॥ ॥ मू०क० ॥ वसत निमाइग्राम शांमसो लगाइ
मति ऐसी मन आइ भोग छपन लगायेहे ॥ प्रीतिकी सचाई यह जगमे दिखाइ सेवे जगन्नाथदेव आप रुचिसो जिमायेहे ॥ राजा
को सुपन दियो नाम लै प्रगटकियो संतहीके ग्रह मेतो जेवो यों रिझायेहे ॥ भक्तिके अधीन सब जानत प्रवीनजन ऐसेहे
रंगीन लाल ठौरठौर गायेहे ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ निमाइग्रामींअसेवास ॥ नामजयाचेंसंतदास ॥ हरीचेठायींप्रीतीसरस ॥ सर्व
कालमतीलाविली ॥ ८ ॥ सर्वदाहरीचीकरीसेवा ॥ प्रपंचीधंदातोचिअघवा ॥ कष्टकरोनिअनेकवैभवा ॥ हरीसीअर्पणकरितसे ॥ ९ ॥
एकदांऐसेंआलेंमनांत ॥ कींनीलाचलींजगन्नाथ ॥ तयासीछप्पन्नभोगहोत ॥ तैसेंचिआपणकरूंदेवा ॥ १० ॥ अनेकप्रकारेंकष्टकरून ॥
शिधासाहित्यमेळवोन ॥ छप्पन्नभोगसिद्धकरून ॥ मनींआमंत्रीजगन्नाथा ॥ ११ ॥ ऐसेंतयाचेंप्रेमपाहून ॥ भक्तवत्सलश्रीजगज्जीवन ॥
प्रीतीचेंजगांतसत्यपण ॥ दाविलेंआपणप्रगटहोवोनी ॥ १२ ॥ पोटींनावरेप्रेमपान्हा ॥ प्रत्यक्षबैसलेआपणभोजना ॥ संतदासेंहेंपहातां
जाणा ॥ निमग्नझालाप्रेमांत ॥ १३ ॥ लगबगेंकरूनताटवाढिलें ॥ छप्पन्नप्रकारचेभोगठेविले ॥ रुचीनेंहरीसीजेवूंघातलें ॥ आपुल्याह
स्तेंकरूनियां ॥ १४ ॥ तेव्हांश्रीजगन्नाथआपण ॥ सप्रेमयुक्तजेविलेभोजन ॥ तांबूलत्रयोदशगुणीघेऊन ॥ गुप्तजाहलेतेधवां ॥ १५ ॥
संतदासासीपरमानंद ॥ इकडेकायकरीगोविंद ॥ स्वप्नींरायाच्याप्रगटोनिविशद ॥ सप्रेमयुक्तसांगतसे ॥ १६ ॥ नामतयाचेंप्रगट
केलें ॥ आजिसंतदासाच्याघरींवहिलें ॥ यथेच्छमाझेंभोजनझालें ॥ प्रीतीनेंकेलेंवश्यबहु ॥ १७ ॥ उदईकछप्पन्नभोगजाण ॥
तुह्मीनमजलाकरावेंअर्पण ॥ क्षुधानसेचिमजलागोन ॥ तृप्ततयानेंकेलेंबहू ॥ १८ ॥ ऐसेश्रीहरीभक्ताधीन ॥ जेतच्चरणींप्रवीणज

न ॥ तेचिसर्वहीजाणतीखूण ॥ ऐसारंगीनसेहरी ॥ १९ ॥ यापरीभक्तप्रेमळअनेक ॥ तयांचेंहरीनेंकेलेंकौतुक ॥ जागोजागींपुराणींदेख ॥ सज्जनींसम्यकगाइलेकीं ॥ २० ॥ मूलभक्तिमालिकाग्रंथ ॥ भक्तिरसबोधिनीटीकाख्यात ॥ महाराष्ट्रभाषेंतभक्तिप्रेमामृत ॥ एकशें विसावाछप्पागोडहा ॥ २१ ॥ श्रीत्र्यंबकेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीत्र्यंबकेश्वरायनमः ॥ जयसद्गुरुदामोदरा ॥ त्वरेंउद्धरींमजपामरा ॥ जन्ममृत्यूच्यापडिलोंघेरा ॥ तुजविणदाताराकोणसोडवी ॥ १ ॥ ॥ मू०छ०॥ मदनमोहनसूरदासकी नामसृंखला जुरी अटल ॥ गानकाव्यगुनरासि सुहृद सहचरि अवतारी ॥ राधाकृष्णउपासिक रहसिसुखके अधिकारी ॥ नवरसमुख्यसिंगार विविधिभातिनिकरि गायो ॥ वदनउच्चरतबेर सहसपायनव्है धायो ॥ अंगिकारकी अवधि यह ज्यो आख्या भ्राता जमल ॥ मदनमोहन० ॥ १२१ ॥ ॥ टी०ओ० ॥ सूरध्वजनामें ब्राह्मण ॥ श्रीकृष्णचरणींपरमलीन ॥ सुरदासमदनमोहन ॥ गाजवीनामआपुलें ॥ २ ॥ उभयनामांचीएकसांखळ ॥ अक्षय्यजुडोनिगेलीसरळ ॥ गायनकाव्यामाजीसकळ ॥ गुणांचीराशीजाहले ॥ ३ ॥ श्रीहरीचेपरमसुहृद ॥ सहचरगोपींचाअवतारविशद ॥ राधाकृष्णाचीउपासनाशुद्ध ॥ आणीकदेवतानजाणती ॥ ४ ॥ राधाकृष्णाचेंएकांतसुख ॥ त्याचेअधिकारीहेअसतीसम्यक ॥ नवरसहीवर्णिलेठीक ॥ परीश्रृंगारबहुगाइला ॥ ५ ॥ विविधप्रकारेंकरून ॥ श्रृंगाराचेंकेलेंवर्णन ॥ सर्वकवनांतमदनमोहन ॥ नामआपुलेंघातलें ॥ ६ ॥ कायकवनाचासांगूंप्रकार ॥ उच्चारहोण्याचाकायतोउशीर ॥ तितुक्यामाजीपृथ्वीवर ॥ सहस्रपायहोऊनधांवतसे ॥ ७ ॥ कितीकवनाचीसांगूंयोग्यता ॥ अंगिकाराचीअवधीतत्त्वता ॥ महापाप्याच्यामुखासीस्पर्शतां ॥ तत्काळउद्धरीतयातें ॥ ८ ॥ उभयतांबंधुयमलार्जुन ॥ जगींतयांचीख्यातीजाण ॥ श्रीकृष्णाचालागतांचरण ॥ तत्काळउद्धारहोयत्याचा ॥ ९ ॥ तैसाचिकवनाचाअसेप्रकार ॥ कैसाहीपातकीअसोनर ॥ मुखासीस्पर्शहोतांसत्वर ॥ होतसेउद्धारतयाचा ॥ १० ॥ ॥ मू०क० ॥ सुरदासनाम नैनकंजअभिराम फूले झूले रंग पीके नीके जीके ओर ज्यायेहे ॥ भये सो अमीन यों संडीलेके नवीन रीति प्रीति गुर देखि दाम वीसगुने लायेहे ॥ कही पुवा पावे

आप मदनगुपाल लाल परे प्रेमख्याल लादि छकरा पठायेहे ॥ आयो निसि भयें शाम कियो आज्ञा जोग लैके अवही लगावो
भोग जागि फिरि पाछेहे ॥ १ ॥ ॥ टी०ओ० ॥ सुरदासहेंनामचिकेवळ ॥ परंतुसुंदरप्रफुल्लितनिर्मळ ॥ तयाचेंहोतेंनेत्रकमळ ॥ भ
क्तपरमअसेकीं ॥ ११ ॥ भक्तिरंगाचेंकरोनिप्राशन ॥ त्यामाजीसर्वदाझुलेआपण ॥ त्यांतचिउत्तमनिमग्नराहून ॥ तेचिउद्गारनिघतीस
दा ॥ १२ ॥ प्रारब्धवशेंकरून ॥ बादशाहाचीकृपापूर्ण ॥ पूर्वेंससंडिलागांवजाण ॥ सुभेदारकेलेतेथींचे ॥१३॥ परीतयाचेंसर्वदाचित्त॥
फिरतसेश्रीवृंदावनांत ॥ मदनगोपाळश्रीकृष्णनाथ॥ तयासींप्रीतीलागलीसे ॥१४॥ पदार्थींमाजीमालपूवा ॥ हिंदुस्थानांतहोतसेबरवा॥
तोआवडेदेवाधिदेवा ॥ नित्यनैवेद्यतोचिहोय ॥१५॥ एकदासूरदासबाजारांत ॥ संडिल्यामाजीफिरतफिरत ॥ नेत्रींपाहिलागूळतेथ॥
अतिशयउत्तमअसेकीं ॥ १६ ॥ कायतयाचीसांगूंरीती ॥ नवीनचितेंव्हांउपजेप्रीती ॥ ऐसेंतयाच्याआलेंचित्तीं ॥ कींहेंप्रभूच्यायोग्य
होय ॥ १७ ॥ मालपूव्यांतगूळपरिकर ॥ पडतांपदार्थहोईलसुंदर ॥ दूतासीआज्ञाकरीसत्वर ॥ गूळसर्वहीविकतघ्या ॥ १८ ॥ गाडेचे
गाडेभरून ॥ वृंदावनींद्यापाठवोन ॥ तेव्हांविनवितीसेवकजन ॥ महाराजयांतपडेलतोटा ॥ १९ ॥ जितुक्यांतयेथेंगूळमिळेल ॥ वीस
पटत्याच्याभाडेंपडेल ॥ आपुलेंबहुतद्रव्यखर्चेल ॥ चित्तींविचारपहावा ॥ २० ॥ मदनमोहनसूरदास ॥ कायतयांसीबोलतीसुरस ॥ दे
वायोग्यहापदार्थविशेष ॥ कायखर्चाकडेपहातां ॥२१॥ मुख्यगोपालजीहोयसंतुष्ट॥ तेंचिआह्मासीकरणेंस्पष्ट॥ वीसपटकायचाळीसपट॥
द्रव्यआमुचेंखर्चोकीं ॥ २२ ॥ मदनगोपालश्रीदेवाधिदेवा ॥ पावोकींतयासीमालपूवा ॥ हेंचिआवडेआमुच्याजीवा ॥ लक्षद्रव्याक
डेनसेची ॥ २३ ॥ ऐसेंसेवकांसीबोलून ॥ गूळसर्वहीविकतघेऊन ॥ गाडेचेगाडेभरोन ॥ वृंदावनासीपाठवी ॥ २४ ॥
बरोबरदिधलेसेवकजन ॥ दरमजलतेगेलेघेऊन ॥ दोनप्रहररात्रींजाण ॥ वृंदावनासीपोहोंचले ॥ २५ ॥ गोपालजीच्यामं
दिराजवळ ॥ सेवकेंगाड्याआणिल्यासकळ ॥ गुसांइजीसीकळतांतेवेळ ॥ कायसांगूनधाडिलें ॥ २६ ॥ निद्रापन्नमदनगोपाळ ॥
गडबडहोईलभरतांगूळ ॥ जागेहोतीलह्मणोनिसकल ॥ तैशाचिगाड्याराहूंद्या ॥ २७ ॥ प्रातःकाळींघेऊंभरोन॥ ऐसेंसेवकांनिरोपून ॥

गुसांईनिद्राकरितीआपण ॥ तोंकायचमत्कारझाला ॥२८॥ भक्तवत्सलजगज्जीवन ॥ सदाभक्तांचेप्रेमाधीन ॥ स्वप्नींगुसांईच्याप्रगटोन ॥
कायआपणआज्ञापिती॥२९॥भूकलागलीमजलाबहुत ॥ तुह्मीआतांचिउठोनित्वरित ॥ सूरदासेंजोधाडिलायेथ ॥ गूळउत्तममजलागीं ३०
तोआवडेबहूतयेव्हां ॥ आतांउठोनिमालपूवा ॥ करोनिनैवेद्यमजअर्पावा ॥ तेणेंहीक्षुधाराहेल ॥३१ ॥ मागोनिसकाळींजागल्यावर ॥ म
हानैवेद्यतैंकरावाथोर ॥ मालपूवाकरोनिअपार ॥ मजलागोनिअर्पावा ॥३२॥ परंतुहल्लींथोडाकरून ॥ करावेंमाझेंक्षुधाहरण ॥ गुसांईते
व्हांलगबगेंउठोन ॥ मालपूवाकरोनअर्पिती ॥ ३ ॥ विश्वंभरजोजगज्जीवन ॥ तृप्तजाहलातेणेंकरून ॥ मुख्यभक्ताचेंजैसेंमन ॥ तैसा
चिआपणहोयउतावळा ॥३४॥ सुरदासाचीऐसीप्रीती ॥ वश्यजाहलाश्रीजगत्पती ॥ उठोनियांअर्धरात्री ॥ करीभक्षणमालपूवा ॥ ३५॥
॥ ॥ मू०क० ॥ पद ले बनायो भक्तिरूप दरसायो दूरि संतनकी पानहीको रछक कहाउ मे ॥ काहु सीखि लियो साधु लियो
चाहे परचेको आये द्वार मंदिरके खोलि कंही आउ मे ॥ रह्यो बैठि जाइ जू जि हाथमे उठाय लीनी कीनी पूरि आस मेरी निसि
दिन गाउ मे ॥ भीतर बुलावे श्रीगुसांइ बार दोइ चारी सेवा सोपि सारि कह्यो जन पद्ध्याउमे ॥ २ ॥ ॥ टी०ओ० ॥ ऐसेसूरदा
सभक्तप्रेमळ ॥ भजनींरंगलेसर्वकाळ ॥ गोपालजीचेगुणनिर्मळ ॥ कवनकरोनिगातसे ॥ ३६ ॥ एकदाऐसेंपदगाइलें ॥ त्यामाजीभक्तिस्व
रूपदाविलें ॥ कैसातरीमीतुझावहिलें ॥ कवण्याअनाथाशरणजाऊं ॥३७॥ तुझ्यासंतांचेंपादचर्म ॥ त्याचारक्षकमीबोलिजेउत्तम ॥ माझी
गतीतूंविश्रामधाम ॥ तुझेनीअनेकसुखपावे ॥३८॥ ऐसियाअर्थाचेंकेलेंपद ॥ भूवरीतेंप्रगटलेंविशद ॥ कोणीएकसाधूस्वच्छंद ॥ तेणेंहेंकव
नऐकिलें ॥३९॥ ह्मणेतोकींमहासरदार ॥ संडिल्याचाअसेसुभेदार ॥ ऐश्वर्याचाअसोनिभर ॥ कायहेंपदांतबोलतसे ॥४०॥ कींसंतांचापान
हधर ॥ मजलाआश्चर्यवाटेथोर ॥ तरीतयाचीप्रसंगानुसार ॥ परीक्षापाहीनएकदा ॥ ४१ ॥ तेंपदठेविलेंशिकोन ॥ तंवसूरदासमदनमो
हन ॥ वृंदावनासीआलेजाण ॥ ध्यावयादर्शनगोपालजीचें ॥ ४२ ॥ पालखीमाजीबैसोन ॥ भोंवतेशतावधीसेवकजन ॥ गर्जतीचो
पदारबंदीजन ॥ यापरीमंदिरापातले ॥ ४३ ॥ तंवतोसाधूआलाजाण ॥ जेणेंघोकिलेंहोतेंकवन ॥ सुरदासासीपहातांतेण ॥ कायआ

पणकरीतसे ॥ ४४ ॥ मंदिराच्याद्वारापाशीं ॥ उभाराहूनवदेआवेशीं ॥ अहोमीजातसेंदर्शनासी ॥ कोणीतरीजोडासांभाळावा ॥४५॥
जोंवरीयेतोंदर्शनकरून ॥ तोंवरीयाचेंकरावेंरक्षण ॥ ऐसेंबोलोनिस्पष्टभाषण ॥ जोडाकाढोनठेवीतसे ॥ ४६ ॥ सूरदासमदनमोहन ॥
तेणेंतयाचेंऐकिलेंभाषण ॥ लगबगेंआपणपालखींतून ॥ उतरोनिधांवतआलातेथें ॥ ४७ ॥ जोडाउचलोनिहातीं घेतला ॥ शिरींवंदो
निजवळठेविला ॥ ह्मणेहेदेवापूर्णकृपाळा ॥ अहोरात्रमीगातहोतों ॥ ४८ ॥ बहुदिवसांचाहेतूहोता ॥ तोआजिपूर्णकेलातत्त्वता ॥ ऐ
साआनंदमानोनिचित्ता ॥ तेथेंचिबैसेदारापाशीं ॥४९॥ ऐसाचमत्कारसंतेंपाहून ॥ ह्मणेमीपुरतीपरीक्षापाहीन ॥ कोठवरीहाजोडाघेऊ
न ॥ येथेंचिबैसलाराहेलकीं ॥५०॥ ऐसाविचारकरून ॥ अंतरींबैसलाजाऊन ॥ बाहेरकांहींनयेचिआपण ॥ बहुतवेळझालीसे ॥ ५१ ॥
मंदिरींचेजेमहंत ॥ तयांसीकळलावृत्तांत ॥ कींसूरदासजीआलेयेथ ॥ बाहेरबैसलेआहेती ॥ ५२ ॥ तिहीं धाडिलेंपाचारण ॥ दोनचार
वेळेसीजाण ॥ सूरदासजीतेव्हांआपण ॥ कायसांगूनधाडिती ॥ ५३ ॥ हरीनेंमाझ्यामनातुल्य ॥ सेवासोंपोनिदिलीनिर्मळ ॥ सज्जना
चेंचरणकमळ ॥ ध्यानकरीतबैसलोंमी ॥ ५४ ॥ ऐसात्याचायेतांनिरोप ॥ त्यासाधूसीहोयअनुताप ॥ गुसांइजीच्यायेऊनसमीप ॥ स
र्वहीवृत्तसांगतसे ॥ ५५ ॥ अहोमीत्याचीपाहिलीपरीक्षा ॥ परीतयाचीपूर्णशिक्षा ॥ सज्जनांचेचरणींलक्षा ॥ पूर्णपणेंठेवीतसे ॥ ५६ ॥
मगतोसाधुआणिगुसांई ॥ बाहेरयेऊनतैंलवलाहीं ॥ सूरदासासीधरोनिबाहीं ॥ पाठीथापटोनिनेतीमंदिरा ॥ ५७ ॥ ॥ मू०क० ॥
पृथ्वीपती संपति ले साधुनि खवाइ दई भई नही संक यो निसंक रंग पागेहे ॥ आये सो खजाने लेन मानो यह बात अहो पाथ
र ले भरे आप अधीनिस भागेहे ॥ रुका लिखि डारे हम गटके ये संतनिने याते हम सटके हे चले जब जागेहे ॥ पहुंचे हजूर
भूप खोलिके संदूक देखे पेखे अंक कागदमे रीझे अनुरागेहें ॥ ३ ॥ ॥ टी०ओ० ॥ असोयावरीसंडिल्यांत ॥ बादशाहाकडोनि
वहिवाटकरीत ॥ जोकांहींपैसाउत्पन्नहोत ॥ तोसंतसेवनींलावीतसे ॥ ५८ ॥ ऐसेकितीएकदिवसझाले ॥ तेरालक्षरुपयेखर्चकेले ॥सत्सं
गींमनरंगोनिगेलें ॥ निःशंकझालेतयायोगें ॥ ५९ ॥ बादशाहासीहेंकळेल ॥ जेव्हांतयासीरागयेईल ॥ तेव्हांमाझेंतोकायकरील ॥ ऐ

सीनआलीमनींशंका ॥ ६० ॥ जेंकांहींउत्पन्नहोतसेधन ॥ तेणेंसंतांसीघालीभोजन ॥ ऐसेलोटतांबहुतदिन ॥ बादशाहाचेमनींआलें
॥ ६१ ॥ अहोजाहलेबहुतदिन ॥ संडिल्याचेंकायउत्पन्न ॥ अद्यापनाहींआलेंजाण ॥ तरीतगादाधाडावा ॥ ६२ ॥ मगखजिनाध्याव
यासी ॥ बादशाहधाडीबहुसेनेसी ॥ ह्मणेजाऊनसंडिल्यासी ॥ सूरदासासीगांठावे ॥ ६३ ॥ त्यांपासूनयावेंद्रव्यघेऊन ॥ नातरीतगादा
करावाजाण ॥ यापरीआज्ञाहोतांजाण ॥ आलेंसैन्यसंडिल्यासी ॥ ६४ ॥ सूरदासासीगांठितीयेऊन ॥ येरूपाहतांवचकेपूर्ण ॥ कायत
यांसीबोलेवचन ॥ आजिमीखजिनादेतोंकीं ॥६५॥ मार्गींबहुतलूटमार ॥ ह्मणूननधाडिलाआजिवर ॥ आतांहेंसैन्यआलेंफार ॥ तरी
मीहाजरकरितोंकीं ॥ ६६ ॥ ऐसेंतयांसीभाषणकरून ॥ अर्धरात्रीसीउठोनिआपण ॥ सर्वसंदुकींतखडेभरून ॥ आणोनिठेविल्यागाड्यां
वरी ॥ ६७ ॥ सर्वसंदुकींततेधवां ॥ आपुल्याहस्तेंलिहोनिदोहा ॥ बादशाहासीनिरोपअवघा ॥ कळवोनिदीधलात्यामाजी ॥ ६८ ॥
॥ ॥ दोहा ॥ तेरहलाख संडीले उपजे सबसाधनि मिलि गटके ॥ सूरदासमदनमोहन अधिरातिको सटके ॥ १ ॥ ॥ ओवी ॥
